# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र

**सत्र–५ पेपर ११** DSE - E 70

# धर्माचे समाजशास्त्र

**(Sociology of Religion)**

**सत्र–६ पेपर १६** DSE - E 195

# नागर समाजशास्त्र

**(Urban Sociology)**

**बी. ए. भाग–३ : समाजशास्त्र**

(शैक्षणिक वर्ष २०२१–२२ पासून)

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०२२
बी. ए. भाग-३ समाजशास्त्र पेपर (११ व १६) करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : ३००**

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
प्रभारी कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर-४१६ ००४.

■

ISBN- 978-93-92887-69-7

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

## दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### ■ सल्लागार समिती ■

**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
अतिरिक्त सचिव-II
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**प्रा. (डॉ.) आर. के. कामत**
प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
प्रभारी अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्य (डॉ.) आर. जी. कुलकर्णी**
प्रभारी अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
प्रभारी कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. जी. आर. पळसे**
प्रभारी संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. ए. बी. चौगुले**
प्रभारी वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. के. मोरे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


**समाजशास्त्र अभ्यासमंडळ**

अध्यक्ष - **डॉ. मच्छिंद्र सकटे**

सौ. मंगलाताई रामचंद्र जगताप कॉलेज, उंब्रज, जि. सातारा

- **डॉ. अरुण विठ्ठल पौडमल**
  यशवंतराव चव्हाण कॉलेज (के.एम.सी.)
  कोल्हापूर
- **प्रा. डॉ. जे. एच. कराडे**
  समाजशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. श्रीमती प्रतिमा शहाजीराव पवार**
  समाजशास्त्र अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. संजय हिंदुराव शिंदे (सनदे)**
  सरदार बाबासाहेब माने कॉलेज,
  रहिमतपूर, जि. सातारा
- **डॉ. रमेश हिंदुराव पाटील**
  श्रीमती के.आर.पी. कन्या महाविद्यालय,
  उरुण-इस्लामपूर, जि. सांगली.
- **डॉ. सतीश सर्जेराव देसाई**
  एस. एम. डॉ. बापूजी साळुंखे कॉलेज,
  मिरज, जि. सांगली

# प्रस्तावना

शिवाजी विद्यापीठाच्या दूर शिक्षण विभागाअंतर्गत बी. ए. पदवी अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या आणि समाजशास्त्र विषयाची निवड केलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे मी पेपर क्र. ११ (धर्माचे समाजशास्त्र) व पेपर क्र. १६ (नागर समाजशास्त्र) चे संपादक या नात्याने आपले मनःपूर्वक स्वागत करतो. शिवाजी विद्यापीठाचा समाजशास्त्र विषयाचा विद्यमान पदवी अभ्यासक्रम एकूण तीन वर्षाचा असून या विषयाची बी.ए. पदवी संपादन करण्यासाठी विद्यार्थ्यांना सत्रपद्धतीनुसार एकूण सोळा पेपर्सचा अभ्यास करावा लागतो. प्रथम वर्षासाठी पेपर क्र. १ व २, द्वितीय वर्षासाठी पेपर क्र. ३ ते ६ तर तृतीय वर्षासाठी पेपर क्र. ७ ते १६ हे पेपर्स अभ्यासावे लागणार आहेत. त्यामध्ये आतापर्यंत आपण पेपर क्र. १ ते ६ अभ्यासले असून बी.ए. च्या शेवटच्या वर्षासाठी पुढील पेपर्स क्र. ७ ते १६ यांचा अभ्यास करावा लागणार आहे.

बी. ए. भाग-३ मध्ये शिकत असलेल्या समाजशास्त्राच्या विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोनातून सत्र ५ साठी पेपर क्रमांक ११ ''धर्माचे समाजशास्त्र'' यामध्ये धर्माचे आकलन, धर्माच्या अभ्यासाचे दृष्टीकोण, भारतातील धर्म, धर्म आणि सामाजिक परिवर्तन आणि सत्र ६ साठी पेपर क्रमांक १६ ''नागर समाजशास्त्र'' यामध्ये नागर समाजशास्त्राचा परिचय, नागर समाजशास्त्रातील प्रमुख संकल्पना, नागरीकरणाची प्रक्रिया, नागरी सामाजिक संरचना हे अतिशय महत्त्वपूर्ण असे पेपर आहेत.

ज्यावेळी विविध समाजशास्त्रीय विचारवंतांचा अभ्यास त्यांच्या उपघटकानुसार केला जाईल त्यावेळी आपणास या समाजशास्त्रज्ञांची वैचारिक-सैद्धांतिक बैठक समजून येईल. अर्थात पाश्चात्य विचारवंतांवर सोप्या भाषेत पुस्तक लिहिणे हे तसे खूप अवघड काम मानावे लागेल. परंतु माझ्या सर्व अभ्यासू सहकाऱ्यांनी त्यांच्यावर सोपविलेल्या घटकांचे लिखान अतिशय अभ्यासपूर्ण असे केल्यामुळे सदरचे पुस्तक माझ्या दृष्टीने परिपूर्ण झाले आहे अशी माझी श्रद्धा आहे.

शेवटी संपादक या नात्याने आम्ही सर्वप्रथम मा. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, दूर शिक्षण केंद्राचे संचालक डॉ. डी. के. मोरे, शिवाजी विद्यापीठ समाजशास्त्र विभागप्रमुख व अभ्यासमंडळाचे चेअरमन डॉ. मच्छिंद्र सकटे, समाजशास्त्र विद्याशाखेशी संबंधित सर्व प्राध्यापक आणि दूर शिक्षण केंद्रातील सर्व प्रशासकीय सेवकांचे मोलाचे सहकार्य मिळाल्यामुळेच आम्हाला संपादकीय जबाबदारी व्यवस्थितपणे पार पाडणे शक्य झाले हे आम्ही प्रामाणिकपणे कबूल करू इच्छितो. वरील सर्वांचे आम्ही शतशः ऋणी आहे.

**■ संपादक ■**

**प्रा. अर्चना जगतकर**
न्यू कॉलेज, शिवाजी पेठ,
कोल्हापूर, जि. कोल्हापूर

**डॉ. मच्छिंद्र सकटे**
सौ. मंगलाताई रामचंद्र जगताप कॉलेज,
उंब्रज, जि. सातारा

दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर

**पेपर–११ धर्माचे समाजशास्त्र**
**पेपर–१६ नागर समाजशास्त्र**
बी. ए. भाग–३ : समाजशास्त्र

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखन सहभाग | सत्र–५ घटक क्रमांक | सत्र–६ घटक क्रमांक |
|---|---|---|
| **डॉ. संभाजी कांबळे**<br>श्रीपतराव चौगुले आर्टस ॲण्ड कॉमर्स, सायन्स कॉलेज, माळवाडी कोतोली, ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर | १, ३ | – |
| **प्रा. बबन रणजित पाटोळे**<br>सहा. प्राध्यापक, दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर | ३ | – |
| **प्रा. अर्चना जगतकर**<br>न्यू कॉलेज, शिवाजी पेठ, कोल्हापूर | २, ४ | – |
| **श्री. चंद्रकांत खंडागळे**<br>श्रीमती कस्तुरबाई वालचंद महाविद्यालय, सांगली | – | १, २ |
| **प्रा. डॉ. सुषमा अर्जुन जाधव**<br>देवचंद कॉलेज, अर्जुननगर, ता. कागल, जि. कोल्हापूर | – | ३ |
| **डॉ. के. एम. देसाई**<br>श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, दसरा चौक, कोल्हापूर | – | ४ |

■ **संपादक** ■

**प्रा. अर्चना जगतकर**
न्यू कॉलेज, शिवाजी पेठ,
कोल्हापूर, जि. कोल्हापूर

**डॉ. मच्छिंद्र सकटे**
सौ. मंगलाताई रामचंद्र जगताप कॉलेज,
उंब्रज, जि. सातारा

# अनुक्रमणिका


| प्रकरण क्रमांक | घटकाचे शीर्षक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | **सेमिस्टर–५ : पेपर–११** | |
| १. | धर्माचे आकलन | १ |
| २. | धर्माच्या अभ्यासाचे दृष्टीकोण | १९ |
| ३. | भारतातील धर्म | ४३ |
| ४. | धर्म आणि सामाजिक परिवर्तन | ९६ |
| | **सेमिस्टर–६ : पेपर–१६** | |
| १. | नागर समाजशास्त्राचा परिचय | ११३ |
| २. | नागर समाजशास्त्रातील प्रमुख संकल्पना | १२६ |
| ३. | नागरीकरणाची प्रक्रिया | १४३ |
| ४. | नागरी सामाजिक संरचना | १६२ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०२०-२१ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

# घटक – १
# धर्माचे आकलन
## (Understanding Religion)

**घटक संरचना**

१.१ प्रस्तावना

१.२ उद्दिष्टे

१.३ विषय विवेचन

१.३.१ धर्माच्या समाजशास्त्राचा अर्थ व व्याख्या

१.३.२ धर्माच्या समाजशास्त्राची व्याप्ती

१.३.३ धर्माच्या समाजशास्त्राचा अभ्यास विषय

१.३.४ धर्माची व्याख्या आणि वैशिष्टे

१.३.५ धर्मातील मुलभूत संकल्पना

१.४ सारांश

१.५ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न

१.६ स्वयं-अध्ययन प्रश्नाची उत्तरे

१.७ सरावासाठी प्रश्न

१.८ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

## १.१ प्रस्तावना

कोणत्याही मानवी समाजात धर्म हा एक अविभाज्य घटक असल्याचे दिसून येते. धर्म हा मानव समाजा इतकाच प्राचीन आहे. आजच्या प्रगत समाजात त्याचे अस्तित्व नाही असे म्हणता येत नाही. आज वर्तमान स्थितीत मानवाने विज्ञानाच्या साहयाने आपल्या भोवतालच्या पर्यावरणावर बरेच नियंत्रण मिळवले आहे. याचा परिणाम असा की, काही समाज धर्मनिरपेक्ष झाले आहेत. तरी सुद्धा धर्म एक सार्वभौमिक तत्व बनलेला आहे. धर्म मानवाचा अलौकिक शक्तीशी संबंध जोडतो. त्याचा संबंध मानवाच्या भावना, श्रद्धा आणि भक्तीशी आहे. धर्म मानवाच्या आंतरिक जीवनालाच प्रभावित करीत नाही तर त्याच्या सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक जीवनालाही प्रभावित करतो. मार्क्सने धर्माला मानवासाठी अफूची गोळी मानली

आहे. धर्म हा भारतीय जीवनाचा सर्वोच्च आदर्श मानला जातो. आपण या प्रकरणामध्ये धर्माच्या समाजशास्त्राची व्याख्या अर्थ अभ्यास विषय व्याप्ती, वैशिष्टे व संकल्पना इत्यादींचा अभ्यास करणार आहोत.

## १.२ उद्दिष्टे :

१. धर्माच्या समाजशास्त्राचा अर्थ स्पष्ट करता येईल.

२. धर्माच्या समाजशास्त्राची व्याप्ती स्पष्ट करता येईल.

४. धर्माच्या समाजशास्त्राचा अभ्यास विषय स्पष्ट करता येईल.

३. धर्माची व्याख्या व वैशिष्टे सांगता येईल.

५. धर्मातील मुलभूत संकल्पना समजून घेता येतील.

## १.३ विषय विवेचन

विवेचनाच्या दृष्टीने या घटकाचे चार प्रकारामध्ये केले आहे. पहिल्या विभागामध्ये धर्माच्या समाजशास्त्राचा अर्थ व व्याख्या पाहणार आहोत. दुसऱ्या विभागामध्ये धर्माच्या समाजशास्त्राच्या अभ्यास विषय व व्याप्ती स्पष्ट केलेली आहे. तिसऱ्या विभागामध्ये धर्माची व्याख्या व वैशिष्टे पहाणार आहोत. तसेच चौथ्या विभागामध्ये धर्मातील मुलभूत संकल्पना यांचे विवेचन केलेले आहे.

### १.३.१ धर्माच्या समाजशास्त्राचा अर्थ व व्याख्या :

धर्माचे समाजशास्त्र म्हणजे धर्माचा समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून केलेला अभ्यास होय. कुटुंब, कुल, राज्य, अर्थ या सारख्या मुलभूत स्वरूपाच्या सामाजिक संस्था प्रमाणेच धर्मसंस्था ही सुद्धा एक मुलभूत स्वरुपाची सामाजिक संस्था आहे. मानवी समाजाच्या उद्यापासूनच निसर्ग व मानव तसेच मानवा-मानवातील संबंधाचे स्वरूप निर्धारित, नियमित व नियंत्रित करण्यात धर्मसंस्था सहभागी होत आली आहे. या शाखेमध्ये धर्म व समाज यांच्यातील परस्पर संबंधाचा वैज्ञानिक अभ्यास केला जातो.

"Religion' हा इंग्रजी शब्द 'धर्म' या शब्दाला पर्यायी म्हणून वापरला जातो. Religion हा इंग्रजी शब्द लॅटीन भाषेतील Religio या शब्दापासून तयार झाला असून हा शब्द 'लेग' (Leg) आणि 'लिग' (Lig) या दोन शब्दापासून बनला आहे. Leg चा अर्थ सोबत आणणे किंवा पालन करणे असा आहे. तर Lig चा अर्थ बांधणे असा होतो. म्हणजेच या दोन्ही शब्दांचा एकत्रित अर्थ अशा आवश्यक क्रियांचे संपादन करणे होय की, ज्या मानव आणि अलौकिक शक्तींना एकत्रित आणतात.

धर्म ही एक महत्वाची सामाजिक संस्था असून तिचा समाजातील इतर सामाजिक संस्था, समूह व संघटना इत्यादीवर मोठा प्रभाव आहे. हिंदू धर्मशास्त्रात धर्म या संकल्पनेत व्यक्ती व समाज यांचे जीवन नियंत्रण ठेवणे हा धर्माचा प्रमुख उद्देश आहे. मानवी शरीराच्या मुलभूत गरजा पूर्ण करताना व्यक्तीचे जीवन संयमित ठेवणे हे धर्माचे कार्य होते. त्यामुळे धर्माचे समाजशास्त्र म्हणजे धर्माच्या समाजातील कार्याचे

समाजशास्त्रीय विश्लेषण होय. म्हणजेच धर्म व समाज यांच्यातील परस्पर संबंधांचा, धर्म व इतर सामाजिक संस्था यांच्या परस्पर प्रभावाचा व धर्माच्या समाजातील कार्याचा समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून केलेला अभ्यास होय.

**धर्माच्या समाजशास्त्राच्या व्याख्या :**

धर्माच्या समाजशास्त्राचा अर्थ अधिक स्पष्टपणे समजण्यासाठी विविध विचारवंतानी धर्माच्या केलेल्या व्याख्या अभ्यासणे आवश्यक आहे.

१) धर्माचे समाजशास्त्र हे 'धार्मिक संस्था, श्रध्दा व आचरण प्रकार यांचा वैज्ञानिक अभ्यास आहे. (Science study of religious institutions, beliefs and practices)

--ऑक्सफोर्ड डिक्शनरी ऑफ सोशिओलॉजी

२) चळवळी व संस्था यांच्यात अंतर्भूत असलेल्या कल्पना व आदर्श यांच्यातील परस्परसंबंध आणि त्यांचा उदय, विकास, भरभराट व ऱ्हास यांच्या सामाजिक स्थितीच्या अभ्यासाच्या एक पैलू म्हणजे धर्माचे समाजशास्त्र होय.

(The sociology of religion is the one aspects of the study of the relationship between ideas and ideals embodied in movements and institutions, and the social situations of their origin, development, flourishing and decline.)

--थॉमस एफ. ओ. देअ

## १.३.२. धर्माच्या समाजशास्त्राची व्याप्ती

**१. समाजशास्त्राची एक शाखा :**

प्रस्तावनेत म्हटल्याप्रमाणे धर्माचे समाजशास्त्र ही समाजशास्त्राची एक शाखा आहे. या शाखेत धर्माचे स्वरूप, धर्माची संरचना, धर्माची कार्ये, धर्माचा प्रभाव, लोकांची धार्मिकता, धर्माची सामाजिक परिवर्तनातील भूमिका, धर्मावरून उद्भवलेले कलह इत्यादी बाबींचा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास केला जातो. या शाखेचा उदय समाजशास्त्राच्या प्रारंभीच्या काळातच झालेला दिसून येतो. समाजशास्त्राचे जनक असलेल्या ऑगस्ट कॉम्टने धर्माच्या कार्याची चर्चा केलेली आढळते. त्यानंतर अभिजात समाजशास्त्रज्ञ डूरखेम, वेबर, मार्क्स, सिमेल इत्यादींनी धर्माचा अभ्यास करून या शाखेच्या विकासात मौलिक योगदान दिले. त्यानंतरच्या इतर अनेक समाजशास्त्रज्ञांनीही या शाखेच्या विकासास हातभार लावला आहे. या शाखेत समाजशास्त्रज्ञ धर्मास श्रध्देची व्यवस्था (System of Belief), एक सामाजिक तथ्य किंवा घटना (Soical fact or phenomenon) तसेच एक सामाजिक संस्था (Social Institution) मानून त्याचा इतर सामाजिक तथ्यांच्या वा घटनांच्या, सामाजिक संस्थांच्या व एकंदर समाज व्यवस्थेच्या संदर्भात अभ्यास करतात. हा अभ्यास समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून करतात. समाजशास्त्रज्ञ हे समाजशास्त्रात रूढ झालेल्या विविध दृष्टिकोनांचा (उदा. प्रकार्यवादी दृष्टिकोन, घटनाशास्त्रीय दृष्टिकोन, आंतरक्रियावादी दृष्टिकोन,

संघर्षवादी दृष्टिकोन इ.) अवलंब करून धर्माचा अभ्यास करतात. थोडक्यात, धर्माचे समाजशास्त्र ही समाजशास्त्राची एक महत्त्वपूर्ण अशी शाखा आहे.

**२. धर्माच्या तत्त्वज्ञानाहून भिन्न :**

धर्माचे समाजशास्त्र हे धर्माचे तत्त्वज्ञान याहून देखील भिन्न आहे. धर्माचे तत्त्वज्ञान ही तत्त्वज्ञानाची (philisophy) एक शाखा असून या शाखेत धर्माचा तत्त्वज्ञानात्मक दृष्टिकोनातून अभ्यास केला जातो. या शाखेत धर्माची तात्त्विक मीमांसा केली जाते. धार्मिक श्रध्दा, कर्मकांड, मूल्ये, विचारसरणी अनुभूती, संस्कारविधी इत्यादींचा बौध्दिकदृष्ट्या अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न धर्माचे तत्त्वज्ञान करते. म्हणजेच धार्मिक समजुतींची बौध्दिक समीक्षा करते. जीव (व्यक्ती), जगत (समाज) व जगदीश्वर (ईश्वर) याविषयीचे विविध धर्मात विविध दृष्टिकोन असून त्यांच्यामध्ये जीवन व जीवनाची मूल्ये व ध्येये याबाबतच्या कांही समजूती दडलेल्या आहेत. या समजुतींची बौध्दिक समीक्षा करणे व मानवाची जीवनदृष्टी डोळस, विवेकी, शुध्द होण्यासाठी आवश्यक असणारे वैचारिक अधिष्ठान तयार करणे हे धर्माच्या तत्त्वज्ञानाचे कार्य मानले जाते. धर्माचे तत्त्वज्ञान हे ईश्वराचे अस्तित्त्व, आत्म्याचे अमरत्व सिध्द करण्यासाठी मांडलेल्या सिध्दांतांचीही मीमांसा व समीक्षा करते.

धर्माच्या तत्त्वज्ञानाप्रमाणेच धर्माचे समाजशास्त्र हे धर्माचा अभ्यास करीत असले तरी त्याच्या अभ्यासाचा दृष्टिकोन हा तात्त्विक अथवा तत्त्वज्ञानात्मक (Philosophical) नसून समाजशास्त्रीय (Sociological) आहे. धर्माच्या तत्त्वज्ञानाप्रमाणे धर्माचे समाजशास्त्र हे धर्मश्रध्दा, धर्मविधी, धार्मिक विचारसरणी, धार्मिक मूल्ये इत्यादींची तात्त्विक किंवा बौध्दिक समीक्षा अथवा चिकित्सा करीत नाही; तर त्यांचे वैज्ञानिक, वस्तुनिष्ठ व अनुभवजन्य पध्दतीने विश्लेषण व स्पष्टीकरण करते. धर्माच्या समाजातील कार्यांचे व समाजावरील प्रभावाचे वस्तुनिष्ठ, वैज्ञानिक, अनुभवजन्य (Empirical) ज्ञान देणे हे धर्माच्या समाजशास्त्राचे कार्य आहे. ईश्वराचे अस्तित्त्व व आत्म्याचे अमरत्व यासारख्या श्रध्दा सिध्द करण्यासाठी मांडलेल्या सिध्दांतांची मीमांसा धर्माचे समाजशास्त्र करीत नाही. मात्र, या श्रध्दांचा मानवी वर्तनावर, मानवी संबंधावर, मानव समाजावर काय प्रभाव पडतो याचे विश्लेषण व स्पष्टीकरण धर्माचे समाजशास्त्र करते. थोडक्यात, धर्माचे समाजशास्त्र हे धर्माच्या तत्त्वज्ञानाहूनही भिन्न आहे.

**३. ईश्वरशास्त्राहून भिन्न :**

धर्माचे समाजशास्त्र हे ईश्वरशास्त्राहून किंवा धर्मशास्त्राहून भिन्न आहे. ईश्वरशास्त्र हे एक शास्त्र असून त्यामध्ये ईश्वराचे अस्तित्व, त्याचे स्वरूप, ईश्वराचे जगाशी व मानवाशी असलेले संबंध, ईश्वराशी संबंध प्रस्थापित करण्याचे मार्ग इत्यादी बाबींची मीमांसा अथवा चर्चा केली जाते. ईश्वर एक आहे. की अनेक आहेत? ईश्वर सगुण आहे की निर्गुण आहे? यासारख्या मूलभूत प्रश्नांचाही विचार ईश्वरशास्त्रात होतो. ईश्वराच्या संदर्भातील उपासन पध्दती, पुराणकथा, पापपुण्याची कल्पना, पारलौकिक जीवन, स्वर्ग नरकाची कल्पना इत्यादींचाही उहापोह हे शास्त्र करते. । बहुतेक सर्वच धर्मांचे स्वतःचे असे एक ईश्वरशास्त्र असल्याचे

आढळते व त्याचे अनुयायी या । शास्त्रातील ज्ञान हे सत्यच आहे अशी श्रध्दा बाळगताना दिसतात. हे ज्ञान सत्य आहे की । असत्य आहे याची चिकित्सा करणे ते निषिध्द मानतात.

ईश्वरशास्त्राप्रमाणेच धर्माचे समाजशास्त्रही धार्मिक बाबींचा अभ्यास करीत असले तरी ईश्वरशास्त्राहून त्याचा अभ्यासाचा दृष्टिकोन पूर्णतः भिन्न अथवा वेगळा आहे. धर्माचे । समाजशास्त्र हे ईश्वर खरोखरच अस्तित्त्वात आहे काय? असल्यास तो एक आहे की अनेक आहेत? ईश्वर सगुण आहे की निर्गुण आहे? पारलौकिक जग (विश्व) तसेच स्वर्ग नरक । अस्तित्त्वात आहे काय? इत्यादी प्रश्नांचा अभ्यास धर्माच्या समाजशास्त्रात केला जात नाही. असा अभ्यास समाजशास्त्रीयदृष्ट्या अनावश्यक ठरतो. याउलट ईश्वर, पारलौकिक जग, स्वर्ग-नरक इत्यादींचे अस्तित्त्व मानणाऱ्या व्यक्ती व समूहांच्या ऐहिक जीवनावर या श्रध्दांचे काय परिणाम होतात याचा अभ्यास करणे समाजशास्त्रदृष्ट्या महत्त्वाचे अथवा आवश्यक मानले जाते. एक सामाजिक तथ्य म्हणून धर्म मानवी जीवनावर काय प्रभाव टाकतो, मानवी । जीवनात कोणती कार्ये पार पाडतो या प्रश्नांचा अभ्यास धर्माच्या समाजशास्त्रात होतो व हा अभ्यास वैज्ञानिक पध्दतीने अथवा वैज्ञानिक दृष्टिकोनातून होतो. ईश्वरशास्त्रात वैज्ञानिक पध्दतीचा अथवा दृष्टिकोनाचा अवलंब केला जात नाही.

**४. धर्माच्या ऐतिहासिक अभ्यासाहून भिन्न :**

धर्माचा समाजशास्त्रीय अभ्यास हा धर्माच्या ऐतिहासिक अभ्यासाहून देखील भिन्न आहे. धर्माचा अभ्यास ऐतिहासिक दृष्टिकोनातूनही होतो. मानव समाजाच्या इतिहासाच्या सर्व कालखंडात धर्मश्रध्दा, धर्मविधी, धार्मिक कल्पना समजूती व विचारसरणी, धार्मिक पंथ-उपपंथ, संप्रदाय-उपसंप्रदाय, धार्मिक अधिकारी व्यक्ती, धर्मग्रंथावरील निष्ठा इत्यादी बाबी आढळतात. मानवी संस्कृतीच्या प्रारंभीच्या काळापासून ते आजपर्यंत वरील सर्व धार्मिक बाबींमध्ये होत आलेले संक्रमण, परिवर्तन यांचे वर्णन इतिहासात केले जाते. यासच धर्माचा ऐतिहासिक अभ्यास म्हणतात.

धर्माचा समाजशास्त्रीय अभ्यास हा धर्माच्या ऐतिहासिक अभ्यासाहून भिन्न आहे. धर्माचा ऐतिहासिक दृष्टिकोनातून होणारा अभ्यास बहुतांशी वर्णनात्मक (Descriptive) स्वरूपाचा आढळतो. त्यामध्ये धार्मिक बाबींचे विश्लेषण, समालोचन व स्पष्टीकरण फारसे आढळत नाही. धर्माच्या समाजशास्त्रात मात्र धार्मिक बाबींचे वैज्ञानिक दृष्टिकोनातून विश्लेषण व स्पष्टीकरण करण्यावर भर दिला जातो. धर्मश्रध्दा, धर्मविधी, धर्मकल्पना यांचे समाजातील स्थान, महत्त्व, कार्य, प्रभाव यांचा विश्लेषणात्मक अभ्यास इतिहासकारांपेक्षा समाजशास्त्रज्ञांनी अधिक व्यापक व वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून केलेला आढळतो.

**५. धर्माच्या मानसशास्त्रीय अभ्यासाहून भिन्न :**

धर्माचा अभ्यास मानसशास्त्रीय दृष्टिकोनातूनही केला जातो. धर्म ही मानवी मनाची ईश्वराच्या व विश्वाच्या संदर्भातील मानसिक क्रिया व प्रतिक्रिया आहे असे मानून धर्माचा अभ्यास मानसशास्त्र (Psychology) करते. अश्रध्द, सश्रध्द, अंधश्रध्द व्यक्तींच्या मनोव्यापारात धार्मिक मूल्ये, दृष्टिकोन, कल्पना, विचारसरणी इत्यादींचे स्थान व कार्य कसे असते हे समजावून घेण्याच प्रयत्न मानसशास्त्र करते.

तसेच धार्मिक अनुभूतीमागील प्रेरणा, भावना, विचार, विकार, अबोध मनाचे कार्य त्याचबरोबर गुढानुभूती, साक्षात्कार, प्रार्थना, ध्यानधारणा, समाधी यासारख्या मनाच्या अवस्था यांचाही अभ्यास मानसशास्त्र करते.

धर्माच्या या मानसशास्त्रीय अभ्यासाहून धर्माचा समाजशास्त्रीय अभ्यास भिन्न आहे. धर्म ही ईश्वर व विश्वाविषयीची मानसिक क्रिया-प्रतिक्रिया आहे असे मानसशास्त्र मानते. याउलट, धर्माचे समाजशास्त्र हे धर्मास मानसिक क्रिया न मानता एक सामाजिक तथ्य वा घटना मानते. व्यक्तीच्या मनोव्यापारात धार्मिक गोष्टींचे स्थान व कार्य कसे असते हे मानसशास्त्र अभ्यासते. याउलट, समाजात, धर्माचे स्थान व कार्य कसे आहे हे धर्माचे समाजशास्त्र अभ्यासते. धार्मिक अनुभूतीमागील प्रेरणा, भावना, विचार, विकार इत्यादी मानसशास्त्र अभ्यासते. याउलट, धार्मिक अनुभूतींचे धार्मिक विधींच्या रूपाने सामाजिक प्रगटीकरण (Social Expression) कसे होते हे धर्माचे समाजशास्त्र अभ्यासते. गुढानुभूती, साक्षात्कार, ध्यानधारणा, समाधी इत्यादींना मनाच्या अवस्था मानून त्यांचे अध्ययन मानसशास्त्र करते. याउलट, गुढानुभूती येणाऱ्या म्हणजेच साक्षात्कार झालेल्या व्यक्तींना धर्माधिकारी (Religious Authority) म्हणून समाजात कसे उच्च व आदरणीय स्थान अथवा दर्जा प्राप्त होतो व अशा धर्माधिकाऱ्यांचा लोकांच्या आचार-विचारांवर कोणता प्रभाव पडतो याचा अभ्यास धर्माच्या समाजशास्त्रात होतो. अशाप्रकारे, धर्माच्या मानसशास्त्रीय अभ्यासाहून धर्माचा समाजशास्त्रीय अभ्यास भिन्न आहे.

**६. धर्माच्या अभ्यासाचा अभिनव दृष्टिकोन :**

धर्माचा अभ्यास ईश्वरशास्त्रीय, तत्त्वज्ञानात्मक, मानसशास्त्रीय, ऐतिहासिक अशा विविध दृष्टिकोनातून केला जातो. तथापि, धर्माच्या अभ्यासाचा समाजशास्त्रीय दृष्टिकोन हा इतर दृष्टिकोनांहून भिन्न तर आहेच शिवाय तो अभिनव असा आहे. समाजशास्त्र है, धर्माचा अभ्यास त्यास एक सामाजिक तथ्य मानून करते. धर्मसंस्था ही अनेक मूलभूत सामाजिक संस्थांपैकी एक संस्था असून या सर्व सामाजिक संस्थांचा परस्परांशी तसेच संपूर्ण समाजव्यवस्थेशी अर्थपूर्ण संबंध असतो. तसेच या सामाजिक संस्थांमध्ये परस्परावलंबनही असते. तसेच त्या परस्परांवर प्रभावही टाकीत असतात, असा दृष्टिकोन घेऊन समाजशास्त्र हे धर्मसंस्थेचा इतर संस्थांवर पडणारा प्रभाव तसेच इतर संस्थांचा धर्मसंस्थेवर पडणारा प्रभाव अभ्यासते. धर्मसंस्था ही व्यक्ती, समूह व संपूर्ण समाज यांच्यादृष्टीने कोणती कार्ये पार पाडते याचेही विश्लेषण धर्माचे समाजशास्त्र करते. अशाप्रकारचा दृष्टिकोन इतिहास, मानसशास्त्र, तत्त्वज्ञान, ईश्वरशास्त्र यांचा नसतो.

## १.३.३ धर्माच्या समाजशास्त्राचा अभ्यासविषय

**१. धर्माचा अभ्यास :**

धर्माचे स्वरूप, संरचना, धर्मसंरचनेचे घटक, धर्म संरचनेतील घटकामधील परस्परसंबंध, व धर्माचा समाजातील उदय इत्यादीचा अभ्यास धर्माच्या समाजशास्त्रात धर्माचा सविस्तर सांगोपांग आणि पद्धतशीर वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास केला जातो. धर्माच्या उद्याची सामाजिक घटकांच्या संदर्भात मीमांसा, डूरखीमने केलेली आहे. तसेच धर्माच्या उद्‌यासंबंधाचे सिद्धांत हर्बर्ट स्पेन्सर, विल्यम सम्नर आणि अल्बर्ट किल्लर यांनीही मांडले आहेत. धर्मास श्रद्धा व विधीची व्यवस्था अनेक समाजशास्त्रज्ञ मानतात. त्या अनुषंगाने

धर्मश्रद्धा व धर्मविधींचा अभ्यास केला जातो. परंतु हा अभ्यास करताना ते धर्मश्रद्धा सत्य आहेत की, असत्य, तसेच धर्मविधी करणे हे योग्य आहे की अयोग्य आहे याचे विश्लेषण व स्पष्टीकरण करीत नाहीत. त्याऐवजी ते धर्मश्रद्धांचा व धर्मविधीचा मानवी वर्तनावर काय प्रभाव पडतो याचे वस्तुनिष्ठपणे विश्लेषण करण्याचा प्रयत्न करतात.

**२. विविध धर्मांचा अभ्यास :**

जगाच्या वेगवेगळ्या भागात वेगवेगळे धर्म उदयास आले आहेत. म्हणून धर्माच्या समाजशास्त्रात विविध धर्मांचाही तुलनात्मक अभ्यास केला जातो. काही धर्म स्थानिक व प्रादेशिक स्वरूपाचे पहावयास मिळतात. उदा. हिंदू, बौद्ध, जैन, शीख, पारशी, ज्यू, शिंतो व ताओ इत्यादी तर काही धर्माच्या अनेक समाजात प्रसार होवून ते विश्वधर्म म्हणून ओळखले जातात. उदा. बौध्द, ख्रिस्ती व इस्लाम इत्यादी. तसेच जगातील वेगवेगळ्या आदिवासी अथवा आदिम जमातीचे स्वतःचे असे वेगवेगळे धर्म आहेत. या आदिम धर्मांना प्राथमिक धर्म म्हणून ओळखले जातात. या विविध धर्माच्या श्रध्दा, विधी, संस्कार व समारंभ इत्यादीमध्ये विविधता दिसून येते. एवढेच नव्हे तर त्याच्यामध्ये परस्पर विरोधही आढळून येतो. प्रत्येक धर्मामध्ये अनेक पंथ व उपपंथ, संप्रदाय व उपसंप्रदाय उदयास आले असून येते. प्रत्येक धर्माचा स्वरूप अत्यंत संकीर्ण व जटील बनलेले आहे. धर्मामध्ये निर्माण झालेली भिन्नता व जटिलता समजावून घेण्यासाठी समाजशास्त्रज्ञ विविध धर्मांचा तुलनात्मक पद्धतीने अभ्यास करतात.

**३. धार्मिकतेचा अभ्यास :**

'धार्मिक क्रियामध्ये लोकांना असणारा रस व त्यातील सहभागाने प्रमाण म्हणजे धार्मिकता होय.' त्यामुळे धर्माच्या समाजशास्त्रात लोकांच्या धार्मिकतेचा अभ्यास केला जातो. धर्माचे आचरण प्रकार म्हणजेच प्रार्थना, यज्ञकार्य, तीर्थयात्रा, समारंभ व उत्सव इत्यादीमध्ये सहभागी होण्याचे लोकांचे प्रमाण, तीव्रता व सातत्य इत्यादीच्या समुच्चयास धार्मिकता म्हणतात. वेगवेगळ्या लोकांमध्ये धार्मिकतेचे प्रमाण कमी जास्त आढळते. त्यामुळे समाजशास्त्रज्ञ ह्या धार्मिकतेचे मोजमाप करण्याचा प्रयत्न करतात. त्यासाठी ते समाजशास्त्रातील साधने व तंत्रे वापरतात. उदा. धर्मश्रद्धा धार्मिक संघटना, संघटनेतील सदस्यत्व, धार्मिक सेवामधील सहभाग इत्यादीवर प्रश्न विचारले जातात. व त्यांच्या धर्मिकतेविषयी निष्कर्ष काढले जातात. जेऱ्हाड लेन्स्की यांनी आपल्या धार्मिक घटक या ग्रंथात धार्मिकतेचे विश्लेषण केलेले आढळते.

**४. धर्माच्या प्रभावाचा अभ्यास :**

धर्माच्या समाजशास्त्रामध्ये समाजातील विविध संस्था, व्यक्ती, समूह, संघटना, मंडळे यांचा व एकंदर समाजजीवन यांच्यावर धर्माचा मोठा प्रभाव पडलेला आहे. या प्रभावाचा अभ्यास केला जातो. त्यामुळे समाजशास्त्रज्ञ धर्मास एक सामाजिक संस्था मानतात. धर्माच्या इतर सामाजिक संस्थावर म्हणजेच विवाह, कुटुंब, राज्य व शिक्षण यांच्यावर मोठा प्रभाव पडतो. कारण या सर्व सामाजिक संस्था ह्या परस्परसंबंधित व परस्परावलंबी आहेत. त्यामुळे समाजाचा अभ्यास करताना धर्म व इतर सामाजिक संस्था यांच्यातील परस्परसंबंध, परस्परावलंबन व परस्परप्रभाव यांचा अभ्यास करणे अनिवार्य ठरते. म्हणूनच धर्माच्या

समाजशास्त्रात या बाबींचा अभ्यास केला जातो. सामाजिक, संस्थेप्रमाणेच विविध सामाजिक समूह उदा. कुटुंब, कुल, आप्त संबंधी समूह यांच्यावर धर्माचा मोठा प्रभाव आहे. या प्रभावाचेही अध्ययन या शाखेमध्ये केले जाते.

**५. धर्माच्या कार्याचा अभ्यास :**

धर्माचा अभ्यास करताना सामाजशास्त्रज्ञानी धर्म समाजात कोणती कार्ये पार पाडतो. याचा अभ्यास करण्यावर विशेष भर दिलेला आढळतो. धर्म समाजव्यवस्थेच्या विविध गरजा पूर्तीसाठी कसे योगदान देतो. याची चर्चा अनेक समाजशास्त्राज्ञानी केलेली आहे. धर्मश्रद्धा, विधी, संस्कार व समारंभ इत्यादीच्या कार्याचे महत्व विल्यम रॉबर्टसन स्मिथने स्पष्ट केले आहे. डूरखाइच्या मते, धर्म समाजात ऐक्यभाव निर्माण करून समाजव्यवस्थेचे जतन करतो. धर्म विशिष्ट अशी सामाजिक सांस्कृतिक चौकट पुरवून इतर सामाजिक संस्थाच्या विकासास सहाय्य करते, असे मॅक्सवेबरनी दाखवून दिले आहे. धर्म सामाजिक ऐक्य व सामाजिक नियंत्रण कसे करतो याचे विवेचन किंग्जले डेव्हिस यांनी केले आहे. थोडक्यात धर्म हा समाजात महत्वपूर्ण कार्य पार पाडतो असे अनेक समाजशास्त्रज्ञांनी धर्माच्या अभ्यासाद्वारे दाखवून दिलेले आहे. धर्माच्या कार्याविषयीच्या मतास प्रकार्यवाद असे म्हणतात.

**६. धर्माच्या अपकार्याचा अभ्यास :**

धर्माच्या अपकार्या संदर्भात कार्ल मार्क्सने असे मत मांडले आहे की, धर्म हा भांडवलशाही समाजातील विषय स्तरीकरणाचे समर्थन करण्याचे कार्य पार पाडतो. तसेच भांडवलदार वर्गाच्या हातातील साधन म्हणून धर्म कामगार वर्गाच्या शोषणास सहाय करतो. असेही मत त्यांनी मांडलेले आहे. धर्माचे हे कार्य समाजाच्या दृष्टीने अपकार्य ठरते. धर्मविधी धार्मिक सण, समारंभ, उत्सव, यज्ञ, मंदिर, चर्च व मशिद इत्यादीच्या निमित्ताने पैसा, वेळ व श्रम इत्यादीची उधळपट्टी होते याचे विवेचन थॉमस एफ ओदेअ यांनीही केले आहे. धर्म हा समाजात दुफळी व संघर्ष निर्माण करतो. सामाजिक प्रगतीस व परिवर्तनास अडथळा आणतो. दैववादी वृत्ती वाढीस लावतो असे ते म्हणतात.

**७. धर्मावरून होणाऱ्या कलहाचा अभ्यास :**

धर्मावरून होणाऱ्या वादविवादांचा किंवा धर्मश्रद्धा, धार्मिक विधी, किंवा कर्मकांड व धर्म ग्रंथातील वचने इत्यादींचा अन्वयार्थ लावण्यावरून समाजात मतभिन्नता निर्माण होते. व त्यातून विविध वादविवाद वा कलह सुरु होतात. वेगवेगळे युक्तिवाद केले जातात. यातून समाजात अनेक गुंतागुंतीचे असे धार्मिक, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक व मानसिक प्रश्न आणि समस्या उद्भवतात. या कलहाचा, युक्तिवादाचा व प्रश्नाचा समाजातील लोकांच्या वर्तनावर व परस्पर संबंधावर पडतो. त्यामुळे त्यांची दखल समाजशास्त्रज्ञाना घेणे भाग पडते. त्यामुळे धर्मावरून होणाऱ्या अशा कलहांचा अभ्यास धर्माच्या समाजशास्त्रात केला जातो. या संदर्भात मूलतत्ववाद, धर्मांतरवाद, संप्रदायवाद व धर्मनिरपेक्षता हे वाद महत्वपूर्ण ठरले आहेत. या सर्वांचा मानवाच्या, धार्मिक, राजकीय, आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक जीवनावर लक्षणीय असा प्रभाव पडलेला आहे. या प्रभावाचे स्वरूप समजावून घेण्याचा प्रयत्न समाजशास्त्रज्ञ करतात.

### ८. धर्म व सामजिक परिवर्तनाचा अभ्यास :

सामाजिक परिवर्तनाच्या संदर्भात धर्माच्या समाजशास्त्रात अभ्यास केला जातो. मानव समाजात सतत परिवर्तन होत असते. या परिवर्तनास काही घटक चालना देत असतात, तर काही घटक परिवर्तनाच्या मार्गात अडथळा निर्माण करीत असतात. धर्म हा या दृष्टीने परिवर्तनावर प्रभाव टाकणारा महत्वाचा घटक आहे. धर्म हा सामाजिक परिवर्तनास चालना देणारा तसेच त्यास विरोध करणारा घटक ठरलेला आढळतो. धर्म व सामाजिक परिवर्तन यांच्यातील सहसंबंध मॅक्सवेबरने स्पष्ट केलेला आहे. ख्रिस्ती धर्मातील प्रोटेस्टमट या पंथाचे नीतिशास्त्र हे पाश्चात्य समाजात आधुनिक भांडवलशाहीच्या उदयास कारणीभूत ठरले. याउलट हिंदू, बौध्द, इस्लाम व ज्यू या धर्मांच्या प्रभावामुळे पौर्वात्य समाजात भांडवलशाहीच्या उदयास प्रोत्साहन मिळाले नाही. असा निष्कर्ष मॅक्सवेबरने काढलेला आहे. सर्वसाधारण धर्माने पुरस्कृत केलेल्या श्रद्धा, विधी, नियमने व मुल्ये यांच्याशी एकनिष्ठ राहावे अशी शिकवण धर्माकडून दिली जाते. त्यामुळे या शिकवणीच्या विरोधी गोष्टींचा स्वीकार करण्यास म्हणजेच परिवर्तनास धर्म नकार देतो. त्यामुळे सहाजिकच तो अडथळा ठरतो. उदा. मध्ययुगात युरोपमध्ये चर्चने व्याजाने पैसे देणे घेणे यास मान्यता देण्याचे नाकारले. त्यामुळे भांडवलशाहीच्या विकासाच्या मार्गात अडथळे आले. इस्लाम धर्मामध्ये देखील व्याजावर जगणे निषिद्ध मानल्याने कर्जाद्वारे भांडवल उभारणीस त्यामुळे होणाऱ्या आर्थिक प्रगतीस खीळ बसली. लोकसंख्या नियंत्रणासाठी कुटुंब नियोजनाचा स्वीकार करणे अनिवार्य आहे. तथापि काही लोकांच्या अंधश्रद्धा संतती नियमनास विरोध करीत असल्याने परिवर्तनास अडथळे येतात.

## १.३.४. धर्माची व्याख्या आणि वैशिष्ट्ये :

### धर्माची व्याख्या :

धर्माची सर्वसामान्य व्याख्या करणे कठीण आहे तरीही धर्माचा अर्थ स्पष्ट करण्यासाठी काही व्याख्या पुढील प्रमाणे पहाता येतील.

१. दिव्य प्राण्यावरील विश्वास म्हणजे धर्म होय

(Religion is the belief in spiritual beings. -Edward Tylor)

२. मानवी जीवन आणि निसर्गक्रम यांचे निर्देशन आणि त्यावर नियंत्रण ठेवू शकतात अशी श्रद्धा असलेल्या आणि मानवापेक्षा श्रेष्ठ असलेल्या शक्तीशी मिळते जुळते घेणे किंवा आराधना वा प्रार्थना करणे म्हणजे धर्म होय असे मी मानतो.

----- जेम्स फ्रेजर

(By religion I understand a propitiation or conciliation of powers superior to man hich are believed to direct and control the course of nature and human life -- James Frazer)

३. धर्म ही एक मानसिक शक्ती किंवा प्रवृत्ती असून ती ईश्वरास जाणण्यासाठी मानवास समर्थ बनविते.

(Religion is mental faculty or disposition which enables man to apprch end the infinite)

४. सामाजिक परिस्थितीत आढळून येणाऱ्या अमूर्त, अदृश्य अनोळखी आणि अनियंत्रित अशा शक्तींशी मिळते-जुळते घेण्याची प्रक्रिया म्हणजे धर्म होय.

-- प्रा. बॅलॉड

(Religion is process of adjustment to the intangible, unseen, unknow and uncontrolled force believed to the present in the social situation)

५. अलौकिकतेविषयी श्रद्धा, अभिवृत्ती आणि अशा श्रद्धांशी संबंधित असे आचरण यांचा धर्मात अंतर्भाव होतो.

(Super naturalistic belief, the attitudes, and the conduct related to such beliefs are what constitute religion.)

मानवापेक्षा श्रेष्ठ अशी कोणती तरी अलौकिक शक्ती संपूर्ण मानवी जीवन नियंत्रित करीत असते अशी लोकांची श्रद्धा असते. त्या श्रद्धेशी संबंधित असे वर्तन व्यवहार आणि कर्मकांड म्हणजे धर्म होय. धर्माशी निगडीत असणाऱ्या गोष्टी पवित्र मानल्या जातात. यावरून धर्माचे स्वरूप लक्षात येते. धर्माच्या उद्देशाबाबत विवेचन करताना भारतातील सुप्रसिद्ध विचारवंत आणि समाजशास्त्रज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी धर्म आणि धम्म यामध्ये फरक केला आहे. डॉ. आंबेडकरांच्या मते, धर्माचा उद्देश जगाच्या उत्पत्तीचे स्पष्टीकरण करणे हा आहे. परंतु धम्माचा उद्देश मात्र जगाचे पुनर्निर्माण करणे हा आहे. असे त्यांनी बौध्द धर्माला 'धम्म' असे म्हंटले आहे. धम्मात कोणत्याही अलौकिक शक्तीवर विश्वास ठेवला जात नाही. धर्मात मात्र अलौकिक शक्तीवर विश्वास ठेवला जातो.

**धर्माची वैशिष्टे :**

**१. सार्वत्रिकता :**

धर्म केवळ प्रगत समाजातच आढळून येतो असे नाही. तर धर्म हा अतिप्राचीन, अर्वाचीन तसेच अविकसित, विकसनशील व विकसीत अशा सर्व समाजात आढळतो. पूर्वी असे मानले जाई की, मानवी संस्कृती विकसीत अवस्थेत पोहचल्यानंतरच धर्माचा उदय झाला. पण हे मन बरोबर नाही अत्यंत प्राथमिक अवस्थेतील आदिम जमातीतही कोणत्या ना कोणत्या प्रकारची धर्मश्रद्धा व धर्माचरण आढळते असे एडवर्ड टायलर नी निदर्शनास आणून दिले आहे. धर्म नाही असा एकही मानव समाज वा समूह आढळत नाही म्हणूनच मार्शल जोन्स हे धर्मास मानवी संस्कृतीचे एक सामान्य लक्षण मानतात म्हणून धर्माचे एक प्रमुख वैशिष्टे म्हणजे धर्माची सार्वत्रिक्तता होय.

**२. श्रद्धांची व्यवस्था :**

आपण आतापर्यंत पाहिलेल्या व्याख्येवरून हेच स्पष्ट होते की, अलौकिक शक्तीवरील श्रद्धेच्या केंद्रबिंदुतून धर्माचा उदय झालेला आहे. कारण श्रद्धेविना मानवाचे जीवन अर्थहीन आहे. अर्थात धार्मिक श्रद्धा या व्यक्तीच्या आंतरमनाचा भाग असून त्याला वैचारिक अधिष्ठान प्राप्त झालेले असते. लौकिक जीवनापेक्षा भव्य दिव्य अशी अलौकिक शक्ती आहे. अर्थात तिचे अस्तित्व पुराव्यानिशी सिद्ध करता येत नाही. तसेच तिचे अस्तित्व देखील दाखवता येत नाही परंतु ती आहे अशी मनोमन नितांत श्रद्धा असते तिच्या कृपा अवकृपेने चांगले किंवा वाईट घडत असते. तीच सर्व मानवी जीवन नियंत्रित व मार्गदर्शित करीत असते. या श्रद्धेतूनच पाप-पुण्य, स्वर्ग-नरक, देव-देवता, प्रतीके याची निर्मिती झालेली आढळते. परंपरेने हा विश्वास त्याच्या समाजात दृढमूल झालेला आहे. जगातील सर्वच धर्मात अशा प्रकारच्या अनेक श्रद्धांचा समावेश आढळून येतो. म्हणून धर्म ही अलौकिक शक्तीशी संबंधित असलेल्या श्रद्धांची व्यवस्था आहे.

**३. विधींची व्यवस्था :**

व्यक्तीच्या आंतरमनात असणाऱ्या श्रद्धा व्यक्त करण्यासाठी व्यक्ती जी कृती करते त्यातूनच धार्मिक विधी निर्माण होतात. मनोभावे कोणताही धार्मिक विधी केला असता ईश्वर-कृपा संपादन होईल व आपले इच्छित फळ साध्य होईल. अशा भावनेतूनच सर्व धर्मातील व्यक्ती धार्मिक विधी करीत असतात. पूजा-पाठ, प्रार्थना, नमाज पडणे, अभिषेक करणे, पारायणे करणे, उपवास करणे, पवित्र दिवशी पवित्र स्थळी स्नान करणे, दानधर्म करणे, धार्मिक भाषा स्थळी जाने अशा अनेकविध धार्मिक प्रत्येक धर्मात आढळतात. अर्थात या धार्मिक विधींच्या पुर्ततेतून अलौकिक शक्ती प्रसन्न होते. किंवा नाही हे आपणास पुराव्यानिशी सिद्ध करता येत नसले तरी धार्मिक विधी मनोभावे केल्या असता त्यातून प्राप्त होणारे मानसिक समाधान निश्चितपणे व्यक्तीचे मनोबल वाढवीत असते. हे आपणास आजच्या वैज्ञानिक युगातही मानावेच लागते. धार्मिक विधी धर्माची क्रियाशील बाजू आहे. धार्मिक विधी या भावनात्मक असतात. विधी करण्यात काही चूक झाल्यास अलौकिक शक्ती प्रसन्न होत नाही. उलट तिचा कोप होऊ शकतो असे मानले जाते.

**४. पावित्र्याची कल्पना :**

धर्मामध्ये पवित्र्याच्या कल्पनेला अत्यंत महत्त्वपूर्ण स्थान आहे. ही पावित्र्याची कल्पना मोठ्या प्रमाणात मानवी श्रद्धेशी निगडीत असते. धर्म कोणताही असो, त्याचे स्वरूप कोणतेही असो त्या धर्मात अंतर्भूत असणाऱ्या सर्व वस्तू, देव-देवता, गुरु, साधुसंत, भिख्खू, प्रमाणभूत ग्रंथ, नितीतत्वे, भंडारे, तीर्थस्थळे, सण, समारंभ, मंदिरे, मशीद, चर्च, गुरुद्वार, विहार, संस्कार, पूजेचे साहित्य, ठराविक वृक्ष यामध्ये वडाचे झाड, पिंपळाचे झाड, लिंबाचे झाड, ख्रिसमस ट्री, उंबराचे झाड या सर्व बाबीमध्ये पावित्र्य असते अशी व्यक्तीची दृढ श्रद्धा असते. ज्या वस्तू सामान्य नाहीत ज्याच्या विषयी श्रद्धायुक्त आदराची भावना असते. जिचा संबंध अलौकिक शक्तीशी जोडला जातो. या सर्व वस्तूचा समावेश पवित्र वस्तूंमध्ये करण्यात येतो.

या सर्व पवित्र वस्तूंना प्राप्त झालेले पावित्र्य हे त्यांच्या अंगभूत गुणांमुळे प्राप्त झालेले नसून या वस्तूंकडे पाहण्याचा दृष्टिकोनामुळे ते प्राप्त झालेले असते. म्हणून धर्मपरत्वे पावित्र्याच्या कल्पना भिन्न असतात.

**५. अपवित्रतेची कल्पना :**

प्रत्येक धर्मामध्ये अपवित्रतेची कल्पना आढळून येते. कारण धर्मामध्ये काही वस्तूंना अपवित्र मानले आहे. ज्या वस्तू, घटना किंवा क्रिया यांच्यामुळे पवित्र वस्तूंचे पावित्र्य नष्ट होईल. त्यांचा अनादर किंवा अपमान होईल अशा सर्वांना अपवित्र मानले जाते. व त्यांना दूर ठेवले जाते. हिंदू धर्मात मृत्यूमुळे व प्रसूतीमुळे आलेला सुतककाळ आणि स्त्रियांची मासिक पाळी, अस्पृश्य मानलेल्या व्यक्ती यांना अपवित्र मानले गेले होते. त्यांना पवित्र वस्तूंना स्पर्श करण्यास मनाई केली जाते.

**६. आचार विचारांची व्यवस्था :**

धर्म ही आचार विचारांचीही एक व्यवस्था आहे. मानव (जीव), विश्व (जगत) व अलौकिक शक्ती (जगदीश्वर) यांच्यातील परस्परसंबंध कसे आहेत. त्याबाबतचे निश्चित असे विचार वा तत्वे किंवा सिद्धांत धर्माने प्रतिपादन केलेले आढळतात. म्हणूनच मानवामानवातील तसेच मानव व अलौकिक शक्ती यांच्यातील परस्परांचा निर्देश धर्म या संज्ञेद्वारे होतो असे मैकयाव्हर व पेज यांनी म्हंटले आहे. उदा. हिंदू धर्मातील कर्म व पुनर्जन्माचा सिद्धांत, बौध्द धर्मातील अनात्मवादाचा सिद्धांत, ख्रिस्ती धर्मातील ट्रिनिटी सिद्धांत इत्यादी. विचारप्रमाणेच धर्म ही आचारांची वा वर्तनप्रकारचीही व्यवस्था आहे. प्रत्येक व्यक्तीचे वैयक्तिक व सामाजिक वर्तन कसे असावे याबाबतचे काही नियम धर्म घालून देतो. व त्याचे पालन झालेच पाहिजे असा आग्रह असतो. त्यामुळे धर्म ही एक प्रकारची आचारसंहिता असते. प्रत्येक धर्मामध्ये अशा प्रकारची आचारसंहिता दिसून येतो. उदा.  जैन, धर्मातील अनुव्रते व महाव्रते, इस्लाममधील शरीरत, कायदे, बौध्द धर्मातील पंचशील तत्वे, बायबल मधील दहा आज्ञा, व हिंदू धर्मातील मनुस्मृतीतील वर्तन विषयक नियम या सर्व आचारसंहिताच आहेत. धर्माप्रमाणे आचार विचारांचे पालन करणे हे पुण्य मानले जाते. तर त्यांच्याविरुद्ध वर्तन करणे म्हणजे पाप मानले जाते. त्यामुळे पुण्य करण्यास बक्षीस मिळते. तर पाप करणाऱ्यास दंड किंवा शिक्षा अलौकिक शक्तीकडून मिळते असे मानले जाते.

**७. व्यक्तिगत अनुभूती :**

धर्म ही वैयक्तिक अनुभूती आहे असे मॅलिनोस्की याचे मत आहे. प्रत्येक व्यक्तीला अलौकिक शक्तीविषयी व्यक्तिश: आदर व भीती वाटत असते. व्यक्तीला पावित्र्याची येणारी अनुभूती अलौकिक शक्तीच्या संदर्भात येणारे गुढानुभव तिला होणारा दिव्यत्वाची साक्षात्कार इत्यादी गोष्टी ह्या व्यक्तिगत अनुभूती असतात. उपवास, पूजापाठ, प्रार्थना, याज्ञमाग व ध्यान-धारणा या सारख्या धार्मिक कृत्यामुळे व्यक्तीच्या मनात उद्भवणाऱ्या भावभावना व अभिवृत्ती ह्या तिचे व्यक्तिगत अनुभव असतात. समाधीच्या अवस्थेत येणारे गुढानुभव हे देखील व्यक्तिगत असतात. महमद पैगंबरामना प्राप्त झालेले अल्लहाचे दिव्य संदेश, येशू ख्रिस्तामना झालेले ईश्वराचे दर्शन, इत्यादी अनुभूती व्यक्तिगत आहेत. विश्वातील अनेक धर्मामधील अनेक साधुसंताना असे व्यक्तिगत गुढानुभव आल्याचे सांगितले जाते यालाच साक्षात्कार ही म्हणून ओळखले जातात.

**८. अलौकीक शक्तीच्या स्वरूपाविषयी मतभिन्नता :**

सर्व समाजातील धर्माचे स्वरूप म्हणजे अलौकिक शक्तीचे स्वरूप समान नाही. या शक्तीच्या स्वरूपाबाबत मतभिन्नता आढळते. काही समाजातील धर्मात ही शक्ती सगुण–साकार तर काही समाजातील धर्मात ती निर्गुण–निराकार मानले जाते. तसेच ही शक्ती एक आहे की अनेक आहे या बाबतही मतभिन्नता आढळते. काही धर्मात ख्रिस्ती इस्लाम व ज्यू धर्मात ही शक्ती एकच आहे असे मानले आहे. म्हणजेच ईश्वर एकच आहे असा या धर्मामध्ये विश्वास ठेवला जातो. तर हिंदू धर्मामध्ये अनेक शक्ती आहेत असे मानले जाते. कारण अलौकिक शक्ती विविध रूपे धारण करते असे मानले जाते. तसेच बौध्द व ताओ धर्मामध्ये ईश्वराचे अस्तित्व नाकारलेले आहे. अशा प्रकारे अलौकिक शक्तीच्या विषयी वेगवेळ्या धर्मात वेगवेगळी मते आढळतात. एवढेच नव्हे तर एकाच धर्मामधील वेगवगळ्या पंथात व एकाच पंथातील वेगवेगळ्या उपपंचातही अलौकिक शक्तीच्या स्वरूपाबाबत मतभिन्नता दिसून येते.

**९. धर्म एक सामाजिक घटना :**

डुरखाईम व मॅलिनोस्की यांनी धर्म ही एक सामाजिक घटना आहे असा उल्लेख केला आहे. धर्माच्या उदयास सामाजिक घटक जबाबदार आहेत. धर्माच्या उद्याचा सिद्धांत मांडताना डुरखाईमने देवकवादाची चर्चा केली आहे. देवकाची पूजा करताना समूहातील सदस्यांना सामुहिक संवेदनेची अनुभूती येते. नैतिक स्वरुपात धर्म हा अनुभूतीतून देवकासच ईश्वर मानले जाते. आणि हा ईश्वर अन्य काही नसून प्रत्यक्ष कूल, जमात वा समाजच आहे. त्यामुळे ईश्वराची पूजा म्हणजेच समाजाची पूजा ठरते. म्हणून धर्म हा सामाजिक घटना ठरते. मॅलिनोस्कीच्या मते, धार्मिक श्रद्धा व विधींचा उदय समाजात होत असल्याने धर्म सामाजिक घटना आहे.

**१०. समायोजनाची व्यवस्था :**

विश्वातील प्रत्येक जीवास आपल्या गरजांची पूर्तता करून आपले अस्तित्व टिकवण्यासाठी सभोवतालच्या पर्यावरणाशी समायोजन साधावे लागते. म्हणून मानवाच्या दृष्टीने धर्म ही एक पर्यावरणाशी समायोजन साधण्याची व्यवस्था आहे. सभोवतालच्या पर्यावरणाशी समायोजन साधताना मानवास अनेक आपत्तींना म्हणजेच अतिवृष्टी, अनावृष्टी, वादळ, भूकंप, ज्वालामुखी उद्रेक, हिमपात, उष्णतेची लाट, व कडाक्याची थंडी, इत्यादीच्या तोंड द्यावे लागते. अपार कष्ट करूनही कामात अपयश येते. जीवनात अनपेक्षितपणे अदभूत, अनाकलनीय, व त्रासदायक घटना घडतात. त्यामुळे आपल्यापेक्षा श्रेष्ठ अशी एक अलौकिक शक्ती असून ती आपल्या जीवनावर प्रभाव टाकते. अशी मानवाची श्रद्धा बनली आहे. त्यामुळे या शक्तीची कृपा व्हावी ती प्रसन्न व्हावी म्हणून मानवाने काही विधी सुरू केल्या आहेत. अशाप्रकारे आपल्या सभोवतालच्या पर्यावरणातील अनाकलनीय, अनपेक्षित, व त्रासदायक अशा पैलुंशी समन्वय साधण्यासाठी मानवाने अलौकिक शक्तीची कल्पना केली व तिच्याशी संपर्क प्रस्थापित करण्यासाठी विविध विधी सुरू केल्या यातूनच धर्म उदयास आला. म्हणूनच धर्म ही पर्यावरणाशी समायोजन साधण्याची व्यवस्था ठरते.

### १.३.५. धर्मातील मुलभूत संकल्पना :

प्रत्येक धर्मात विशिष्ट प्रकारचे धार्मिक विश्वास आढळतात. असे असले तरी बौध्द, ख्रिश्चन, हिंदू व मुस्लीम इत्यादी धर्मातील विश्वास हे सारखे नाहीत. धार्मिक विश्वासाच्या संदर्भात विविधता आढळून येते. धर्मसंस्था ही सुद्धा संस्थाकृत प्रमाणकांचे आणि विश्वासाचे एक प्रतिमान आहे. धार्मिक विश्वासाचा लोकांवर फार मोठा प्रभाव असतो. हे विश्वास व्यक्तींच्या इतके अंगवळणी पडलेले असतात की, त्यामुळे आपल्या धर्मातील विश्वास व्यतिरिक्त आणखी इतर धार्मिक विश्वास असू शकतात याची लोकांना कल्पना देखील नसते. त्याचप्रमाणे एका धर्मातील लोकांना दुसऱ्या धर्माचे विश्वास हे विचित्र वाटतात. परंतु लोक धर्म म्हणून ज्या विश्वासाचे पालन करतात त्याच्यात आणि समाजातील अधिकृत धार्मिक विश्वासामध्ये बराच फरक असतो. सर्वच धार्मिक विश्वासाचा कसा आणि किती परिणाम होईल हे लोकांच्या जीवन स्थितीवर अवलंबून असते विशेष महत्वाची बाब म्हणजे धार्मिक विश्वासाची शास्त्रीय आधारावर चिकित्सा करणे लोकांना मान्य नसते हे विश्वास अनुभवाच्या आधारावर खरे उतरतीलच असे नाही. विश्वास खरे नसले तरी त्यांचा व्यक्तीच्या वर्तनावर प्रभाव पडत असतो. हॅरी जॉन्सन यांनी धार्मिक विश्वासाचे प्रकार सांगितले आहेत.

**१. ब्रह्मांडव्यवस्थाविषयक विश्वास :**

धर्मामध्ये कर्म-पुनर्जन्मासंबंधीचे विचार आहेत. हिंदू धर्मामध्ये तर कर्म आणि पुनर्जन्माची कल्पना विशेष महत्वाची मानली जाते. प्रत्येक व्यक्ती मृत्युनंतर पुन्हा जन्म घेत असतो. ज्याप्रमाणे व्यक्ती कपडे बदलतो त्याचप्रमाणे आत्मा हा शरीर बदलत असतो अशी कल्पना हिंदू धर्मात आहे. कर्म-पुनर्जन्माच्या कल्पनांचा समावेश ब्रम्हांडव्यवस्थाविषयक विश्वासामध्ये केला जातो. ख्रिश्चन धर्मामध्ये ट्रिनिटीची कल्पना विशेष महत्वाची आहे. ख्रिश्चन धर्मामध्ये मोक्षाची कल्पना असून जगाचा अंत झाल्यावर परमेश्वर प्रत्येकाच्या ऐहिक कर्माप्रमाणे त्यांना पुढील गती देईल. ख्रिश्चन धर्मानुसार परमेश्वराने शून्यातून स्वर्ग आणि पृथ्वीची निर्मिती केली आहे. तसेच मुस्लीम धर्मामध्ये महमद पैगंबराला अल्लाहाचा प्रेरित मानण्यात आले आहे. गौतम बुद्धाने आत्मा, पुनर्जन्म इत्यादी कल्पना नाकारल्या आहेत.

**२. मोक्षविषयक विश्वास :**

मोक्षप्राप्ती करणे हा बहुतेक धर्माचा एक महत्वाचा उद्देश आहे. मोक्षप्राप्ती हे जीवनाचे परमोच्च असे उद्दिष्ट मानण्यात आले आहे. प्रत्येक धर्मात मोक्षप्राप्ती विषयक विश्वास आढळून येतो. तसेच मोक्षप्राप्तीच्या विविध मार्गाचा आणि साधनाचा विचार देखील मांडण्यात आला आहे. मोक्षप्राप्ती विश्वासामध्ये प्रत्येक धर्मात भिन्नता दिसून येते. मोक्षप्राप्तीची पारलौकिक आणि ऐहिक अशी दोन साधने आढळतात. संसारातून निवृत्त होवून ज्या मार्ग साधनांच्या सहाय्याने मोक्षसाधनेचा प्रयत्न करावयाचा असतो. त्यास पारलौकिक साधने म्हणतात. संन्यासी हा अशा पारलौकिक साधनाद्वारे मोक्षप्राप्ती करतो. संसाराचा त्याग न करता आपल्या दैनंदिन जीवनात ज्या मार्ग साधनाच्या सहाय्याने मोक्षाचे उद्दिष्ट गाठता येते. त्या मार्ग साधनेला ऐहिकाभिमुख म्हंटले जाते.

### ३. पौराणिक विश्वास :

प्राचीन काळात घडलेल्या घटनांबाबत किंवा होऊन गेलेल्या खऱ्या किंवा काल्पनिक व्यक्तीबद्लच्या कथांना पुराणकथा म्हणतात. अशा कथांशी संबंधित असलेले विश्वास म्हणजे पौराणिक विश्वास होत. पुराणकथा या बहुदा काल्पनिकच असतात. कारण या कथांमध्ये सत्यता नसते. हिंदू धर्मात अशा विविध पौराणिक कथा आढळतात. या प्रकारच्या पौराणिक कथा अनेक धर्मामध्ये आढळतात.

### धार्मिक विधी संस्कार :

विश्वातील प्रत्येक धर्मामध्ये विधीसंस्कार पहावयास मिळतात. परंतु सर्व धर्मातील विधी संस्कार हे सारखे नसतात. प्रत्येक धर्मानुसार धार्मिक विधी संस्कार हे वेगवेगळे असतात. धार्मिक विधी आणि संस्कारामध्ये विशिष्ट स्वरूपाच्या धार्मिक क्रिया असतात. आपल्या मनोकामना पूर्ण करून घेण्यासाठी, अलौकिक शक्तीस आव्हान करण्यासाठी, तिची उपासना-पूजा करण्यासाठी संबंधित असणाऱ्या क्रिया या धार्मिक क्रिया होत. विशिष्ट क्रिया ही पूर्णपणे धार्मिक वा आर्थिक नसते. धार्मिक क्रियांची ही धार्मिक विधी आणि संस्कारांना लागू पडणारी आहे. प्रत्येक धार्मिक विधी आणि संस्कारात काही वस्तू, पदार्थ प्रतीकांची हाताळणी केली जाते. या वस्तू विशिष्ट प्रकारे उपयोगात आणल्या जातात. आणि त्यांच्या होणाऱ्या उपयोगास धार्मिक विश्वासाच्या संदर्भात निश्चित अर्थ असतो. धार्मिक विधी आणि संस्काराचा आत्मा किंवा मोक्षांशी संबंध असतो. या उद्दिष्टांशी संबंधित काही त्याचप्रमाणे काही वर्तनप्रकार सुद्धा विश्वास असतात. मोक्ष मिळवण्याच्या उद्देशाने परमेश्वराचे स्तवन करणे, तपश्चर्या करणे, इत्यादी प्रकारचे वर्तन व्यक्तीद्वारे केले जाते. धार्मिक विधी या करमणूक किंवा मनोरंजनासाठी केल्या जात नाहीत धार्मिक विधी ही कर्त्याने विशिष्ट उद्देश साध्य करण्याच्या हेतूने केलेली क्रिया असते. म्हणूनच तिला साधनात्मक क्रिया म्हणतात. धार्मिक विधी हे साधनात्मक असले तरी त्यात भावनात्मकता देखील असते.

### ब) पावित्र्याची कल्पना :

धर्मात श्रद्धा व विधीप्रमाणे पवित्र्याच्या कल्पनेला अत्यंत महत्वपूर्ण स्थान आहे. ही पावित्र्याच्या कल्पनेला मोठ्या प्रमाणात मानवी श्रद्धेशी निगडीत असते. धर्म कोणताही असो त्याचे स्वरूप कोणतेही असो त्याचे स्वरूप कोणतेही असो त्या धर्मात अंतर्भूत असणाऱ्या सर्व वस्तू, देव-देवता, गुरु, साधुसंत, त्या धर्माचे प्रमाणभूत ग्रंथ नितीतत्वे भंडारे, गुलाल, अंगारा, तीर्थस्थळे, सण-समारंभ, मंदिर, संस्कार, पूजेचे साहित्य, ठराविक वृक्ष या सर्व बाबीमध्ये पावित्र्य असते अशी व्यक्तीची गाढ श्रद्धा असते. ज्या वस्तू सामान्य नाहीत, ज्याच्याविषयी श्रद्धायुक्त आदराची भावना असते. जिचा संबंध अलौकिक शक्तीशी जोडला जातो या सर्व वस्तूचा समावेश पावित्र वस्तूंमध्ये केला जातो.

या पवित्र वस्तूचा अलौकिक शक्तीचे प्रतिनिधित्व करतात या सर्व पवित्र वस्तूंना प्राप्त झालेले पावित्र्य हे त्यांच्या अंगभूत गुणांमुळे प्राप्त झालेले नसून या वस्तूकडे पाहण्याचा दृष्टीकोनामुळे ते प्राप्त झालेले असते. म्हणून धर्म परत्वे पावित्र्याच्या कल्पना भिन्न भिन्न असतात. पावित वस्तूतील पावित्र्य हे जणू काही निसर्गजन्म मानले जाते. कारण पवित्र वस्तूंच्या सानिध्यात असणाऱ्या इतर वस्तुनामही पावित्र्य प्राप्त झालेले

असते. उदा. देवघरातील सर्व साहित्य, पूजेचे ताम्हण, फोटो, पुसावयाचे वस्त्र, या वस्तूंचा वापर आपण दैनदिन व्यवहारात करीत नाही. जेवावयाचे ताट म्हणून पूजेच्या ताम्ह्णाचा वापर कधीच करणार नाही किंवा देवाच्या फोटो पुसण्याच्या वस्त्राने आपण फरशी पुसणार नाही. अशी साधी कल्पनाही आपणास करवत नाही. तात्पर्य हेच की पवित्र वस्तूंच्या सानिध्यातील सर्व वस्तूमध्ये पावित्र्य असते असा एक पारंपारिक दृष्टीकोन आहे. अर्थात पवित्र्याच्या कल्पनेबरोबरच काही अपवित्रतेच्या कल्पना देखील प्रत्येक धर्मातील आढळतात. त्यांना धर्मनिषिद्ध मानल्या जाते. उदा. स्नान न करता देवपूजा करणे निषिद्ध आहे. सुतक आले असता देवपूजा निषिद्ध आहे. शीख धर्मात दारू पिणे, सिगारेट पिणे निषिद्ध मानले जाते.

थोडक्यात धार्मिक श्रद्धा व धार्मिक विधी यांच्यामधील प्रतीकात्मक पूल म्हणजे पवित्र वस्तू होय. धार्मिक श्रद्धा, धार्मिक विधी व पवित्रतेच्या कल्पना या मुलभूत तत्वातुनच धर्माचे स्वरूप स्पष्ट होते.

## १.४. सारांश :

धर्माच्या दृष्टीकोनातून एक गोष्ट आवर्जून लक्षात घेतली पाहिजे ती म्हणजे धर्माचा समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास करताना समाजशास्त्रज्ञ हे धार्मिक श्रद्धा सत्य आहेत की असत्य आहेत. धार्मिक कर्मकांड करणे योग्य आहे की अयोग्य आहे, धार्मिक विचारसरणी व शिकवण उपयुक्त आहे की अनुपयुक्त आहे याची चर्चा करीत नाहीत. तसेच लोकांच्या धर्माविषयीचा दृष्टीकोन बदलणे हा ही त्यांच्या अभ्यासाचा उद्देश नसतो. त्यामुळे ते धर्माचा अभ्यास व्यावहारिक उपयुक्ततेच्या दृष्टीने करीत नाहीत. असे असले तरी त्यांच्या धर्माचा वस्तुनिष्ठ अभ्यास हा कळतनकळतपणे व्यावहारिक प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी उपयोगी ठरू शकतो. त्यामुळे धर्माच्या समाजशास्त्राचा अभ्यास हा अप्रत्यक्षपणे व्यवहारोपयोगी ठरू शकतो. म्हणून धर्माच्या समाजशास्त्राचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

## १.५ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न

प्रश्न : योग्य पर्याय निवडून खालील विधाने पूर्ण करा.

१. धर्माच्या समाजशास्त्रात धर्म व समाज यांच्यातील ----------समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास केला जातो.

अ) संघर्षाचा　　　　ब) परस्पर संबंधाचा

क) झुंडशाहीचा　　　　ड) यापैकी नाही

२. धर्माच्या कार्याविषयी मतास ----------- म्हणतात.

अ) कार्यवाद　　　　ब) अपकार्य

क) प्रकार्यवाद　　　　ड) संरचनात्मक

३. ------------ यांनी धर्मास अफूची गोळी असे म्हंटले आहे.

अ) ऑगस्त कॉम्त | ब) मॅक्सवेबर

क) डुरखाईम | ड) कार्ल मार्क्स

४. धर्माला धम्म ही संज्ञा ------------ यांनी वापरली आहे.

अ) महात्मा फुले | ब) एम.एन.श्रीनिवास

क) डॉ. आंबेडकर | ड) जी.एस.धुर्ये

५. --------- यांनी दिव्य प्राण्यावरील विश्वास म्हणजे धर्म होय अशी व्याख्या धर्माची केली आहे.

अ) कार्ल मार्क्स | ब) ऑगस्त कॉम्त

क) एडवर्ड टायलर | ड) डुरखाईम

## १.६ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१. परस्पर संबंधांचा

२. प्रकार्यवाद

३. कार्ल मार्क्स

४. डॉ. आंबेडकर

५. एडवर्ड टायलर

## १.७ सरावासाठी प्रश्न

१. धर्माच्या समाजशास्त्राची व्याख्या देवून धर्माच्या समाजशास्त्राचा अर्थ स्पष्ट करा.

२. धर्माच्या समाजशास्त्राचा अभ्यास विषय स्पष्ट करा.

३. धर्माची व्याख्या देवून धर्माची वैशिष्टे सांगा.

४. धर्मातील मुलभूत संकल्पना स्पष्ट करा.

## १.८. अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ :


१. आगलावे प्रदीप (२०१५) समाजशास्त्र : संकल्पना आणि सिद्धांत, साईनाथ प्रकाशन, नागपूर

२. कऱ्हाडे बी. एम (२०११) समाजशास्त्र मुलभूत संकल्पना, पिंपळापुरे अॅन्ड कं. पब्लिशर्स, नागपूर.

३. खंडागळे चंद्रकांत (२०२१) धर्माचे समाजशास्त्र, प्रकाशक : मायादेवी खंडागळे

४. डोईफोडे ज्योती (२०११) भारतीय समाज : संरचना व परिवर्तन, विद्या बुक्स पब्लिशर्स, ओरंगाबाद.

५. पुंडलिक विद्याधर (२००३) धर्माचे समाजशास्त्र, कॉन्टीनेटल प्रकाशन.

६. Baird Robert D. Religion in Modern India Manohar, Delhi, 1995.

७. Madan T.N. (Ed), Religion in India, Oxford University Press, New. Delhi, 1992

८. Dsouza Leela, Sociology of Religion.

९. Pias Richard, Sociology of Religion.

❑❑❑

# घटक – २
# धर्माच्या अभ्यासाचे दृष्टीकोण
## (Perspectives to Study of Religion)

**अनुक्रमणिका**


२.० उद्दिष्ट्ये

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

२.२.१ धर्माच्या अभ्यासाचे दृष्टीकोण : दुर्खीम आणि वेबर

२.२.२ धर्माच्या अभ्यासाचे दृष्टीकोण : महात्मा फुले आणि आंबेडकर

२.३ सारांश

२.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

२.५ स्वयं अध्ययनाच्या पश्नांची उत्तरे

२.६ संदर्भासाठी पुस्तके


## २.० उद्दिष्ट्ये

या घटकाच्या अध्ययनानंतर आपल्याला 'धर्माचे समाजशास्त्र' या पेपरमधील धर्माच्या अभ्यासाचे विविध दृष्टिकोण समजून घेता येतील. यातील दोन विचारवंत हे पाश्चिमात्त्य आहेत आणि दोन विचारवंत हे भारतीय आहेत. म्हणजेच पाश्चिमात्त्य आणि भारतीय विचारवंतांचे धर्माच्या अभ्यासाबाबतचे दृष्टिकोण अभ्यासता येणार आहेत.

पाश्चिमात्त्य विचारवंत एमिल डुर्खीम आणि मॅक्स वेबर यांचे धर्माच्या अभ्यासाचे दृष्टीकोण याचे अध्ययन करता येईल.

भारतीय सामाजिक विचारवंत महात्मा ज्योतीबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे धर्माच्या अभ्यासाच्या दृष्टीकोणाचा अभ्यास करता येईल.

## २.१ प्रास्ताविक

धर्माचे समाजशास्त्र हा समाजशास्त्राचा एक विभाग आहे. धर्म आणि समाज यांचे परस्परसंबंध काय आहेत आणि त्यांच्या कोणत्या परस्पर प्रतिक्रिया होत असतात हेही सांगते. धर्माचे समाजशास्त्र धर्माचा समाजशास्त्रीय दृष्टीकोणातून अभ्यास करणारे शास्त्र आहे. धर्माचा समाजजीवनावर कसा प्रभाव पडतो याचाही अभ्यास धर्माच्या समाजशास्त्रामध्ये केला जातो त्यापैकी ''धर्मसंस्थेचा'' विशिष्ट अभ्यास धर्माच्या समाजशास्त्रामध्ये केला जातो.

कोणत्याही मानवी समाजाचा 'धर्म' हा अत्यंत महत्त्वाचा आणि अविभाज्य असा घटक आहे. मानवाच्या धर्मसंकल्पनेची सांगड कोणत्या तरी दिव्य शक्तीशी घातली जाते. आजही वर्तमान स्थितीमध्ये मानवी जीवन तांत्रिकदृष्ट्या खुपच प्रगत झालेले आहे. तरीही मानव धार्मिक गोष्टींचा आधार घेताना दिसतो. धर्म एक महत्त्वाची सामाजिक संस्था असून धर्म मानवाच्या वैयक्तिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक जीवनालाही प्रभावित करतो. आपणास हेही माहिती आहे की धर्म हा मानवी समाजाइतकाच पुरातन आहे. प्रारंभी अवस्थेपासून ते विकसित अवस्थेपर्यंत जगाच्या पाठिवर जेवढे मानवी समाज अस्तित्वात आहेत त्यातील काळाच्या ओघात काही नष्ट झाले. परंतु धर्माचे अस्तित्व मात्र अबाधित आहे. व्यक्तीवर नियंत्रण ठेवण्यासाठी, ताणांचे निरसन करण्यासाठी, चांगले वर्तन करण्यासाठी म्हणजेच सामाजिक नियंत्रण करण्यासाठी धर्म संस्था कार्य करते. कोणत्याही समाजातील मूल्ये, जीवनविषयक दृष्टिकोण, संस्कृती, धर्म यांचा परस्परांशी असणारा संबंध हा घनिष्ट आहे. एवढेच नाही तर बरेच मानवी व्यवहार हे धार्मिक जीवन आणि धार्मिक क्रिया भावनेशी संबंधित असतात.

अशा या मानवावर नियंत्रण करणाऱ्या धर्माच्या उदयासंदर्भात विविध दृष्टिकोण विविध समाजशास्त्रज्ञांनी मांडलेले आहेत. धर्म एक सामाजिक तथ्य वा घटना आहे. तसेच धर्माचा समाजावर पडणारा प्रभाव कशा स्वरूपाचा आहे. धर्माचा इतर संस्थांशी असणारा संबंध घनिष्ठ असतो अशी गृहितके मांडून समाजशास्त्राच्या अभ्यासकांनी धर्माचा अभ्यास केला आहे.

धर्माच्या उदयासंदर्भातले, उत्पत्तीबाबतचे सिद्धांत म्हणजे धर्म समाजात कसा निर्माण झाला किंवा अगदी सोप्या शब्दात सांगायचे तर धर्माचा जन्म कसा झाला हे सांगणारे सिद्धांत, दृष्टीकोण होय. समाजशास्त्रामध्ये जे जे समाजाच्या अभ्यासाचे विविध दृष्टिकोण आहेत. उदा. संरचनात्मक-कार्यात्मक, प्रकार्यात्मक संघर्षवादी, घटनाशास्त्रीय अशा विविध दृष्टीकोणातून धर्माचाही अभ्यास केला आहे. समाजशास्त्राचे जनक ऑगस्त कॉम्त यांनी धर्माचा अभ्यास हा संरचनात्मक दृष्टीकोणातून, डुर्खीमने धर्माचा प्रकार्यात्मक, कार्ल मार्क्सने संघर्षवादी वा द्वंद्वात्मक भौतिकवादी दृष्टीकोनातून, मॅक्स वेबरने घटनाशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास केलेला आढळतो. या घटकामध्ये आपण विविध पाश्चिमात्त्य विचारवंतांच्या दृष्टीकोणाचा प्रामुख्याने, डुर्खीम आणि मॅक्स वेबर यांच्या धर्माच्या अभ्यासाविषयीचा दृष्टीकोण तपशीलवार अभ्यासणार आहोत. त्याचबरोबर भारतातील महान समाजसुधारक आणि सामाजिक विचारवंत महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याही दृष्टीकोणांचे अध्ययन आपण करणार आहोत.

धर्म समाजव्यवस्थेमध्ये का निर्माण होतो, त्याची कारणे आणि धर्माची प्राथमिक स्वरूप समजून घेणे हे समाजशास्त्रात अभिप्रेत आहे. धर्माच्या उत्पत्तीबाबत अनेकविध विचारवंतानी वेगवेगळी मते मांडली आहेत. या प्रकरणात पाश्चिमात्त्य विचारवंतांपैक एमिल डुर्खीमचा धर्माच्या अभ्यासाचा दृष्टिकोन प्रथम आपण अभ्यासणार आहोत.

## २.२.१ एमिल डुर्खीमचा धर्मविषयक दृष्टिकोण :

समाजशास्त्राचे जनक ऑगस्त कॉम्त यांच्या नंतर फ्रान्समधील अत्यंत महत्त्वाचा, अभ्यासू विचारवंत, समाजशास्त्रज्ञ म्हणून एमिल डुर्खीमकडे बघितले जाते. डुर्खीमवर बालपणातच धर्माचा प्रभाव पडला. त्याचे वडील 'ज्यू' धर्मगुरू होते. त्यांनी डुर्खीमला वयाच्या १३ व्या वर्षीच ज्यू धर्माची दीक्षा दिली. त्याने धर्मग्रंथांचा अभ्यास सुरू केला. त्यानंतर तो एका कॅथॉलिक शिक्षिकेच्या प्रभावाखाली आला व तिच्याकडून त्याला कॅथॉलिक पंथातील धार्मिक विचारांचे ज्ञान मिळाले. डुर्खीमच्या एकूण विचारांवर विल्फ्रेडो पॅरेटो आणि मॅक्स वेबर यांच्या धार्मिक विचारांचाही प्रभाव होतो. त्यामुळे शिक्षिकेकडून मिळालेल्या कॅथॉलिक पंथांच्या धार्मिक विचारातून मिळालेले ज्ञान आणि पॅरेटो, वेबरच्या विचारांच्या प्रभावातून 'धर्म' हा त्याच्या समाजशास्त्रीय चिंतनाचा एक महत्त्वाचा विषय बनला. मानवी समाजाचा अभ्यास हा प्रत्यक्षवादी अशा विज्ञानाच्या पद्धतीने झाला पाहिजे अशा मतांची मांडणी ही विविध समाजशास्त्रज्ञांच्या अध्ययनातून मांडली. तशाच मतांची मांडणी डुर्खीमने केली असून 'धर्म हे एक सामाजिक तथ्य असून व्यक्तीला समाजाशी जोडण्याच्या भावनांमधून धर्म उदयास आला असा दृष्टीकोन त्याने मांडला.' म्हणजे दुर्खीमने आपल्या समाजशास्त्रीय चिंतनात समाजाला महत्त्वाचे स्थान दिलेले आहे.

दुर्खीम हे प्रकार्यवादी विचारवंत आहे. प्रकार्यवाद हा सामाजिक शास्त्रातील एक महत्त्वाचा सिद्धांत वा दृष्टिकोन आहे. त्यांच्या मते 'समाज ही परस्परसंबंधित व परस्परावलंबी असलेल्या अनेक भागांची मिळून बनलेली एक संतुलित अशी व्यवस्था असून या व्यवस्थेतील प्रत्येक भाग समाजाची एक विशिष्ट गरज पूर्ण करण्याचे प्रकार्य पार पाडीत असतो. त्यामुळे प्रतिकूल परिस्थितीतही समाजाचे संतुलन, सातत्य व अस्तित्व टिकून राहते असे प्रतिपादन करणारा दृष्टिकोण म्हणजे प्रकार्यवाद होय.' अशी मांडणी या सिद्धांतातून होते.

या प्रकार्यवादी दृष्टीकोनातूनच डुर्खीम यांनी कुटुंब, श्रमविभाजन, धर्म या सामाजिक तथ्यांचा अभ्यास केलेला आहे.

धर्माचा प्रकार्यवादी दृष्टीकोनातून अभ्यास करताना ते असे मत प्रतिपादित करतात की, धर्म हा समाजातील विविध घटकांच्या मते एकात्मता, ऐक्यभाव निर्माण करून ते दृढ करण्याचे आणि त्यातील सातत्य टिकवून ठेवण्याचे प्रकार्य प्रभावीपणे पार पाडतो.

एमिल डुर्खीमच्या या धर्मविषयक सिद्धांताच्या आधारे धर्माची उत्पत्ती कशी, कुठे, कोणत्या समाजात झाली, धर्म समाजात कोणती कार्ये करतो, मानवाच्या जीवनात धर्माला कोणते स्थान आहे? तसेच पवित्र, अपवित्रता, श्रद्धा व विधी या संकल्पना काय आहेत हे समजून घेता येते.

एमिल डुर्खीम यांनी धर्माचा समाजशास्त्रीय दृष्टीने अभ्यास केला व त्याआधारे 'The Elementary forms of Religious life' या नावाचा ग्रंथ लिहिला. त्यांनी मध्य-ऑस्ट्रेलियातील 'अरुंटा' या आदिवासी जमातीच्या देवकवादाचा अभ्यास करून या ग्रंथामध्ये धर्माची व्याख्या, स्वरूप, उदय, व कार्य यांचे समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून विवेचन केलेले आहे. हा ग्रंथ १९१२ साली प्रकाशित झाला त्याला मराठीमध्ये 'धर्माची प्राथमिक स्वरूपातील रूपे' असे रूपांतर करता येईल. हा ग्रंथ मूळ फ्रेंच भाषेमध्ये लिहिलेला होता त्यानंतर १९१५ साली या ग्रंथाचा इंग्रजी अनुवाद प्रकाशित झाला. या ग्रंथाचे तीन भाग असून पहिल्या भागामध्ये कुल व देवकवाद, दुसऱ्या भागात कुल व देवकवादाविषयीच्या आकडेवारीच्या आधारे धर्माच्या सिद्धांतात तर तिसऱ्या भागात धर्माच्या सामाजिक संदर्भाचे स्पष्टीकरण केलेले आहे.

डुर्खीमच्या या चिंतनाचे मुख्य लक्ष्य म्हणजे सर्व मानवी समाजातील धर्माचे मूलभूत स्वरूप समजून घेणे हे होते. मध्य-ऑस्ट्रेलियामधील 'अरुंटा' ही जगात सर्वात प्राथमिक व प्राचीन जमात आहे असे मानले आहे. ज्या काही ज्ञात इतर आदिवासी जमाती आहेत त्यापैकी ही प्राचीन जमात मानून त्या जमातीतील धर्माचे अध्ययन करण्यात आले. 'अरुंटा' सारख्या अतिलघु जमातीच्या धार्मिक जीवनाच्या आधारे अखिल मानव जातीच्या धर्माचे स्वरूप जीवनाच्या आधारे अखिल मानव जातीच्या धर्माचे स्वरूप स्पष्ट करण्याचा प्रयत्न या ग्रंथात केलेला आढळून येतो. अरुंटा जमातीतील देवकवादाचा (Totemism) चा समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास करून त्यासंदर्भातील विवेचनाबाबत देवकवाद (कुलप्रतिकवाद) हे धर्माचे प्रारंभिक अतिसरल रूप आहे असे मत मांडले आहे. याच प्रकारचे विवेचन ब्रिटीश मानवशास्त्रज्ञ विल्यम रॉबर्टसन स्मिथ यांनी मांडलेले आहे.

दुर्खीमच्या Elementry Forms of Religias Life या पुस्तकामध्ये खालील मुद्द्यांना अधोरेखित केले आहेत. ऑस्ट्रेलियन जमातीतील कुलचिन्ह पद्धतीचा अभ्यास करून धर्माची व्याख्या व स्वरूप स्पष्ट केले आहे व त्याची तुलना अमेरिकन समाजाशी केलेली आहे. धर्माच्या उदयासंदर्भातील प्रचलित जे सिद्धांत आहेत उदा. सर्वात्मवाद, निसर्गवाद याचे खंडन केले आहे. तसेच ऑस्ट्रेलियन जमात 'अरुंटा' मधील कुलचिन्हवादातून (टोटेम) धर्माचे सुक्ष्म, सखोल व विस्तृत विवेचन केलेले आहे. अरुंटा जमातीतील गोत्र व्यवस्थेचे वर्णन केलेले आहे. शेवटी स्वतःचा धर्मविषयक सिद्धांत मांडला आहे. तोही वैज्ञानिक दृष्टिकोणातून मांडला आहे. त्यापाठीमागचे कारण म्हणजे धर्मासंदर्भातील अनाकलनीय असणाऱ्या काही बाबी या विज्ञानाच्या चष्म्यातून पाहिल्यानंतर धार्मिक जीवनातील मूलभूत जी काही तत्त्वे आहेत ती तत्त्वे समजून घेता येतील.

डुर्खीमच्या धर्मविषयक सिद्धांताचा मूळ गाभा म्हणजे त्याच्या मते, धर्म हे एक सामाजिक तथ्य आहे, धर्म एक सामाजिक एकसंघ व्यवस्था आहे. व्यक्ती महत्त्वाचा नाही तर समूह महत्त्वाचा आहे. म्हणून सामाजिक जीवनाचे फलित म्हणजे धर्म आहे. डुर्खीमच्या मते धर्म हा काल्पनिक नाही तर तो वास्तव आहे. तो समाजाच्या सहजीवनाची अभिव्यक्ती आहे. धर्म समुहातील सदस्यांवर आदर्शात्मक दबाव करतो त्यामुळे त्या त्या समूहातील व्यक्ती किंवा समूह हे दीर्घकाळापर्यंत अस्तित्व टिकवून आहेत.

एकूणच वरील विवेचनावरून 'एलिमेंटरी फॉर्म ऑफ रिलिजियस लाईफ' या डूर्खीमच्या ग्रंथामध्ये नेमके धर्माबद्दलचे कोणते मुद्दे अधोरेखित केलेले आहेत हे समजून घेता येते.

एमिल डुर्खीम हे विज्ञाननिष्ठ विचार करणारे संशोधक, अभ्यासक होते, त्यामुळे त्यांनी प्रत्यक्षवादी, वस्तुनिष्ठ अभ्यास पद्धतीचा अवलंब, समाजाच्या अभ्यासासाठी केलेला दिसून येतो. डुर्खीमच्या मते धर्मासंदर्भातले विवेचन, धर्मासंबंधीच्या सर्व पूर्वकल्पना, भ्रामकता, अलौकिकता या गोष्टींचा विचार न करता वस्तुनिष्ठपणे, वैज्ञानिक पद्धतीचा वापर करूनच केला पाहिजे.

धर्माच्या उदयाच्या संदर्भातील आपला सिद्धांत मांडण्यापूर्वी डुर्खीमने एडवर्ड टायलर आणि मॅक्समूलर यासारख्या विचारवंतानी धर्माबाबतचे जे सिद्धांत मांडले होते त्या सिद्धांताचे खंडण केलेले आहे. एडवर्ड टायलर यांनी मांडलेला सर्वात्मवादाचा सिद्धांत जो असे प्रतिपादित करतो की आत्म्याच्या अस्तित्वावरील श्रद्धेतून धर्माचा उदय झाला. प्रत्येक प्राणीमात्रामध्ये पशुपक्षी, वनस्पती, एकंदरीत चराचर सृष्टीमध्ये असलेल्या प्रत्येकामध्ये 'आत्मा' असतो. ते एक तत्त्व आहे. शरीराचा नाश झाला तरी 'आत्मा' नष्ट होत नाही. मग असा 'आत्मा' नंतर भूतात्मा, प्रेतात्मा, पिशाच्च, देव बनून अलौकिक जगामध्ये संचार करतो वावरत असतो. याचा परिणाम मानवी जीवनावर होतो आणि मग त्या शक्तीला प्रसन्न करून घेण्यासाठी पूजा अर्चा केली जाते. त्यातूनच धर्माचा उदय झाला असे या सिद्धांतात सांगितले गेले.

परंतु डुर्खीम यांनी या सिद्धांताचे खंडन केले, ते असे म्हणतात की हा सिद्धांत भ्रामक आहे. 'आत्मा' हा अमर आहे. हे अनुभवाच्या आधारे सिद्ध करता येत नाही. आत्म्याचे अस्तित्व जरी गृहीत धरले तरी त्याच्याशी पावित्र्याची कल्पना कशी आणि कोणत्या कारणांनी जोडली गेली हे सिद्ध करता येत नाही. धर्माचा उदय हा समाजात होतो त्याच्या उदयासाठी सामाजिक घटक जबाबदार असतात. आणि धर्म एक सामाजिक तथ्य आहे. त्यामुळे या सिद्धांतात तथ्यापेक्षा भ्रमाला महत्त्व असल्याने डुर्खीमने एडवर्ड टायलरनी मांडलेल्या सर्वात्मवादाचे खंडण केले आहे.

तर दुसरा मॅक्समुलर यांचा निसर्गवाद असे सांगतो की, निसर्गाच्या मध्ये असणाऱ्या विविध शक्ती आणि त्या शक्तीमुळे निसर्गात घडणाऱ्या घडामोडी, त्या घडामोडींचा मानवी जीवनावर होणारा चागला-वाईट परिणाम पाहूनच आदिमानवास निसर्गशक्ती बद्दल भीतीयुक्त आदर वाटण्यातून, निसर्गशक्तीची पूजा केली जाऊ लागली. त्यातूनच धर्माचा उदय झाला. या सिद्धांताचेही एमिल डुर्खीम यांनी खंडन केले आहे. ते या निसर्गवादाबद्दल असे स्पष्ट करतात की वास्तविक लोकांच्या मनामध्ये धर्मश्रद्धांविषयीची जी भावना असते ती आदराची असते. नैसर्गिक संकटे जसे भूकंप, वादळ, महापूर यासारख्या नैसर्गिक घटना फक्त लोकांच्या मनामध्ये भीतीच निर्माण करू शकतात. तिथे आदराची भावना नसते. त्यामुळे धार्मिक गोष्टींकडे लोक आदराने का बघतात हे निसर्गवादाच्या माध्यमातून स्पष्ट होत नाही. तसेच निसर्गवाद हा धर्माच्या निश्चित व मौलिक स्वरूपावर कोणताच प्रकाश टाकत नाही. तसेच आत्मवाद आणि निसर्गवाद यांनी धर्माचा उदय ही साधी सोपी सरळ बाब मानली आहे. परंतु ती अत्यंत संकीर्ण अशी आहे.

त्यामुळे, डुर्खीमच्या मते, आदिमानवाजवळ नैसर्गिक व अतिनैसर्गिक यामध्ये भेद करण्याची बौद्धीक क्षमता नव्हती. त्यामुळे धर्माचे हे दोन्ही सिद्धांत आपोआपच खोटे ठरतात. अशा पद्धतीने दोन्ही सिद्धांताचे खंडन डुर्खीमने केलेले आहे.

आणि यानंतर त्याचा धर्माच्या उदयाचा सिद्धांत मांडलेला आहे.

**डुर्खीमची धर्माची व्याख्या :**

धर्म ही एक पवित्र वस्तुंशी संबंधित असलेल्या श्रद्धा व विधी यांची एकसंघ व्यवस्था आहे. या पवित्र वस्तूंना सामान्य व्यवहारापासून दूर ठेवले जाते. या श्रद्धा व विधी त्या धारण करणाऱ्या सर्वांना चर्च नावाच्या एका नैतिक समुदायात एकत्र करतात.

या व्याख्येचे विश्लेषण केल्यास पुढील काही मुद्दे अधोरेखित करता येतात. ते म्हणजे धर्म ही एक पवित्र वस्तुंशी संबंधित श्रद्धा व विधींची एकसंघ व्यवस्था आहे. तसेच पवित्र मानल्या जाणाऱ्या वस्तूंना लौकिक किंवा जीवनापासून वेगळे केलेले असते. श्रद्धा किंवा विधींना पालन करणाऱ्या सर्व व्यक्ती एकत्र संघटित होतात, त्या नैत्तिक समुदायाला चर्च असे संबोधले गेले आहे.

एकूणच डुर्खीमच्या या व्याख्येमध्ये वरील मुद्द्याच्या आधारे धर्माची व्याख्या सहजपणे समजून येते.

**धर्माचा उदयाचा सिद्धांत :** डुर्खीमचा धर्माचा उदयाचा सिद्धांत हा पुढीलप्रमाणे समजून घेता येईल.

देवकवाद किंवा कुलप्रतिकवाद (Totemism) :

एमिल डुर्खीम यांचा हा सिद्धांत ऑस्ट्रेलियातील 'अरुंटा' या जगातील सर्वात प्राचीन जमातीतील देवकवादाच्या अभ्यासावर आधारित आहे. त्यामुळे या जमातीमध्ये असणारी धर्मकल्पना ही धर्माचे आद्य किंवा प्रारंभिक रूप (Elementary Form) आहे असे डुर्खीमने मानले आहे. हा जो देवकवाद आहे त्याचा प्रथमतः आपण अर्थ समजावून घेवू.

'देवकवाद' म्हणजे आदिवासी जमातींमध्ये 'कुल' हा एकपक्षीय आप्तसंबंधितांचा समूह आढळतो. प्रत्येक जमातीत अनेक 'कुले' असतात त्या कुलातील प्रत्येक सदस्य आपल्या उत्पत्तीचा संबंध एखाद्या विशिष्ट कुलप्रतिकाशी-देवकाशी जोडतात. त्यांचे त्या देवकाबरोबर किंवा कुलाबरोबर अत्यंत भावनिक पातळीवरचे नाते असते. हे देवक चिन्ह, सजीव वस्तू (पशू, पक्षी, वनस्पती, पर्वत, नदी, दगड, झाड, सूर्य, अग्नी, वायू) असे असू शकते. त्याच्या प्रति त्यांच्या मनामध्ये अत्यंत पावित्र्याची आणि आदराची भावना असते. अगदी त्या कुलप्रतिकाच्या वास्तविक रुपाला किंवा प्रतिकाला सुद्धा ते अत्यंत पवित्र मानतात आणि त्याची पूजा करतात. त्याच्या नावाने सण-उत्सव साजरे करतात. तसेच त्याचबरोबर काही विधिनिषेधही पाळतात. उदा. देवक असलेल्या प्राण्याची, पक्ष्याची शिकार न करणे, त्याला त्रास न देणे, झाड न तोडणे, देवक चिन्ह अंगावर गोंदवणे, समान देव असणाऱ्या स्त्री-पुरुषांनी परस्परांना भाऊ-बहीण मानने असले रीतीरिवाज पाळले जातात या रीतीरिवाजांनाच देवकवाद (Totemism) असे म्हटले जाते. हे देवक आपले रक्षण करतात यावर त्यांची कमालीची श्रद्धा असते. अशा या देवकाला ईश्वर, पवित्र मानून त्याची सामूहिक

पुजा केली जाते. या सामुहिक पुजेच्या वेळा समूहातील सदस्यांना सामुहिक संवेदनेची अनुभूती येते. अशा या पुजाअर्चेतून धर्माचा उदय झाला असे डुर्खीम म्हणतो.

डुर्खीमच्या मते देवकवादामध्ये असणाऱ्या देवकांमध्ये कोणतीही अलौकीक शक्ती किंवा विशेष गुणधर्म वगैरे काही नसते. ही जी देवक किंवा प्रतिकं आहेत तीच्या शक्तीचा जो स्त्रोत आहे तो त्या समाजातच आहे. त्यामुळे देवकवाद पूर्वजपुजा, पशु, पक्षी, झाडे, यांची पुजा नाही तर ती समाजाचीच पुजा आहे. ईश्वर अन्य काही नसून समाजच आहे. समाजापुढे व्यक्ती हा गौण आहे असे दुर्खीम म्हणतो. त्यामुळेच दुर्खीमच्या मतानुसार देवकवाद हे धर्माचे प्रारंभिक रूप आहे.

दुर्खीमच्ये मते ईश्वरास शरण जाणे म्हणजे समाजास शरण जाणे होय. तसेच ईश्वराचे जे गुण मानले जातात उदा. पावित्र्य, दया, क्षमा, शांती, औदार्य ते प्रत्यक्षामध्ये समाजाचेच गुण आहेत. तसेच ज्या गोष्टी ईश्वरनिर्मित मानल्या जातात जसे की पापपुण्य, धार्मिक विधी, निषेध नियमने, हे समाजनिर्मितच आहे. ईश्वराची स्वर्गाची कल्पना ही आदर्श समाजाची कल्पना आहे असे दुर्खीम मानतो.

थोडक्यात समाज हाच धार्मिक, अनुभूतीचे उगमस्थान आहे. समाज हाच महत्त्वाचा आहे. धार्मिक श्रद्धा, विधी ही त्याची प्रतिके आहेत अशी मध्यवर्ती संकल्पना डुर्खीमच्या धर्माच्या सिद्धांतांची मांडता येईल.

**पवित्र अपवित्र संकल्पना :** डुर्खीमने धर्माचा सामाजिक सिद्धांत प्रतिपादित करत असताना त्याचे धर्माचे स्वरूप समजावून घेण्यासाठी पवित्र, अपवित्र, श्रद्धा व विधी या चार संकल्पना ज्या धर्माच्या सिद्धांतात अंतर्भूत आहेत त्या समजावून घेणे महत्त्वाचे आहे.

**अ) पवित्र वस्तू :** आपला धर्माचा सिद्धांत विश्लेषित करताना डुर्खीमने जगातील सर्व वस्तूंचे पवित्र आणि अपवित्र वस्तू असे दोन प्रकार पाडले आहेत. एखाद्या धर्मात एखादी वस्तू पवित्र मानली आणि मग त्यावर विश्वास ठेवणाऱ्या लोकांमध्ये सामेहिक एकता निर्माण होते. त्या वस्तूच्या अंगभूत/अंतर्गत गुण अथवा उपयोगवादी मूल्यांमुळे पवित्र होत नाही तर समाज तिच्याकडे कोणत्या दृष्टिकोणातून पाहतो या आधारे ठरते, किंवा समाज त्यांना विशेष आदर सन्मान देतो, आणि इतर वस्तुंच्या तुलनेत त्यांना उच्च स्थान प्रदान करतो.

म्हणजेच समाज ज्या वस्तूकडे आदराने, सन्मानाने किंवा पावित्र्याच्या दृष्टिने पाहतो ती वस्तू पवित्र ठरते. उदा. हिंदू 'नारळास' पवित्र मानतात, वास्तविक ते इतर फळांसारखेच एक फळ आहे. त्याच्या उपयोगामुळे त्याला पवित्र मानले जाते का? तर तसे नाही 'हिंदू' नारळाकडे 'श्री' (देवाचे) फळ म्हणून बघतात. बौद्ध लोक 'पिंपळ' वृक्षाकडे 'बोधिवृक्ष' म्हणून बघतात. म्हणून तो त्यांना पवित्र वाटतो, तसेच पुजेच्या फुलांना पवित्र मानले जाते, ती फुले ताटातून खाली पडली, अनावधानाने पायदळी तुडवली गेली तर त्या फुलाला डोक्याला लावले जाते आणि त्याची क्षमा मागितली जाते. अशी असंख्य उदाहरणे पवित्र वस्तूंच्या संदर्भात सांगता येतील.

यावरून असे म्हणता येते की त्या वस्तूचे पावित्र्य हे त्याच्या अंतर्भूत गुण, उपयोगितेवरून ठरवले जात नाही तर समाज त्या वस्तूकडे कोणत्या दृष्टीने बघतो हे महत्त्वाचे मानले जाते.

या पवित्र वस्तुंची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे समजून घेता येतील.

१) बहुसंख्य पवित्र वस्तू या मूर्त असतात त्यापैकी काही सजीव (पशु, पक्षी, वनस्पती) तर काही निर्जीव (उदा. देवाची मूर्ती, धर्मग्रंथ, धर्मस्थळे) असतात.

२) पवित्र वस्तू या कायम वेगळ्या ठेवल्या जातात.

३) पवित्र वस्तूबद्दलची आदर आणि सन्मानाची भावना असते.

४) पवित्र वस्तूंना निषेध नियमांद्वारे सुरक्षित करून त्याचे पावित्र्य राखण्याचे कार्य केले जाते.

५) पवित्र वस्तूंच्या उपस्थितीमध्ये समूहातील सदस्यांनी कसे वर्तन करावे हे ही ठरवले जाते. त्यासंदर्भातही काटेकोर नियमांचे पालन केले जाते; की ज्या माध्यमातून त्या वस्तूचे पावित्र्य टिकून राहिले.

६) पवित्र वस्तूमध्ये समाजाला उपयुक्त ठरणारा गुणधर्म असतो अशी समाजाची समजूत असते, मात्र ही वस्तू प्रत्यक्षत तशी असेलच असे नाही. म्हणजेच पवित्र वस्तूला व्यावहारिक बाजूने पाहिले जात नाही.

७) पवित्रता एकरूपतेच्या नियमांचे प्रतिनिधित्व करतात.

८) पवित्र वस्तू लोकांवर नैतिकदृष्ट्या वर्चस्व गाजवितात.

जशा पवित्र वस्तूंबद्दल डुर्खीमच्या धर्मविषयक सिद्धांतात मांडणी आहे तशीच अपवित्र वस्तूंबद्दलही स्पष्टीकरण केलेले आहे.

**ब) अपवित्र वस्तू :** डुर्खीमच्या मते ज्या वस्तू पवित्र नाहीत त्या अपवित्र ठरतात. अपवित्र वस्तू या पवित्र वस्तूंचा प्रतिवाद ठरतात. पवित्र नसलेली वस्तू म्हणजे अपवित्र वस्तू होय. अपवित्र वस्तू वाईट वा निरुपयोगी असते असा अर्थ घेतला जात नाही. त्या साधनरूप असतात, त्यांच्याकडे फायद्याच्या दृष्टिने पाहिले जाते त्यांचा संबंध धार्मिक जीवनाशी जोडला जात नाही तसेच त्या वस्तूंकडे श्रद्धेने न बघता तार्कीकतेने बघितले जाते. पवित्र आणि अपवित्र या संकल्पना सापेक्ष आहेत. कारण त्या स्थल, काल व व्यक्ती परत्वे बदलतात. उदा. एखाद्या समाजात जी वस्तू पवित्र मानली जाते तीच वस्तू दुसऱ्या समाजात अपवित्र मानली जाते. उदा. गाय हिंदू धर्मात पवित्र. तर मुस्लीम धर्मात अपवित्र, म्हणून हिंदूंमध्ये गोमांसभक्षण वर्ज्य ठरते.

दुर्खीमच्या मते पवित्र वस्तूंचा संबंध धर्माशी असतो. त्या विधिनिषेधाची जपणूक करतात. समाज त्या पवित्र वस्तूंना अपवित्र वस्तूंपासून दूर ठेवतो.

**क) श्रद्धा व विधी :** डुर्खीम धर्मास श्रद्धा व विधी यांची एकसंघ व्यवस्था मानतो. श्रद्धा या पवित्र वस्तूंशी संबंधित असतात तर विधी हे त्या पवित्र वस्तूंच्या बाबत करावयाच्या आचरणाशी संबंधित

असतात. समाजाची वास्तविकता ही श्रद्धेशी जोडलेल्या विचारांमध्ये असते. विचार आणि श्रद्धा या समाजाचे प्रतिनिधित्व करतात म्हणून समाज हाच ईश्वर आहे असे प्रतिपादन डुर्खीम करतो. कर्मकांड हे धर्माचे क्रियात्मक अंग आहे. धार्मिक विधिच्या माध्यमातून काही साध्य नाही झाले तरी त्या विधी सातत्याने लोक करतात, कारण त्या विधिच्या पाठीमागे असणारी प्रचंड श्रद्धा. लोक श्रद्धाळू आणि अंधश्रद्धाळू असतात. कारण ते अविवेकी आणि अतार्कीक असतात. तरीही त्यातून बाहेर पडण्याची त्यांची इच्छा असत नाही. एखादा धार्मिक विधी एखाद्या समूहामध्ये पिढ्यान्‌पिढ्या सुरूच राहातो; आणि तो अत्यंत श्रद्धेने पार पाडला जातो. डुर्खीमच्या मते या विधिमुळे लोकांच्यात ऐक्य निर्माण होते, ते एकतेच्या सूत्रामध्ये बांधले जातात. डुर्खीमने काढलेला निष्कर्ष असा की समान श्रद्धा बाळगणाऱ्या व समान विधीमध्ये सहभागी होणाऱ्या लोकांच्या सामाजिक ऐक्यभाव निर्माण करण्याचे प्रकार्य धर्म पार पाडत असतो. यालाच धर्माचा प्रकार्यात्मक दृष्टिकोन असे म्हटले जाते.

एकूणच वरील विवेचनाच्या आधारे दुर्खीमचा धर्मविषयक सिद्धांत समजून घेता येतो. डुर्खीमचे धर्मासंदर्भातील अध्ययन, चिंतन हे अत्यंत महत्त्वपूर्ण असले तरी त्याच्याही सिद्धांतावर टीका आक्षेप घेतलेले आहेत.

**डुर्खीमच्या सिद्धांतांवरील टीका :**

१) एक म्हणजे देवकपुजेतून धर्माचा उदय झाला हे योग्य वाटत नाही. कारण अनेक जमातीमध्ये देवक व धर्म यांचे अस्तित्व भिन्न भिन्न आहे. तसेच हा सिद्धांत केवळ 'अरुंटा' या जमातीच्या अध्ययनावर आहे आणि तो धर्माचा सामान्य सिद्धांत मांडला आहे.

२) मॅलीनोस्कींच्या मते धर्माची उत्पत्ती ही फक्त सामुहिक आधारावर नाही तर ती व्यक्तिगत अनुभवाच्या आधारावर झालेली आहे. मॅलीनोस्की हे धर्मास एक सामाजिक घटना आणि वैयक्तिक अनुभूतीही मानतात. डुर्खीम मात्र धर्मास केवळ सामाजिक घटना मानतो व वैयक्तिक अनुभूतीकडे दुर्लक्ष करतो.

३) मेल्कोम आणि हॅमिल्टन यांच्या मते डुर्खीमचा धर्मविषयक सिद्धांत फक्त अत्यंत साध्या जीवन जगणाऱ्या समाजापुरता मर्यादित आहे. आधुनिक समाजव्यवस्थेसाठी तो लागू होत नाही.

४) तसेच 'अरुंटा' या जमातीपेक्षाही काही जमाती या अधिक प्राचीन आहेत. त्यामुळे अरुंटा जमात हीच अतिप्राचीन जमात आहे हे डुर्खीमचे मत खरे नाही. तसेच केवळ एकाच जमातीच्या अध्ययनावरून काढलेले निष्कर्ष हे एकांगी ठरतात.

वरील पद्धतीने जरी डुर्खीमच्या धर्मविषयक सिद्धांतावर टीका झाल्या असल्या तरी डुर्खीमचा धर्मविषयक सिद्धांत हा प्रकार्यवादी दृष्टिकोनातून महत्त्वाचे योगदान देणारा असा आहे.

वरील पद्धतीने डुर्खीमच्या धर्माच्या सिद्धांताचे विवेचन करता येईल.

यानंतर दुसरा पाश्चिमात्त्य विचारवंत मॅक्सवेबर यांच्या धर्मविषयक सिद्धांताचे अध्ययन आपण करणार आहोत.

**मॅक्स वेबर यांचा धर्मविषयक सिद्धांत :**

डुर्खीम यांच्या प्रमाणेच मॅक्स वेबर या जर्मन समाजशास्त्रज्ञाने धर्माच्या समाजशास्त्राच्या विकासात आपल्या अध्ययनातून मोठे योगदान दिलेले आहे. वेबर हे फक्त समाजशास्त्रज्ञच नाही तर त्यानी अर्थशास्त्र, इतिहास, कायदाशास्त्र इत्यादी विषयातही अध्ययन, चिंतन केलेले आहे. वेबर यांचा जन्म २ एप्रिल १८६४ रोजी जर्मनीतील 'एरफर्ट' या शहरामध्ये झाला. त्यांचे कुटुंब एक संपन्न कुटुंब होते त्यांचे आई-वडिल हे प्रोटेस्टंट पंथाचे अनुयायी होते. त्यांचे आजोबा तागाचे व्यापारी होते. मॅक्स यांच्या वडिलांनी या व्यापारात लक्ष घातले परंतु नंतर बर्लिन शहरात सरकारी खात्यामध्ये नौकरी स्विकारली, त्यानंतर एटफर्ट शहरात न्यायाधीश म्हणून नेमणूक झाली. त्या नौकरीचा राजीनामा दिला आणि बर्लिन या मूळ गावी परतले. त्यानंतर त्यांना व्यवसायाबरोबरच राजकारणात प्रवेश केला. बिस्मार्कच्या काळात ते नॅशनल लिबरल पार्टीचे महत्त्वाचे कार्यकर्ते झाले. एकूणच घरात सामाजिक आणि राजकीय वातावरण होते. विविध राजकीय नेते, विचारवंत, अर्थतज्ज्ञांचे घरी येणे जाणे होते. त्यांची आईही सुशिक्षित प्रोटेस्टंट पंथाची अनुयायी होती. त्याचाही परिणाम मॅक्स वेबरच्या व्यक्तिमत्त्वावर झाला. वेबरने मुख्यतः अनुभवजन्य संशोधनावर भर दिलेला आहे. त्याने जगातील प्रमुख सहा धर्माचा तुलनात्मक अभ्यास केला. (ख्रिस्ती, ज्यू, हिंदू, बौद्ध, कन्फ्युशिअस, ताओ)

धर्माचा अभ्यास आर्थिक दृष्टिकोनातून केला आहे, आर्थिक विकासामध्ये धर्माचे योगदाान काय आहे याचे विवेचन त्याच्या धर्मविषयक चिंतनात दिसून येते.

वेबरने धर्माच्या अभ्यासाच्या आधारे खालील ग्रंथ लिहिलेले आहेत.

(१) दि प्रोटेस्टंट एथिक्स ॲण्ड स्पिरिट ऑफ कॅपिटॅलिझम, (२) दि रिलिजन ऑफ इंडिया, (३) दि रिलिजन ऑफ चायना, (४) एनसिएंट ज्युडाईम, (५) सोशॅलॉजी ऑफ रिलिजन या सर्व ग्रंथाच्या माध्यमातून वेबरचा धर्मविषयक दृष्टिकोण स्पष्ट होतो. या बहुतांश ग्रंथांचे लेखन त्यांनी जर्मन भाषेमध्ये केले आहे. या ग्रंथलेखनातून त्यांचे धर्मविषयक ज्ञान हे किती सखोल होते हे लक्षात येते. समाजशास्त्राच्या नवीन संशोधनामध्ये आपल्या वैज्ञानिक दृष्टिकोनातून मोलाची भर घालणारा एक अभिजात विचारवंत म्हणून त्याकडे पाहिले जाते.

वेबरने धर्माचा अभ्यास हा घटनाशास्त्रीय दृष्टीने केला आहे, हा अभ्यास समजून घेण्यासाठी प्रथमतः घटनाशास्त्रीय दृष्टिकोनाचा अर्थ समजून घेणे महत्त्वाचे आहे. घटनाशास्त्र म्हणजे, ''मानवी इंद्रियांना अनुभवास येणाऱ्या म्हणजेच निरीक्षणक्षम असणाऱ्या घटनाघटनांमधील परस्परसंबंधांचे पूर्वग्रहविरहितपणे, पद्धतशीर आकलन करून घेणे म्हणजे घटनाशास्त्र होय.

वेबरने धर्माचा घटनाशास्त्रीय दृष्टिकोनातून धर्म आणि अर्थव्यवस्था यांच्यामधील परस्परसंबंधांचे अध्ययन केले आहे. मॅक्स वेबर यांच्या मते, समुदायाच्या अनुभविक नैतिक तत्त्वांचा आणि त्या समुदायातील आर्थिक व्यवस्थांचा परस्परांशी कमालीचा आणि निकटचा संबंध असतो.

आपल्या 'प्रोटेस्टंट एथिक्स ॲण्ड स्पिरिट ऑफ कॅपिटॅलिझमा' या ग्रंथामध्ये धर्मविषयक दृष्टिकोणाची मांडणी केली आहे. वेबर यांनी वर प्रतिपादित केल्याप्रमाणे धर्माचा अभ्यास करत असताना जगातील सहा मुख्य धर्माच्या अभ्यासानंतर धर्मविषयक दृष्टिकोणाचे प्रमुख आधार अधोरेखित केलेले आहेत. ते पुढीलप्रमाणे अभ्यासता येतील.

धर्म आणि आर्थिक घटना परस्परांवर अवलंबून आहेत. हे दोन्हीही परस्परांना प्रभावीत करत असतात.

वेबरच्या मते, कोणताही एकांगी दृष्टिकोन हा वैज्ञानिक नसतो. कोणत्याही प्रकारच्या एकतर्फी युक्तीवादापासून आपली फसवणूक होणार नाही याची आपण काळजी घेणे आवश्यक असते. ज्याप्रमाणे इतिहासाचे आर्थिक स्पष्टीकरण विश्वसनीय आणि अगदी बिनचूक असू शकत नाही. त्याप्रमाणे इतिहासाचे आर्थिक स्पष्टीकरण विश्वसनीय आणि अगदी बिनचूक नसते तसेच सर्व सामाजिक घटनांचे मूळ, धर्म असे समजून चालणे सुद्धा विश्वसनीय होणार नाही. हे दोन्ही घटक परस्परावलंबी आहेत. याशिवाय आणखी काही घटक मानवी समाजाचे अस्तित्व उत्क्रांतीत समाविष्ठ असतात.

तसेच वेबरच्या मते, पद्धतीशास्त्राच्या दृष्टीने आपण कोणत्याही एका घटकाची 'परिवर्तनशील घटक म्हणून निवड करून त्याच्या साहाय्याने या घटकांचा आर्थिक आणि इतर सामाजिक घटकांवर होणाऱ्या परिणामांचे परीक्षण केले आहे.

वेबर यांनी आपल्या धर्मविषयक दृष्टिकोनात धर्माशी संबंधित सर्व तत्त्वांचे स्पष्टीकरण न करता केवळ 'आदर्श प्रारुपांना' निश्चित करत त्यांच्यातील कार्यकारणभावांच्या प्रभावांना व्याख्यान्वित केले आहे.

वरील पद्धतीने वेबर यांनी धर्मविषयक दृष्टिकोन मांडत असताना आपल्या दृष्टीकोनाचे प्रमुख आधार मांडलेले आहेत.

मॅक्स वेबर यांनी धर्माला परिवर्तनशील घटक म्हणून निवड करून धर्माचा आर्थिक जीवनावर पडणारा प्रभाव आपल्या अध्ययनात मांडला आहे.

**प्रोटेस्टंट नीतीशास्त्र आणि भांडवलशाहीची प्रवृत्ती :**

मॅक्स वेबर यांनी आपल्या धर्माच्या चिंतनातून धर्म हा कसा अर्थव्यवस्थेवर प्रभाव टाकतो हे 'प्रोटेस्टंट एथिक्स ॲण्ड स्पिरिट ऑफ कॅपिटॅलिझम' या ग्रंथामध्ये स्पष्ट केलेले आहे. धर्म आणि अर्थव्यवस्था या कशा परस्परांना प्रभावित करत असतात त्यांच्यातील परस्परसंबंध कशा प्रकारचे आहेत हे दाखवून दिले आहे.

अर्थव्यवस्था आणि धर्मातील अन्योन्य संबंध दाखवून देताना कार्लमार्क्स यांचा संदर्भ वेबर यांनी दिला आहे आणि त्यांच्या विचारांचे खंडणही केलेले आहे. मार्क्स म्हणतो की अर्थव्यवस्थेवर समाजातील इतर व्यवस्था अवलंबून असतात त्यामुळे अर्थव्यवस्थेमध्ये बदल झाला की इतर व्यवस्थेत बदल होतो. अर्थव्यवस्था ही धर्मावर प्रभाव टाकत असते. मार्क्सचे हे मत वेबरला एकांगी वाटते. त्यांच्या मते धर्म व

अर्थव्यवस्था या एकमेकावर प्रभाव टाकत असतात. म्हणजे मार्क्स अर्थव्यवस्थेचा धर्मावरील प्रभाव सांगतो तर वेबर हा धर्माचा अर्थव्यवस्थेवरील प्रभाव दाखवतो.

यासंदर्भातील विवेचन वेबरने त्या ग्रंथात केलेले आहे. ख्रिस्ती धर्मातील प्रोटेस्टंट पंथाचे नीतीशास्त्र हे विशेषतः 'कॅलव्हिनवादी' या नावाच्या उपपंथाची नीतीतत्त्वे किंवा आचारसंहिताही भांडवलशाहीची प्रवृत्ती विकसित करण्यात कशी सहाय्यभूत ठरली याचे पुराव्यासहित विश्लेषण केले आहे.

१६ व्या शतकामध्ये युरोपात प्रोटेस्टंटवाद हा प्रचलित झाला. याचे मुख्य प्रवर्तक मार्टीन ल्युथर आणि जॉन कॅल्व्हिन या दोघांचा उल्लेख केला जातो. कॅथॉलिक पंथातील परंपरागत आणि कर्मकांडामध्ये गुंतलेल्या विचारसरणीला मागे टाकले. त्याकाळामध्ये कॅथलिक धर्मापदेशक राजाप्रमाणे अत्यंत सुखविलासी जीवन जगत होते. भ्रष्टाचार वाढलेला होता हे सर्व संपवण्यासाठी साधे जीवन जगणारा, सुधारणावादी प्रोटेस्टंट चर्चची स्थापना संपूर्ण युरोपमध्ये करण्यात आली. फ्रेंच विद्वान जॉन कॅल्व्हिनने 'कॅल्व्हिनवाद' पंथाची स्थापना केली.

मॅक्स वेबर यांच्या निरीक्षणानुसार पाश्चात्य भागात प्रामुख्याने प्रोटेस्टंट पंथाचे लोक आहेत आणि त्यांनी ऐहिक जीवनात खूप प्रगती केली आहे. शिक्षण, व्यवसायात ते अग्रेसर आहेत. नौकरशाहीत वरची पदे काबीज केलेली आहेत. कुशल तांत्रिक कामगार आहेत. भांडवलवृद्धीत त्यांचा मोलाचा वाटा आहे. त्यांच्या धर्मातील आचारात कोणत्या गोष्टी आहेत की ज्यामुळे भांडवल वृद्धी झाली आहे. तसेच ज्या क्षेत्रामध्ये भांडवलशाहीचा विकास झाला त्या क्षेत्रामध्ये कॅल्व्हिनवादी पंथाचा प्रभाव होता. त्यामुळे कॅल्व्हिनवादी आचाराचा प्रभाव आहे का? याचा शोध घेण्यासाठी या पंथाची वैशिष्ट्ये लक्षात घेतली.

**कॅल्व्हिनवादातील नीतीतत्त्वे :** कॅल्व्हिन पंथाची पुढील पाच तत्त्वे कॅलव्हिन यांनी सांगितलेली आहेत. १) ईश्वर अनुभवातीत आहे. त्याने जग निर्माण केले असून तोच या जगावर राज्य करतो. मनुष्याची बुद्धी मर्यादित असल्याने तो ईश्वरास ना समजू शकतो ना त्याच्यापर्यंत पोहोचू शकतो. २) ईश्वराने मानवाच्या भाग्यात शाश्वत मोक्ष आहे की मृत्यु (पाप) आहे हे अगोदरच ठरवून टाकलेले आहे व त्याचे कारण मानवास कळु शकत नाही. ३) ईश्वराने स्वतःच्या गौरवासाठी जग निर्माण केले आहे. ४) आपल्या या गौरवासाठी ईश्वराने मानवास असा आदेश दिलेला आहे की, त्याने आपल्या भाग्यात मोक्ष आहे की नरक आहे याची चिंता न करता पृथ्वीवर स्वर्ग आणण्यासाठी कष्ट करावेत. ५) जगातील सर्व वस्तू, मानवाचा स्वभाव आणि हाडे व मांस या गोष्टी पाप व मृत्यूचे निदर्शक आहेत. केवळ ईश्वरी कृपेनेच त्यांच्यापासून मुक्ती मिळू शकते.

कॅलव्हिनच्या या पाच तत्त्वांचे एक आदर्श प्रारुप तयार करून वेबरने कॅलव्हिनची ही तत्त्वे व भांडवलशाही यांच्यात घनिष्ट संबंध असल्याचे स्पष्ट केले आहे. प्रोटेस्टंटवादाने आधुनिक भांडवलशाहीला दिलेल्या सात देणग्या आहेत. त्यातून भांडवलशाहीच्या विकासाला प्रभावित करणारी वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतात.

**१) काम हीच पूजा :** प्रोटेस्टंट आचारशास्त्रामध्ये काम करणे हा सर्वात मोठा गुण मानला आहे. कॅथॉलिक नीतीतत्त्वामध्ये मात्र असे विचार आढळत नाहीत. 'काम हीच पुजा' आहे काम केल्यानेच ईश्वराची प्राप्ती होते अशा पद्धतीचे विचार प्रोटेस्टंट नीती तत्त्वामध्ये असल्याने भांडवली विकासात त्याचे स्थान मोठे आहे. थोडक्यात या तत्त्वाच्या अनुषंगाने कामालाच ईश्वराची प्रार्थना असे म्हटले आहे.

**२) धनाद्वारेच धनाची वृद्धी होते :** प्रोटेस्टंट आचारशास्त्रातील धनाद्वारेच धनाची वृद्धी होते हा विचार महत्त्वाचा आहे. म्हणजे कर्जावर व्याज वसूल करण्यास दिलेली मान्यता होय. बेंजामिन फ्रँकलीन यांच्या मते, धनाने धन मिळवता येऊ शकते याचा अर्थ आपल्या धनाचा उपयोग धन मिळवण्यासाठी करता येऊ शकतो. ज्यामध्ये व्याजाच्या रुपाने धन मिळवता येते. कॅथॉलिक नीतित्त्वामध्ये व्याज घेणे हे अधर्म मानले जाई. यांच्या उलट इथे व्याज घेण्याला मान्यता दिलेली आहे. याचा परिणाम म्हणून व्यक्ती आपले धन ईश्वरीय दंड अथवा भय बाजूला ठेवून धन मिळवण्यासाठी कोणत्याही उद्योगामध्ये गुंतवू शकते.

**३) व्यावसायिक नीतितत्त्वे :** प्रोटेस्टंटवादाने भांडवलशाहीच्या विकासाला प्रभावित करणारे महत्त्वाचे घटक म्हणजे 'व्यावसायिक नीतितत्त्वे' किंवा 'उद्योगाची' संकल्पना होय. या तत्त्वांमुळेच भांडवलशाहीच्या वाढीस सहाय्यता मिळाली आहे. कॅलव्हिनवादामध्ये असे मानले जाते की, व्यक्तीच्या मृत्यूनंतर प्रत्येक आत्म्याला एक तर स्वर्गात किंवा नरकात जावे लागणार आहे. व्यक्तीने आयुष्यभर केलेल्या कामाने त्याचे भाग्य बदलत नाही. परंतु अशी काही चिन्हे व्यक्तीला दिसून येतात की त्यावरून आपला आत्मा स्वर्गात जाणार की नरकात या विषयीचा अंदाज येतो. आपण करत असलेल्या कामामध्ये किंवा व्यवसायामध्ये अधिकाधिक यश प्राप्त करत असेल तर तो स्वर्गात जाणार आहे. या तत्त्वामुळे प्रत्येकाने आपल्या उद्योगामध्ये सतत कार्यमग्न राहून अधिकाधिक यश संपादन करण्याचा प्रयत्न केला पाहिजे असा प्रभाव पाडला गेला. आपले कार्य अधिकाधिक कठोर प्रशिश्रमातून यशस्वीता प्राप्त करणे म्हणजे ईश्वरीय इच्छेने गुणगाण केल्यासारखेच आहेत. चर्चला नियमित भेट दिल्यामुळे अगर यात्रांमुळे मोक्षप्राप्ती होणार नाही. तर आपल्या वाट्याला आलेले काम व्यवस्थितरित्या करण्यानेच मिळणार आहे. एखादी व्यक्ती आपल्या धर्माचे पालन चर्चप्रमाणेच आपल्या कामाच्या ठिकाणी किंवा व्यवसायाच्या ठिकाणीही करू शकते. हे विचार भांडवली विकासास अधिकाधिक मदत करणारे ठरले. भांडवलशाहीची यशस्वीता ही प्रत्येक व्यक्ति आपल्या व्यावसायिक क्षेत्रामध्ये अधिक उत्साह आणि निष्ठापूर्वक काम करण्यावरच अवलंबून आहे. अशाप्रकारे व्यावसायिक नीतीतत्त्वे भांडवलशाही विकासाला कारणीभूत ठरले.

**४) मद्यसेवनावर बंदी :** प्रोटेस्टंट आचारशास्त्रामध्ये मद्यपानाला बंदी घातली असून त्याला वाईट कर्म असे म्हटले आहे. या वर्तनाला कमी ठरवून सदवर्तन आणि इमानदारी वृत्ती अधिक अधिक उच्च ठरविण्यात आले आहे. महासेवनावरील बंदी वा निर्बंधामुळे या लोकांमधील आळशीपणा कमी होवून कामाच्या ठिकाणी कार्यक्षमता वाढली, कुशलता वाढली, त्याचबरोबर जे लोक यंत्रावर काम करतात त्यांच्यासाठी तर या गोष्टी खूप महत्त्वपूर्ण आहेत. या आचारशास्त्रामध्ये आत्मसंयमाला महत्त्व दिलेले आहे. यामध्ये सरळ, साध्या जीवनाचा पुरस्कार केलेला आहे श्रमाला मौल्यवान म्हटले आहे.

**५) अतिसुट्ट्या घेण्याला विरोध :** प्रोटेस्टंटवादात कॅथॉलिक प्रमाणे अतिसुट्ट्या घेण्याला विरोध केला आहे. प्रोटेस्टंटांसाठी काम हीच पुजा आहे. एखाद्या व्यवसायाची वृद्धी व्हायची असेल तर अधिकाधिक काम श्रम आणि कमीत कमी सुट्ट्या घेणे महत्त्वाचे असते हे आचारशास्त्र सांगते यामुळे माणसाचे कामाचे तास वाढले तर भांडवलाचा पुरेपूर वापर होवू लागला.

**६) साक्षरता व शिक्षणाला चालना :** प्रोटेस्टंटवादात शिक्षण आणि साक्षरतेला महत्त्वाचे स्थान दिले गेले. प्रोटेस्टंट पंथ हा शिक्षणाला प्रोत्साहित करत असल्यामुळे सर्वसामान्यांच्या शिक्षणात आणि साक्षरतेमध्ये वाढ झाली. परिणामी कुशल लोकांची संख्याही वाढली.

**७) प्रामाणिकपणा (सचोटी) :** प्रोटेस्टंट आचारशास्त्रामध्ये प्रामाणिकपणा किंवा सचोटी या गुणाला महत्त्वाचे स्थान आहे. प्रामाणिकपणाने व्यवसाय किंवा काम करणे महत्त्वाचे आहे. कोणालाही न फसवणे, सत्याच्या मार्गाने चालणे याला महत्त्व दिलेले आहे.

तसेच प्रोटेस्टंटवादाने संपत्ती गोळा करण्यात परवानगी दिली आहे. परंतु तिचा वापर मौजमजेसाठी करण्याला विरोध केला आहे. त्यामुळे भांडवलाच्या संचयाला चालना मिळाली. तसेच त्यांनी सांसारिक आणि इंद्रिय सुखाला अयोग्य मानले आहे. चांगले कपडेलत्ते, नृत्य, संगीत नाटक तसेच कादंबरीला राक्षसी देणगी म्हणून उल्लेख केला आहे.

एकूणच वेबरच्या मतानुसार प्रोटेस्टंट पंथामध्ये असलेली नीतीतत्त्वे ही भांडवलशाहीच्या उदयाला आणि विकासाला कारणीभूत ठरली आहेत. प्रोटेस्टंट पंथाचे नीतीशास्त्र व भांडवलशाही प्रवृत्ती यांच्यातील अन्योन्यसंबंध स्पष्ट करून वेबरने धर्माचा अर्थव्यवस्थेवर कसा प्रभाव पडतो हे दाखवून दिलेले आहे. तसेच वेबरने भांडवलशाहीच्या उत्क्रांतीचे परीक्षण करून आपल्या विचारांच्या पुष्ट्यर्थ आपल्यासमोर इतिहासातील काही तथ्येही मांडली आहेत. त्यांच्या मते भांडवलशाहीचा विकास इंग्लंड, अमेरिका, हॉलंड या देशात उच्चतम झाला आहे कारण या देशात प्रोटेस्टंटवादी विचारसरणी, आचारांचे अनुसरण करणारे लोक आहेत. परंतु इटली, स्पेन यासारख्या देशांमध्ये कॅथॉलिक नीती तत्त्वांचा प्रभाव असल्याने भांडवलशाहीचा विकास झाला नाही. वेबरने यासंदर्भात विविध धर्मांचे तुलनात्मक अध्ययन करून भांडवलशाहीच्या विकासासंदर्भात मांडणी केली आहे.

कोणत्याही क्षेत्रामधील व्यवसायामध्ये उत्तुंग यश मिळवण्यासाठी व्यवस्थित आचरण, प्रामाणिकपणा, परिश्रम, कार्यकुशलता, सतर्कता, सचोटी, एकनिष्ठा असणे आवश्यक असते. हे सर्व गुण प्राटेस्टंट नीतीशास्त्रामध्ये आहेत, म्हणून ज्या देशांमध्ये प्रोटेस्टंट पंथाची नीतीतत्त्वे आचरणात आणली जातात. त्याच भागात भांडवलशाहीचा विकास झाला असे वेबर सांगतो आणि धर्माचा अर्थव्यवस्थेशी असणारा अन्योन्य संबंध स्पष्ट करतो.

या पाश्चिमात्त्य विचारवंतांच्या धर्मविषयक चिंतनानंतर आपण भारतीय समाजशास्त्रज्ञांचे धर्माच्या अभ्यासाविषयक दृष्टिकोन आपण अभ्यासणार आहोत.

**ब) भारतीय समाजशास्त्रज्ञांचे धर्मविषयक दृष्टिकोन** Perspectives of Religion in India :

**महात्मा जोतिराव गोविंदराव फुले (१८२७–१८९०) :**

आपल्याला सर्वांनाच महात्मा जोतिराव फुले हे किती महान समाजसुधारक होते ते माहिती आहे. परंतु त्याबरोबर महात्मा फुले हे अत्यंत बुद्धीमान, कृतीशील विचारवंतही होते. त्यांचा पिंड हा कृतीशील क्रांतीकारकाचा होता. ते बोलके सुधारक नव्हते तर ते कर्ते सुधारक होते. आपल्या सामाजिक सुधारण्याच्या कार्यास वैचारिक वा तात्त्विक अधिष्ठान देण्याच्या उद्देशाने महात्मा फुले यांनी विविध विषयांवर आपले महत्त्वपूर्ण विचार मांडलेले आहेत. सामाजिक विषमतेविरोधी लढाई लढत असताना सर्वसामान्य जनतेच्या प्रबोधनासाठी, मानसिक परिवर्तनासाठी प्रचंड लेखन त्यांनी केलेले आहे. तत्कालीन समाज रचना, मानवाचे आचरण, शिक्षण, धर्म, ईश्वर, नीती, अशा विविध विषयांवर अत्यंत तर्कसंगत, बुद्धिवादी दृष्टिने त्यांनी विचार मांडलेले आहेत. तसेच या लेखनामधून त्यांचा विश्वव्यापी मानवतावादी दृष्टिकोणही दिसून येतो.

महात्मा फुले यांनी 'सार्वजनिक सत्यधर्म', 'गुलामगिरी', 'ब्राह्मणांचे कसब', 'शेतकऱ्यांचा आसूड', 'अस्पृश्यांची कैफियत' असे प्रचंड लेखन केले आहे. तत्कालीन समाजव्यवस्थेमध्ये असणारे वर्णभेद, जातीभेद, लिंगभेद आणि त्यातून निर्माण झालेल्या सामाजिक विषमते विरुद्धचा लढा लढणारे दूरदर्शी समाजसुधारक, क्रांतीकारी विचारवंत म्हणून महात्मा फुलेंना गौरवले जाते. सामाजिक समता, न्याय, बंधुता प्रस्थापित करायची असेल तर ब्राह्मण पुरोहित वर्गाने स्त्रीशुद्रांसह बहुजन समाजावर लादलेली धार्मिक व सामाजिक गुलामगिरी नष्ट करून त्यांना मानवाचे अधिकार, हक्क मिळवून देण्यासाठीची महात्मा फुलेंची चळवळ ही महाराष्ट्राच्या इतिहासात गौरवशाली मानली जाते. या चळवळींना संघटित स्वरूप देण्यासाठी सत्यशोधक समाजाची स्थापना महात्मा फुलेंनी केलेली आहे.

या मुद्द्यामध्ये आपण महात्मा फुले यांच्या धर्मचिकित्सेचा अभ्यास करणार आहोत.

**महात्मा फुले यांचा धर्मविषयक दृष्टिकोण :**

महात्मा फुले यांनी सामाजिक विषमतेविरुद्धची चळवळ संघटित करण्यासाठी सत्यशोधक समाजाची स्थापना करून 'सार्वजनिक सत्यधर्म' या नावाचा ग्रंथ लिहिला. या ग्रंथामध्ये सत्यशोधक समाजाची तत्त्वे स्पष्ट करण्यात आली. हा ग्रंथ महात्मा फुले यांनी त्यांच्या आयुष्याच्या शेवटी लिहिला, त्या काळात त्यांना अर्धांगवायुचा झटका आल्याने त्यांचा उजचा हात लुळा पडला. अशा स्थितीतही डाव्या हाताने लेखन पूर्ण केले पण ग्रंथाची छपाई अर्धवट असतानाच फुलेंचा मृत्यु झाला. पुढे त्यांचे दत्तकपुत्र यशवंत यांनी १८९१ मध्ये हा ग्रंथ प्रकाशित केला. हा ग्रंथ संवादात्मक अशा स्वरूपाचा आहे. हा ग्रंथ म्हणजे फुले यांच्या धार्मिक विचारांचे सार आहे. महात्मा फुले यांनी देव, धर्म, पाप-पुण्य, स्वर्ग-नरक इत्यादी गोष्टींवर आपली स्वतःची मते व्यक्त करून समाजातील रुढी, अंधश्रद्धा, अंधविश्वास, धर्मांधता यावर जोरदार हल्ले चढवलेले आहेत. प्रखर विरोध या गोष्टींना केला आहे. त्यांनी विश्वव्यापी असा मानवतावादी दृष्टिकोण समाजाला दिला आहे. त्यांची धर्मचिकित्सा ही काही एका विशिष्ट जाती, धर्म, गटाच्या विरोधामध्ये नव्हती तर समाजात अस्तित्वात असणाऱ्या सामाजिक मूल्यांविरुद्ध होती.

भारतातील धार्मीक गुलामगिरी संदर्भात ते असे म्हणतात की, ''हिंदुस्थानचा इतिहास हा या देशातील बहुसंख्य समाजावर लादलेला गुलामगिरीचा इतिहास असल्याने या देशाला त्याच्या इतिहासामध्ये जेवढे दारिद्र्य, मानहानी, पारतंत्र्य आले तेवढे ते क्वचितच एखाद्या देशाच्या वाट्याला आलेले असेल. ही गुलामगिरी धर्मदास्यातून निर्माण झाली आहे म्हणून हे धर्मदास्य मानवी मुक्तीसाठी झुगारून दिले पाहिजे.''

या धर्मदास्यातून मुक्ती मिळवण्यासाठी धर्मांमध्ये असणारे कर्मकांड, ग्रंथप्रामाण्य, पापपुण्य, संस्कार मानवाचे आचरण इत्यादी विषयी इतरांनी विचारलेल्या प्रश्नांना महात्मा फुलेंनी उत्तरे दिलेली आहेत.

महात्मा फुले यांची धर्मचिकित्सा, धर्मविषयक विचार पुढील मुद्द्यांच्या आधाराने अभ्यासता येतील.

सार्वजनिक सत्यधर्माची प्रतिष्ठापना करण्यापूर्वी जो भ्रष्ट धर्म सर्वसामान्यांच्या मनामध्ये रुजला आहे त्याला लोकांच्या मनातून बाजूला केले पाहिजे. त्यासाठी नेमके काय करायला पाहिजे याचाही विचार ज्योतिबांनी केलेला होता.

**१) ग्रंथप्रामाण्य अमान्य :** महात्मा फुलेंनी धर्मग्रंथाचे प्रामाण्य मान्य केलेले नाही. ते म्हणतात की जगातील कोणताही धर्म हा ईश्वरप्रणित नाही. त्यामुळे कोणताच ग्रंथ हा प्रमाण म्हणजेच सत्य नाही. कोणत्याही धर्माच्या धर्मग्रंथाच्या आधारे त्याच धर्मातील अनुयायांमध्ये भेदाभेद कसा काय केला जाऊ शकतो. म्हणजे स्त्री-पुरुषांमध्ये केला जाणारा भेद कसा काय असू शकतो. त्यामुळे वेद, पुराणे, महाकाव्ये, स्मृतीग्रंथ, भगवत्गीता, ज्ञानेश्वरी इ. ग्रंथांना प्रमाणग्रंथ म्हणून त्यांनी नाकारलेले आहे. कारण त्याद्वारे समाजातील शुद्रातिशूद्रांना अज्ञानाच्या अंधःकारात खितपत ठेवण्यासाठी, त्याचे शोषण करण्यासाठी आपला स्वार्थ साधण्यासाठी रचलेले आहेत. समाजाची वेगवेगळ्या वर्णामध्ये विभागणी करून शुद्रांवर अन्याय अत्याचार करणारी संरचना मुद्दाम तयार करण्यात आली आहे. आणि अशा प्रकारच्या माणसामाणसामध्ये भेद करणाऱ्या, सामाजिक विषमतेला खतपाणी घालणाऱ्या ग्रंथाचे प्रमाणत्त्व महात्मा फुले यांनी नाकारले. वेदांच्या बद्दल महात्मा फुले लिहितात की, वेदग्रंथ हे संस्कृतसारख्या कठीण भाषेमध्ये लिहिण्यामागे व ही भाषा शुद्रातिशूद्रांना शिकण्यास मनाई करण्यामागे ब्राह्मणांचा स्वार्थ दडलेला आहे. वेद ग्रंथ वाचण्याचा अधिकार सर्वांना का नाही असा प्रश्न फुले विचारतात. कारण विविध धर्मग्रंथांच्या माध्यमातून समाजातील बहुसंख्य लोकांच्या मानवी हक्कांना हेतुपुरस्सर डावलले आहे. त्यामुळे महात्मा फुलेंनी ग्रंथप्रमाण्य विरोध केलेला दिसतो, आणि त्यानंतर 'सार्वजनिक सत्यधर्म' या ग्रंथातून समता, स्वातंत्र्य, बंधुता, सहिष्णुता, मानवता या मुल्यांची जपणूक करणारा ग्रंथ प्रमाणभूत असा आहे.

**२) निर्मिक :** महात्मा फुले यांनी ईश्वर हा अद्भूत शक्ती किंवा अदृश्य अशी विभूती आहे हे नाकारले आहे. ते ईश्वराचे अस्तित्व मानतात परंतु हिंदू धर्मातील बहुदेवता त्यांना मान्य नाहीत तर त्यांच्या मते एक ईश्वर हा विश्वाचा निर्माता आहे. त्याने सूर्यमंडळासह सर्व प्राणीमात्रांना निर्माण केले आहे म्हणून त्याला निर्मिक असे संबोधतात. ईश्वरभक्तीच्या पाठीमागे जे जे कर्मकांड आहे ते मानवामानवामध्ये भेद करणारे आहे. त्यामुळे त्यांनी निर्मिक हा सर्वव्यापी, निर्गुण व निराकार आहे असे म्हटले. त्यानंतर महात्मा फुले हे ईश्वरासाठी वापरले जाणारे ब्रह्म, गॉड, अल्ला हे शब्दही नाकारलेले आहेत. ईश्वराला नकार देऊन

निर्मिकाचा त्यांनी स्वीकार केलेला आहे. विश्वाचा निर्माता एकच असल्याने त्याला वेगवेगळी नावे दिली तर त्यातून भेदाभेद वाढतो, विषमता, कलह निर्माण होतात त्यामुळे एकच 'निर्मिक' आहे अशी मांडणी महात्मा फुले करतात.

**३) कर्मकांडाचा त्याग :** महात्मा फुले यांच्या मते, ईश्वरभक्ती करण्यासाठी सर्व धर्मामध्ये जे विविध प्रकारचे कर्मकांड केले जातात ते निरर्थक आहेत. या गोष्टींना त्यांना कडाडून विरोध केलेला आहे. आणि पुरोहितांचा भांडाफोड केला आहे. पारंपारिक पुजा, नामस्मरण, जपजाप्य, तीर्थयात्रा, तीर्थस्थान, सोवळेओवळे, इत्यादी विधींची आवश्यकताच नाही. हे सर्व विधी भटभिक्षुकांनी आपले पोट विनाकष्टाने भरण्यासाठी तयार केलेले आहेत. या सर्व हिंदू धर्मातील विधी भक्तीची साधने नाहीत तर ती शोषणाची साधने आहेत, सामान्य जनांना गुलामगिरीत ठेवण्यासाठी तयार केलेल्या या गोष्टी आहेत तर त्यांचा त्याग करण्यासाठी ते सांगतात. समाजातील गरीब, अज्ञानी लोकांची लुबाडणुक करण्यासाठीच धर्मविधींची निर्मिती भ्रष्ट ब्राह्मणांनी केली असेही ते सांगतात. त्यांच्या मते मानवाची सेवा करणे, मानवी हक्कांचे संरक्षण व संवर्धन करणे हीच खरी ईश्वरभक्ती आहे असे ते म्हणतात. महात्मा फुले यांनी मूर्तीपूजेवर जोरदार टीका केलेली आहे. एकूणच देवाच्या नावावर सर्वसामान्य अज्ञानी जनतेला फसवणाऱ्या कर्मकांडाला व ते करणाऱ्या भटभिक्षुकांवर कडाडून हल्ला चढवला आहे.

**४) मध्यस्थांना विरोध :** हे मध्यस्थ म्हणजे कोण? तर जे ईश्वर आणि भक्त यांच्यामध्ये मध्यस्थ बनून कर्मकांड करणारे लोक अशांना महात्मा फुलेंनी विरोध केलेला आहे. आपल्या धर्मविषयक विचारांची मांडणी करताना महात्मा फुले असे म्हणतात की ईश्वर आणि भक्त यांच्यामध्ये कोणतेही मध्यस्थ नको आहेत. कारण हे मध्यस्थ खुप मोठ्या प्रमाणावर भक्तांचे शोषण करतात. विविध प्रथा परंपरांमध्ये अज्ञानी भक्तांना अडकवून ठेवतात. धर्माच्या नावावर विविध भ्रम निर्माण केले जातात आणि भक्तांना त्यामध्ये गुंतवून ठेवले जाते म्हणूनच मध्यस्थांचे उच्चाटण करणे महत्त्वाचे आहे असे अधोरेखित करतात. त्यांच्या मते, भक्त आणि ईश्वराच्यामध्ये मध्यस्थ बनून जे ब्राह्मण पुरोहित यांनी 'गुलामगिरी' निर्माण केली ती गुलामगिरी संपवण्यासाठी मध्यस्थांना कडाडून विरोध त्यांनी केला.

**५) अंधश्रद्धांवर आघात :** महात्मा फुले यांनी अंधश्रद्धांवर फार मोठा आघात केलेला आहे. धर्माच्या, देवाच्या नावावर विविध अंधश्रद्धा पसरलेल्या आहेत. लोक अज्ञानी असल्याने, तर्कसंगती, बुद्धी प्रमाण्यतेच्या अभावामुळे अंधश्रद्धांनाच धर्मश्रद्धा मानल्या जातात. त्यामुळे संपूर्ण समाजाचे नुकसान होते. समाजात दैवी चमत्कार, विभूती पूजा, पूनर्जन्म, स्वर्ग-नरक, तंत्र, मंत्र, पापपुण्य, जपतप, अंगारे, उतारे, धुपारे, अवतारवाद, दैवी साक्षात्कार या सर्व गोष्टी अज्ञानामुळे निर्माण होतात. तर अशा फोल, असत्य असणाऱ्या गोष्टींचे संपूर्ण निर्मूलन समाजातून झाले पाहिजे असे ठामपणे महात्मा फुले सांगतात. सर्व सामान्य लोकांना त्यांनी मोठा धीर देण्याचे कार्य केले आहे. जपतप करून पाऊस पडत नाही, मंत्रतंत्राने अपत्यप्राप्ती होत नाही, देवाला नैवेद्य वगैरे देण्याची गरज नाही असे ते अगत्याने सांगतात.

**६) सर्वधर्मसमभाव :** महात्मा फुलेंचे धर्मविषयक चिंत हे वैश्विक आणि सहिष्णु स्वरूपाचे होते. त्यांनी विविध धर्मातील दोष दाखवून दिलेले आहेत असे असले तरी त्यांचा धर्मविषयक दृष्टिकोन हा विधायक दिसतो. 'धार्मिक सहिष्णुता' हा त्यांच्या धर्मविषयक चिंतनातील महत्त्वाचा मुद्दा लक्षात घेण्यासारखा आहे. ते म्हणतात की कोणी कोणाच्या धर्माचा द्वेष, मत्सर, हावा न करता राहावे. सार्वजनिक सत्यधर्म या पुस्तक 'विश्वकुटुंबाची संकल्पना' त्यांनी मांडलेली आहे.

**७) शेतकरी व कष्टकरी वर्गाच्या शोषणास धर्म जबाबदार :** महात्मा फुले यांची धर्मचिकित्सा समजावून घेत असताना त्यांनी शेतकरी व कष्टकरी वर्गाच्या शोषणास धर्म कसा जबाबदार आहे हे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. हा शेतकरी कष्टकरी वर्ग सर्वात महत्त्वाचा उत्पादक वर्ग आहे. परंतु त्यांच्या श्रमाला पाहिजे तितका योग्य मोबदला दिला जात नाही. ते सातत्याने दारिद्र्यातच पिचत आहेत. त्याचे कारण म्हणजे पुरोहित वर्ग, कारण हा पुरोहित वर्ग त्यांच्या अज्ञानाचा, धर्मभोळेपणाचा फायदा घेवून त्यांच्याकडून विविध धार्मिक विधींच्या माध्यमातून पैसा कसा गोळा करतात याबद्दल ते बोलतात. या कष्टकरी, कामकरी, शेतकरी वर्गाने कष्टाने जमा केलेली संपत्ती ही पुरोहित वर्ग हा कसा लबाडीने लुबाडतो, यावर ते घणाघाती टीका करताना दिसतात.

एकूणच धर्माच्या नावावर या गोरगरीब जनतेचे शोषण या पुरोहित वर्गाकडून कसे केले जाते याची चिकित्सा महात्मा फुले यांनी केली आहे.

**८) 'नीती' धर्मात सर्वोच्च :** म. फुले यांनी प्रतिपादित केलेला सार्वजनिक सत्यधर्म हा नीतीमान धर्म आहे. नीतीला सर्वोच्च स्थान दिलेले आहे. कोणत्याही धर्मामध्ये नैतिक वर्तनाला महत्त्वाचे स्थान असेल तर त्या धर्मामध्ये विषमता निर्माण होणार नाही. भेदाभेद राहणार नाही. म्हणून सार्वजनिक सत्यधर्मामध्ये ते सद्‌गुणांचा, नैतिक वर्तनाचा पुरस्कार करतात. त्यांच्या मते सर्व मानव समान आहेत आणि सर्वांना समान हक्क व स्वातंत्र्य असावीत. मानवाचे नैतिक वर्तन हेच धार्मिक वर्तन आहे असे महात्मा फुले यांचे मत आहे.

**९) सार्वजनिक सत्यधर्माची आचारसंहिता :** म. फुले यांनी सार्वजनिक सत्यधर्माची एक वैशिष्ट्यपूर्ण आचारसंहिता घालून दिलेली दिसते. ज्याच्या माध्यमातून नैतिकतेचा पुरस्कार करणारी आहे. यामध्ये त्यांनी असे सांगितले आहे की, निर्मिकाशिवाय इतर कशाचीही पुजा करू नये. भक्तीमार्गात भक्त आणि निर्मिकाच्या मध्यस्थ कोणीही असता कामा नये, गरजच नाही, माणूस जातीने नाही तर तो गुणांनी श्रेष्ठ ठरतो, मोक्ष, कर्मकांड, जपतप, पुनर्जन्म या गोष्टी अज्ञानाच्या मुळातून निर्माण झाल्या आहेत. त्याचा आपल्या जीवनात अवलंब करू नये, प्राणीमात्राची हिंसा करू नये, मद्यपानापासून दूर राहावे असे अनेक तत्त्वे, आचारसंहिता की ज्या सद्‌वर्तन आचरणास प्रोत्साहित करणाऱ्या आहेत त्याचा पुरस्कार जोतिबांनी या सत्यधर्मात केला आहे.

महात्मा फुले यांच्या मते धर्म म्हणजे चांगले आचरण, मानवाची सेवा करणे, स्वातंत्र्य, समता, आणि बंधुत्त्वाची भावना निर्माण होणे असा अर्थ ते आपल्या धर्मविषयक विचारांमध्ये सांगतात.

यानंतर आपण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा धर्मविषयक दृष्टिकोण अभ्यासणार आहोत.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा धर्मविषयक दृष्टिकोन :**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा धर्मविषयक दृष्टिकोन काय आहे हे आपण समजून घेणार आहोत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय समाजाचे विविध अंगानी अध्ययन केलेले होते. तसेच भारतातील हिंदू, बौद्ध, ख्रिश्चन, मुस्लीम, शीख या सर्वच धर्मांचे अध्ययन करून त्यासंदर्भातील अभ्यासपूर्ण आणि संशोधनात्मक लेखनही केलेले आहे. या मुद्द्यामध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मविषयक विचार काय आहेत? धर्माचा विचार कोणत्या दृष्टिकोणातून कोणकोणत्या अंगाने केला आहे हे अभ्यासणार आहोत.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे एक अत्यंत बुद्धीमान समाजसुधारक, विचारवंत, नेते, अर्थशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ, कायदेपंडित होते आणि त्यांनी विविध विषयांचा अत्यंत सुक्ष्म आणि सखोल अभ्यास केला होता. भारतामध्ये सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी आपले अखंड आयुष्य वेचलेले होते. भारतीय समाजातील वंचित समुहांना माणूस म्हणून जगण्याचे सर्व हक्क मिळावेत यासाठी त्यांनी कार्य केलेले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे धर्मविषयक तत्त्वज्ञान हे पारंपारिक धर्मश्रद्धेला, निरर्थक कर्मकांडांना, अंधश्रद्धा, अनिष्ट प्रथांना नाकारणारे होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या धर्मविषयक विचारांचा अभ्यास करीत असताना असे लक्षात येते की त्यांनी हिंदू धर्माची सविस्तर अशी चिकित्सा केलेली आहे. 'Philosophy of Hinduism' या ग्रंथामध्ये हिंदू धर्माच्या तत्त्वज्ञानाचे सखोल अध्ययन केले आणि धर्माच्या तत्त्वज्ञानाचे मूल्यमापन करणाऱ्या कसोट्यांचे प्रतिपादन केलेले आहे. याद्वारे कोणत्याही धर्माच्या अभ्यासाच्या दिशा त्यांनी निश्चित करून सांगितल्या आहेत.

प्रथमतः धर्म म्हणजे नेमके काय आहे हे समजून घेणे अत्यंत गरजेचे आहे असे ते प्रतिपादन करतात. दुसरे म्हणजे धर्म कोणत्या आदर्श योजनेसाठी आहे हे जाणून घेणे आणि तिसरे म्हणजे अशा कसोटीची निश्चिती करणे की जी दैवी आदेशाच्या आदर्श योजनेचे मूल्यमापन करण्यास उपयुक्त ठरेल.

म्हणजे कोणताही धर्म वरील तिन्ही दिशांच्या कसोटीस उतरला पाहिजे असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांगतात.

'धर्म' या शब्दाचा उपयोग डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मशास्त्र असा केला आहे. यामध्ये धर्मशास्त्राचे दोन प्रकार त्यांनी सांगितले आहेत.

१) पौराणिक धर्मशास्त्र आणि २) नागरी धर्मशास्त्र.

पौराणिक धर्मशास्त्रामध्ये विविध देवांच्या कथा आहेत तर नागरी धर्मशास्त्रामध्ये विविध भागातील सण परंतरा यांची माहिती दिलेली असते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मात्र नैसर्गिक धर्मशास्त्र या अर्थाने शब्दाचा उपयोग केला आहे.

तसेच दुसऱ्या कसोटीमध्ये तसेच धर्माचा अभ्यास करताना धर्म हा कोणत्या आदर्श योजनेसाठी आहे हे समजून घेणेही महत्त्वाचे आहे आणि ही अभ्यासाची दुसरी दिशा आहे. यामध्ये हिंदू धर्माच्या संदर्भातले विश्लेषण असे केले आहे की, हिंदू धर्माची दैवी आदेशाची योजना ही लिखित स्वरूपात देव्हाऱ्यात ठेवण्यात आली असून धर्माचरण कोणत्या नियमाने करावे, शास्त्रविधीच्या प्रत्येक मिनिटांचा तपशील 'मनुस्मृती' या हिंदूंच्या पवित्र ग्रंथात केलेला आहे.

तर धार्मिक तत्त्वज्ञानाच्या तिसऱ्या कसोटीच्याही त्या दैवी आदेशाच्या आदर्श योजनेचे मूल्यमापन करणे होय. धर्म या कसोटीस उतरला पाहिजे असे डॉ. आंबेडकर प्रतिपादन करतात.

धर्माच्या तत्त्वज्ञानाच्या अनुषंगाने अत्यंत व्यापक लेखन झालेले असले तरी दुर्दैवाने त्याच्या मूल्यमापनाचा प्रश्न अद्यापही हाताळला गेला नाही. हा प्रश्न सोडविण्यासाठी निश्चित अशा प्रकारची पद्धत आढळलेली नाही. तर या प्रश्नावर प्रत्येकाने आपली स्वतःची पद्धत बनवली आहे असे डॉ. आंबेडकर नमूद करतात.

यानंतर धर्माच्या आवश्यकतेसंदर्भात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आपण समजून घेणे महत्त्वाचे आहे.

डॉ. आंबेडकर 'धर्म ही मानवी जीवनासाठी आवश्यक बाब आहे असे मानत असत. ते धर्मविरोधी नव्हते परंतु धार्मिक ढोंग, अंधश्रद्धा, निरर्थक कर्मकांड, अनिष्ठ प्रथा यावर मात्र त्यांनी कडाडून हल्ला चढवलेला होता. डॉ. आंबेडकरांची धार्मिक वृत्ती ही बुद्धीवादी पद्धतीची होती. त्यांच्या मते 'भक्तीमार्गाने मनुष्य हा विभुतीपुजक, मूर्तीपुजक बनतो हा त्यामधला एक मोठा दोष आहे. म्हणून भक्तीमार्ग हा राष्ट्राला विघातक आहे असे माझे प्रामाणिक मत आहे असे त्यांनी स्पष्टपणे मत व्यक्त केले आहे. असे असले तरी डॉ. आंबेडकरांच्या मते मनुष्याच्या उत्कर्षाला धर्म ही एक अत्यंत आवश्यक गोष्ट आहे. श्रेष्ठ व धनवान वर्गास धर्माची आवश्यकता वाटणार नाही. परंतु गरीब व पिडीतांना आहे कारण तो आशेवर जगतो आणि धर्म मानवाला आशावादी बनतो, तुम्ही घाबरू नका, तुमचे जीवन आशावादी होईल असा संदेश धर्म मनुष्याला देतो त्यामुळे धर्माला लोक चिकटून राहातात. थोडक्यात, डॉ. आंबेडकरांच्या मते धर्म ही गरीबांसाठी आवश्यक अशी बाब आहे.

याशिवाय धर्माकडून काही अपेक्षा ते व्यक्त करतात. डॉ. आंबेडकर हे धर्मास एक सामाजिक संस्था मानतात. या संस्थेकडून ते विविध अपेक्षा करतात. तसेच धर्म हा विज्ञानाशी सुसंगत असला पाहिज. बदलत्या परिस्थितीनुसार आणि वैज्ञानिक प्रगतीबरोबर धर्मातही बदल घडून आला पाहिजे. तसेच धर्म स्वातंत्र्य, समता, बंधुता या मूल्यांच्या कसोटीवर उतरला पाहिजे. तसेच धर्म हा राज्याचे साधन बनले पाहिजे असे प्रतिपादन डॉ. आंबेडकर करतात.

धर्म लोकशाही राज्याचे साधन बनला पाहिजे, धर्म समता, बंधुता, न्यायाची प्रस्थापना करणारा असला पाहिजे. असा धर्म (म्हणजे धम्म) या अपेक्षा पूर्ण करू शकतो म्हणून त्यांनी बौद्ध धम्माचा स्विकार केला.

**हिंदू धर्मासंदर्भात विचार :**

डॉ. आंबेडकरांनी हिंदू धर्मविषयक विचार व्यक्त करताना असे म्हटले आहे की, 'धर्मामध्ये केवळ तत्त्वांचाच समावेश असावा लागतो. तो केवळ नियमांचाच संग्रह असू नये. नियम हा धर्माचा विषय होवू नये. ज्या क्षणी एखाद्या धर्माची पातळी नियमांच्या संग्रहापर्यंत घसरते तो 'धर्म' संज्ञेला अपात्र ठरतो. कारण खऱ्या धर्मकार्याचे सार असलेली जबाबदारीची जाणीवच तो ठार करीत असतो या दृष्टीने हिंदू धर्म कसा आहे? तो तत्त्वांचा संच आहे की नियमांचा साठा आहे? 'वेद आणि स्मृतींनी सांगितलेला आजचा धर्म जर आपण पाहिला तर त्यात यज्ञासंबंधीचे नियम सामाजिक नियम आणि स्वच्छतेच्या नियमांच्या भेसळीपलिकडे दुसरे काहीही नाही.

डॉ. आंबेडकरांच्या मते हिंदू लोक, ज्याला धर्म म्हणतात, त्यात अनेक प्रकारच्या आज्ञा व निषेध एवढेच आहे त्यापलिकडे काही नाही. यासंदर्भात डॉ. आंबेडकर असे म्हणतात की आज्ञांच्या जथ्याला मी धर्म मानण्यास मुळीच तयार नाही.

तसेच डॉ. आंबेडकर असेही प्रतिपादित करतात की, हिंदू धर्मामध्ये आदर्शांची एकनिष्ठता नाही. तसेच ते नियम सर्व वर्गांसाठी सारखे नाही आहेत. म्हणजेच त्या नियमांमध्ये विषमता आहे. हिंदू लोक हे पुजाअर्चा व्रतवैकल्ये, सोवळेओवळे, उपासतापास इ. कर्मकांडास ते धर्म मानतात धर्मात नीतीमत्तेस स्थान नाही. तसेच धर्माचे तत्त्वज्ञान हे सर्वसमावेशक व स्थळकाळ निरपेक्ष नसल्याने हा धर्म लोक धर्म होवू शकत नाही. तसेच महत्त्वाचे म्हणजे हिंदूधर्म हा बुद्धिप्रामाण्य न मानता केवळ ग्रंथप्रामाण्य मानतो. त्यामुळे या धर्मात विवेकाला, सदाचाराला स्थान नाही. नैतिकतेशी विसंगत आहे ग्रंथांनी लोकांना गुलाम करून टाकले आहे. त्यामुळे त्यांनी वेदप्रामाण्य नाकारून मनुस्मृतीचे दहन केले आहे.

तसेच हिंदू धर्माची चिकित्सा करताना न्याय आणि उपयुक्ततेच्या कसोट्या सांगितल्या आहेत. या दोन्ही कसोट्यांचा अवलंब करून हिंदू धर्माचे मूल्यमापन केलेले आहे.

न्यायाच्या कसोटीनुसार हिंदू धर्माच्या तत्त्वज्ञानाचे परीक्षण केले आहे. न्यायाच्या कसोटीमध्ये समानता, स्वतंत्रता, बंधुता ही मूल्ये समाविष्ठ असतात त्या अनुषंगाने हिंदू धर्म हा समानता मानतो काय? यासंदर्भातली चिकित्सा केली आहे. जातीव्यवस्था हे हिंदू धर्माचे एक महत्त्वाचे अंग आहे. आणि या जातीव्यवस्थेमध्ये प्रचंड मोठी विषमता आहे. श्रेणीतत्त्वानुसार एक श्रेष्ठ तर दुसरा कनिष्ठ असा भेदभाव आहे. प्रत्येक जात ही वेगवेगळी असून एकापेक्षा दुसरी ही वरचढ आहे. तसेच न्यायासाठी जे काही कायदे तयार करण्यात आले. त्यामध्ये एकाच अपराधाबद्दल भिन्न भिन्न शिक्षा दिलेल्या असून त्यामध्ये असमानता आणि अन्याय काटकता दिसून येते. याशिवाय हिंदू धर्मात धार्मिक विधी आणि आश्रमांशी संबंधित असणाऱ्या बाबीही असमानच आहेत. त्यामुळे हिंदू धर्मात समानता मानणारा नाही. धार्मिक असमानता हिंदू धर्मात दिसून येते. तसेच हिंदू धर्म स्वातंत्र्य मान्य करता का? तर हिंदू धर्मात वाचनाचा, लेखनाचा, विशिष्ठ व्यवसायाचा, संपत्ती साठविण्याचा, ज्ञान दानाचे स्वातंत्र्य हे फक्त काही विशिष्ट उच्चवर्णीयांसाठीच ठेवले.

ज्ञानाच्या प्रसारापासून कनिष्ठवर्णीयांना कोसो दूर ठेवले त्यामुळे हिंदू धर्मात स्वातंत्र्य नाही हे नाकारले गेलेले आहे.

यासंदर्भात डॉ. आंबेडकर असे म्हणतात की, स्वातंत्र्याला ज्या गोष्टींचा आवश्यकता असते त्यास हिंदू धर्माचा विरोध आहे. त्यामुळे हिंदू धर्माने स्वतंत्रतेचे तत्त्व देखील नाकारलेले आहे.

तसेच बंधुभावाच्या दृष्टीकोणातून पाहता भारतातील जाती या विविध उपजातीमध्ये विभागल्या गेल्या आहेत त्यांचे तुकडे झाले आहेत त्यामध्ये फुटीची प्रक्रिया सातत्याने सुरू आहे. बंधुभावाच्या तत्त्वामध्ये, बंधुभाव वाढण्यासाठी जिव्हाळ्याची प्रक्रिया, सुखदुःख वाटून घेण्याची गरज आहे. जे एकमेकांच्या सुखदुःखात, आनंद, दुःख, जन्म, मृत्यु, विवाह, सहभोजन या सर्व प्रसंगात सहभागी होतात त्यांच्यात बंधुभाव आढळतो. ही जी जिव्हाळ्याची प्रक्रिया असते ती हिंदू लोक वाटून घेत नाहीत. प्रत्येक गोष्ट स्वतंत्र आणि वेगळी असते. हिंदू त्यांच्या संपूर्ण आयुष्यात स्वतंत्र व वेगळा असतो असे मत डॉ. आंबेडकर व्यक्त करतात.

एकूणच न्याय दृष्टीकोणातून पाहता हिंदू धर्म हा समानतेचा द्वेष करणारा, स्वतंत्रतेच्या विरोधी आणि बंधुभावाचा प्रतिकार करणारा आहे हे स्पष्ट केले आहे.

यानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू धर्माचे अत्यंत वस्तुनिष्ठ रीतीने अध्ययन केलेले असून त्यासंदर्भात अनेक कूट प्रश्न उपस्थित केलेले आहेत.

त्याबरोबरच हिंदू धर्माचा त्याग करून नवीन कोणता धर्म स्विकारावा याचा विचार केला. विविध धर्मांचा अत्यंत सखोल अभ्यास करून स्वातंत्र्य, समता, बंधुता या मानवतावादी मूल्यांचा पुरस्कार करणारा 'बौद्ध धम्म' धर्मांतरासाठी निवडला.

डॉ. आंबेडकरांनी 'धर्म' ही संज्ञा दोन प्रकारे वापरली आहे. 'बौद्ध धम्म' हा एक धर्म नाही असे जेव्हा ते म्हणतात, तेव्हा ते त्या शब्दाचा सर्वमान्य प्रचलित (आणि शब्दकोशातील) अर्थ घेतात. या अर्थाने धर्म ईश्वरी अथवा दैवी शक्ती सभोवती एकवटला आहे. हा अर्थ जर गृहीत धरला तर बौद्ध धम्म हा धर्म ठरत नाही. कारण तो कोणत्याही दैवी शक्तीसमोर झुकायला सांगत नाही. याचबरोबर धर्माचा अभ्यास करणारे प्रसिद्ध समाज शास्त्रज्ञ एमिल डुरखाईम यांनी धर्माची व्याख्या व्यापक केली आहे आणि त्यांनी 'पावित्र्य' या पैलूवर प्रकाश टाकला आहे. तसेच धर्माची भूमिका सामाजिक संबंध सुधारण्यात किती महत्त्वाची ठरते याचाही विचार मांडला आहे. या व्याख्येच्या अनुषंगाने मात्र बौद्धधम्म हा एक धर्म होता. त्यामध्ये केवळ नैतिकता नव्हे तर 'पवित्र नैतिकता' आहे. डॉ. आंबेडकरांनी यासंदर्भात बुद्ध आणि त्याचा धम्म या ग्रंथात विस्तृत विवेचन केले आहे.

डॉ. आंबेडकरांनी कोणत्या विचारांचा धर्म स्वीकारला आणि कोणत्या आशयाचा धर्माला नकार दिला हे समजून घेणे सुद्धा महत्त्वाचे आहे. डॉ. आंबेडकरांनी अंधश्रद्धेवर आधारित असलेला हिंदू धर्म नाकारला आणि मानवी कल्याणाची क्रांतीकारक भूमिका असणारा विवेकवादी बौद्ध धर्म स्वीकारला.

१९३५ मध्ये प्रकाशित केलेल्या "Annlilation of Caste" या भाषणात समाजाला धर्माची गरज असते हे ते सांगतात. 'खरा धर्म हा समाजाचा पाया असतो ज्यावर तमाम खऱ्या नागरी शासन व्यवस्था तसेच दोन्हींच्याही मान्यता अवलंबून असतात. या बर्कच्या विधानाशी ते सहमत आहेत.

तसेच १९३६ च्या 'मुक्ती कोन पथे' या भाषणात म्हणतात, समाजाच्या धारणेकरिता घातलेली बंधने म्हणजेच धर्म ही माझी देखील धर्माची कल्पना आहे. परंतु समाजाच्या योग्य धारणेसाठी समाजाची बंधने कशा प्रकारची असावीत हा प्रश्न धर्माच्या व्याख्येपेक्षा फार महत्त्वाचा आहे. कारण धर्म कोणता व अधर्म कोणता हे व्याख्येवर अवलंबून नसून बंधनाच्या स्वरूपावर अवलंबून आहे.

मनुष्याच्या स्वयंपूर्ण व स्वतंत्र स्थानाचा आदर करणाऱ्या समाजधारणेस उपयुक्त असलेल्या बौद्ध धर्माचा स्वीकार बाबासाहेबांनी केलेला आहे.

तसेच बौद्ध धर्म खरा समतेचा धर्म ९ एप्रिल १९५५ रोजी ''जनतामध्ये'' प्रकाशित झालेल्या भाषणात डॉ. बाबासाहेब म्हणतात, 'सद्यस्थितीत माणसाला धर्माची काय जरूरी आहे अशा अर्थाची टीका काही लोक करतात, पण मला वाटते, हे लोक मानवी समाजाच्या धारणेसाठी धर्माची किती आवश्यकता आहे हीच गोष्ट विसरतात. मानवी समाजाला धर्माने दोन देणग्या दिल्या आहेत. एक म्हणजे मानवी जीवनात ऐक्य अबाधित करणारी मानसिक प्रेरणा निर्माण करणे आणि मानवी समुहात धर्मच समता निर्माण करू शकतो. या दोन महत्त्वाच्या कसोट्यामुळे सद्यस्थितीत समता निर्माण करून चांगल्या तऱ्हेने लोकशाही नांदवायची असेल तर धर्माची अत्यंत आवश्यकता आहे. म्हणजे डॉ. आंबेडकरांना मानवतेच्या मूल्यांवर आधारित धर्म अभिप्रेत होता आणि ही मानवतेची नैतिक मूल्ये बौद्ध धम्मात असल्यामुळे त्याचा स्विकार डॉ. आंबेडकरांनी केला.

**स्वयं अध्ययनासाठी प्रश्न**

**रिकाम्या जागा भरा.**

१) एमिल डुर्खीम यांनी धर्माचा ........... दृष्टीकोनातून अभ्यास केला.

२) 'Elementary forms of Religious Life' हे पुस्तक ................. यांनी लिहिले.

३) कुल हा ............. पक्षीय समूह आहे.

४) एमिल डुर्खीम यांनी ऑस्ट्रेलियातील ............. या जमातीचा अभ्यास केला.

५) मॅक्स वेबर यांनी धर्माचा अभ्यास .......... या दृष्टीकोनातून केला.

६) मॅक्स वेबर यांनी या महत्त्वपूर्ण ग्रंथाचे ................ लेखन केले.

७) कॅलव्हिन यांनी एकूण ............... नीतीतत्त्वे सांगितली आहेत.

८) 'ब्राह्मणांचे कसब' या ग्रंथाचे लेखक ......... हे आहेत.

९) 'सार्वजनिक सत्यधर्म' हा ग्रंथ ............ यांनी लिहिला.

१०) ‘निर्मिकाची’ संकल्पना ............... यांनी मांडली.

११) विविध देवांच्या कथा ................ या धर्मशास्त्रात सांगितल्या जातात.

१२) ‘धर्म’ या शब्दाचा उपयोग डॉ. आंबेडकरांनी ................. असा केला.

१३) ‘आज्ञांच्या जश्याला मी धर्म मानण्यास मुळीच तयार नाही असे ............ यांनी म्हटले आहे.

१४) 'Annlilation of Caste' हा ग्रंथ ............... यांनी लिहिला.

१५) डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी ............. या धर्माचा स्विकार केला.

**स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे**

१) प्रकार्यवादी दृष्टीकोणातून
२) एमिल डुर्खीम
३) एकपक्षीय
४) अरुंटा
५) घटनाशास्त्रीय
६) ‘प्रोटेस्टंट एथिक्स ॲन्ड स्पिरिट ऑफ कॅपिटॅलिझम
७) पाच तत्त्वे
८) महात्मा फुले
९) महात्मा फुले
१०) महात्मा फुले
११) पौराणिक
१२) धर्मशास्त्र
१३) डॉ. आंबेडकर
१४) डॉ. आंबेडकर
१५) बौद्ध

संदर्भ ग्रंथ

१) विद्याधर पुंडलिक, ‘‘धर्माचे समाजशास्त्र’’, कॉन्टनेंटल प्रकाशन, २००३.

२) डॉ. प्रदीप आगलावे, ‘समाजशास्त्र डॉ. बाबासाहेब आंबेडकर’, सुगावा प्रकाशन, पुणे, २००९.

३) प्रा. चंद्रकांत खंडागळे, ‘धर्माचे समाजशास्त्र’, सौ. मायादेवी खंडागळे, सांगली, २०२१.

४) डॉ. प्रदीप आगलावे, ‘समाजशास्त्र संकल्पना आणि सिद्धांत’, साईनाथ प्रकाशन, नागपूर २००९.

५) डॉ. बाबासाहेब आंबेडकर : बुद्ध आणि त्यांचा धम्म

६) डॉ. कसबे रावसाहेब, ‘आंबेडकर आणि मार्क्स’.

❑❑❑

# घटक – ३
# भारतातील धर्म
## (Religion in India)

**अनुक्रमणिका**


३.१ प्रस्तावना

३.२ उदिष्टे

३.३ विषय विवेचन

- ३.३.१ हिंदू धर्म : स्वरूप, सिध्दांत, आचारपध्दती, हिंदू धर्माचे स्थान
- ३.३.२ इस्लाम धर्म : उदय, धर्माचरण, शरीयतची संकल्पना, इस्लामचा भारतीय समाजावरील प्रभाव
- ३.३.३ बौध्द धर्म : वैशिष्टे, सिध्दांत, अष्टांगमार्ग, बौध्द धर्माचा भारतीय समाजावरील प्रभाव
- ३.३.४ ख्रिस्ती धर्म : उदय, प्रसार, मुलतत्त्वे, भारतातील ख्रिस्ती समुदायाची स्थिती
- ३.३.५ जैन धर्म : उदय, प्रसार, सिध्दांत, भारतातील जैन धर्माचे स्थान
- ३.३.६ शीख धर्म : उदय, प्रसार, धर्मश्रध्दा, भारतातील शीख धर्माची स्थिती
- ३.३.७ सत्यधर्म : सत्यधर्माची तत्त्वे, सार्वजनिक सत्यधर्म
- ३.३.८ शिवधर्म

३.४ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न

३.५ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.६ सरावासाठी प्रश्न

३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

## ३.१ प्रस्तावना :

धर्माच्या समाजशास्त्रात जगातील विविध धर्माचेही अध्ययन केले जाते. त्यामुळे जगातील प्रमुख धर्माचा भारताच्या विशेष संदर्भात अभ्यास या प्रकरणामध्ये करण्यात येणार आहे. भारत हा बहुधर्मीय देश म्हणून ओळखला जातो. कारण जगातील प्रमुख धर्माचे अनुयायी कमी जास्त संख्येने भारतात असलेले, दिसून येतात. त्यापैकी हिंदू हे देशामध्ये ८०% असलेले दिसून येतात. तर जैन, बौध्द, शीख, ख्रिस्ती, इस्लाम, पारसी व ज्यू या धर्माचे अनुयायी हे अल्पसंख्यांक आहेत. या सर्व धर्मामध्ये श्रध्दा, विधी, तत्त्वज्ञान, शिकवण, मुल्ये, संस्कार, पंथ व उपपंथ इत्यादी विषयी मोठी भिन्नता दिसून येते. त्यामुळे धार्मिकदृष्ट्या भारतीय समाज अत्यंत संकीर्ण असा बनलेला आहे. तसेच भारतीय व्यक्ती व समाजजीवन यांच्यावर धर्माचा मोठा प्रभाव आहे. उदा. व्यक्तीचे जीवन, भावभावना, आशा आकांक्षा, आचारविचार, आवडीनिवडी व व्यक्तिमत्त्व इत्यादीवर धर्माचा मोठा पगडा पडलेला दिसून येतो. इतकेच नव्हे तर भारतातील विवाह, कुटुंब, राज्य, शिक्षण, अर्थ, आप्तसंबंध, सामाजिक स्तरीकरण, साहित्य, कला, क्रीडा, गीत, संगीत, नृत्य, मनोरंजन, खाण्यापिण्याच्या सवयी, वेशभूषा व केशभूषा इत्यादीवर सुध्दा धर्माचा फार मोठ्या प्रमाणात पगडा पडलेला दिसून येतो. त्यामुळे भारतीय समाजाचे यथार्थ आकलन होण्यासाठी विविध धर्माचा समाजशास्त्रीयदृष्ट्या अभ्यास करणे गरजेचे आहे.

## ३.२ उद्दिष्टे

१. हिंदू धर्माचे स्वरूप, स्पष्ट, करता येईल.

२. हिंदू धर्मातील सिद्धांत व स्थान स्पष्ट करता येईल.

३. इस्लाम धर्माचा भारतीय समाजावरील प्रभाव समजून घेता येईल.

४. बौध्द धर्माची वैशिष्टे व अष्टांगमार्ग याचे आकलन होईल.

५. ख्रिस्ती धर्माची मुलतत्वे पाहता येतील.

६. जैन धर्माचा उदय, प्रसार व सिध्दांत याचे आकलन होईल.

७. शीख धर्मातील धर्मश्रध्दा समजावून घेता येईल.

८. सत्य धर्माचे स्वरूप व कार्ये याची माहिती, करून घेता येईल.

९. शिव धर्माचे स्वरूप व कार्ये याचे आकलन होईल.

## ३.३ विषय विवेचन :

### ३.३.१ हिंदू धर्म :

प्राचीन धर्म म्हणून हिंदू धर्माकडे पाहिले जाते. या धर्माच्या अनुयायांची संख्या जगामध्ये सुमारे ११० कोटी (१४.१%) तर भारतामध्ये ९६,६२,५७,००० (७९.८%) इतकी आहे. जम्मू-काश्मिर, केरळ, नागालँड व मिझोराम ही राज्ये वगळता इतर राज्यामध्ये हिंदू बहुसंख्यांक आहेत. तसेच महाराष्ट्रामध्ये ८.९७ कोटी (७९%) लोकसंख्या हिंदूंची आहे. हिंदू धर्माची परंपरा भारतामधील प्राचीन असल्यामुळे त्याची पाळेमुळे भारतीय समाजामध्ये खोलवर रूजलेली दिसून येतात. त्यामुळे हिंदू धर्माचा प्रभाव भारतामधील अल्पसंख्याक धर्मावर सुध्दा पडलेला दिसून येतो. या धर्माचे स्वरूप पुढीलप्रमाणे समजावून घेता येईल.

**अ) हिंदू धर्माचे स्वरूप :**

**१. हिंदू धर्माला विविध नावे :**

हिंदू धर्मास योगी अरविंद यांनी 'सनातन' धर्म असे आहे. सनातन धर्म म्हणजे आदी व अंत नसलेला धर्म होय. या धर्माचे प्रचलन आर्य लोकांनी सुरू केल्याने या धर्मास आर्य धर्म असेही म्हणतात. या धर्माची पाळेमुळे वैदिक साहित्यात आढळत असल्याने त्यास 'वैदिक' धर्म म्हंटले जाते. तर काही अभ्यासक या धर्मास 'वेदांती' धर्म म्हणूनही ओळखतात. हिंदू हा शब्द सिंधू नदीच्या परिसरात राहणाऱ्या लोकांना उद्देशून अरब लोकांनी आठव्या शतकाच्या आसपास वापरलेला दिसतो. सिंधू हा शब्द फारसी भाषेतील उच्चारण पध्दतीनुसार हिंदू असा ('स'चा उच्चार 'ह') उच्चारला जाऊ लागला व हिंदू हाच शब्द पुढे रूढ झाला.

**२. धर्माचा उदय व विकास :**

हिंदू धर्मास कोणी संस्थापक नाही. तसेच या धर्माचा उदय केंव्हा झाला हे सांगता येत नाही. भारतामध्ये बाहेरून आलेल्या आर्य लोकांनी सुरू केलेल्या आर्य वा वैदिक धर्माचे संस्कारीत, विस्तारीत व विकसित रूप म्हणजे आजचा हिंदू धर्म होय. याचा प्रारंभ आर्यांनी केला असला तरी काळाच्या ओघात हा धर्म केवळ आर्याचा न राहता, आर्येत्तर लोकांत झालेल्या युध्दात आर्य विजयी होऊन विजेत्यांच्या धर्म श्रध्दांच्या आणि धर्माचरणाचा स्वीकार पराजित झालेल्या आर्येत्तरांनी केला. तसेच आर्येत्तरांच्या देवता, श्रध्दा, व कर्मकांड इत्यादीचाही धर्माचा विस्तार उत्तर व पूर्व भारतात झाला. पुढे आर्यावर्त व दक्षिण पंथ यांच्यातील अडथळे नष्ट झाल्याने आर्य धर्माचा विस्तार दक्षिणेत झाला व त्यातून एक नवीन धर्म आकारास आला. तत्वे व कर्मकांड या धर्मामध्ये मोठ्या प्रमाणात मांडली आहेत.

**३. पवित्र ग्रंथ :**

हिंदू धर्मामध्ये एकमेव असा पवित्रग्रंथ दिसून येत नाही. कारण हिंदू धर्मातील लोक अनेक ग्रंथांना प्रमाण ग्रंथ मानतात. धर्मातील श्रध्दा, तत्वे व कर्मकांड यांचा विकास वेदग्रंथ, ब्राह्मणे, आरण्यके, वेदांगे, उपनिषदे व धर्मसूत्रे इत्यादी धर्मग्रंथातून झालेला आहे. ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद व अथर्ववेद हे चार वेदग्रंथ

अपौरूषेय म्हणजेच पुरूषाने न लिहलेले आहेत असे मानले जाते. त्यामुळे ते ईश्वरनिर्मित आहेत असे श्रध्दाळू हिंदू मानतात. वेद या शब्दाचा अर्थ ज्ञान असा असून वेदवाणी ही देववाणी मानली जाते. वेदसाहित्यास पूरक म्हणून लिहलेले शिक्षा, कल्प, निरूक्त, व्याकरण, छंद व ज्योतिष ह्या सहा ग्रंथांना वेदांगे म्हणतात. यापैकी कल्पसुत्रे हे ग्रंथ महत्त्वाचे असून त्यांचे श्रौतसूत्रे, गृहसूत्रे आणि धर्मसूत्रे असे तीन प्रकार आहेत. भगवद्‌गीता, वाल्मीकीचे 'रामायण' व व्यासाचे 'महाभारत' ही दोन महाकाव्ये, १८ पुराणे आणि मनुस्मृती, याज्ञवलक्यस्मृती व पाराशर स्मृती हे 'स्मृतीग्रंथ' इत्यादी ग्रंथही हिंदू लोक पवित्र धर्मग्रंथ म्हणून मानतात.

**४. ईश्वरवादी धर्म :**

हिंदू धर्म हा ईश्वराचे अस्तित्व मानणारा असल्याने तो ईश्वरवादी म्हणून ओळखला जातो. आर्यांनी निसर्गाच्या विविध शक्तींनी देवदेवतांची नावे दिलेली आहेत. उदाहरणार्थ सूर्यदेवता, चंद्रदेवता, वायुदेवता, अग्निदेवता, व जलदेवता होय. त्यांची पूजाअर्चा केली जाते. आर्यांनी देवदेतांच्या मूर्ती कल्पिलेल्या नसल्याने प्रारंभी मंदिरे व मूर्तीपूजा न्हवती पुढे मात्र मंदिर, बांधून त्यामध्ये देवदेवतांची मूर्तीपूजा होऊ लागली प्रारंभी आर्य लोक 'बहुदेवतावादी' होत पुढे ते 'इष्टदेवतावादी' बनले. अनेक देवतांपैकी कोणत्यातरी एकाच देवास इष्ट देव मानून त्याची पूजा करू लागले. पुढे आर्य एकेश्वरवादी बनले. म्हणजे केवळ एकच ईश्वर आहे.असे मानू लागले. विविध देवता ह्या एकाच ईश्वराची भिन्न रूपे आहेत अशी श्रध्दा रूढ झाली.

**५. हिंदू धर्मातील तत्त्वे :**

हिंदू धर्मास अमुक एक संस्थापक व अमुक एक प्रमाणग्रंथ नसल्याने त्याची रचना शिथिल राहिली. त्यामुळे त्यामध्ये वेगवेगळी तत्त्वे असलेली दिसून येतात. उदाहरणार्थ आजीवकाचे पूर्णत: दैववादी, तत्वज्ञान, चार्वाकाचे पूर्णत: जडवादी तत्वज्ञान, तांत्रिक पंथातील वैचित्र्यपूर्ण तत्वज्ञान इत्यादी तत्वे हिंदू धर्मामध्ये आढळून येतात.

**६. धर्मातील पंथ व उपपंथ :**

हिंदू धर्मातील तात्विक मतभेदातून जैन धर्म वाढून देशभर पसरला. हिंदू धर्माच्या शिथिल रचनेमुळेच बौध्द धर्माचा उदय झाला. त्याचा विकास होऊन हळूहळू तो विश्वधर्म बनला. हिंदू व मुस्लीम धर्मातील तत्त्वांचा, समन्वय साधून शीखधर्म उदयास आला. बसवेश्वरांनी स्थापन केलेला लिंगायत पंथ आज स्वतंत्र धर्माची मागणी करीत आहे. भक्तिमार्गाचा पुरस्कार करणारा भक्तिपंथ देखील देशभर पसरला. हिंदू धर्मातील बहुदेवतावादामुळे वेगवेगळ्या देवतांची पूजा करणारे वेगवेगळे पंथ उदाहरणार्थ वैष्णव पंथ, शैव पंथ, महानुभव पंथ, महाराष्ट्रातील वारकरी पंथ, इत्यादी उदयास आले. त्यापैकी काही पंथात ताठर आचारसंहिता निर्माण झाली. आज हे विविध पंथ भारतात एखाद्या जातीप्रमाणे नांदत असलेले दिसून येतात. त्यामुळे विविध पंथाच्या श्रध्दा व आचार पध्दतीत भिन्नता दिसून येते. तर काही बाबतीत विरोध देखील दिसून येतो.

**ब) हिंदू धर्मातील सिद्धांत :**

**१. अध्यात्मवाद :**

हिंदू धर्माच्या तत्वज्ञानानुसार या विश्वामध्ये केवळ 'ब्रम्ह' हे सत्य असून जग हे मिथ्य आहे. जीवात्मा म्हणजेच जीव हा परमात्म्याचा अंश आहे मात्र जीवाला आपल्या या मूळ स्वरूपाचा विसर पडून तो अनेक योनीत जन्म घेत फिरत राहतो. म्हणजेच जन्ममृत्युच्या चक्रात तो अडकतो. या चक्रातून सुटका करून जीवात्म्याचे अंतिम ध्येय म्हणजेच मोक्षप्राप्ती आहे. मनुष्य योनीत जन्म घेणे ही जीवात्म्याच्या दृष्टीने मोक्षप्राप्तीची संधी आहे. म्हणून मनुष्याने केवळ भौतिक सुखात रममाण न होता धर्मविहित मार्गाने जीवन जगून मोक्षप्राप्तीसाठी प्रयत्न करावेत. असे हिंदू धर्माचे तत्वज्ञान सांगते. या विचारास स्थूलपणे अध्यात्मवाद असे म्हणतात.

**२. कर्म व पुनर्जन्म सिध्दांत :**

प्रत्येक कर्माचे एक निश्चित फळ असते. व ते फळ म्हणजेच परिणाम व्यक्तीला अपरिहार्यपणे भोगावेच लागते. व्यक्तीच्या गतजन्मातील कर्माचा प्रभाव सध्याच्या जीवनावर पडतो. तर सध्याच्या जीवनातील कर्माचा प्रभाव भावी जीवनावर पडतो. थोडक्यात व्यक्तीच्या कर्मानुसार तिच्या प्रत्येक जीवनाचे स्वरूप ठरत असते. यालाच कर्म सिध्दांत म्हणतात. पुनर्जन्म सिध्दांत म्हणतात. पुनर्जन्म सिध्दांत म्हणजे पुन्हा पुन्हा जन्म घेणे होय, हिंदू धर्म तत्वज्ञानानुसार आत्मा अमर आहे. मृत्यूने केवळ देहाचा नाश होतो. आत्म्याचा नाश होत नाही. आत्मा म्हणजेच जीव होय. जीव हा त्याच्या कर्मानुसार वेगवेगळे जन्म घेत राहतो. कर्माची फळे भोगण्यासाठी जन्म घेणे जन्म घेतल्यानंतर कर्म करणे व ह्या कर्माची फळे भोगण्यासाठी पुन्हा पुन्हा जन्म घेणे असे अखंडपणे चालू असते. जन्ममृत्यूच्या या चक्रास बंध म्हणतात या बंधनातून मुक्त होणे म्हणजेच मोक्ष मिळणे होय. भगवद्गितेत मोक्षप्राप्तीचे ज्ञानमार्ग, कर्ममार्ग, भक्तिमार्ग व योगमार्ग असे चार मार्ग सांगितले आहेत.

**३. पुरूषार्थ सिध्दांत :**

हिंदू धर्मामध्ये मानवी जीवनाची धर्म, अर्थ, काम, मोक्ष, ही चार ध्येये मानली आहेत. या ध्येयांनाच पुरूषार्थ असे म्हणतात. यापैकी अर्थ व काम लौकिक स्वरूपाचा, मोक्ष हा अंतिम व पारलौकिक स्वरूपाचा तर धर्म हा लौकिक व पारलौकिक जीवनाला जोडणारा पुरूषार्थ आहे. हिंदू धर्मशास्त्रानुसार धर्म पुरूषार्थाची प्राप्त करणे. म्हणजे वर्ण धर्माचे व आश्रमधर्माचे पालन करणे होय अर्थ पुरूषार्थाची प्राप्ती करणे म्हणजे व्यक्तीने धर्मसंमत व समाजमान्य मार्गाने अर्थार्जन, अर्थोत्पादन, द्रव्यसंचय व द्रव्यसंवर्धन करून कुटुंबाच्या व समाज्याच्या गरजांची पूर्तता करणे होय. काम पुरूषार्थाची प्राप्ती करणे म्हणजे कामपूर्ती वंशवृध्दी करण्यासाठी धर्म संमत मार्गाने वैवाहिक व कौटुंबिक जीवन जगणे होय. मोक्ष पुरूषार्थाची प्राप्ती करणे म्हणजे जन्ममृत्यूच्या चक्रातून मुक्त होऊन आत्म्याचे परमात्म्यात विलिन होणे होय.

अशा प्रकारे अध्यात्मवाद, कर्म व पुनर्जन्म सिध्दांत आणि पुरूषार्थ सिध्दांत हिंदू समाजव्यवस्था, हिंदूचे जीवन व हिंदूधर्म यांचे मुलभूत आधार आहेत.

**क) हिंदू धर्मातील आचारपध्दती :**

**१. वर्णव्यवस्था :**

समाजशास्त्रीयदृष्ट्या वर्णव्यवस्था ही हिंदूचे सामाजिक स्तरीकरण व कार्यविभाजन आहे. प्रारंभी आर्य लोक हे राजन म्हणजेच योध्दे व उमराव होते. ब्राह्मण व वैश्य अशा तीन वर्गात विभागलेले होते. पुढे राजन वर्गास क्षत्रिय म्हटले जाऊ लागले. राजाला दिव्यत्व बहाल करण्याचा अधिकार आपल्याकडे घेवून ब्राह्मण वर्गाने आपला दर्जा उंचावला. पुढे वैश्यानी शेतीबरोबरच व्यापारही सुरू केला. ब्राह्मण, क्षत्रिय, वा वैश्य या तीन वर्गाना, द्वीज म्हणजेच दोन वेळा जन्म घेणारे मानले. व त्यांचा दर्जा श्रेष्ठ ठरविला. पुढे इंडो-आर्यन समूहाबाहेरील व्यक्तींना शुद्र म्हणून ओळखले जाऊ लागले. हा चौथा वर्ग उदयास आला. शूद्रांना 'द्वीज' हा दर्जा नाकारून त्यांचा दर्जा कनिष्ठ ठरविला. अशा या चार वर्गांनाच वर्णव्यवस्था म्हंटले आहे. या चार वर्णांची कार्ये, भूमिका, अधिकार व जबाबदाऱ्या निश्चित केल्या.

ब्राह्मणांनी अध्यापन व पौराहित्य म्हणजेच धार्मिक पूजापाठ इतर कार्ये करणे. क्षत्रियांनी ब्राह्मणांचे संरक्षण व प्रजापालन करणे, वैश्यानी शेती, व्यापार व पशुपालन करणे व वरील तीन वर्गाची सेवा शूद्रांनी करणे प्रत्येक वर्णातील व्यक्तीने आपल्या वर्णाचं कार्य करणे हे तिचे धर्मपालन ठरविले.

**२. जातीव्यवस्था :**

चार वर्णाच्या व्यवस्थेबाहेर अतिशूद्र या नावाने ओळखला जाणारा वर्ग उदयाला आला. या वर्गाचे व्यवसाय गलिच्छ असल्याने त्यांना हीन किंवा तुच्छ ठरविले. या वर्गातील लोकांचा स्पर्श व संपर्क अपवित्र व निषिध्द मानला. पुढे समाजाच्या गरजा वाढत गेल्या. त्या पूर्ण करण्यासाठी नवनवे व्यवसाय उदयास आले. त्या आधारे प्रत्येक वर्णात अनेक समूह व उपसमूह निर्माण होत गेले. त्यांनाच जाती व उपजाती म्हंटले गेले. प्रत्येक जातीचा सामाजिक दर्जा, व्यवसाय, विवाहाचे व सामाजिक संपर्काचे क्षेत्र निश्चित केले सर्व जातीचे परस्परसंबंध कसे असावेत याची नियमावली केली गेली. यातूनच समाजामध्ये जातीव्यवस्था उदयास आली. त्यामुळे व्यक्तीची जात जन्मावरून ठरू लागली. व्यक्तीने आपल्या जातीचेच कार्य करणे म्हणजे धर्मपाल ठरविले. यातूनच काही जातीच्या दर्जा श्रेष्ठ, काहींचा मध्यम तर काहींचा कनिष्ठ ठरविला गेला. त्यामुळे हिंदू समाजात बंदिस्त सामाजिक स्तरीकरण उदयास आले.

**३. आश्रमव्यवस्था :**

हिंदू धर्माने व्यक्तीच्या आयुष्याचे चार टप्पे पाडले. प्रत्येक टप्प्यात व्यक्तीने कोणते आचरण करावे हे ठरवून दिले. या टप्प्यांनाच आश्रमव्यवस्था म्हणतात. ब्रह्मचर्याश्रम, गृहस्थाश्रम, वानप्रस्थाश्रम व संन्यासश्रम हे चार आश्रम आहेत. ब्रह्मचर्यातील व्यक्तीने गुरूगृही जाऊन विद्याभ्यास करावा. त्यांनी भावी जीवनासाठी आवश्यक असणारे ज्ञान व कौशल्ये संपादन करावीत तसेच शिस्त, संयम व चारित्र्य इत्यादी सद्गुणांचे

संवर्धन करावे असे निश्चित करण्यात आले. गृहस्थाश्रमामध्ये व्यक्तीने मिळविलेले ज्ञान व गुणसंपन्न होऊन स्वगृही परतल्यावर त्याचा गृहस्थाश्रमातील प्रवेश सुरू होतो. या आश्रमामध्ये व्यक्तीने धर्मसंमत मार्गाने विवाह करून कामतृप्ती व वंशवृध्दी करावी. पत्नीसह पंच-महायज्ञे करून कौटुंबिक व सामाजिक कर्तव्ये पार पाडावीत. तसेच कौटुंबिक व सामाजिक जीवन परिपूर्णपणे जगल्यानंतर व्यक्तीने या जीवनातून मुक्त होऊन वनामध्ये जाऊन राहावे तेथे चिंतन, मनन करावे, मोक्षप्राप्तीसाठी आवश्यक असणाऱ्या गोष्टींची पूर्वतयारी करावी यालाच व्यक्तीने सन्यास घेऊन सर्वसंगपरित्याग करून केवळ मोक्षप्राप्तीवर लक्ष केंद्रित करावे. संन्यासाने समाजात सतत फिरत राहून लोकांना उपदेश करीत जगावे यालाच संन्यासाश्रम असे म्हणतात. हे आचरण हिंदू धर्मात महत्त्वपूर्ण मानले जाते.

**४. संस्कारव्यवस्था :**

व्यक्तीवर तिच्या जन्मापासून ते मृत्यूनंतर ही करावयाच्या विविध संस्कारांची एक व्यवस्था हिंदू धर्मात निर्माण केलेली आहे. त्यापैकी सोळा संस्कार विशेष प्रसिध्द आहेत. त्यामध्ये गर्भाधन, पुसंवन, नामकरण, उपनयन, विवाह, व अंतेष्टी इत्यादी महत्त्वपूर्ण संस्कार आहेत. व्यक्तीवर संस्कार करणे म्हणजे तिला उत्तमोत्तम बनविणे असा अर्थ आहे. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून संस्कार करणे म्हणजे व्यक्तीचे समाजीकरण करणे होय. व्यक्तीला तिच्या सामाजिक भूमिका सक्षमपणे पार पाडण्यास सक्षम बनविणे हा संस्कारामागील मुख्य उद्देश आहे. हिंदू धर्मामध्ये वरील महत्त्वपूर्ण आचरण प्रकार असलेले दिसून येतात.

**ड) हिंदू समुदायाची स्थिती व स्थान :**

**१) प्रभावशाली समुदाय :**

हिंदू समुदाय हा सर्वात अधिक प्रभावशाली समुदाय आहे. कारण भारतामध्ये तो सुमारे ८०% असून त्याचा इतर धर्मावर मोठा प्रभाव पडलेला आहे. तसेच इतर धार्मिक समुदायातील व्यक्तीचे पूर्वज हिंदू असून त्यांच्या जीवनात हिंदू धर्माचे व संस्कृतीचे अवशेष आढळतात. हिंदू धर्माचे विशिष्ट समाजरचना पुरस्कृत केली आहे. तशी इतर धार्मिक समुदायांना म्हणजेच जैन, बौध्द, शीख व लिंगायत इत्यादी ना, त्यांची स्वत:ची समाजरचना नसल्याने त्यांना हिंदूंचाच नागरी कायदा लागू केलेला आहे. हिंदू धर्मातील लोक हे स्वत:ला भारताचे मुळचे रहिवासी मानतात.

**२. सामाजिक भेदभाव :**

हिंदू समुदाय हा पंथ, उपपंथ, वर्ण, जात, उपजात, जमात, प्रांत, व भाषा इत्यादीच्या आधारे अनेक समूहात व उपसमूहात विभागला गेला आहे. यातील प्रत्येक समूहाची जीवनपध्दती इतराहून भिन्न आहे. त्यामुळे ते परस्परांना वेगळे मानतात. त्यामुळे त्यांच्या मनात विशाल समुदायाविषयी निष्ठा निर्माण होण्याऐवजी संकुचित समूहनिष्ठा निर्माण झाली आहे. जातीच्या आधारे निर्माण झालेली समूहनिष्ठा ही अधिक प्रबळ आहे. हिंदू समूहात सुमारे ३७०० च्या आसपास जाती व उपजाती असून त्यातील काही जातींचा सामाजिक दर्जा श्रेष्ठ तर काही जातींचा दर्जा कनिष्ठ मानला गेला आहे. श्रेष्ठ जातींना अनेक विशेषाधिकारी

दिले तर कनिष्ठ जातीवर अनेक निर्बंध लादले. या सामाजिक भेदभावामुळे हिंदू समुदायात मोठी विषमता निर्माण झाली. स्वातंत्र्यानंतर हा जातीभेद नष्ट करण्याचे विविध उपाय करूनही तो नष्ट झालेला नाही. उलट प्रत्येक जात आज संघटीत होऊन केवळ आपले हित साध्य करण्याचा प्रयत्न करताना दिसून येते. प्रत्यक्षात हिंदूमधील या जातीभेदामुळे केवळ उच्च जातींचे प्रभुत्व निर्माण झालेले असून कनिष्ठ जाती अद्यापही प्रभावहीनच राहिलेल्या दिसून येतात.

**३. विवाह व कुटुंब :**

पंरपरेने धर्मपालन, प्रजोत्पादन व कामतृप्ती हे हिंदू विवाहाचे उद्देश असून आज धर्मपाल हा उद्देश कालबाह्य ठरला आहे. मात्र विवाहप्रसंगी धार्मिक विधी करण्यास हिंदू लोक आजही प्राध्यान देतात. हिंदू समाजात आजही जात अंतर्विवाह अधिक पसंत करतात. तर आंतरजातीय विवाह कायदेशीर ठरविलेले असतानाही नापसंत करतात. त्यामुळे त्यांचे प्रमाण अल्प असलेले दिसून येते. तसेच असे विवाह बहुधा प्रेमविवाह असतात व ते पालकांच्या विरोधात जाऊन केलेले असतात. पूर्वी हिंदूमध्ये बालविवाहास मान्यता होती. आज बालविवाहास कायद्याने बंदी घालूनही असे विवाह ग्रामीण व अशिक्षित कुटुबांमध्ये होताना दिसतात. हिंदू विवाह एक संस्कार व अतूट बंधन म्हणून विवाह विच्छेदास कायदेशीर मान्यता दिली असली तरी हिंदू समाजामध्ये स्त्रीने विवाहविच्छेद घेणेबाबत हिंदू समुदाय नाखुश दिसतो. हिंदू समाजामध्ये एक पत्नीविवाह आदर्श मानतात व बहुसंख्य पुरूष त्याचेच पालन करतात. बहुपत्नी विवाहास कायद्याने काही निर्बंध घातले असल्याने त्याचे प्रमाण घटले आहे. मात्र काही पुरूष कायद्यातून पळवाटा काढून असा विवाह करताना दिसतात. हिंदू समाजामध्ये संयुक्त कुटुंब आदर्श मानले असल्याने अशा कुटुबांचे प्रमाण मोठे होते. मात्र आज संयुक्त कुटुबांचे विघटन होत असून विभक्त कुटुंबपध्दती वाढत असलेली दिसून येते.

**४. आर्थिक स्थिती :**

हिंदूंची आर्थिक स्थिती संमिश्र स्वरूपाची आहे. हिंदू धर्मामध्ये आर्थिकदृष्ट्या उच्च मध्यम व कनिष्ठ असे तीनही वर्ग आढळून येतात. उच्च वर्गामध्ये मोठे व्यापारी, उद्योगपती, राजकारणी, जमीनदार, बडे बागाईतदार व सावकार, उद्योजक, मध्यम, व्यापारी, मध्यम शेतकरी, व प्रशासकीय अधिकारी इत्यांदीचा समावेश होतो. तसेच कनिष्ठ विभागामध्ये कामगार, फिरते विक्रेते, कोरडवाहू शेती करणारे छोटे शेतकरी, शेतमजूर, पारंपारिक बलुतेदार-अलुतेदार, सार्वजनिक सेवेतील कनिष्ठ सेवक व मोलमजुरी करणारा वर्ग इत्यादींचा समावेश या कनिष्ठ वर्गामध्ये होतो. ग्रामीण भारतात शेतजमीन हा उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत असून तो बहुसंख्यांक असलेल्या हिंदूच्या ताब्यात मोठ्या प्रमाणावर आहे. मात्र जमिनिवरील मालकी हक्कावरून जातीजातीत मोठी विषमता आढळते. तसेच छोटे व सीमांत शेतकऱ्यांची स्थिती अत्यंत दयनीय आहे. त्यामुळे आत्महत्यांचे प्रमाण त्यांच्यात वाढत आहे.

**५. राजकारण :**

लोकशाहीमध्ये संख्येला अधिक महत्त्व असते. त्यामुळे बहुसंख्यांक हिंदू असल्याने भारतीय राजकारणात इतर धार्मिक समुदायापेक्षा हिंदूचा वरचष्मा निर्माण झालेला दिसतो. देशातील सर्वच राष्ट्रीय व प्रादेशिक

पक्षांचे प्रमुख नेते व सदस्य हे प्रामुख्याने हिंदूच असलेले दिसतात. सत्ता कोणत्याही राजकीय पक्षाची असली तरी मंत्री मंडळामध्ये हिंदू मंत्र्यांची संख्या अधिक असते. मतदारही आपल्या जाती धर्माच्या उमेदवारास प्राध्यान्याने मतदान करताना दिसतात.

**६. संस्कृती :**

भारतातील सांस्कृतिक क्षेत्रातही हिंदूंच वर्चस्व आढळून येते, साहित्य, कला, क्रीडा, गीत, संगीत, चित्रपट व दूरदर्शन मालिका इत्यादीमध्ये हिंदूचे योगदान व सहभाग मोठा असलेला दिसून येतो. सांस्कृतिक क्षेत्रातील विविध किताबांचे व पुरस्कारांचे मानकरी हे सर्वाधिक हिंदूच असल्याचे दिसून येतात. हिंदू संस्कृती प्राचीन असून तिचा प्रभाव इतर धार्मिक समुदायांच्या संस्कृतीवर पडलेला आहे. त्यामुळे भारतीय संस्कृती म्हणजे हिंदू संस्कृती असाच अर्थ अनेकजण घेतात. हिंदू संस्कृतीही एकसंघ नाही. तिच्या अंतर्गत अनेक उपसंकृती आढळतात. तसेच उच्च जातींनी पुरस्कृत केलेल्या सांस्कृतिक बाबी ह्या अभिजात मानतात. तर विविध उपसंस्कृतीना स्थानिक वा लोकसंस्कृती मानून दुय्यम ठरविले जाते. मात्र या भेदभावाविषयी विद्रोहाची प्रवृत्ती पूर्वीही होती आणि आजही असलेली दिसून येते.

### ३.३.२ इस्लाम धर्म :

इस्लाम धर्म हा भारताबाहेर उदयास आलेला धर्म आहे. इस्लामची लोकसंख्या जगामध्ये सुमारे १९० कोटी (२४.४%) इतकी आहे. भारतामध्येही हिंदूंच्या खालोखाल म्हणजे मुस्लीम धर्माची लोकसंख्या १७.२२ कोटी (१४.२%) इतकी आहे. महाराष्ट्रात इस्लामची लोकसंख्या १.२९ कोटी आहे. जम्मू-काश्मीरमध्ये, मुस्लीम बहुसंख्यांक असून उत्तरप्रदेश, बिहार, आसाम, पश्चिम बंगाल, आंध्रप्रदेश व केरळ इत्यादी राज्यात मुस्लीम लोकसंख्या अंदाजे १० ते २५% च्या आसपास आहे. इस्लाम धर्माचे स्वरूप पुढीलप्रमाणे समजावून घेऊया.

**इस्लाम धर्माचा उदय :**

मध्य-पूर्वेतील अरब लोकांच्यामध्ये बहुदेवतावाद, कोर्य, संघर्ष, हिंसाचार, लुटालूट, अंधश्रध्दा, अनैतिकता, विषमता, जुगार, माध्यमान व अस्थैर्य इत्यादी अनिष्ठ प्रथा मोठ्या प्रमाणात होत्या. त्यांच्यामध्ये एकेश्वरवाद, शांतता, नैतिकता, समता, सदाचार, बंधुता, स्थिरता प्रस्थापित करण्यासाठी मक्का येथील कुरेशी जमातीतील महमद (इ.स.५५७-६३२) या प्रेषिताने इ. स. ६१० मध्ये इस्लाम या नव्या धर्माची स्थापना केली महमंदानी मेंढपाळ व व्यापाराच्या निमित्ताने भटकत असताना वैश्विक स्वरूपाचे चिंतन केले. त्यातून त्यांना एकेश्वरवाद, सदाचार, समता, बंधुता, सत्यता, व मानवता इत्यादी शाश्वत तत्त्वे स्फुरली. म्हणजेच दिव्यज्ञान प्राप्ती झाली त्यांनी वरील तत्त्वांचा प्रसार सुरू केला. बगदाद, दमास्कस, कैरो, इत्यादी नगरमध्ये त्यांना बरेच अनुयायी मिळाले. परंतु मूर्तिपूजक, बहुदेवतावादी, युध्द, हिंसा, लुटमार, करण्याची सवय असलेल्या लोकांना त्यांची शिकवण न पटल्याने त्यांनी महंमदांचा छळ सुरू केला. या छळाला कंटाळून महंमदांनी ६२२ मध्ये मक्केकडून मदिनेस स्थलांतर केले. येथूनच हिजरी सन सुरू झाला. मदिनेस त्यांचे स्वागत झाले. तेथे त्यांना असंख्य अनुयायी मिळाले. त्यांच्यामध्ये त्यांनी इस्लामची तत्त्वे मोठ्या

प्रमाणात रूजविली. इस्लामच्या तत्त्वांनी प्रभावित होऊन इतरही जमातींनी इस्लामचा स्वीकार केला. मंहमदांनी आपल्या अनुयायांना इस्लामचा प्रसार शांततेने करण्याचा संदेश दिला. त्यानुसार अनेक अनुयायांनी धर्मप्रसारक बनून इस्लामच्या प्रसारास वाहून घेतले इस्लाम स्थिरस्थावर झाल्यावर एका शतकाच्या आतच इस्लाम ही प्रभावी राजकीय शक्ती बनली आणि इस्लामी राज्यकर्त्यांनी पुढे पर्शिया ते स्पेनपर्यंत इस्लामचा प्रसार तलवारीच्या जोरावर केला. अशाप्रकारे इस्लामच्या प्रसारकांनी शांततेने तर राज्यकर्त्यांनी तलवारीच्या जोरावर इस्लामचा प्रसार केल्याचे दिसून येते.

**इस्लामचा भारतातील प्रवेश :**

म्हमंद पैगंबरांच्या काळापासून सहाव्या व सातव्या शतकामध्ये व्यापाराच्या निमित्ताने काही अरब भारतात मलबारच्या किनाऱ्यावर शांततामय मार्गाने आले. त्यांनी येथील लोकांचा विश्वास संपादन केला. परिणामी मलबारी लोकांनी आपल्या मुलांचा अरबांशी विवाह लावून दिला. या विवाहातून जन्मलेल्या पिढ्यांच्या मुस्लीम समुदायास 'मोफला' हे नाव पडले. आठव्या शतकापासून मात्र भारतावर इस्लामी आक्रमणे सुरू झाली. इ. स. ७१२ मध्ये महंमद बिन-कासिमने सिंदग प्रांत जिंकला. गझनीच्या महंमदाने इ. स. १००० ते १०२७ या काळात भारतावर १७ स्वाऱ्या केल्या. महंद घोरीने दिल्ली-अजमेरचा राजा पृथ्वीराज चौहानचा १०९२ मध्ये व नंतर कनोजचा राजा जयचंद राठोडचा पराभव केला. १३९८ मध्ये मंगोलच्या तैमूरलंगने भारतावर आक्रमण केले. कुतुबुद्दीन ऐबक याने १२०६ मध्ये प्रथमच मुस्लीम राजवट स्थापन केली. पुढे अल्लाउद्दिन खिलजी, (१२९६-१३१६) महंमद तुघलक (१३२५-१३५१), सय्यद घराणे (१४१४ ते १४५०), लोदी घराणे (१४५१ ते १५२६), मोघल घराणे (१५२६ ते १७०७) यांनी दिल्लीच्या तख्तावर राज्य केले. यापैकी अल्लाउद्दिन खिलजी व मोघल सम्राट औरंगजेब यांनी सक्तीने हिंदूंचे प्रामुख्याने युध्दात हरलेल्या व शरण आलेल्या सैनिकांचे धर्मांतर घडवून आणले. महंमद बिन तुघलक व अकबर यांनी मात्र धार्मिक सहिष्णुता जोपासली. या कालावधीत मुस्लीम राज्यकर्त्यांनी जवळीक साधण्याच्या उद्देशाने, राजपूत, वैश्य, गुजर, मारवाडी, जाट, खत्री, कायस्थ इत्यादी उच्च जातींनी तर उच्चवर्णीय हिंदूच्या जातीभेदास कंटाळून कनिष्ठ जातीतील काही व्यक्तींनी इस्लाम धर्म स्वीकारला.

**इस्लामचा अर्थ :**

इस्लाम धर्माची स्थापना महंमद पैगंबर यांनी केली. हा धर्म शांतता व शरणागती या दोन गुणांवरून ओळखला जातो. तेच गुणाचा अर्थ पुढीलप्रमाणे आहे.

१. Islam हा शब्द अरबी भाषेतील साल्म (Slam) या शब्दापासून बनला असून त्याचा अर्थ शांती; (Peace) असा आहे. यावरून इस्लाम म्हणजे शांतीत प्रवेश करणे असा शब्दश: अर्थ होतो. अरब समुदायातील सततचे युध्द व हिंसाचाराने अशांत बनलेल्या जीवनाचा त्याग करून शांततामय जीवनाचा स्वीकार करणे म्हणजे इस्लाम असा अर्थ होतो.

२. शरणागती (Submission) असा आहे. यावरून सर्वश्रेष्ठ अल्लास (ईश्वरास) संपूर्णत: शरण जाणे म्हणजे इस्लाम असा अर्थ होतो. ईश्वरासाठी अरबी भाषेत अल्ला शब्द आहे. अल्लाच्या आज्ञा पाळणे म्हणजे इस्लाम असेही म्हणता येते.

**अ) इस्लाम धर्मातील श्रध्दा**

**१. अल्ला :**

इस्लाम धर्म हा एकेश्वरवादी आहे. अल्ला हा या विश्वातील एकमेव ईश्वर असून त्याच्याशिवाय अन्य कोणताही ईश्वर नाही. अशी इस्लामची मुख्य श्रध्दा आहे. अल्ला हा सर्वश्रेष्ठ, सर्वव्यापी, सर्व शक्तिमान, सर्वज्ञ, सृष्टीचा निर्माता, व सत्ताधारी असा आहे. तो मानवाच्या सर्व कृत्यांचा साक्षीदार असून दयाळू व क्षमाशीलही आहे. त्यांची कृपा प्राप्त करून घेण्यासाठी त्याला संपूर्णपणे शरण जाणे. त्याच्या आज्ञा पाळणे हे प्रत्येक व्यक्तीचे परम कर्तव्य आहे असे इस्लाम मानतो.

**२. फरिश्ते :**

इस्लाम फरिश्त्यांच्या म्हणजेच देवदूतांच्या अस्तित्वावरही श्रध्दा ठेवतो. फरिश्ते हे अल्लाचे सच्चे सेवक, आज्ञापालक, उपासक, संदेशवाहक, आहेत. भूतलावरील व्यक्तींच्या शुभाशुभ कृत्यांची नोंद घेणारे 'किरमन' व 'कंतिबीज' या नावाने दोन फरिश्ते आहेत असे इस्लाम मानतो. मृत्यूनंतर जेंव्हा अल्लापुढे उभे केले जाते तेंव्हा फरिश्त्यांनी केलेल्या नोंदी विचारात घेतल्या जातात. फरिश्त्यांवरील श्रध्दा व्यक्तीस शुभ कर्मे करण्यास प्रवृत्त करते. इस्लाममध्ये फरिश्त्यांप्रमाणेच शैतानाच्या अस्तित्वावरही श्रध्दा ठेवलेली आढळते. शैतान सर्वत्र संचार करून व्यक्तीस शुभ कृत्ये करण्यापासून परावृत्त करतात असे मानले जाते.

**३. कुराण :**

कुराण हा इस्लामचा पवित्र असा प्रमाणग्रंथ असून त्यामध्ये ईश्वराकडून महंमदांना मिळालेले दिव्य ज्ञान व संदेश ग्रंथात केलेले आहेत. या ग्रंथाचे पठन केले जाते. तसेच त्यातील अल्लाची कृपा होते. अशी इस्लामची श्रध्दा अंतिम ग्रंथ असून त्यामध्ये मानवी जीवनाच्या सर्व प्रकारच्या व्यवहारांना मार्गदर्शक ठरणारी तत्त्वे आहेत. असे इस्लाम मानतो. कुराणात ११४ सुराह ६२३६ श्लोक आहेत. कुराणाचा मुस्लिमांवर आजही मोठा प्रभाव आहे. तसेच कुराण या शब्दाचा अर्थ पठन असा आहे.

**४. प्रेषित (रसूल) :**

प्रेषितांच्या अस्तित्वावरही इस्लाम श्रध्दा ठेवतो. प्रेषित अनेक असून अल्ला त्यांना आपल्या भक्तांना मार्गदर्शन करण्यासाठी आपले पैगाम म्हणजेच संदेश घेऊन पृथ्वीवर पाठवितो अशी श्रध्दा इस्लाम धर्मीय बाळगतात. प्रेषित मानवासारखेच देहधारी असून त्यांच्यावर अल्लाचा वरदहस्त असतो. त्यामुळे ते सामान्य मानवास मार्गदर्शन करू शकतात. या प्रेषितांपैकी महंमद हे अंतिम व सच्चे प्रेषित असून त्यांची शिकवण निर्दोष व परिपूर्ण आहे. त्यांच्यानंतर कोणीही प्रेषित पृथ्वीवर येणार नाही, म्हणून प्रत्येकाने मंहमदाचे अनुयायी झालेच पाहिजे असे इस्लाम सांगतो.

**५. कयामतचा दिन (हशर) :**

कयामतचा दिन म्हणजेच 'अंतिम निवाड्याचा दिवस' या संकल्पनेवरील श्रध्दा देखील इस्लाममध्ये महत्त्वाची मानलेली आहे. एका दिवशी अल्ला सर्व जीवसृष्टी नष्ट करील. या दिवशी सर्व मानव अल्लासमोर हजर होतील. अल्ला त्यांच्या कृत्यांचा अंतिम निवाडा करेल. म्हणजे सर्व मानवाच्या शुभाशुभ कृत्यांच्या फरिश्त्यांनी केलेल्या नोंदी अल्ला विचारात घेईल. व ज्यांची शुभ कृत्ये ही अशुभ कृत्यांपेक्षा जास्त असतील त्यांना अल्ला स्वर्गात म्हणजेच कयामतच्या दिनाविषयी श्रध्दा आहे. प्रत्येकास एका दिवशी आपल्या शुभाशुभ कर्मांचा म्हणजेच पापपुण्याचा हिशेब अल्ला समोर द्यावा लागणार आहे. व त्यानुसार स्वर्गप्राप्तीचे बक्षीस वा नरकयातनांची शिक्षा मिळणार आहे. ही श्रध्दा व्यक्तीस शुभ कर्मे करण्याची प्रेरणा देते. त्यामुळे ही इस्लामधील श्रध्दा सामाजिकदृष्ट्या महत्त्वाची ठरते.

**ब) इस्लाममधील धर्माचरण (इबादत):**

इस्लाममधील धर्माचरण म्हणजेच वर्तन प्रकार किंवा आचरण प्रकार होय. या आचरण प्रकारांनाच उपासना असेही म्हणतात. इबादत म्हणजे दास म्हणून मानवाने अल्लाच्या आज्ञा पाळणे असाही होतो.

**१. तोहिद :**

तोहिद म्हणजे इस्लाममधील श्रध्दांना प्रत्यक्ष व्यवहारात उतरविण्यासाठी इस्लामच्या पवित्र वचनांचा वा मंत्रांचा सतत उच्चार करणे होय. यासंदर्भात पुढील मंत्र महत्त्वाचे इस्लाम धर्मामध्ये मानतात.

अ) 'ला इलाह इल्लल्लाह महम्मद-उर-रसूलल्लाइ' या मंत्राचा अर्थ, अल्लाशिवाय दुसरा ईश्वर नाही व मुहम्मद हा अल्लाचा प्रेषित आहे असा आहे.

ब) 'अशब्द अब्दूला इलह इल्ल अशहद अन्न मुह्म्मद' हाच ईश्वराचा सेवक व प्रेषित आहे असा आहे.

**२. नमाज :**

ज्या गोष्टीवर श्रध्दा आहे त्या गोष्टीच्या कृतीने व मुखाद्वारे दिवसातून पाच वेळा म्हणजेच पहाटे दुपारी, चौथ्या प्रहरी, सूर्यास्तानंतर व रात्र झाल्यावर दीड दोन तासानंतर पुनरूच्चार करणे म्हणजे नमाज किंवा प्रार्थना होय. नमाज पढताना प्रथम शरीर, मन, वस्त्रे, व नमाजची जागा इत्यादी गोष्टी स्वच्छ व शुध्द करावेत. तसेच डोळे झाकावे व मक्केकडे तोंड करावे. ठरलेल्या वेळीच नमाज करावे अशा अटी घातलेल्या आहेत. नमाज मशिदीत जाऊन सामुहिकपणे पढणे महत्त्वाचे मानले आहे. त्यामुळे इस्लामच्या अनुयायांमध्ये ऐक्य व बंधुभाव निर्माण होईल असा उद्देश आहे. नमाज पढण्यामध्ये अल्लाचे दास्यत्व कबूल करणे. त्याची मदत व मार्गदर्शन मिळविण्यासाठी याचना करणे, आपल्या चुकांची कबुली देणे व अल्लाच्या प्रेषिताबद्दल ग्वाही देणे. इत्यादी गोष्टी अंतभूर्त आहेत. इस्लाम ईश्वरवादी असला तरी त्यामध्ये ईश्वराची मूर्तीपूजा मान्य नाही. त्यामुळे मशिदीत ईश्वराच्या मूर्तीची प्रतिष्ठापणा केली जात नाही. मूर्तीपूजेऐवजी केवळ नमाज पढणे हीच पूजा अर्चा मानली जाते.

**३. रोजा :**

दरवर्षी रमजानच्या महिन्यात सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत उपवास करणे. हे तिसरे धर्माचरण असून त्यास रोजा म्हणतात. पहाटेच्या नमाज पूर्वीची बांग म्हणजेच मगरीब ऐकल्यानंतर उपवास सोडतात. रमजान च्या महिन्यातच कुराण पृथ्वीवर अवतरले असल्याने हा महिना पवित्र व मंगलमय मानला जातो. ह्या उपवासामुळे अंगी सहनशीलता, संयम, संकटांना तोंड देण्याचे सामर्थ्य देते. तसेच ऐक्य व बंधुभाव निर्माण होण्यास मदत होते असे मानले जाते.

**४. जकात :**

आपल्या उत्पन्नातील किमान अडीच टक्के हिस्सा गरीब व गरजू व्यक्तींना दान करणे म्हणजे जकात होय प्रत्येक धनवानाने निर्धन व्यक्तींना दान करणे हे आवश्यक मानले आहे. दान केल्याने स्वार्थी वृत्ती, धनाचा मोह, संकुचितपणा इत्यादी दुर्गुण नष्ट होतात. व असे दान करणारी व्यक्ती अल्लास प्रिय होते. असे मानतात. श्रीमंतानी आपल्या संपत्तीचा उपयोग केवळ स्वत:च्या ऐशोआरामासाठी म्हणजेच चैनीसाठी न करता, दिन-दुबळ्यांना आधार देण्यासाठी करावा अशी अपेक्षा जकात करण्यामागे आहे त्यामुळे सामाजिकदृष्ट्या 'जकात' महत्त्वपूर्ण आचरण ठरते.

**५. हज :**

शक्य असेल त्या प्रत्येक व्यक्तीने आयुष्यात एकदा तरी पैगंबराचे जन्मस्थान असलेल्या 'मक्का' या शहरास भेट द्यावी हे ही महत्त्वाचे मानलेले आहे. यालाच हजची यात्रा करणे असेही म्हणतात. 'हज' यात्रेच्या निमित्ताने विविध देशातील मुस्लीम एकत्र येतात. त्यामुळे त्यांच्यात ऐक्य व बंधुभाव निर्माण होण्यास मदत होते. हज यात्रेचे कर्तव्य मात्र केवळ आर्थिक क्षमता असणाऱ्या मुस्लीम बांधवासाठीच अनिवार्य मानलेले आहे.

**क) इस्लामधील शरीयतची संकल्पना :**

शरीयत ही इस्लाम आचारसंहिता किंवा कायदेसंहिता आहे. शरियतमध्ये १. कुराणमधील तत्वे २. सुन्ना (परंपरागत कायदे) ३. इज्मा (वादग्रस्त मुद्यांवरील विद्वानांचे एकमत) ४. कियास (तर्कदृष्ट्या आवश्यक वाटणारा नियम) ५. (उपलब्ध तथ्यांवरून निर्णय देताना न्यायाधीशांनी ग्रंथित केलेली तत्त्वे) या पाच बाबींवर आधारलेली आहे. शरियतमध्ये मान्य किंवा कायदेशीर वर्तन आणि अमान्य किंवा निषिध्द वर्तन असा भेद केला आहे. मान्य किंवा कायदेशीर वर्तनास 'हलाल' व निषिध्द वर्तनास 'हराम' म्हंटले आहे. व्यक्तीने नेहमी हलाल वर्तन करावे आणि हराम वर्तन टाळावे असे शरियत सांगते. शरियत अत्यंत व्यापक असून त्यामध्ये व्यक्तीची कर्तव्ये नमूद केलेली आहेत. ती कर्तव्ये पुढीलप्रमाणे

**१) ईश्वरविषयीची कर्तव्ये :** अल्लावर संपूर्ण श्रध्दा ठेवून त्याचे आदेश व कुराणातील नियमाचे पालन करणे.

**२) स्वविषयक कर्तव्ये :** सर्व प्रकारच्या व्यसनांपासून दूर राहणे, अंगभर वस्त्रे वापरणे, उद्योगी असणे, विवाहाद्वारेच कामतृप्ती करणे, भौतिक गरजांचे दमन न करणे व आत्महत्या न करणे इत्यादी.

**३) इतरांविषयीची कर्तव्ये :** इतरांचे अहित होईल अशी कृत्ये म्हणजेच चोरी, लुटमार, भ्रष्टाचार, फसवणूक, चहाडी, निंदानालस्ती, व्याज घेणे व जुगार खेळणे इत्यादी गोष्टी न करणे तसेच मातापित्यांचा आदर व अपत्यांचे संगोपन करणे, आप्त, मित्र, शेजारी, दिनदुबळे, अनाथ, आजारी इत्यादींना मदत करणे, विवाहबाह्य लैंगिक संबंध न ठेवणे, गटबाजी न करणे, समाजात ऐक्य व बंधुभाव वाढीस लावणे. इत्यादी.

**४) पशुपक्षी व वनस्पतीविषयीची कर्तव्ये :** सर्व सजीवांविषयी भूतदया दाखविणे, केवळ मनोरंजनासाठी पशुहत्या न करणे, केवळ उपद्रवी प्राण्यांना मारणे, वनस्पतीचा विनाकारण नाश न करणे इत्यादी कर्तव्यांचे पालन शरीयत मध्ये आवश्यक मानली आहेत.

**ड) भारतातील मुस्लिमांची सामाजिक स्थिती :**

१. भारतामध्ये मुस्लीम हे अल्पसंख्यांक असून बहुसंख्यांक हिंदूकडून आपणास भेदभावाची वागणूक मिळते. असे अनेक मुस्लिमांना वाटते. म्हणून ते आपली वेगळी वस्तीस्थाने करून राहतात. त्यांनी आपली धार्मिक अस्मिता व वेगळी सामाजिक-सांस्कृतिक ओळख टिकवून ठेवलेली आहे. भारतीय समाजाच्या मुख्य प्रवाहापासून ते वेगळे राहू इच्छितात.

२. मुस्लीम धर्मामध्ये शिक्षणाचे प्रमाण तुलनेने कमी आहे. त्यामुळे प्रशासकीय सेवेत त्यांचे प्रमाण फार कमी दिसून येते. बहुसंख्य मुस्लीम हे आर्थिकदृष्ट्या दुर्बल असून ते स्वयंरोजगारावर भर देताना दिसून येतात. गरीब मुस्लीम हे आधुनिकीकरणाची गती ही मंद स्वरूपाची दिसून येते. त्यामुळे ते परंपरागत व कालबाह्य अशा जुनाट आचार विचारांना टिकवून राहिलेले दिसतात.

३. भारतातील हिंदुत्ववादी संघटना व लोक मुस्लिमांकडे, त्यांच्या राष्ट्रनिष्ठेकडे संशयाने पाहतात. अनेक मुस्लिमही दुहेरी निष्ठा बाळगतात. भारतात राहुनही इस्लामी जगताशी निष्ठा राखू इच्छितात. यातूनच हिंदू-मुस्लीम मतभेद तीव्र होऊन सांप्रदायिकतेस चालना मिळते व राष्ट्रीय एकात्मतेसमोर आव्हान निर्माण होते.

**ई) इस्लामचा भारतीय समाजावरील प्रभाव :**

**४. धार्मिक जीवनावरील प्रभाव :**

काही मुस्लीम राज्यकर्त्यांनी हिंदूंचे सक्तीने धर्मांतर सुरू केले. त्यांनी हिंदुंच्या पवित्र स्थळांची विटंबना केली तसेच स्त्रियांचीही विटबंना केली. हिंदुंवर जिझिया कर लादला. हिंदूंची संपत्ती लुटली. यातूनच हिंदू-मुस्लीम असा धार्मिक संघर्ष सुरू झाला. मुस्लीम हे हिंदुंना 'काफिर' तर हिंदू हे मुस्लीमांना तुच्छ मानू लागले. त्यांनी धार्मिक सलोखा निर्माण करण्याचा प्रयत्न केला. मुस्लीम आक्रमणामुळे निर्माण झालेली संभ्रमावस्था दूर करण्यासाठी या पंथांनी भक्ती मार्गाचा पुरस्कार केला. त्यातून महाराष्ट्रात वारकरी संप्रदाय उदयास आला. इस्लाममधील एकेश्वरवाद, समता व बंधुता या तत्त्वांचा प्रभाव काही हिंदू विचारवंतांवर

पडला व त्यांनी ईश्वर व अल्ला एकच आहेत. राम व रहीम तसेच कृष्ण व करीम एकच आहेत असा प्रचार सुरू केला. त्यामुळे पीर व दर्ग्यांना भेट देवू लागले.

**१. सार्वजनिक जीवनावरील प्रभाव :**

भारतीय समाजात इस्लामच्या रूपाने एक नवीन धार्मिक समुदाय निर्माण होऊन भारतातील धार्मिक विविधतेत भर पडली. मुस्लीमांपुर्वी भारतात आलेले ग्रीक, शक, हून, व कुशाण हे परकीय लोक भारतीय समाजात मिसळून भारतीय बनले. मुस्लिमांनी मात्र अलगतेचे धोरण ठेवले. त्यांनी भारतीय समाजाशी फारसे जुळवून घेतले नाही. त्यामुळे त्यांचा स्वतंत्र असा वेगळा समुदाय निर्माण झाला. मुस्लीम बनलेल्या हिंदुंना स्वधर्मात परत घेण्यास मनाई धर्ममार्तंडांनी केली. मुस्लीम आक्रमणापासून हिंदू स्त्रियांना सुरक्षित ठेवण्यासाठी हिंदुंनी बालविवाह, विधवा विवाहबंदी, स्त्रीशिक्षणबंदी, सतीप्रथा, केशवपन, व पडदापध्दती इत्यादी अनिष्ट प्रथांचे उदात्तीकरण केले. त्यामुळे हिंदू स्त्रियांच्या समस्येत वाढ झाली.

**२. सांस्कृतिक जीवनावरील प्रभाव :**

इस्लाम भारतात आल्यावर त्यांची अरबी व फारसी भाषांमध्ये संवाद वाढला त्यामुळे फारसी ही भाषा राजभाषा बनली. परिणामी संस्कृतचे महत्त्व कमी झाले. हिंदी भाषेचा विकास झाला. फारसी व हिंदी भाषांमधून उर्दू भाषेचा उदय झाला. या भाषेमधून अनेक ग्रंथ, गझल, शेरशायरी निर्माण झाली. इतकेच नव्हे तर मुस्लीम राज्यांनी साहित्यिकांना उदार आश्रम दिल्याने गुलबदन, बेगमचा 'हुमायुननामा' अबू फजलचा 'ऐन-ए-अकबरी' अब्बास खान शेरखानीचा 'तारीख-ए-शेरशाही' असे अजरामर ग्रंथ निर्माण झाले. बाबरने पर्शियन चित्रकार भारतात आणले. त्यांच्याकडे उत्तमोत्तम चित्रांचा संग्रह होता. हुमायून स्वत: चित्रकार होता. अकबराच्या पदरी १५० चित्रकार होते. भारतीय कला व इराणी कला यांच्या मिश्रणातून इंडो-इस्लामिक वास्तुकला शैली उदयास आली. संगमरवर दगड, घुमट, मिनार, जाळीदार, नक्षीकाम इत्यादीचा वापर करून कुतुबमिनार, चारमिनार, जाम्मा-मशिद, बुलंद दरवाजा, ताजमहाल, लाल किल्ला, गोलघुमट, हुमायून मकबरा, बिबिचा मकबरा इत्यादी अप्रतिम वास्तू निर्माण झाल्या.

**३. शैक्षणिक जीवनावरील प्रभाव :**

महंमद गझनी, महंमद घोरी यांनी इस्लामी आचार विचारांचे शिक्षण देणारे मदरसा स्थापन केले. मुस्लीम राजवट स्थिरावल्यावर अनेक मदरशे भारतामध्ये स्थापन झाले. ते मुस्लीम सांप्रदायिकतेचे शिक्षण देणारी केंद्रे बनली. विश्वातील ज्ञान, शास्त्रे, कलाकौशल्ये व संस्कृती भारतामध्ये इस्लाममुळे आली. सम्राट अकबराने भारतीय तत्वज्ञान, नितिशास्त्र, गृहशास्त्र, कृषिशास्त्र, साहित्य, मापनशास्त्र, राज्यशास्त्र, ज्योतिषविद्या, खगोलशास्त्र व विविध कला इत्यादींच्या शिक्षणास उत्तेजन दिलेले दिसून येते.

**४. राजकीय जीवनावरील प्रभाव:**

सम्राट हर्षवर्धन ते हुमायून या प्रदीर्घ कालखंडात भारतामध्ये असंख्य लहान राज्ये निर्माण झालेली होती. अकबर, शहाजहान व औरंगजेब या मोगल बादशहा हा हिंदुस्थानचा सम्राट मानला जाऊ लागला.

बहुसंख्य मुस्लीम राज्यकर्त्यांनी सहिष्णुतेने व सलोखा ठेवून राज्य कारभार केला. अकबराने धर्म निरपेक्षपणे कारभार करून राष्ट्रीय ऐक्य निर्मितीचा प्रयत्न केला शहाजहानची कारकीर्द सुवर्णकाळ गेली. भारतात मुस्लीम राजांनी साम्राज्य विस्ताराचे धोरण राबविले तरीही अनेक हिंदू राजवटी टिकून होत्या. राणा प्रतापसिंहानी शेवटपर्यंत अकबराशी लढा देवून आपली राजवट टिकवण्याचा प्रयत्न केला. महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्य स्थापन केले.

अशाप्रकारे इस्लाम धर्म व इस्लाम राजवटीचा भारतीय समाजावर मोठा प्रभाव पडला. हिंदू-मुस्लीम संस्कृतीच्या देवाण घेवाणीतून एक संमिश्र संस्कृती मात्र विकसित झाली नाही. तर मुस्लिमांनी हिदूंची धार्मिक सहिष्णुता स्वीकारली नाही. त्यामुळे ह्या दोन्ही धर्माचे समुदाय भारतात परस्परांशी एकात्म होऊ शकले नाहीत ही मोठी शोकांतिकाच म्हणावी लागेल.

**बौध्द धर्म :**

भारतामध्ये उदयास आलेल्या बौध्द धर्माचे जगामध्ये सुमारे ३५ कोटी अनुयायी आहेत. तसेच भारतामध्ये ८४.४३ लाख इतके अनुयायी असलेले दिसून येतात. लडाख, सिक्कीम, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड, अरूणाचल प्रदेश, पश्चिम बंगालमधील दार्जिलिंग जिल्हा व दक्षिण भारतातील काही भागामध्ये बौध्द धर्माचे अनुयायी आहेत. डॉ. बाबसाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्रातील अस्पृश्यांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी हा धर्म स्वीकारला. पुढे अन्य राज्यातील अनेक अस्पृश्यांनीही हा धर्म स्वीकारला त्यामुळे बौध्दांची संख्या लक्षणीय स्वरूपात वाढलेली दिसून येते. या धर्मामधील बौध्दांना 'नवबौध्द' म्हटले जाते.

**बौध्द संज्ञेचा अर्थ :**

गौतम बुध्दांनी प्रतिपादन केलेला धर्म हा बौध्द धर्म म्हणून ओळखला जातो. सिध्दार्थाच्या जन्मानंतर सातव्या दिवशीच त्याची माता महामाया मृत्यू पावली. त्यानंतर त्यांची मावशी व सावत्रमाता असलेल्या गौतमी ने त्याचे संगोपन केले. त्यामुळे गौतमीचा पुत्र म्हणून सिध्दार्थला गौतम म्हटले जाऊ लागले. गयेजवळील निरंजनवनात पिंपळ वृक्षाखाली केलेल्या चिंतनातून सिध्दार्थास जे दिव्यज्ञान प्राप्त झाले तेंव्हा त्यास बुध्दत्व प्राप्त झाले. व लोक सिध्दार्थाला बुध्द, प्रबुध्द, तथागत व भगवान इत्यादी नावांनी संबोधू लागले. यापैकी बुध्द हे नाव विशेष प्रचलित आहे. अर्थात बुध्द हे काही नाव वा पद नव्हे बुध्द ही एक स्थिती आहे. बौध्दिक व नैतिकदृष्ट्या परिपूर्णतेची आदर्श स्थिती ज्याने स्वप्रयत्नाने प्राप्त केलेले आहे तो बुध्द. सत्याला सत्य व असत्याला असत्य म्हणून ओळखण्यास सक्षम आहे आणि बुध्दाने दाखविलेल्या मार्गाने आपल्या दु:खापासून मुक्त होण्याचे प्रयत्न करीत आहे. थोडक्यात जो जागृत झाला तो बुध्द होय.

**अ) बौध्द धर्माची वैशिष्टे :**

**१. बौध्द धर्म एक तत्वज्ञान :**

बौध्द धर्म हा एक धर्म आहे. असे आपण म्हणतो तथापि तो एक धर्म नसून एक तत्वज्ञान आहे 'धर्म' म्हणजे, ईश्वराविषयीची श्रध्दा व विधी यांची व्यवस्था होय' या धर्माच्या व्याख्येनुसार बौध्द धर्म हा ठरत नाही. कारण बौध्द धर्मामध्ये ईश्वर मानत नाहीत, त्यामुळे बौध्द धर्म हा जीवन जगण्याचा एक मार्ग आहे. जीवनाकडे पाहण्याचा एक दृष्टीकोन आहे. म्हणूनच बुध्दांच्या शिकवणीवर आधारलेल्या जीवनमार्गास 'धर्म' म्हणण्याऐवजी 'धम्म' म्हटले जाते. धर्म व धम्म यातील फरक स्पष्ट करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, ईश्वराचे स्वरूप व त्याला प्रसन्न करून घेण्याचे मार्ग या संबंधीचे विचार म्हणजे धर्म होय. तर वैयक्तिक व सामाजिक नीती म्हणजे धम्म होय.

२. मध्यममार्गी तत्वज्ञान हे मध्यममार्गी तत्वज्ञान आहे. त्याचे दोन अर्थ आहेत गौतम बुध्द म्हणतात, जीवन जगताना देहाचे फाजील लाड करणे जसे चूक, तसेच देहास मुद्दाम क्लेश देणेही चूकच आहे. या दोन्हीच्या मधला मार्ग पाहिजे याचा अर्थ असा की, भौतिक सुखात अखंड बुडून जाणे हे एक टोक आहे तर अशा सुखापासून संपूर्ण अलिप्त राहणे हे दुसरे टोक आहे माणसाने ही दोन्ही टोके टाळून त्यांच्या मधला मार्ग निवडला पाहिजे बुध्दाचा हा मध्यम मार्ग ॲरिस्टॉटलच्या सुवर्णमध्य या संकल्पनेशी जुळणारा आहे. गौतम बुध्दांनी कार्यकारणभावाचे तत्व स्वीकारले आहे. त्यांच्या काळात कार्यकारणभावांविषयी दोन परस्परविरोधी मते प्रचलित होती. बुध्द म्हणतात, अगोदर कारण घडते मग कार्य घडते हा क्रम कारण कार्य संबंधात सर्वत्र अबाधित असतो. त्यांच्या या मतास प्रतित्यसमुत्पाद असे म्हणतात. 'ते असेल तर हे घडते' (अस्मिन सति इदम् भवति) असा प्रतीत्यसमुत्पादाचा शब्दश: अर्थ आहे. बुध्दांचे हे मत इंग्रजी तत्वज्ञ ह्यूम यांच्या कारण कार्य सिध्दांताशी साम्य दर्शविणारे आहे.

**३. वैज्ञानिक दृष्टीकोन :**

बौध्द धर्माची विचारधारा ही आधुनिक वैज्ञानिक दृष्टीकोनाशी जुळणारी आहे. कारण आधुनिक विज्ञानाप्रमाणे अनुभववाद, प्रत्यक्षवाद, आणि घटनावाद यांचा पुरस्कार बौध्द धर्माच्या तत्त्वज्ञानामध्ये दिसून येतो. ज्या गोष्टींचा आपल्याला अनुभव येत नाही त्या गोष्टी विज्ञान मान्य करीत नाही बौध्द धर्मही ईश्वर, आत्मा यांचा अनुभव येत नसल्याने त्यांचे अस्तित्व नाकारतो. कार्यकारणभावांविषयीचा बौध्द दर्शनातील प्रतीत्यसमूत्पादाचा सिध्दांत हा प्रत्यक्षवादावर आधारलेला आहे.

**४. मानवतावादी धर्म :**

बौध्द धर्म हा मानवतावादी धर्म म्हणून ओळखला जातो. गौतम बुध्द हे व्यवहारवाडी व नैतिक विचारवंत होते. निव्वळ तात्विक प्रश्नांची चर्चा करण्यात त्यांना रस नव्हता. मानवी जीवनातील दु:खाचा नाश करण्याचा मार्ग शोधणे ही त्यांच्या चिंतनाची प्रेरणा होती. यातून त्यांनी जो मार्ग म्हणजे धम्म प्रतिपादन केला तो मानवी कल्याणास पोषक असा आहे. कारण बौध्द धर्म समता, स्वातंत्र्य, बंधुत्व व न्याय या

लोकशाही मूल्यांचा पुरस्कार करतो. वैदिक धर्माने पुरस्कृत केलेला वर्णभेद बुध्दाने नाकारला. सर्व मानव समाज असून जन्माने कोणीही श्रेष्ठ वा कनिष्ठ ठरत नाही असे त्यांनी सांगितले. प्रत्येकास स्वकर्तृत्वाने आपला दर्जा उंचावण्याचे स्वातंत्र्य आहे. असे प्रतिपादन केले. पुरूषाप्रमाणेच स्त्रियांनाही शिक्षण घेण्याचा व निर्वाणप्राप्तीचा अधिकार दिला बौध्द संघात स्त्रियांनाही भिक्षुणी म्हणून प्रवेश दिलेला दिसून येतो.

**५. निरिश्वरवादी धर्म :**

बौध्द धर्म हा निरिश्वरवादी धर्म आहे. जगातील अनेक धर्म हे ईश्वराच्या अस्तित्वावर श्रध्दा ठेवतात. हे धर्म ईश्वर सृष्टीचा निर्माता असून, ईश्वरी इच्छेनुसार सृष्टीचेसर्व व्यवहार घडतात असे मानतात. बौध्दधर्म मात्र ईश्वराचे अस्तित्व नाकारतो. बुध्दांच्या मतानुसार हि सृष्टी म्हणजे विश्व स्वयंभू आहे. सृष्टीतील सर्व व्यवहार हे कार्यकारणभावाच्या तत्वानुसार चालतात. त्यासाठी ईश्वराचे अस्तित्व मानण्याची गरज नाही त्यामुळे निरिश्वरवाद हे या धर्माचे खास वैशिष्टे आहे.

**६. दहा अव्याकृत्ये :**

बहुतेक धर्मसंस्थापकांनी मानवी बुध्दीस अनाकलनीय असणाऱ्या प्रश्नांची म्हणजे विश्वनिर्मिती, स्वर्ग-नरक, लोक-परलोक, आणि मृत्युनंतरची स्थिती या विषयी उत्तरे दिलेली आहेत. परंतु गौतम बुध्दांनी अनाकलनीय प्रश्नांची उत्तरे देण्याचे नाकारले आहे. अशा प्रश्नांना बौध्द धर्मामध्ये अव्याकृत म्हणतात. अशी दहा अव्याकृत म्हणजे १. जग शाश्वत आहे. २. जग अशाश्वत आहे. ३. जगाला अंत आहे. ४. जग अनंत आहे. ५. जीव व शरीर एकच आहे. ६. जीव व शरीर भिन्न आहेत. ७. तथागत मृत्युनंतर नसतो. ८. तथागत मृत्युनंतर असताही व नसतो असेही नाही. ह्या दहा प्रश्नांची उत्तरे देण्याचे बुध्दांनी नाकारले. वरील प्रश्नांची चर्चा करण्यापेक्षा दु:खाचा नाश कसा करता येईल.

**ब) पंचशील तत्वे :**

**१. अहिंसेचे पालन :**

बौध्द धर्मामध्ये अहिंसेच्या तत्वाला अतिशय महत्वाचे स्थान आहे. अहिंसा म्हणजे हिंसा करू नये. हिंसेचा त्याग करणे होय. म्हणजेच प्राणी मात्रास दया दाखवावी. त्यांची हिंसा करू नये शरीराने, वाणीने व मनाने कोणत्याही प्राणीमात्रास त्रास देणे म्हणजे अहिंसा होय. तसेच शरीराने कोणासही न मारणे, इजा पोहचेल असे वर्तन न करणे चारित्र्य अत्यंत शुध्द व स्वच्छ असण्यासाठी नैतिक मूल्यांमध्ये अहिंसेचे व्रत पालन करणे. हे मानवाचे आद्यकर्तव्य आहे. मानवी मन मुळातच स्वार्थी, सुख उपभोगी स्वरूपाचे असते. आपल्या सुखाच्या तृष्णेच्या विरोधात येणाऱ्या व्यक्ती विषयी वैर ठेवणे तसे अवघडच आहे. मानवी मनाच्या स्वैरपणाची खरी जाणीव गौतम बुध्दांना झाली होती. त्यामुळेच त्यांनी केवळ प्राणी मात्राची हत्या न करणे म्हणजे अहिंसा असा संकुचित अर्थ न बाळगता व्यापक अर्थाने कायिक, वाचिक व मानसिक कोणत्याही पीडा न होणे म्हणजे अहिंसा असे व्यापक अर्थाने अहिंसाबाबत तत्व मानले.

**२. चोरी करू नये :**

समाज सुस्थिर व संघटित राहण्यासाठी इतरांवर अन्याय होईल असे वर्तन न करणे अगत्याचे आहे. चोरी करणे हे पाप कर्म आहे. त्यामुळे इतरांवर तर चोरी केल्यामुळे अन्याय होतोच पण व्यक्तीची स्वार्थी वृत्ती वाढते. जे आपले आहे त्यावर आपला हक्क आहे त्याचाच वापर मानवाने करावा परद्रव्य अभिलाषा ही अंत्यत वाईट आहे. जे आपले नाही किंवा आपणास दिलेले नाही त्याची आशा मानवाने करू नये म्हणजेच चौर्य कर्मापासून परावृत्त राहणे होय. आपल्या जवळ जे आहे त्यामध्ये समाधानी वृत्तीने जगून प्रवस्तुविषयी, परज्ञानाविषयी, यत्किंचितही आशा न बाळगणे हे तत्व, समाज, सुव्यवस्था, सुस्थिरता, व सुशांततेच्या दृष्टीने योग्यच आहे हेच मानवाच्या दैनंदिन जीवनातील इतिवृत्त आहे.

**३. व्याभिचार करू नये :**

गौतम बुध्दांनी मानवी विघातक वृत्तीचा सारासार विचार करूनच पंचशील व्रते मांडली आहेत. व्यक्तीच्या शुध्द व स्वच्छ चारित्र्यासाठी विवाहसंस्थेला मान्यता दिली आहे. धर्म विहित काम भावनेची पूर्तता करणे त्यांनी मान्य केलेली आहे. त्यांच्या मते अत्यंतिक कामवासनेवर विजय संपादन करणे अत्यंत आवश्यक आहे. कारण हीच कामवासना मानवाच्या नैतिक अधःपतनाला कारणीभूत होते. कामवासनेमुळे व्यभिचार वाढतो व्यभिचारामुळे व्यक्ती व समाजाची नैतिकता ढासळते यासाठी व्यक्तीने स्वतःच्या व समाज्याच्या कल्याणासाठी व्यभिचारापासून अलिप्त असणे आवश्यक आहे.

**४. खोटे बोलू नये :**

सत्य हेच बौध्द नितिशास्त्राचे मुलभूत तत्व आहे. व्यक्तीने सदैव सत्याचीच कास धरावी. सदैव सत्य बोलावे. असत्याचा त्याग करावा. आपल्या विचारात, कृतीत व मनामध्ये देखील सत्यता असावी. मानवाने सर्व प्रकारच्या असत्याचा त्याग करावा. सत्य हे मानवास सदैव पथभ्रष्टतेपासून परावृत्त करते सत्यामुळे आपले शील जसे शुध्द राहते तसेच समाजाचे चारित्र्यही शुध्द राहते. म्हणूनच व्यक्तीने आपल्या जीवनामध्ये नेहमी सत्याने वागावे.

**५. मादक पदार्थाचे सेवन करू नये:**

मादक पदार्थांच्या सेवनाने व्यक्तीचा आपल्या बुध्दीवरचा ताबा सुटतो व तो पशुवत बनतो. त्याच्या हातून अमानवी कृत्ये घडू शकतात. म्हणून मानवाने गुंगी आणणाऱ्या व मादक पदार्थांपासून नेहमी अलिप्त राहावे. मद्यपान हे आरोग्य विघातक आहे. तसेच शारीरिक व मानसिक दुर्बलता मादक पदार्थाच्या सेवनाने वाढते. त्यामुळे व्यक्ती, निरूत्साही बनते त्यामुळे समाजाचा विकासही होत नाही. अशाप्रसंगी व्यक्तीने आपल्या दैनंदिन जीवनात मादक पदार्थांपासून अलिप्त रहावे.

अशाप्रकारे पंचशील तत्वे समाजाच्या दृष्टीकोनातून महत्वाची आहेत.

## क) आर्य अष्टांगमार्ग :

### १. सम्यक दृष्टी :

'यथा दृष्टी तथा सृष्टी' या तत्वानुसार शुध्द आचरणासाठी प्रथम मानवाने आपली दृष्टी यर्थाथ ठेवणे आवश्यक आहे. जे जे वास्तव आहे ज्याची कारणीमांसा स्पष्ट करता येते हे जाणून घेणे म्हणजेच सम्यक दृष्टी होय. सृष्टीत जे काही घडते ते कार्यकारण भावांच्या प्रक्रियेमुळे घडते. अशी मानवाची वास्तव वस्तुनिष्ठ दृष्टी ठेवणे हाच उद्देश यामागे आहे. सारासार विवके बुध्दी जागृत ठेवून विश्वातील प्रत्येक घडामोडीकडे पाहणे म्हणजेच सम्यक दृष्टी होय. विश्वातील सत्य जाणणे, सद्सद्विवेकबुध्दीचा विकास झाल्याने विश्वातील अवास्तव बाबीकडे पूर्णत: दुर्लक्ष करू शकतो. त्यामुळे अद्भूत, चमत्कारिक कल्पनांचा त्याग करतो. कर्मकांड, काल्पनिक दिव्यशक्ती, दैव या सर्वांचा त्याग व्यक्ती करते. विश्वात घडणारी कोणतीही घटना दैवी शक्तीच्या कृपेने अगर अवकृपेने घडत नसून ती निसर्ग नियमानुसारच घडते असे मानणे म्हणजेच सम्यक दृष्टी होय.

### २. सम्यक संकल्प :

सम्यक संकल्प म्हणजे योग्य गोष्टी करण्याचा निश्चय किंवा शुध्द विचार विकसीत करणे होय. जेंव्हा व्यक्तीची दृष्टी यथार्थ बनते तेंव्हा योग्य विचार, योग्य हेतू व योग्य आकांक्षा व्यक्ती मनात बाळगून त्याप्रमाणे वागण्याचा प्रयत्न करते क्षणभंगुर बाबी कोणत्या याची जाणीव व्यक्तीस होते. व त्यामुळे व्यक्ती राग, लोभ, संपत्ती, ऐश्वर्य, सत्ता व कामउपभोग यांचा त्याग करते. व्यक्तीने आपल्या मनामध्ये शुभकामना चांगल्या आकांक्षा, निरासक्ती, सर्व प्राणीमात्रांविषयी प्रेमळ भावना बाळगणे अशा प्रकारचा संकल्प बाळगावा. समाजशास्त्रीयदृष्ट्या विचार करता हा दुसरा आर्यमार्ग शुध्द भावनेवर आधारित असल्याने व्यक्ती व समाज या दोहोंच्या दृष्टीने अत्यंत उपकारक वाटतो. कारण कोणतीही कृती प्रेरणेतूनच निर्माण होत असते तेंव्हा शुध्द प्रेरणा असेल तर सामाजिक कृतीदेखील शुध्द बनते. सम्यक संकल्पामुळे सर्वांबद्दल प्रेम, मैत्रीची भावना वाढते व दुराचरनापासून व्यक्ती अलिप्त राहते.

### ३. सम्यक वाचा :

जेंव्हा व्यक्तीची संपूर्ण विश्वाविषयीची दृष्टी यथार्थ बनते, मनाशी शुध्द संकल्प व्यक्ती बाळगू लागते तेंव्हा तिची वाणीदेखील यथार्थ बनते दैनंदिन जीवनात व्यक्तीने योग्य तेच बोलावे, इतरांना त्रास होईल असे बोलू नये, म्हणजेच सम्यक वाचा होय. सम्यक वाचा म्हणजे व्यक्तीने जे सत्य आहे तेच बोलावे, असत्य बोलू नये, इतरांविषयी वाईट बोलू नये, इतरांची निंदानालस्ती करू नये, आपल्याशी संबंधित व्यक्तीविषयी रागाची, शिवीगाळीची भाषा वापरू नये. सर्वांशी आपुलकीने व सौज्यन्याने बोलावे, समंजसपणे व मुद्देसूद बोलावे, तसेच अर्थहीन मूर्खपणाची बडबड करू नये. थोडक्यात सामाजिक कलह वाढेल असे वर्तन करू नये.

४. **सम्यक कर्म :**

प्रत्येक व्यक्तीने सत्कर्म करावे कारण शीलवान, चारित्र्यवान व्यक्ती बनवण्यासाठी कर्म फळाचा त्याग करावा, शरीर, मन, वाणी याद्वारे व्यक्तीने शुभकार्येच करावीत. इतरांना त्रास होईल, क्लेश होईल असे कोणतेही कर्म व्यक्तीने करू नये. चोरी, व्याभिचार, दुराचार, हिंसा, यापासून दूर असावे. व्यक्तीने शुध्द कर्म करावे. त्यामुळे आपोआपच व्यक्तीहित व समाजहित साधले जाते. सत्कर्म हे व्यक्तीस सदैव समाजभिमुख वर्तनाचीच प्रेरणा देणारे आहे. योग्य वर्तनाची शिकवण सम्यक कर्माद्वारे मिळते. मानवी जीवन व समाजजीवन यांच्याशी सुसंगत असेच वर्तन म्हणजे सम्यक कर्म होय.

**५. सम्यक आजीविका :**

शरीराचे अस्तित्व टिकून राहण्यासाठी चरितार्थ चालविणे तर आवश्यक आहे पण आत्यंतिक हव्यासामुळे व्यक्ती व समाजाचा विनाश होतो. हे मर्म गौतम बुध्दांनी जाणले होते. म्हणूनच त्यांनी योग्य मार्गाने चरितार्थ चालविणे म्हणजेच सम्यक आजीविका हा मार्ग सांगितला. आपल्या मार्गाने इतरांवर अन्याय होणार नाही. इतरांस इजा पोहचणार नाही याची दक्षता व्यक्तींनी घ्यावी. हे समाजाच्या हिताचेच असते. समाजमान्य व परहिताला बाधा न आणणाऱ्या मार्गाने निर्वाह चालविणे म्हणजेच सम्यक आजीविका होय. हीच उपजीविका 'न्यायपूर्ण उपजीविका' म्हणून ओळखली जाते.

**६. सम्यक व्यायाम :**

बौध्द तत्त्वज्ञान हेच मुळात प्रयत्नवादी व व्यवहारवादी आहे. व्यक्तीने प्रयत्नवादी असावे. पण हे प्रयत्न यथार्थ असावेत हेच सांगण्याचा प्रयत्न यामध्ये केलेला आहे. व्यक्तीची दृष्टी यथार्थ असावी, वास्तविक असावी, मनात वैरभाव असू नये. सर्वप्रथम व्यक्तीने या दुःखमय जीवनातून सुटका करून घेण्यासाठी आपल्यामध्ये असणारे दुगुर्ण घालवून दिले पाहिजेत. तसेच आपल्यामध्ये सद्गुण संपादन करावेत व्यक्तीने आपल्यातील घालविलेले दुर्गुण पुन्हा आपल्यात येवू न देण्याचा प्रयत्न करणे, नव्या सद्गुणांची जोपासना करणे आवश्यक आहे. अशाप्रकारे मनातील दृष्ट वासनांचे दमन करून चांगले विचार व सद्गुण यांची जोपासना करावी. वाईट, अशुभ विचार यांना आसरा न देता शुभ विचारांची प्रेरित होऊन मानसिक, नैतिक आध्यात्मिक उन्नतीसाठी प्रयत्नशील असणे म्हणजे सम्यक होय.

**७. सम्यक स्मृती :**

मानवी मन हे स्वैर वैर भरकटणारे असते. आपल्या अंरतरंगात दडून बसलेल्या दृष्ट कामना उफाळून येत असतात. ही मनाची अस्थिरता गौतम बुध्दांनी जाणली होती अशा प्रसंगी आपले चित्त, स्थिर ठेवून मनाची थोडीही चलबिचल न होऊ देता मनाचा समतोल कायम ठेवणे म्हणजेच सम्यक स्मुर्ती होय. व्यक्तीने अंतर्मुख व्हावे व आपले सुख-दुख, वेदना, रागद्वेष, आसक्ती या मनोविकारांवर चिंतन करावे. त्यापासून अलिप्त राहण्याचा सतत प्रयत्न करावा. 'मी' च्या ऐवजी सकळ कल्याणाचा विचार ठेवून मानवाने सदैव चांगल्याच बाबींचे स्मरण करावे कृतीही तशीच करावी. हीच निर्वाण पदाची सातवी पायरी होय.

**८. सम्यक समाधी :**

व्यक्तीने प्रयत्नाने यथार्थ दृष्टीप्राप्त करावी. त्यामुळे यथार्थ निश्चय, यथार्थ वाणी, यथार्थ कर्म व्यक्तीच्या हातून घडते. तसेच योग्य मार्गाने उपजीविका चालवावी, सदर विचारांचे प्रयत्न अंगीकारावेत, योग्य ते चिंतन व योग्य त्या गोष्टींचेच स्मरण करावे. या नंतरची पायरी म्हणजे इंद्रियांवर पूर्णत: ताबा ठेवून ध्यानस्थ व्हावे. चित्ताची एकाग्रता साधूनच व्यक्ती पूर्णतया शुध्द व पवित्र होऊ शकते हीच सम्यक समाधी होय.

ध्यान मार्गामुळेच व्यक्ती आपल्या सर्व विकारांवर, तृष्णेवर, विजय मिळवितो. व्यक्तीच्या विचाराला एक प्रकारची परिपक्वता येते. जीवनातील सुख, दु:खात ती समतोल वागते सुख-दु:खाच्या भावनेच्या पलीकडे व्यक्ती जाते. यामुळेच व्यक्ती निर्वाणपदास पात्र ठरते.

अशा प्रकारे बौध्द धर्मातील हे अष्टांग मार्ग गौतम बुध्दांनी सांगितले आहेत.

**ड) बौध्द धर्मग्रंथ : त्रिपिटक :**

'त्रिपिटक' हा पालीभाषेतील बौध्द धर्माचा प्रमाणग्रंथ आहे. गौतम बुध्दांच्या निर्वाणानंतर त्यांच्या उपदेशाविषयी मोठी मतभिन्नता निर्माण झाली. त्यामुळे बुध्दांचा मूळ उपदेश वा शिकवण नेमकी काय होती हे ठरवण्यासाठी एक परिषद आयोजित केली या परिषदेत बुध्दांच्या उपदेशाचे जे स्मरणात्मक ज्ञान त्यांच्या निकटवर्ती शिष्यांकडून उपलब्ध झाले ते ज्ञान तीन भागामध्ये विभागले या तीन भागांनाच त्रिपिटक असे म्हणतात. पिटक म्हणजे पेटी वा पेटारा होय यावरून तीन पेटाऱ्यात भरून ठेवलेले बुध्दांचे विचार म्हणजेच त्रिपिटक असा अर्थ होतो.

**१) सुतपिटक :** यामध्ये बुध्दांची शिकवण प्रवचने, नीतीनियम, समाविष्ट असून ती कथा रूपात म्हणजेच जातककथा आहेत. सुत्तपिटकाचे दीघनिकाय, मज्झीमनिकाय, संयुक्तनिकाय, अंगत्तनिकाय, व खुद्दनिकाय हे पाच विभाग असून या प्रत्येक विभागाचे काही उपविभाग आहेत.

**२) विनयपिटक :** यामध्ये बौध्द भिखुंच्या आचरणाचे नियम, त्यांची दिनचर्या, भिक्खू-संघाविषयीचे नियम, संघाचा इतिहास इत्यादी अंतभूर्त आहे. याचेही पाच विभाग आहेत.

**३) अभिधम्मपिटक :** याची सात प्रकरणे असून त्यामध्ये प्रामुख्याने तात्विक बाबींची चर्चा आहे.

**इ) बौध्द धर्मातील पंथ :** (हीनयान व महायान )

गौतम बुध्दांच्या मृत्युनंतर त्यांची शिकवण नेमकी काय आहे. याविषयी त्यांच्या अनुयायांमध्ये मतभिन्नता निर्माण झाली. त्यामुळे बुध्दांची शिकवण निश्चित करण्यासाठी एक 'संगीती' म्हणजे परिषद भरविली. या परिषदेत एका गटाने बुध्दांच्या शिकवणीचा अर्थ शब्दश: व मूळ स्वरूपात घेतला. या गटास 'थेरवादी किंवा स्थविरवादी' म्हटले गेले. थेरवादातून पुढे 'हीनयान' नावाचा पंथ उदयास आला. या उलट दुसऱ्या गटाने बुध्दांची शिकवण अधिक व्यापक अर्थात स्वीकारली व त्यामध्ये वेगवेगळ्या लोकसमुहांच्या

आचार विचारांचा अंतर्भाव केला त्यामुळे बौध्द विचारांचे सामाजिक अधिष्ठान खूपच व्यापक झाले. या गटास 'महासंधिक' म्हटले गेले. या महासंधिकातूनच पुढे 'महायान' हा पंथ उदयास आला. या दोन पंथातील फरक पुढीलप्रमाणे पहाता येतील.

**५. निवार्ण प्राप्ती :**

नैतिक आचरण व ध्यान धारणेद्वारे प्रत्येक व्यक्तीने केवळ स्वयंप्रयत्नाने निर्वाण मिळवावे. हे हीनयान पंथाने परमसाध्य मानले. सर्व गोष्टी नाशवंत असल्याने स्वत:च्या निर्वाणासाठी प्राप्ती व्हावी यासाठी प्रत्येक व्यक्तीने प्रयत्न करावेत असे महयान पंथाने ध्येय मानले. बुध्दांनी जसे सर्वांच्या निर्वाण प्राप्तीसाठी प्रयत्न केले. तसेच प्रयत्न प्रत्येकाने करावेत असे महायान पंथ सांगतो. 'यान म्हणजे वाहन होय' असंख्य लोकांना निर्वाणापर्यंत वाहून नेण्यास आमचा पंथ समर्थ आहे. याउलट केवळ स्वत:स निर्वाणपदापर्यंत वाहून नेण्याचे संकुचित ध्येय बाळगणारा हीनयान पंथ लहान व कनिष्ठ दर्जाचा आहे. अशाप्रकारे अर्थ सूचित होतो. हीन म्हणजे तुच्छ असा अर्थ होत असल्याने हीनयान पंथाने स्वत:साठी 'श्रावकयान' हे नाव स्वीकारलेले आढळते.

**२. ईश्वराचे अस्तित्व :**

गौतम बुध्दांनी ईश्वराचे अस्तित्व नाकारल्याने हीनयान पंथ हा निरिश्वरवादास चिकटून राहिला आहे. याउलट महायान पंथात हळूहळू बुध्दालाच ईश्वर मानण्यात आले. त्यामुळे पूजा-अर्चा व प्रार्थना इत्यादी कर्मकांडास महायान पंथाने प्रोत्साहन दिले. बुध्दांची पूजाअर्चा केल्याने गौतम बुध्दांची कृपा होईल असे महायान पंथ मानतो.

**१. बाह्य पदार्थांचे स्वरूप :**

विश्वातील बाह्य पदार्थ हे 'क्षणिक' आहेत असे हीनयान पंथ मानतो. याउलट बाह्य पदार्थ हे 'शून्य' आहेत. म्हणजे ते 'तथता' आहेत. असे महायान पंथ मानतो. तथा म्हणजे जसे आहे तसे. बाह्य पदार्थ हे नाम, रूप, जाती व क्रिया इत्यादी विकार व उपाधी नसलेले आहेत. असे महायान पंथ मानतो. म्हणजेच हा पंथ बाह्य पदार्थांना वास्तव मानतो.

**३. संप्रदाय :**

'वैभाषिक व 'सौत्रांतिक' हे दोन 'सर्वास्तिवादी' म्हणजे जड पदार्थाचे ज्ञानक्रीयनिरपेक्ष अस्तित्व मानणारे संप्रदाय हीनयान पंथातून उदयास आले. वैभाषिक संप्रदायाच्या मते, बाह्य पदार्थ क्षणिक आहेत. व त्यांचे आपणास प्रत्यक्ष ज्ञान होते. सौत्रांतिक संप्रदायाच्या मते, बाह्य पदार्थांचे ज्ञान आपणास प्रत्यक्षपणे नव्हे तर अप्रत्यक्षपणे म्हणजे तर्क केल्याने होते. याउलट महायान पंथातून 'माध्यमिक' व योगाचार' हे दोन चीद्वादी म्हणजे जड पदार्थांचे अस्तित्व नाकारणारे संप्रदाय उदयास आले. माध्यमिक संप्रदायाच्या मते जगात काहीही अस्तित्वात नसते तर केवळ विज्ञान म्हणजे Ideas अस्तित्वात असतात. या Ideas

स्वंयप्रकाशित आहेत. म्हणजेच त्यांच्या अस्तित्वाची ग्वाही त्या स्वत:च देतात. म्हणजेच ज्ञात्याशिवाय ज्ञान अस्तित्वात असू शकते.

**४. प्रसार :**

हीनयान पंथ आचरणात आणण्यात अधिक कठीण असल्याने त्याचा प्रसार खूपच कमी झाला. श्रीलंका, म्यानमार, थायलंड व कंबोडीया इत्यादी लहान देशांमध्येच हीनयान पंथ आढळतो. याउलट महायान पंथ आचरणात आणण्यास बराचसा सोपा असल्याने व स्थानिक समूहांच्या धार्मिक समजुतींचा या पंथात समावेश होऊ शकत असल्याने त्यांचा प्रसार मोठ्या प्रमाणावर झाला. हा पंथ भारताबाहेर चीन, जपान, कोरिया, मंगोलिया व तिबेट इत्यादी देशात पसरला.

**ई) बौध्द धर्माचा भारतीय समाजावरील प्रभाव :**

**१. सामाजिक जीवनावरील प्रभाव :**

बौध्द धर्माने वर्णभेद, जातीभेद व लिंगभेद नाकारून त्याजागी समता, स्वांतत्र्य व बंधुभाव इत्यादी मुल्यांवर आधारलेली सामाजिक समतेची समाजव्यवस्था स्वीकारली. त्यामुळे शुद्राप्रमाणेच अनेक उच्चवर्णीयांनीही बौध्द धर्म स्वीकारला. त्यामुळे समाजामध्ये वर्णव्यवस्थेने निर्माण केलेली सामाजिक विषमता कमी होण्यास मदत झाली. बुध्दांनी व्यक्तीचा सामाजिक दर्जा जन्मावरून न ठरविता तिच्या गुणकर्तुत्वाने ठरविला जावा असे प्रतिपादन केले. त्यामुळे शुद्रांना स्वकर्तुत्वाने आपला दर्जा उंचावण्याची संधी बौध्द धर्मामध्ये प्राप्त झाली. यातूनच उर्ध्वगामी गतिशीलतेस चालना मिळाली. स्त्रियांवर वैदिक काळात लिंगभेद निर्माण होऊन अनेक अनिष्ट निर्बंध लादले होते. त्यामुळे स्त्री जीवन अत्यंत दु:खी बनले होते. बौध्द धर्माने लिंगभेद नाकारून स्त्रियांना पुरूषांप्रमाणेच विविध अधिकार दिले. बौध्द संघात स्त्रियांना प्रवेश देण्यात आला. पुरूषाप्रमाणेच स्त्रियांनाही निर्वाणप्राप्तीसाठी पात्र ठरविण्यात आले. त्यामुळे स्त्री जीवनात सुधारणा होण्यास चालना मिळाली. नीतीमुल्यांचा म्हणजेच पंचशीलाचा पुरस्कार करून लोकांना नैतिक व चारित्र्य संपन्न जीवन जगण्याची शिकवण दिली. त्यामुळे समाजामध्ये नैतिक व्यवस्था निर्माण होण्यास मदत झाली.

**२. सांस्कृतिक जीवनावरील प्रभाव :**

बौध्द धर्मातील धर्मग्रंथ हे पाली भाषेत लिहलेले असल्यामुळे या भाषेचा विकास घडून आला. तसेच बौध्द धर्माचा प्रसार जेथे जेथे झाला तेथील भाषेत बौध्द धर्म व तत्त्वज्ञानावरील विपुल ग्रंथ लिहिले गेले. पाली, संस्कृत, मगधी, चीनी व तिबेटी इत्यादी भाषांमध्ये बौध्द विद्वानांनी ग्रंथरचना केली. त्यामुळे बौध्द धर्मात साहित्य निर्मितीस मोठी चालना मिळाली. बौध्द काळामध्ये देशभर विहार, मठ, स्तंभ, स्तूप, लेण्या व बुध्दाची मूर्ती इत्यादींची उभारणी केली गेली. त्यामुळे वास्तुकला, शिल्पकला, चित्रकला व नक्षीकाम इत्यादींचा मोठ्या प्रमाणात विकास घडून आलेला दिसून येतो. अजंठा लेण्यातील भिंतीवरील बुध्दांच्या जीवनावरील प्रसंग दर्शविणारी चित्रे व त्यांचा रंग आजही शाबूत असलेला दिसून येतो.

### ३. शैक्षणिक जीवनावरील प्रभाव:

बुध्दांनी संघ, विहार, माठ इत्यादींच्या माध्यमातून सामान्यांना शिक्षण देण्याचा उपदेश केला. त्यानुसार असंख्य बौध्द भिख्खूंनी व विद्वानांनी शिक्षणप्रसारास वाहून घेतले. बौध्द काळात नालंदा, वल्लभी, तक्षशीला, महाबोधि व विक्रमशिला इत्यादी विद्यापीठे स्थापन झाली. त्यामध्ये नव्हे तर विदेशातूनही विद्यार्थी शिक्षण घेण्यासाठी आले. एक शिक्षणकेंद्र म्हणून भारतास जगात ख्याती प्राप्त झाली. ब्राम्हण धर्माने स्त्री व शूद्रांना शिक्षण राहिली होती. बौध्द धर्माने स्त्री व शुद्रांना तसेच सर्वांना शिक्षण घेण्याचा हक्क दिल्यामुळे शिक्षणाचे सार्वत्रिकरण घडून आले. परंतु बौध्द धर्माच्या ऱ्हासानंतर पुन्हा स्त्री शूद्रांना शिक्षण बंद झाले. बौध्द काळात अनेक धर्मपरिषदांचे आयोजन  करण्यात आले होते. या परिषदांत देशातील विद्वानांनी भाग घेऊन धर्म, नीती, तत्वज्ञान व सामाजिक जीवन इत्यादी विषयावर मुक्त वादविवाद केला त्यामुळे देशात बौध्दिक, वैचारिक प्रगती घडून येण्यास मदत झाली.

### ४. धार्मिक जीवनावरील प्रभाव :

वैदिक धर्माचे क्लिष्ट तत्वज्ञान, निरर्थक व खर्चिक कर्मकांड, यज्ञात होणारी प्रचंड हिंसा, पुरोहितांकडून होणारे शोषण आणि अंधश्रध्दा इत्यादीने त्रासलेल्या सामान्य जनतेने नैतिक शिकवण देणारा व आचरणास सोपा असलेला बौध्द धर्म स्वीकारल्याने वैदिक धर्ममार्तंडांनी आपल्या धर्मातील यज्ञाचे स्तोम, पशुबळी, मद्यपान, क्लिष्ट कर्मकांड व अंधश्रध्दा इत्यादी अनिष्ट प्रथांचे उच्चाटन करून वैदिक धर्मात सुधारणा करण्यास सुरुवात केली. बुध्दांनी बुध्दीला पटणारे वेदप्रमाण्य नाकारून त्याऐवजी बुध्दीप्रामाण्याचा स्वीकार केला त्यामुळे वैदिक, धर्मातील बहुदेवतावाद, आत्म्याचे अमरत्व, दैववादी वृत्ती, अंधश्रध्दा व देवभोळ्या समजुती इत्यादींचा प्रभाव कमी झाला व समजत बुध्दीप्रामाण्यवादी विचारसरणीचा प्रसार होण्यास चालना मिळाली.

### ५. राजकीय जीवनावरील प्रभाव :

बौध्दधर्माच्या नैतिक, अहिंसावादी, मानवतावादी, तत्वज्ञानाने प्रभावित होऊन अनेक राजांनी म्हणजेच बिंबिसार, अजातशत्रू, वत्सराज, उदयन, अशोक, मिलिंद, कनिष्क व हर्षवर्धन इत्यादींनी बौध्द धर्म स्वीकारला व त्याचा प्रसार केला. विशेषत: अशोक व हर्षवर्धन यांनी राजकीय सत्ता सामान्य जनतेच्या कल्याणासाठी राबविली त्यांनी धर्माधिष्ठीत असा राज्यकारभार केला त्यामुळे धर्म व राज्य या दोन संस्थामध्ये घनिष्टता निर्माण झाली. बौध्दपूर्व काळात सर्वत्र राजेशाही होती. राज्यविस्तारासाठी राजे सतत युध्द करीत, सततच्या युध्दामुळे समाजात हिंसा, क्रौर्य, अशांतता निर्माण होई. बौध्द धर्माने अहिंसा, शांतता, मानवता या मुल्यांचा पुरस्कार करून युध्दाचा निषेद केला. त्यामुळे राजांनी युध्दाचा त्याग करून शांततेने राज्यकारभार करण्यावर भर दिला. सम्राट अशोकाचे उदाहरण यासंदर्भात अत्यंत बोलके आहे. थोडक्यात, बौध्द धर्मामुळे शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित होण्यास मदत झाली. बौध्द धर्म भारताबाहेर अनेक देशामध्ये झपाट्याने पसरला या धर्माचा प्रसार सम्राट अशोकाचा पुत्र महेंद्रच्या नेतृत्वाखाली चीन, जपान, कोरिया, इत्यादी देशात करण्यात आला. तर कन्या संघमित्रा हिच्या नेतृत्वाखाली म्यानमार, थायलंड, मलेशिया, कंबोडिया इत्यादी

देशात झाला. तसेच अनेक परकीय विद्वान हु-एन-त्संग, फहिन, इत्सिंग इत्यादी बौध्द धर्माच्या अभ्यासासाठी भारतात आले. अशाप्रकारे बौध्द धर्मामुळे भारताचे अनेक देशांशी धार्मिक-सांस्कृतिक संबंध निर्माण झालेले दिसून येतात.

बौध्द धर्माचे अहिंसक, सहिष्णू, समतावादी, मानवतावादी, तत्वज्ञानाचा प्रभाव आधुनिक भारतीय विचारवंतावरही पडला. त्यामध्ये महात्मा गांधीनी स्वांतंत्र्यप्राप्तीसाठी बुध्दाचा सत्याचा, अहिंसेचा व शांततेचा मार्ग निवडला. पंडित जवाहरलाल नेहरूंनी आंतरराष्ट्रीय शांततेसाठी बुध्दांच्या पंचशील तत्त्वांचा पुरस्कार केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी समताधिष्ठित समाजरचना, प्रस्थापित करण्यासाठी बौध्द धर्माचा स्वीकार केला. आजही जगातील असंख्य विचारवंत जगाला युध्द नको, बुध्द हवा, असे प्रतिपादन करताना दिसतात. जर्मन समाजशास्त्रज्ञ मैक्स वेबरने बौध्द धर्मास विचारवंतांचा धर्म असे म्हंटले आहे. बौध्द धर्मांनी जगातील विचारवंतांना सर्वाधिक प्रभावित केलेले आहे स्वतंत्र भारताच्या राष्ट्रध्वजावर म्हणजेच तिरंग्यावर अशोक चक्रास स्थान मिळाले आहे. तसेच सारनाथ येथील चार सिहांची प्रतिमा ही देशाची राजमुद्रा बनली आहे. हा बौध्द धर्माच्या तत्त्वांचा प्रभाव म्हणावा लागेल.

**ख्रिस्ती धर्म :**

येशू ख्रिस्त यांच्या शिकवणीतून उदयास आलेल्या व त्यांच्याच नावाने ओळखल्या जाणाऱ्या ख्रिस्ती धर्माचे जगात २०१८ मध्ये सुमारे २३० कोटी अनुयायी होते. अनुयायांच्या दृष्टीने हा धर्म जगात सर्वात मोठा असलेला दिसून येतो. भारतामध्ये २०११ च्या जनगणनेनुसार ख्रिस्ती अनुयायांची संख्या सुमारे २.७८ कोटी होती. तर महाराष्ट्रामध्ये १०.८० लाख इतकी संख्या होती. ख्रिस्ती समुदाय हा भारतात इस्लामच्या खालोखाल दुसऱ्या क्रमांकाचा अल्पसंख्याक समुदाय आहे. भारतामध्ये ख्रिस्ती अनुयायी हे देशभर विखुरलेले आहेत. ईशान्य भारतातील अनेक आदिवासींनी ख्रिस्ती धर्म स्वीकारल्याने नागालँड, मिझोरम, मेघालय, मणिपूर, अरूणाचल प्रदेश, या राज्यांमध्ये ख्रिस्ती अनुयायांची संख्या लक्षणीय प्रमाणात आहे. त्यानंतर गोवा, केरळ, तामिळनाडू व सिक्कीम या राज्यांमध्ये ख्रिस्ती धर्माचे अनुयायी आहेत. तसेच उर्वरित राज्यामध्ये त्यांचे प्रमाण अत्यल्प आहे.

**ट) ख्रिस्ती धर्माचा उदय :**

पॅलेस्टाईन मधील जेरूसलेम जवळील 'बेथेलहेम' या गावी कुमारी मेरीच्या ओटीतून जन्मलेल्या येशूवर बालपणी ज्यू म्हणजेच यहुदी धर्माचे संस्कार झाले. तथापि, या धर्मातील अनिष्ट प्रथांविषयी धर्ममार्तंडांना प्रश्न विचारून येशूने त्यांना सतावून सोडल्याने ते येशूचे विरोधक बनले. आपला लौकिक पिता असलेल्या येशूची भेट यहुन्ना नामक 'ज्यू' साधुशी झाली. या साधुनी येशूला प्रेम, दया, क्षमा, शांती, अहिंसा व शुध्द चारित्र्य इत्यादी मुल्यांचा उपदेश केला. या उपदेशाने प्रभावित झालेल्या येशूने या साधकाकडून आध्यात्मिक, धार्मिक व नैतिक जीवनाची दिक्षा घेतली. त्यानंतर ४० दिवस एकांतात कठोर साधना केली. त्यातून येशूला दिव्य साक्षात्कार झाला. या विश्वात एकच एक ईश्वर असून सर्वजण त्याची लेकरे आहेत. त्यामुळे सर्व मानव समान आहेत. म्हणून त्यांनी परस्परांशी बंधुत्वाने व प्रेमाने वागले पाहिजे असे त्यांचे मत बनले.

आपण ईश्वराचे लाडके पुत्र असून पापी लोकांना तारण्यासाठी व अखिल मानवजातीचे कल्याण करण्यासाठी भूतलावर अवतरलो आहोत. अशी त्यांची धारणा झाली. येशूनी नैतिकतेवर आधारलेल्या साध्या व सोप्या धार्मिक जीवनाचा पुरस्कार केला. ते गावोगाव फिरून लोकांना आपल्या विचारांचा उपदेश करू लागले त्यांची सात्विक वाणी, शुध्द चारित्र्य व नैतिक उपदेश याचा प्रभाव पडून लोक त्यांच्याकडे आकर्षित होऊ लागले. व त्यांनी धार्मिक क्षेत्रात शिरलेल्या अनिष्ट प्रथांचा त्याग करणे सुरू केले. या प्रथेमुळे ज्यांचा आर्थिक फायदा होत होता ते श्रीमंत लोक मात्र येशूचे विरोधक बनले. सामान्य लोकांना येशू हा जुलमी रोमन सत्ता उलथवून टाकील असे वाटू लागले. पण येशुंनी या गोष्टीस नकार दिला. त्यामुळे अनेक सामान्य लोकही येशुचे विरोधक बनले. त्यामुळे विरोधकांनी येशूला धर्मद्रोही ठरवून त्यांना सुळावर म्हणजेच कुसावर चढविले. मृत्युसमयी येशूनी आपल्या मारेकऱ्यांना माफ करावे अशी ईश्वरावकडे प्रार्थना केली. या बलिदानामुळे त्यांच्या शिकवणीचा म्हणजे ख्रिस्ती धर्माचा प्रसार होण्यास जोरदार चालना मिळाली. येशूच्या अनुयायांनी अत्यंत तळमळीने व सेवाभावी वृत्तीने या धर्माचा जगभर प्रसार केला व त्यांचे प्रसाराचे कार्य आजही चालूच आहे.

**ब) ख्रिस्त संकल्पनेचा अर्थ :**

ख्रिस्त ही संज्ञा एक नाव (Name) व (Title) या दोन्ही अर्थाने वापरली जाते. Christ हा इंग्रजी शब्द ग्रीक भाषेतील Chrio या क्रियापदापासून बनलेला आहे. Chrio म्हणजे अभिषेक करणे असा अर्थ आहे. Chrio या क्रियापदापासून Christos पासून इंग्रजी भाषेत Christ हा शब्द तयार झाला. Christ म्हणजे ‘ज्याचा अभिषेक झालेला आहे तो’ असा अर्थ आहे. यावरून ख्रिस्त म्हणजे अभिषेक झालेला होय. ख्रिस्ती धर्मास श्रध्देनुसार येशू हे ख्रिस्त आहेत. कारण पवित्र आत्म्यांनी त्यांचा स्वर्गातून अभिषेक केलेला आहे. हिब्रू बायबलच्या ग्रीक भाषांतरात Christos हा शब्द मसिहा या हिब्रू बायबलमध्ये असे भाकीत केलेले आहे की, त्रस्त लोकांच्या उध्दारासाठी स्वर्गातून एक मसिहा येईल व तो सर्वांचा तारणहार असेल. येशूचे अनुयायी हे येशूस आपला मसिहा मानतात.

थॉमस ॲक्विनस यांच्या सुमाथिऑलॉजीका (१४८५) या ग्रंथात ख्रिस्त या एकवचनी शब्दाचे ईश्वरी अंश असलेल्या येशूचा केलेला अभिषेक आणि देहधारी मानवपुत्र असलेल्या येशूचा केलेला अभिषेक असे दोन अर्थ दिलेले आहेत. यावरून देवाचा लाडका पुत्र असणारा येशू हा देहधारी मानव रूपात ख्रिस्त म्हणजेच मसिहा झाला. अशा या ख्रिस्तावर श्रध्दा ठेवणाऱ्या लोकांचा धर्म म्हणजे ख्रिस्ती धर्म होय.

**क) ख्रिस्ती धर्मग्रंथ : बायबल :**

‘बायबल ज्यू व ख्रिस्ती या दोन्ही धर्मांचा पवित्र ग्रंथ आहे. 'Biblia' हा ग्रीक शब्द श्ठपइपसंश्या ग्रीक शब्दापासून बनलेला असून त्याचा अर्थ पुस्तके (Books) असा आहे. बायबलमध्ये जुना करार (Old Testament) व नवा करार (New Testament) असे दोन भाग आहेत. जुन्या करारात ३९ किंवा ४६ तर नव्या करारात २७ पुस्तके आहेत. त्यामुळे बायबल हे एकच पुस्तक नसून पुस्तकांचा संग्रह आहे. हे स्पष्ट होते. जुन्या कराराचे लेखन इ.स.पूर्व सुमारे १००० वर्षाच्या कालावधीत पूर्ण झाले तर नव्या कराराचे लेखन

इ.स. सुमारे २० ते ९६ या कालावधीत पूर्ण झालेल्या करारांचा वृत्तांत असल्याने ते ईश्वराचे प्रकटीकरण मानले जाते. म्हणून बायबल पवित्र ठरते. बायबल मधील पुस्तके ही वेगवेगळ्या लेखकांची वेगवेगळ्या वेळी लिहिली असली तरी त्या लेखनामागील प्रेरणा व स्फूर्ती ही ईश्वराचीच आहे अशी श्रध्दा आहे. ज्यू लोक हे केवळ जुन्या करारास तर ख्रिस्ती लोक हे दोन्ही करारास आपला पवित्र ग्रंथ मानतात. बायबल हे दैनंदिन, धार्मिक व नैतिक वर्तन कसे असावे याबाबतचा प्रमाणभूत ग्रंथ आहे. असे ज्यू व ख्रिस्ती लोक मानतात. बायबल हा जगातील सर्वात जास्त भाषांमध्ये अनुवादित झालेला एकमेव ग्रंथ आहे.

**ड) ख्रिस्ती धर्मातील श्रध्दा किंवा मुलतत्त्वे :**

**१. ट्रिनिटी सिध्दांत :**

ख्रिस्ती धर्म हा एकेश्वरवादी असून त्यातील ईश्वर ही संकल्पना विविध स्वरूपाची म्हणजे तीन अंगे असलेली अशी आहे. पित्याच्या रूपातील ईश्वर, ईश्वराचा लाडका पुत्र येशू व पवित्र आत्मा या तिन्ही श्रध्दा ठेवतो. या श्रध्देसच ट्रिनिटी सिध्दांत असे म्हणतात. ट्रिनिटी सिध्दांतानुसार ईश्वर एक आहे. तो सर्वांचा पिता असून सर्व मानव त्याची लेकरे आहेत. असा हा ईश्वर परिपूर्ण, सर्वशक्तिमान, सर्वव्यापी, सर्वज्ञ, प्रेमळ, दयाळू व न्यायी आहे. सृष्टीची निर्मिती त्यानेच केलेली असून सृष्टीचे पालन देखील तोच करतो. मनुष्य हा ईश्वराची पूजा, प्रार्थना, करून व इतरांची प्रेमपूर्वक सेवा करून ईश्वराला समजावून घेऊ शकतो. येशू ईश्वर व मानव होता. त्याला मानवाविषयी अपार करूणा व प्रेम होते. पापी जनांना तारण्यासाठी तो कुसांवर चढला. ख्रिस्ती धर्म हा पवित्र आत्म्यावर श्रध्दा ठेवतो. येशूने आपल्या अनुयायांना असे वचन दिले होते की, तो त्यांच्याबरोबर सतत राहील. या वचनाप्रमाणे येशूच्या मृत्युनंतर स्वर्गात गेल्यावर आपला आत्मा लोकांना मार्गदर्शन करण्यासाठी पृथ्वीवर पाठविला. हा पवित्र आत्माच मानवाची शक्ती आहे. तोच लोकांचे तारण करतो लोकांची दु:खे दूर करण्यासाठी कार्य करतो असे ख्रिस्ती धर्मामध्ये मानले जाते. ईश्वराची तीन रूपे वेगवेगळी नसून ती वेगवेगळी अंगे आहेत.

**२. प्रकटीकरण :**

ईश्वराने आपली शक्ती, कृती व कृपा ह्या द्वारे आपल्या इच्छा प्रकट केल्या आहेत. असे ख्रिस्ती लोक मानतात. बायबल हा ईश्वरी इच्छेच्या प्रकटीकरणाचा मुख्य स्त्रोत आहे. या ग्रंथातील ज्ञान हे स्वत: ईश्वराने प्रकट केलेले ज्ञान आहे. अशी एक ख्रिस्ती धर्मश्रध्दा आहे. ख्रिस्ती धर्माच्या दृष्टीने बायबल म्हणजे ईश्वरी वचन असल्याने तो एकमेव प्रमाणग्रंथ आहे.

**३. पुररूत्थान :**

येशूला कुसावर चढविल्याने त्याचा मृत्यू झाला. तथापि, मृत्युनंतर तिसऱ्या दिवशी येशू पुन्हा जिवंत झाले व त्यांनी आपल्या १२ शिष्यांना दर्शन दिले. अशी ख्रिस्ती अनुयायांची श्रध्दा आहे. या श्रध्देलाच पुनरूत्थान असे म्हणतात. सेंट पिटर ह्यास येशूने पुनरूत्थानानंतर पहिले दर्शन दिले. १२ शिष्यांपैकी सेंट थॉमस हा एक होता. पुनरूत्थानानंतर येशू ४०दिवस पृथ्वीवर राहिले व नंतर स्वर्गात गेले अशी श्रध्दा आहे.

**४. प्रेम :**

प्रेम ही ईश्वराची देणगी आहे. त्यामुळे ख्रिस्ती धर्मात प्रेमाच्या कल्पनेस मोठे महत्त्व आहे. आपण ईश्वरावर, शेजाऱ्यावर किंवा आपल्या सानिध्यात येणाऱ्या प्रत्येकावर व शत्रूवरही प्रेम करण्यास शिकतो. प्रेमामुळे आपला अहंकारी स्वभाव बदलतो. म्हणजेच अहंकार गळून पडतो. व समर्पणची वृत्ती निर्माण होते. प्रेमामुळेच आपण स्वत:करिता नव्हे तर इतरासांठी जगण्यास तयार होतो. 'मी सेवा करून घेण्यास नव्हे तर सेवा करण्यास आलो आहे' असे ख्रिस्ती वचन आहे. येशूने इतरांना तारण्यासाठीच आपल्या प्राणाचे बलिदान दिले. या बलिदानामुळेच जगाला प्रेम म्हणजे काय हे समजले. येशूने केलेल्या या प्रेमाहून अन्य कोणाचेही प्रेम महान नाही असे ख्रिस्ती लोक मानतात.

**५. पुर्वनियती :**

मानवी जीवनात जे घडते ते देखील ईश्वराच्या इच्छेनुसार घडते. काही मानवांना शाश्वत सुख लाभणार व काहींना शाश्वत दु:ख भोगावे लागणार असे अगोदरच ईश्वराने पूर्वनिर्धारित केलेले आहे. असे ख्रिस्ती धर्म मानतो. या मतास पूर्वनियती असे म्हणतात. सुखप्राप्तीसाठी कोणाची निवड करावयाची हे ईश्वराच्या कृपेवर अवलंबून आहे. ईश्वरी कृपा दोन मार्गांनी होऊ शकते. ईश्वर स्वत:च काही व्यक्तीवर कृपा करू शकतो. व काही व्यक्ती ईश्वरावर निष्ठा, श्रध्दा ठेवून त्याची भक्ती करून ईश्वराची कृपा मिळवू शकतात. तसेच ईश्वराची कृपा मिळवायची की, नाही हे व्यक्तीच्या इच्छेवर अवलंबून आहे. माझ्यावर श्रध्दा, निष्ठा ठेवा, माझी भक्ती करा, अशी सक्ती ईश्वर कोणावरही करीत नाही. थोडक्यात, जो कोणी ईश्वरावर श्रध्दा ठेवतो, त्यास ईश्वर शाश्वत सुखप्राप्तीसाठी निवडून घेतो असे ख्रिस्ती धर्मात मानले जाते. यालाच पुर्वनियती असे म्हणतात.

**६. पाप व मुक्ती :**

मानवाला ईश्वराने निर्माण केले हा मानव मुलत: पापी नव्हता मात्र, मानवाने आपल्या अंहकारी स्वभावामुळे एकदा ईश्वरी आज्ञेचा भंग केला. व पाप करणे हा त्याचा स्वभाव बनला. तथापि, मानव या पापापासून मुक्त होऊ शकतो. त्यासाठी त्याने आपला तारणहार असलेल्या येशूला पूर्णपणे शरण गेले पाहिजे. मानवाने निष्ठेने ईश्वरची उपासना केली पाहिजे. कारण येशूने सर्वांच्या पापाचे ओझे आपल्या शिरावर घेतलेले आहे. पापीजनांना तारण्यासाठी म्हणजे पापमुक्त करण्यसाठी येशूने पृथ्वीवर अवतार घेतलेला आहे. अशी ख्रिस्ती लोकांची पाप व मुक्ती बाबत श्रध्दा आहे.

**७. पश्चाताप :**

मानवाने आपल्या पापाची किंवा गुन्ह्याची ईश्वराजवळ अंत:करणपूर्वक कबुली देऊन असे पाप पुन्हा करणार नाही असे अभिवचन पापमुक्त होण्यासाठी ईश्वराजवळ केले पाहिजे असे ख्रिस्ती धर्म मानतो. यालाच पश्चाताप असे म्हणतात. पश्चाताप केल्याने ईश्वर पापी मानवास क्षमा करतो व मानव पापमुक्त होतो. व त्याचा स्वर्गात प्रवेश होतो. व त्याला शाश्वत आनंदाची अनुभूती येते. परंतु पश्चाताप न केल्यास

मानवाचा विनाश होतो. असे ख्रिस्ती धर्म मानतो केलेल्या पापाची कबुली देणे. पापाबद्दल ईश्वराची क्षमा मागणे व पुन्हा पाप न करण्याचे वचन ईश्वराला देणे या तीन गोष्टी पश्चातापात अभिप्रेत आहेत.

**८. समेट :**

मनुष्य व ईश्वर यांचा समेट घडवून आणण्याच्या उद्देशाने येशूने मानवी देह धारण केला. अशी या धर्माच्या अनुयायांची श्रध्दा आहे. यालाच समेट असे म्हणतात. असा समेट घडवून आणणे हेच येशूचे जीवनकार्य होते असे मानले जाते. मृत्यू पुनरूज्जीवन होऊन तो पवित्र होतो. ईश्वर मानवावर जे प्रेम करतो त्याबदल्यात मानवाने स्वत:च्या पापाबद्दल पश्चाताप करून येशुवरील दृढ श्रध्दा व्यक्त केली पाहिजे. ईश्वराच्या दृष्टीने ख्रिस्ती अनुयायी निष्पाप ठरला की ईश्वर व व्यक्ती यांचा समेट घडून येतो. अशी ही श्रध्दा आहे.

**९. ईश्वरी राज्य :**

ख्रिस्ती धर्म हा ईश्वरी राज्य या संकल्पनेवरही श्रध्दा ठेवतो. जे लोक येशूवर श्रध्दा ठेवतात त्या सर्वांचे मिळून ईश्वरी राज्य बनलेले आहे असे हा धर्म मानतो. ईश्वरी राज्याचे मूर्त रूप म्हणजे चर्च ही धर्म संघटना मानली जाते. तथापि, ईश्वरी राज्य हे चर्च पेक्षाही अधिक असे काहीतरी असलेले राज्य आहे. या राज्याने वास्तव्य आपल्या अंत:करणात आहे या राज्यात येशू हाच सेवक व येशू हाच राजा आहे असे मानले जाते.

**१०.** ख्रिस्ती व्यक्तीची इतर ख्रिस्ती व्यक्तीशी प्रस्थापित होणारी संगत वा सोबत म्हणजे सहभागीता होय. ख्रिस्ती अनुयायांसाठी अशी सहभागीता प्रस्थापित होणे. अत्यावश्यक मानले जाते. त्यासाठी लहानपणी वा प्रौढपणी व्यक्तीने बाफिस्मा घेणे आवश्यक ठरविलेले आहे. बाफिस्मा घेताना प्रौढास ख्रिस्ती धर्मश्रध्दा स्वीकाराव्या लागतात. ख्रिस्ती अनुयायांची परस्परांशी व त्या सर्वांची येशूशी होणारी सहभागिता महत्त्वाची मानली जाते. या सहभागीतेचा सर्वोच्च अविष्कार प्रभूभोजन या विधिच्यावेळी होतो.

**इ) भारतीय ख्रिस्ती समुदायातील जातीभेद :**

ख्रिस्ती धर्मामध्ये सर्व मानव ईश्वराची लेकरे असल्याने ते समान असून त्यांच्यात श्रेष्ठ-कनिष्ठ असे भेद करणे उचित नाही. परंतु भारतीय ख्रिस्ती समुदायात हिंदुच्या प्रभावामुळे जातीभेद निर्माण झालेला आढळतो. ख्रिस्ती धर्म स्वीकारलेले हिंदू हे आपापल्या जाती व जातीवर आधारलेल्या चालीरीती व सवयी घेऊन ख्रिस्ती समुदायात सहभागी झाले. त्यामुळे ख्रिस्ती समुदायातही जातीसदृश्य स्तररचना व श्रेष्ठ-कनिष्ठत्त्वाची भावना निर्माण झाली.

१. ख्रिस्ती धर्मगुरू व धर्मप्रसारक यांचा दर्जा श्रेष्ठ मानला जातो. मात्र धर्मांतरीत पाद्रींचा दर्जा कनिष्ठच राहिला.

२. ख्रिस्ती धर्म स्वीकारलेले उच्चवर्णीय हिंदू हे स्वत:चा उल्लेख ब्राम्हण-ख्रिस्ती, नायर-ख्रिस्ती असा करतात. व ख्रिस्ती बनलेल्या अस्पृश्य जाती व आदिम जमातींच्या लोकांपेक्षा स्वत:ला श्रेष्ठ मानतात.

३. ख्रिस्ती बनलेल्या उच्च जातींचे राहणीमान सुधारले मात्र अस्पृश्य जाती जमातींचे राहणीमान फारसे सुधारले नाही. त्यामुळे उच्च राहणीमान असणाऱ्यांचा वरचष्मा निर्माण झालेला आढळतो.

४. दक्षिण भारतात प्रारंभीच्या काळी कनिष्ठ जाती जमातींच्या ख्रिस्ती लोकांना ख्रिस्तींच्या मूळ व मुख्य वसाहतींत तसेच चर्चमध्येही वेगवेगळे ठेवले जाई. प्रार्थनेच्या वेळी धर्मगुरूस मदत करण्यास व धर्म वचने म्हणण्यास बंदी घातली जाई एवढेच नव्हे तर त्यांची बाप्तिस्मा व विवाह प्रसंगी त्यांच्यावर सर्वात शेवटी अनुग्रह केला जाई. त्यांची स्मशान भूमिही वेगळी असे. त्यांच्या लग्नाची वरात व प्रेतयात्रा यांना वसाहतीच्या मुख्य रस्त्यावरून नेण्यास बंदी होती. त्यांच्या मृत्युनंतर चर्चची घंटा वाजवली जात नसे. व त्यांच्या मृतासाठी प्रार्थना करण्यासाठी पाद्री त्यांच्या घरी येत नसे. आज या परिस्थितीत बराच फरक पडलेला आहे तरी श्रेष्ठ-कनिष्ठ भेद पूर्णत: संपलेला दिसत नाही. एंकदरीत ख्रिस्त धर्मप्रसारक म्हणजेच मिशनरी व चर्चमधील पदाधिकारी हे ख्रिस्ती बनलेल्या कनिष्ठ जाती जमातींना आजही कनिष्ठ लेखले जाते. त्यामुळे धर्मांतराचा हेतू सफल झाला नाही असे म्हणावे लागेल.

## ३.३.५ जैन धर्म :

जैन धर्म हा भारतातील एक प्रमुख व प्राचीन धर्म असून त्यांची परंपरा आजतागायत भारताच्या विविध भागात अव्याहतपणे चालू आहे. जैन हा भारतीय धर्म व संस्कृतीतील एक अतिशय महत्त्वाचा घटक मानला जातो. २०११ च्या जणगणनेनुसार जैन लोकसंख्या ४४.४५ लाख इतकी अल्प असल्याने जैन समुदाय अल्पसंख्यांक आहे. गुजरात, राजस्थान, मध्यप्रदेश, महाराष्ट्र व कर्नाटक या राज्यात जैन लोक अधिक असून इतर राज्यात ते अत्यल्प प्रमाणात आहेत. जैन लोकसंख्या खेड्यापेक्षा जास्त शहरात आहे. इ.स.पूर्वी ३००० वर्षे देखील जैन धर्माचे अस्तित्व होते. जैन धर्माचे प्रथम तीर्थंकार भगवान ऋषभदेव असून महावीर वर्धमान हे २४ वे अंतिम तीर्थंकार होते. त्यांनी जैन तत्त्वज्ञानाचे पुनरूज्जीवन केले व मोठ्या प्रमाणावर आपल्या धर्माचा प्रसारही केला.

''जैन'' हा शब्द ''जीन'' म्हणजे जिंकणारा म्हणजेच ''जेता'' शब्दा पासून बनला आहे. यावरून ज्या व्यक्तीने आपल्या इंद्रियविकारांना म्हणजेच काम, क्रोध, लोभ, मोह, माया व मत्सर इत्यादींना जिंकलेले आहे. तिला ''जिन'' म्हणतात. अशा या ''जिन'' पदावर पोहचलेल्या व्यक्तींच्या उपदेशाचे सार ज्या धर्मात आहेत. त्या धर्मास जैन धर्म असे म्हणातात.

### अ) जैन धर्मातील प्रमुख सिध्दांत

### १. ईश्वराविषयीचा सिध्दांत :

जैन धर्मानुसार सृष्टी ही अनु नावाच्या अजीव द्रव्यापासून निर्माण झाली आहे. त्यामुळे सृष्टीचा कर्ता वा निर्माता म्हणून ईश्वराचे अस्तित्व मान्य करण्याची गरज नाही. या मतानुसार जैन धर्म हा निरिश्वरवादी म्हणजे ईश्वर न मानणारा ठरतो. तथापि, जैन अनुयायी ध्यानधारणेसाठी व मोक्ष किंवा मुक्ती प्राप्तीसाठी अनेक देवदेवतांचे अस्तित्व मानून त्यांची पूजा अर्चा करतात. तसेच प्रत्येक जीवात ईश्वरी अंश असतो. व

जीव विविध विकारांपासून म्हणजेच राग, लोभ, मोह व माया इत्यादी मध्ये मुक्त झाला की त्यास देवत्व प्राप्त होते असेही जैन धर्मात मानले आहे. या मतानुसार हा धर्म ईश्वरवादी म्हणजे देव मानणारा ठरतो. जैन धर्मानुसार ईश्वर असला तरी तो सृष्टीचा निर्माता नाही असा ईश्वर विषयक सिध्दांत आहे.

**२. अहिंसावाद :**

धार्मिकदृष्ट्या अहिंसा हा जैन धर्माचा प्राण आहे हा धर्म अहिंसेस परम धर्म मानतो. अहिंसा म्हणजे कोणत्याही जीवाची हत्या करणे त्यास इजा करणे एवढाच अर्थ नाही तर सर्व जीवांवर प्रेम करणे त्यांना शारीरिक मानसिक व वाचीकदृष्ट्याही दुखवायचे नाही असा व्यापक अर्थ आहे. इतरही काही धर्म अहिंसेचा पुरस्कार करतात. मात्र जैन धर्म हा टोकाच्या अहिंसेचा पुरस्कार करतो. त्यामुळे अहिंसावाद हा त्याचा महत्त्वाचा सिध्दांत ठरतो.

**३. अनेकांतवाद:**

जैन तत्वज्ञान हे अनेकांतवादी आहे. अनेकांतवाद हा जीवनाकडे पाहण्याचा एक दृष्टीकोन आहे. या दृष्टीकोनानुसार कोणत्याही वस्तुस अंगे असतात. वस्तूच्या स्वरूपाचे ज्ञान मिळविताना आपण त्यापैकी एखादेच अंग विचारात घेतो त्यामुळे आपले ज्ञान एकांगी असते. आपण कितीही प्रयत्न केला तरी वस्तूच्या सर्व अंगांचे आपणास ज्ञान होऊ शकत नाही. कारण तिला अनंत अंगे असतात. म्हणून जैन तत्वज्ञान सांगते की, एखाद्या वस्तूचे एखादे अंग पाहून तिच्या स्वरूपाविषयी आपण ते मत बनवितो त्याहून वेगळी मते त्या वस्तूच्या स्वरूपाविषयी असू शकतात व त्या वेगळ्या मताचा आपण आदर केला पाहिजे. अशा या भिन्न मतास अनेकांतवाद असे म्हणतात. अनेकांतवादाचा जन्म हा अहिंसावादातूनच होतो. अहिंसा म्हणजे इतरांवर प्रेम करणे तसेच मन उदार करून इतरांची मते मान्य करणे होय. अनेकांतवादाची नयवाद व स्यादवाद अशी दोन रूपे आहेत. वस्तूचे ज्ञान वेगवेगळ्या नयनांनी होऊ शकते. म्हनुणच एक नय स्वीकारताना इतर नय (अंग) वगळावयाचे नाहीत हा जो विचार आहे त्यास नयवाद असे म्हणतात. याउलट एखाद्या वस्तूविषयी एखादे केलेले विधान हे एका विशिष्ट संदर्भात सत्य असते.

**४. सप्ततत्वसिध्दांत :**

आपल्या अनुभवास येणाऱ्या जेवढ्या वस्तू आहेत त्यांचे जीव, अजीव, आस्त्रव, बंध, संवर, निर्जरा, व मोक्ष असे सात वर्ग जैन दर्शनात पाडलेले आहेत. त्यांनाच सप्त तत्वे असे म्हणतात. त्यापैकी जीव व अजीव ही तत्वे मुलभूत व शाश्वत आहेत तर उरलेली पाक तत्वे ही जीव व अजीव या तत्वाचा संयोग व वियोग यावर आधारलेली आहेत. जीव व अजीव तत्वाचे विवेचन वास्तुमिमांसाच्या दृष्टीने तर उरलेल्या पाच तत्वाचे विवेचन धार्मिक आचरणाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहे.

**५. मोक्षमार्ग :**

मोक्ष हे ध्येय साध्य करण्याचा मार्ग म्हणून जैन दर्शनात रत्नत्रय सिध्दांत मांडलेला आहे. मोक्षमार्ग हा सम्यगदर्शन, सम्यगज्ञान व सम्यगचरित्र या तीन गोष्टींचा मिळून बनतो. तीर्थंकार सर्वज्ञ होते यावर व सप्ततत्व

सिध्दांतावर पूर्ण श्रध्दा ठेवणे म्हणजेच सम्यगदर्शन होय. जीव आणि अजीव यांच्या स्वरूपाचे सविशेष व निर्दोष ग्रहण करणे म्हणजे सम्यगज्ञान होय. संशय व विपर्यय हे ज्ञानाचे संभाव्य दोष असून ते सम्यगदर्शनाने नष्ट होतात. सम्यगचरित्र म्हणजे सद्वर्तन करणे होय. वरील तीन रत्नांची प्राप्ती होण्यासाठी सिध्द, आचार्य, उपाध्याय व साधू इत्यादींचे शुध्द चरित्र असणाऱ्या पुरूषाचे ध्यान करावे असे जैन धर्म सांगतो. त्यांच्या शुभ गुणावर व शुध्द चरित्र्यावर लक्ष केंद्रित केल्याने आपल्या अशुभ कर्माचा नाश होतो एवढेच. ध्यानाने ईश्वरी कृपा होते असे मात्र नाही. जैन धर्म मोक्षप्राप्तीसाठी सर्वस्वी स्वप्रयत्नावर भर देतो.

**ब. जैनधर्मातील धर्माचरण :**

**१. श्रवणपरंपरा :**

श्रवण परंपरावादी म्हणून जैन धर्म मानला जातो. देहाचे लाड न करता त्यास कष्ट देऊन कठोर तपश्चर्या करून व विरक्त जीवन जगून मोक्ष वा मुक्ती मिळवावी. यावर हा धर्म भर देतो. त्यामुळे जैनांची तीर्थस्थळे ही लोकवस्तीपासून दूर व डोंगरावर असलेली आढळतात.

**२. पाचव्रते :**

जैन धर्मात पाचव्रते म्हणजे आत्मशुध्दी करणे व चरित्र संवर्धन करणे यासाठी सांगितलेली आहेत. ती म्हणजे अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रम्हचर्य व अपरिग्रह ही पाच व्रते आहेत. अहिंसेचे पालन व्हावे म्हणून मुनींनी नाकावर कापडी पट्टी बांधावी ज्यामुळे हवेतील जंतूचीही हत्या नाकाद्वारे होऊ नये. तसेच श्रावकानी नेहमी सुकलेल्या वाटेवरूनच चालावे म्हणजे पायाखाली किडामुंगीही चिरडली जाणार नाही. ब्रम्हचर्याचे पालन करताना मुनींनी कामवासनेवर पूर्ण विजय मिळवावा. म्हणजेच व्यभिचार न करता एक पत्नीव्रत पाळणे होय. अपरिग्रह या वृत्ताचे पालन करताना मुनींनी भौतिक वस्तूंचा, वस्त्रांचाही, त्याग करावा म्हणजे नग्न रहावे तर श्रावकांनी गरजेपुरत्याच भौतिक वस्तू बाळगाव्यात, अधिक वस्तूचा मोह बाळगू नये अशी अपेक्षा केलेली आहे. वरील पाच व्रतांना मुनींच्या संदर्भात 'महाव्रते' तर श्रावकांच्या संदर्भात 'अनुव्रते' असे म्हंटलेले आहे. महाव्रतांचे कडक तर अनुव्रतांचे सौम्य स्वरूपात पालन व्हावे अशी अपेक्षा या धर्मामध्ये केली आहे.

**३. पूजा अर्चा :**

जैन धर्मात अनेक देवदेवतांचे अस्तित्व मानून त्यांची पूजाअर्चा वा उपासना केली जाते. तसेच ध्यानधारणाही केली जाते. २४ तीर्थंकर व त्यांचे शिष्य व पंचपर्मेष्ठी म्हणजेच साधू, उपाध्याय, आचार्य, अहर्त व सिध्द यांची पूजा केली जाते. या धर्मात उपासनेचे चार प्रकार आहेत. ते म्हणजे नागपूजा, स्थापनपूजा, द्रव्यपूजा व भावपूजा होय. हिंदूप्रमाणेच जैनांचीही मंदिरे असून त्यामध्ये प्रार्थना, पूजाअर्चा व इतर धर्मिक विधी केले जातात.

**४. ग्रंथपठन :**

जैन धर्म हा वेदग्रंथाना प्रमाण मानत नाही. या धर्माच्या प्रमाणग्रंथाना आगमग्रंथ हे अर्धमागधी भाषेत तर दिगंबर पंथाचे आगमग्रंथ हे 'शौरसेनी' भाषेत आहेत. काही आगमग्रंथ हे संस्कृत भाषेतही आहेत. आगमग्रंथाचे पठन करणे हे महत्त्वाचे मानले जाते.

**५. तीर्थयात्रा :**

तीर्थयात्रा करणे हे देखील एक धर्माचरण मानले जाते. दिगंबर पंथाची तीर्थस्थळे गजपंथ, मांगीतुंगी, कुंथलगिरी व बाहुबली (महाराष्ट्र), श्रवणबेळगोल (कर्नाटक), शिखरसम्मेद्जी (झारखंड) इत्यादी ठिकाणी आहेत. तर श्वेतांबर पंथाची तीर्थस्थळे माऊंट अबू (राजस्थान), संकेश्वर (कर्नाटक), पाली-ठाणा (महाराष्ट्र) इत्यादी ठिकाणी असलेली दिसून येतात.

**क) जैन धर्मातील पंथ :**

जैन धर्मात धार्मिक आचरणाबाबत मतभिन्नता होऊन वर्धमान महावीरांच्यापूर्वी जैन धर्मात स्थाविरकल्प म्हणजे वस्त्रे परिधान न करणारा असे दोन पंथ उदयास आले. महावीरांच्या पश्चात श्वेतांबर व दिगंबर हे पंथ उदयास आले ते पुढीलप्रमाणे-

१. श्वेतांबर पंथात शुभ्र पांढरे वस्त्र वापरण्यास मान्यता आहे. पार्श्वनाथ पांढरे वस्त्र वापरीत या पंथात मंदिरातील मूर्तीलाही काही वस्त्रे नेसवतात. याउलट दिगंबर पंथात निर्वस्त्र राहण्यास मान्यता आहे. महावीरांनी निर्वस्त्र राहण्यास मान्यता दिली. दिगंबराच्या मंदिरातील मूर्ती नग्न असतात. आज दिगंबरपंथीय साधू नग्न राहतात. तर श्वेतांबर साधू पांढरे वस्त्र वापरतात. दिगंबरांच्या मते वस्त्रधारी साधुस मुक्ती मिळू शकत नाही. याउलट श्वेतांबरांच्या मते नग्नता हे साधुत्वाचे श्रेष्ठ लक्षण असले तरी वस्त्रधारण केल्याने मुक्ती मिळविण्यात अडथळा येत नाही.

२. साक्षात महावीरांची वचने ग्रंथित आहेत. या श्रध्देने श्वेतांबर जे ग्रंथ मूळग्रंथ मानतात ते ग्रंथ दिगंबरांना मूलग्रंथ म्हणून मान्य नाहीत.

३. श्वेतांबरांच्या मते, स्त्री ही जपतप करून कर्मनाश करू शकते व मुक्ती मिळवू शकते. या उलट दिगंबरांच्या मते स्त्री जन्मास मुक्ती मिळू शकत नाही मात्र स्त्री तप करून केवळ सद्गती मिळवू शकते मुक्ती मात्र नाही.

४. श्वेतांबरांच्या मते, केवळ ज्ञान प्राप्त झालेल्या सांधूना अन्नग्रहण करण्याची गरज असतेच. अन्नग्रहणासाठी साधूंनी पात्राचा (भांड्याचा) वापर करण्यास व आपले भिक्षाअण्ण आपल्या वस्तीस्थानात आणून खाण्यास श्वेतांबरांची हरकत नाही. याउलट दिगंबरांच्या मते केवळ ज्ञान प्राप्त झालेल्या साधूंना अन्नग्रहण करण्याची गरज भासत नाही. मात्र इतर साधूंना अन्नग्रहणाची गरज भासते व त्यांनी अन्नग्रहणासाठी करपात्राचा (हाताचा) वापर करावा व उभ्यानेच अन्नग्रहण करावे.

५. श्वेतांबर पंथात १२ स्वर्ग व पृथ्वी, आप व वनस्पती हे तीनच स्थावर जीव मानले जातात. यालट दिगंबर पंथात १६ स्वर्ग व पृथ्वी, आप, तेज, वायू व वनस्पती हे पाच स्थावर जीव मानले जातात. दिंगबर 'काळ' हे स्वतंत्र द्रव्य मानतात.

६. श्वेतांबर पंथात पुजेरा किंवा मूर्तीपूजक किंवा मंदिरमार्गी, धुंडिया किंवा स्थानकवासी किंवा साधुमार्गी, तेरापंथी इत्यादी उपपंथ आहेत. याउलट दिगंबर पंथात तेरापंथी, वीसपंथी, तारणपंथी किंवा समयापंथी, तोतापंथी किंवा खनाजीपंथी इत्यादी उपपंथ आहेत.

या दोन्ही पंथातील वरील भेद हे वैचारिकदृष्ट्या महत्त्वाचे नाहीत. अनेकांतवाद, अहिंसावाद, रत्नत्रय सिध्दांत ईश्वराने सृष्टी निर्माण केली नाही तर पुद्‌गल या द्रव्यापासून सृष्टी निर्माण झाली. तीर्थंकर सर्वज्ञ होते इत्यादी तत्त्वांवर या दोन्ही पंथांची श्रध्दा आहे. म्हणजेच या पंथातील भेद केवळ आचरणाबाबतचे आहेत.

तसेच हे दोन पंथ सोडून इतरही आठ पंथ असून त्यांना 'जिन्हव' म्हंटले जाते. ते आठ पंथ म्हणजे १. बहुतरवाद, २. जीवप्रदेश कवाद, ३. अव्यक्तवाद, ४. समुच्छेदवाद, ५. द्विक्रियावाद, ६. त्रैराशिकवाद, ७. अबध्दवाद व बोरिकवाद हे होत.

**ड) जैन धर्मातील जातिव्यवस्था :**

जातिव्यवस्था व वर्णव्यवस्था यांना कडाडून विरोध सामाजिक समतेचा पुरस्कार करणाऱ्या जैन धर्मात दुर्दैवाने हिंदुंच्या संपर्कांने जातिव्यवस्था व जातीभेद निर्माण झालेला आहे. दिगंबर पंथात ८७ जाती तर श्वेतांबरांत ३८ जाती अशा एकूण १२५ जाती जैन धर्मामध्ये आढळतात. यापैकी कांही जाती म्हणजेच ओसवाल, पारवाडा, हुंबंडा व नरसिंगपूर नामा इत्यादी जाती ह्या दोन्ही पंथात आढळून येतात. यातील काही जाती व्यावसायिक स्वरूपाच्या हातकारा, कोष्टी, साली, गुरव व कासार इत्यादी आहेत. जैन धर्मातील या जातींमध्येही हिंदूप्रमाणेच उच्च नीचतेची भावना आढळते. मात्र ही भावना हिंदूइतकी आत्यंतिक टोकाची नसून कांहीशी सौम्य आहे. हिंदू धर्मात काही कनिष्ठ जातींना अस्पृश्य मानले जात नाही. तथापि हिंदूमधील अस्पृश्य जातींना जैन लोक उच्चवर्णीय हिंदूप्रमाणेच तुच्छ मानताना दिसतात. ग्रामीण भागात, जेथे व्यक्तीची जात माहीत पडते तेथे अस्पृश्यांना जैन मंदिरात प्रवेश नाकारला जातो. जैन समुदायात पंथभेद व जातीभेद तीव्र आहे. कारण प्रत्येक पंथाची व जातीची मंदिरे, तीर्थस्थाने, गुरूकुल, शाळा असून त्यामध्ये प्रवेश करण्यास इतर पंथाचे व जातीचे सदस्य नाखूष असल्याने दिसते. तसेच श्वेतांबर व दिगंबर परस्परांशी विवाह-संबंध जोडीत नाहीत. हीच स्थिती जैनांच्या जातीत व उपजातीत आढळते. आज अनेक शहरात श्वेतांबर व दिगंबर पंथाची वेगवेगळी वसतिगृहे असून त्यामध्ये केवळ आपल्याच विद्यार्थ्यांना प्रवेश दिला जातो. जैनातील प्रत्येक जात व उपजात ही केवळ आपापल्या उन्नतीचा प्रयत्न करताना दिसते. एकंदरीत पंथभेद व जातीभेद यामुळे भारतीय जैन समुदायात ऐक्यभावना आढळत नाही.

### इ) जैन समुदायाची स्थिती व स्थान :

#### १. उच्च दर्जा :

अल्पसंख्याक जैन समुदाय बहुसंख्यांक हिंदूंनी वेढलेला असल्याने त्यांच्यावर हिंदू जीवन पध्दतीचा मोठा प्रभाव पडलेला आहे. परंतु जैन समुदायाने आपले वेगवेगळे टिकवून ठेवलेले आहे. जैन हा एक धर्म असला तरी जैन समुदायाचा सामाजिक दर्जा व स्थान हे उच्च समजले जाते. उच्चवर्णीय हिंदू जैनांकडे समानतेने तर कनिष्ठ जातीचे हिंदू श्रेष्ठत्वाच्या भावनेने पाहतात.

#### २. विवाह व कुटुंबपध्दती :

जैन लोक अंतर्विवाही आहेत. म्हणजे ते पंथ, उपपंथ, जात व उपजात इत्यादींच्या आत राहून विवाह करतात. अलीकडे अल्प प्रमाणात आंतरधर्मीय व आंतरजातीय विवाह होताना दिसतात. जे बहुधा प्रेमविवाह असतात. विधवाविवाह आजही नापसंत केला जातो. ब्राम्हण पुरोहिताकडून विवाह मुहूर्त पाहणे व विवाह विधि करून घेतले जातात. हिंदूमधील संयुक्त कुटुंबाप्रमाणेच जैनांचीही संयुक्त कुटुंबे असून आज या कुटुंबाचे विघटन होत आहे व त्याजागी विभक्त कुटुंब स्थापण्याची प्रवृत्ती नवीन पिढीमध्ये वाढताना दिसते.

#### ३. संस्कृती :

भव्य व सुंदर मंदिरे व मूर्ती, उंच स्तूप व लेण्या इत्यादींची निर्मिती करून जैनांनी वास्तूकलेच्या विकासात भरीव योगदान दिले जाते. अर्धमागधी, शौरसेनी, संस्कृत, तामिळ व कन्नड इत्यादी भाषेत धर्मग्रंथ लिहून साहित्यात मोलाची भर टाकली आहे. जैनांनी हिंदुच्या देवदेवतांचा म्हणजेच गणपती, हनुमान, लक्ष्मी व सरस्वती इत्यादीची पूजाअर्चा केलेली दिसून येते. तसेच सत्यनारायण पूजाही ते करतात. यातूनच जैनांची सहिष्णुता दिसून येते.

#### ४. आर्थिक सुस्थिती :

जैन लोक हे वाणिज्यवृत्तीचे असल्याने ते व्यापार, उद्योग, पशुपालन व शेती व्यवसाय इत्यादीमध्ये अग्रेसर आहेत. त्यामुळे त्यांची आर्थिक स्थिती इतर अल्पसंख्यांकांच्या तुलनेत म्हणजेच मुस्लीम, ख्रिस्ती, बौध्द, अनुसूचित जाती व जमातीपेक्षा उत्तम आहे. गुजरात, राजस्थानमधील श्वेतांबर जैनांनी व्यापार उद्योगात तर महाराष्ट्र कर्नाटकातील दिगंबर जैनांनी शेती व पशुपालनात कर्तृत्व गाजवून देशाच्या आर्थिक विकासात मोलाचे योगदान दिलेले आहे. जैन समुदायात सुशिक्षितांचे प्रमाण सर्वाधिक असून या सुशिक्षितांनी व्यापार, उद्योग, शेती, बँकिंग, शिक्षण व प्रशासन इत्यादी क्षेत्रात प्रवेश करून आपली आर्थिक स्थिती भक्कम केलेली दिसते.

#### ५. राजकीय स्थान :

जैन लोक राजकीयदृष्ट्या संघटीत व सक्रीय नाहीत. संख्येने अत्यल्प असल्याने, देशभर विखुरलेले असल्याने, मुलत: अहिंसक व शांततामय असल्याने ते राजकारणात फारसे अग्रेसर नाहीत. आपला दबावगट

बनवून निवडणुकावर व शासकीय ध्येय धोरणावर प्रभाव टाकून आपले हितसंबंध साध्य करणे जैन लोकांना फारसे शक्य होत नाही. सामान्य जैन लोकांना निवडणुकीच्या राजकारणात रस नाही. अल्पसंख्याक असल्याने जाती धर्माच्या आधारे ते निवडणूक जिंकू शकत नाहीत. राजकारणात रस असणारे जैन नेते थोडेच असून ते विविध राजकीय पक्षांशी संधान बांधून सत्तास्थाने मिळविण्याचा प्रयत्न करतात. आज शासनाने जैन समुदायास अल्पसंख्यांक दर्जा देऊन त्यांच्या विकासासाठी अनेक सुविधा व सवलती दिलेल्या आहेत. त्यांचा लाभ घेऊन आपला विकास साधण्यासाठी अनेक जैन व्यक्ती व संघटना जागृत होऊन सक्रीय झाल्या आहेत.

### ३.३.६ शीख धर्म:

शीख धर्म हा भारतामध्ये उदयास आलेला धर्म आहे. जगामध्ये शीख अनुयायांची लोकसंख्या सुमारे २ कोटी ३० लाख एवढी असून भारतात ती २०११ च्या जनगणनेनुसार २ कोटी ८ लाख ३३ हजार इतकी आहे. शीख लोकांची जास्त लोकसंख्या पंजाब व हरियाणात आहे. तसेच महाराष्ट्र, दिल्ली, राजस्थान व उत्तरप्रदेश इत्यादी राज्यातील शहरांमध्ये त्यांचे वास्तव्य असलेले दिसून येते. शीख समुदाय हा प्रामुख्याने हिंदूमधील खत्री, जाट, अरोडा व डोग्रा इत्यादी जातींचा बनलेला आहे.

**शीख धर्माचा उदय :**

मध्ययुगीन भारतात वर्णभेद, जातीभेद, लिंगभेद, हिंदू-मुस्लीम संघर्ष, बहुदेवतावाद, कर्मकांडाचे स्तोम, रूढी परंपरांचा पगडा, अंधश्रध्दा, ब्राम्हणांचे वर्चस्व व दैववादी वृत्ती इत्यादी कारणामुळे सामान्य माणूस अत्यंत त्रस्त झालेला होता. प्रचलित धर्म म्हणजे हिंदू, इस्लाम, जैन व बौध्द हे धर्म सामान्य लोकांच्या समस्यांचे निराकरण करण्यास असमर्थ आहेत असे वाटल्याने चिंतनशील व मानवतावादी प्रवृत्ती असणारे गुरूनानक यांनी विविध धर्मातील चांगल्या तत्त्वांचा समन्वय साधून 'शीख' या नावाचा नवीन धर्म १५५४ मध्ये आपल्या जन्मगावी सुलतानपूर (पंजाब) येथे स्थापन केला. भजन-किर्तनाद्वारे त्यांनी आपल्या या नवीन धर्माची शिकवण लोकांना दिली. गुरूनानक यांनी मानव मुक्तीचा नवीन मार्ग शोधून काढला. या मार्गात त्यांनी मुक्ती व धार्मिक स्वांतत्र्य लोकांना मिळवून दिल्याने ते धर्म सुधारक म्हणून प्रसिध्द झालेत. त्यांना अनेक अनुयायी मिळाले. त्यांच्यानंतर आलेल्या नऊ गुरूंनी या धर्मात काही नवीन आचार विचारांची भर घालून हा धर्म वाढविला. या धर्मामध्ये दैनंदिन जीवनातील व्यवहार व धर्म यांची उत्तम सांगड घातलेली असल्याने सामान्य लोकांनी हा धर्म आवडीने स्वीकारला.

शीख म्हणजे 'शिष्य' असा अर्थ आहे. गुरूमुखी भाषेत शिष्याला 'शिख्ख' असे म्हणतात. शिष्य हा कोणत्या तरी गुरूचा शिष्य असतो. यावरून गुरूच्या शिकवणी प्रमाणे जो आचरण करतो. तो शीख होय. असा अर्थ होतो. शीख धर्मामध्ये गुरू-शिष्य परंपरेस खूप महत्त्व आहे. गुरूनानाक ते गुरू गोविंदसिंग असे १० गुरू व त्यांचे शिष्यगण म्हणजेच अनुयायी हे सर्वजण म्हणजे शीख असा अर्थ घेतला जातो.

**अ) शीख धर्मातील धर्मश्रध्दा :**

**१. एकेश्वरवाद :**

शीख धर्म हा एकेश्वरवादी आहे. ईश्वर हा एकच असून तो सृष्टीकर्ता, सृष्टीचा नियंता, सर्वव्यापी, निर्गुण, निराकार, दयाळू, न्यायी, प्रेम रूप आहे. मात्र ईश्वर हा अवतार घेत नाही. अशी या धर्माची श्रध्दा आहे. ईश्वरापासून जगाची उत्पत्ती होते व प्रलयाच्या वेळी हे जग ईश्वरातच विलिन होते असे हा धर्म मानतो.

**२. गुरूनिष्ठा :**

शीख धर्म हा गुरूनिष्ठा हे सर्वोच्च मूल्य मानतो. गुरू हे ज्ञान, विवेक व मोक्ष यांचे प्रतिक असून गुरू ईश्वरस्वरूप आहे अशी या धर्माची श्रध्दा आहे. 'वाहिगुरू' हा शब्द ब्रम्हवाचक मानला जातो. ईश्वराने सामान्य लोकांना मार्गदर्शन करण्यासाठी गुरूंना पृथ्वीवर देहधारी मानव म्हणून पाठविलेले असते. गुरूच्या अंगी दैवी शक्ती व ज्ञानाचा प्रकाश असतो. म्हणून गुरूवर निष्ठा ठेवून त्याच्या शिकवणीनुसार शिष्यांनी वागणे श्रेयस्कर ठरते असा या धर्माचा विश्वास आहे. गुरूनानक व इतर नऊ गुरूंनी ईश्वराला गुरू मानले. बाकीच्या शिष्यांनी या नऊ गुरूंना गुरू मानले. तसेच दहावे गुरू गोविंदसिंगांनी ही गुरू परंपरा स्थगित केली.

**३. माया :**

आपल्या अनुभवास येणारे विश्व हे ईश्वराची भौतिक अभिव्यक्ती असल्याने ते विश्व, त्यातील भौतिक साधने व शरीर इंद्रियाद्वारे मिळणारी सुखे या तीन गोष्टी माया (भासमान) आहेत. अशीही श्रध्दा शीख धर्मात आहे. तसेच मानव या गोष्टीना सत्य मानून भौतिक व इंद्रिय सुखाच्या प्राप्तीसाठी धडपड करीत राहतो. पण ही सुखप्राप्ती माया असल्याने ती आत्मिक सुख देत नाही. म्हणून मानवाने माया असलेल्या भ्रामक सुखाच्या मागे न धावता ईश्वराशी एक रूप होणे म्हणजे मोक्ष मिळविणे या सत्य व शाश्वत सुखाच्या प्राप्तीसाठी प्रयत्नशील रहावे असे शीख धर्म मानतो.

**४. पवित्र ग्रंथ :**

शिखांचे पाचवे गुरू अर्जुनदेव यांनी संकलित केलेला 'गुरूग्रंथसाहिब' हा शिखांचा पवित्र ग्रंथ आहे. गुरू गोविंदसिंगानंतर शीख लोक या ग्रंथासच आपला गुरू मानत आहेत. या ग्रंथात गुरू नानकांची शिकवण, प्रार्थना, धर्मविधी तसेच इतरही अनेक संतांची म्हणजेच जयदेव, नामदेव, विलोचन, परमानंद, कबीर, रविदास, मीराबाई, फरीद व सूरदास यांची काव्ये, अभंग, वचने व वाणी इत्यादी गोष्टी ग्रंथित केलेल्या आहेत. १४३० पानांच्या ग्रंथात सत्य, संतोष, सद्‌विचार व नाम या चार गोष्टी अंतर्भूत आहेत. त्यामुळे हा ग्रंथ केवळ एखादा देश, जात वा धर्म यांच्यापुरता मर्यादित नसून संपूर्ण मानवजातीसाठी आदर्श व मार्गदर्शक असा आहे. असे गुरू अर्जुनदेवांनी म्हंटले आहे. शीख लोक गुरूद्वारात याच ग्रथांची ईश्वर व गुरू म्हणून प्रतिष्ठापना करतात व त्याचे वाचन, मनन व चिंतन करीत राहतात.

**५. समता व मानवता :**

शीख हा समता व मानवता या मूल्यावर श्रध्दा ठेवतो. सर्व मानव एकाच ईश्वराची लेकरे असल्याने समान आहेत असे हा धर्म मानतो. त्यामुळे वर्णभेद, जातीभेद व लिंगभेद इत्यादीस या धर्मात स्थान नाही. वैदिक परंपरेतील वर्णव्यवस्था व जातीव्यवस्था यांना या शीख धर्माने कडाडून विरोध केला व सर्व वर्णांतील, जातीतील, धर्मातील व्यक्तींना, शीख धर्मात प्रवेश दिला सर्वांचा सामाजिक दर्जा समान मानला. या धर्माने स्त्री पुरूष समतेचा पुरस्कार केला. स्त्रियांना आदराचे स्थान दिले. पडदा पध्दती, हुंडाप्रथा व घटस्फोट इत्यादी अनिष्ट प्रथांना विरोध केला. स्त्रियांना समान हक्क व संधी दिली. धार्मिक विधीत म्हणजेच भजन - कीर्तन, पूजा-पठण व प्रवचन करणे इत्यादी मध्ये सहभागी होण्याचा हक्क स्त्रियांना दिला.

**६. कर्म व पुनर्जन्म सिध्दांत आणि मोक्ष :**

शीख धर्मामध्ये कर्मसिध्दांत, आत्म्याचे अस्तित्व, पुनर्जन्म व मोक्ष यावरही श्रध्दा ठेवतो. जीव हे 'ईश्वराचे सुक्ष्मरूप' आहे. कर्मसंस्कार व पाप-पुण्यात्मक उपाधीमुळे जीव हा जन्म मृत्युच्या चक्रात सापडतो. हे चक्र थांबवून मोक्ष मिळविणे ही गोष्ट मानव जन्मातच शक्य आहे. म्हणून प्रत्येकाने ईश्वराचे सतत स्मरण करून ईश्वराशी एकरूप व्हावे. असे एकरूप होणे म्हणजेच मोक्षप्राप्ती होय. असे हा शीख धर्म मानतो. मानव बुध्दिमान प्राणी असल्याने त्याने केवळ पशुवत जीवन न जगता अत्यंत संयमी, शिस्तबध्द, वासनामुक्त व अहंकारमुक्त असे विधायक व समाजोपयोगी जीवन जगावे. त्यामुळे मानवाची आत्मउन्नती होते. त्याला आत्मसाक्षात्कार होतो व तो ईश्वराशी एकरूप होतो. असे एकरूप झाल्यानंतर पुनर्जन्म संभवत नाही अशी श्रध्दा आहे.

**ब) शीख धर्मातील धर्माचरण :**

**१. ईश्वरभक्ती :**

ईश्वराशी एकरूप होण्यासाठी प्रत्येकानी ईश्वराची भक्ती करणे हे धर्माचरण मानलेले आहे. ईश्वर हा निर्गुण-निराकार असल्याने त्याची मूर्ती संभवत नाही. त्यामुळे शीख धर्मात मूर्तीपूजेला तसेच उपवास, तीर्थयात्रा या गोष्टींना स्थान नाही. ईश्वराचे सतत नामस्मरण करीत राहणे. त्याची प्रार्थना करणे हीच खरी ईश्वर भक्ती आहे. असे शीख धर्म सांगतो ईश्वर भक्तीसाठी भजन-कीर्तन करणे हे धर्माचरण मानले आहे.

**२. गुरूग्रंथ साहिबाचे पूजन व पठन :**

गुरू ग्रंथसाहिबाचे पूजन व पठन करणे हे शीख धर्मामध्ये महत्त्वाचे धर्माचरण मानलेले आहे. शीख धर्मामध्ये वेदग्रंथांना प्रमाणग्रंथ मानलेले नाही. गुरूमुखी लिपीतील ''गुरूग्रंठ्साहीबा'' हा या धर्माचा प्रमाण ग्रंथ आहे. या ग्रंथातील शिकवण ही 'गुरूवाणी' मानली जाते. 'गुरूद्वारा' हे शिखांचे प्रार्थनास्थळ असून त्यामध्ये या ग्रंथाची पूजा व पठन केले जाते.

**३. गृहस्थाश्रमांचे पालन :**

गृहस्थाश्रमांचे पालन करणे हे शीख धर्मामध्ये महत्त्वाचे मानले जाते. शीख धर्म हा मानवी जीवन व मानवी देहास फार महत्त्व देतो. त्यामुळे वैराग्य, संन्यस्तवृतीचा त्याग करून प्रत्येकाने गृहस्थाश्रम स्वीकारावा. प्रत्येकाने स्वत:साठी स्वत:च कमवावे, साधुसंन्याश्यांनी भिक्षा मागू नये. विवेकाने संसार करून जनसेवा करावी अशी शिकवण शीख धर्माची आहे. त्यामुळे गृहस्थाश्रमाची कर्तव्ये पार पडणे हे महत्त्वाचे आहे.

**४. धर्मपिठांना भेट देणे :**

शीख धर्मातील गुरूंच्या स्मरणार्थ देशाच्या चार दिशांना चार गुरूद्वार बांधली आहेत. त्यांना तख्त असे म्हणतात. पूर्वेस 'पाटना' पश्चिमेस 'अमृतसर' दक्षिणेस 'नांदेड' व उत्तरेस 'आनंदपूर' या चार शहरात गुरूद्वारे असून शीख लोक त्यांना तीर्थक्षेत्रे मानतात. या चार तख्तांना भेट देणे म्हणजेच धर्मपिठांना भेट देणे हे एक महत्त्वपूर्ण धर्माचरण मानले जाते.

**५. पाच 'क' कराराचे पालन :**

पाच 'क' कराराचे पालन करणे हे देखील महत्त्वाचे धर्माचरण मानले जाते. दहावे गुरूगोविंदसिंगांनी 'खालसा' या पंथाची स्थापना करून प्रत्येक शीखाने केस, कंगवा, कच्छ, कडे व 'कृपाण' या पाच वस्तू जवळ बाळगाव्यात असे सांगितले आहे. त्यानुसार प्रत्येक श्रध्दाळू शीख हा या पाच वस्तू जवळ बाळगणे हे धर्माचरण मानतो. या पाच वस्तू शिखांची वेगळी ओळख दर्शवितात.

**६. मोक्षप्राप्तीसाठी प्रयत्न :**

मोक्षप्राप्तीसाठी प्रयत्न करणे हे शीख धर्मातील प्रमुख धर्माचरण आहे. मोक्षप्राप्ती होणे म्हणजे ईश्वराशी एकरूप होणे होय. त्यासाठी आपण ईश्वराचेच अंश आहोत. याची जाणीव जीवाला म्हणजेच मनुष्याला सर्वप्रथम झाली पाहिजे. या जाणीवेसच शीख धर्म आत्मसाक्षात्कार मानतो. ज्ञान, कर्म, भक्ती व योग ही चार आत्मसाक्षात्काराची साधने आहेत. त्यामुळे आत्मज्ञान मिळविणे, सत्कर्म करणे, ईश्वरभक्ती करणे व योग साधना करणे ही चार कृत्ये धर्माचरण आहेत असे हा धर्म मानतो. केवळ मनुष्य जन्मातच मोक्षप्राप्ती शक्य असल्याने प्रत्येक मनुष्याने ही चार कृत्ये करून मोक्ष प्राप्ती साधावी असे हा धर्म मानतो.

**७. सत्संग करणे :**

गुरूद्वारात दररोज साधुसंतांच्या सहवासात राहून ईश्वराचे स्मरण व चिंतन करणे, गुरूग्रंथसाहिबाचे पूजन व पठन करणे व आध्यात्मिक विषयावर विचारविनिमय करणे यालाच सत्संग असे म्हणतात. असा सत्संग करणे हे देखील महत्त्वाचे मानले जाते. ईश्वराचे नामस्मरण व्यक्तिगत तसेच सामुहिक स्वरूपात करण्यावर शीख धर्म भर देतो. सत्संगमुळे आत्मशुध्दी घडते. आत्मज्ञान होते. त्याचबरोबर बंधुभाव आणि सामुहिक ऐक्य भावनाही वाढण्यास मदत होते. त्यामुळे सत्संग हा वैयक्तिक तसेच सामाजिकदृष्ट्या महत्त्वाचे धर्माचरण ठरते.

**क) शीख समुदायातील जातिव्यवस्था :**

गुरूनानकांनी वर्णभेद-जातीभेद नष्ट करून सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी शीख धर्म स्थापन केला. पण दुर्दैवाने या धर्मासही जातिव्यवस्था नष्ट करता आलेली नाही. आजच्या शिखांचे मूळ पूर्वज हे हिंदूच असल्याने हिंदुतील जातिव्यवस्था थोड्या फार फरकाने शीख समुदायातही टिकून राहिली. शीखांमध्ये सरदार व मझवी हे दोन मुख्य जातीसदृश्य समूह निर्माण झालेले आहेत. सरदारांचा दर्जा श्रेष्ठ व मझवींचा दर्जा कनिष्ठ मानला जातो. हिंदूधर्मातील ज्या कनिष्ठ जातींनी शीख धर्म स्वीकारलेल्या ब्राम्हण, क्षत्रिय, जाट व अन्य कांही कारागीर जातींनी आपले वेगळेपण जपले असून ते आपल्या जातीबाहेर, विवाहसंबंध सहसा जोडीत नाहीत. खुशवंत सिंगांच्या मते, शीख धर्मातील समतेचा अर्थ 'आंतरजातीय विवाह करणे' असा कधीही नव्हता. तथापि मझवींना अस्पृश्य मानले जात नाही तसेच गुरूद्वारातील प्रार्थना व लंगरमध्ये ते सरदारांबरोबर सहभागी होऊ शकतात. याचा अर्थ असा होतो की, शीख धर्मातील जातीभेद हा हिंदूधर्माप्रमाणे कठोर किंवा कडक स्वरूपाचा दिसून येत नाही.

**ड) शीखांची स्थिती व स्थान :**

**१. विवाह व कौटुंबिक जीवन :**

शीख समूदाय हा हिंदुतील विविध जातींच्या लोकांचा मिळून बनलेला असल्याने त्याच्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनावर हिंदूंचा मोठ्या प्रमाणात प्रभाव आढळतो. पंजाब व हरियाणातील शेतकरी शीख कुटुंबे ही संयुक्त प्रकारची आहेत. शीख धर्म हा ब्रम्हचर्य नाकारतो व गृहस्थाश्रमाचा पुरस्कार करतो. व्यक्तीने विवेकी व नैतिक असे वैवाहिक व कौटुंबिक जीवन जगावे हा आदर्श या धर्मामध्ये मानला जातो. हिंदूप्रमाणेच शीख धर्म विवाह हा एक संस्कार मानतो. हिंदूप्रमाणेच विवाह विधी पार पाडला जातो. फरक एवढाच की, विवाह प्रसंगी गुरूग्रंथसाहिबातील आनंद नामक मंत्राचे पठन केले जाते. या ग्रंथाभोवती चार फेरे मारून विवाह संपन्न केला जातो. शीखांमध्ये पुनर्विवाहास मान्यता आहे बहुसंख्य शीख हे धर्म अंतर्विवाहाचे पालन करतात.

**२. संस्कृती :**

हिंदू धर्मातील १६ संस्कार शीख धर्मामध्येही पाळले जातात. शीख लोक हे १० गुरूंचे जन्मदिन व पुण्यतिथी, गुरूग्रंथसाहिबाचा प्रतिष्ठान दिन, खालसा पंथाचा स्थापना दिन, धर्मरक्षणार्थ बलिदान देणाऱ्यांचे, हुतात्म्यांचे स्मृतिदिन इत्यादी दिन सन म्हणून साजरे करतात. शीख धर्मामध्ये मृतदेहास अग्नी देतात. व त्याची रक्षा नदीस अर्पण करतात. तसेच मृत व्यक्तीचे थडगे किंवा कबर बांधत नाहीत. परंतु हुतात्म्यांचे स्मारक उभा करतात.

**३. आर्थिक स्थिती :**

शीख धर्मीय लोक पंजाब व हरियाणात बहुसंख्य असून ते प्रामुख्याने शेती व्यवसाय करतात. तेथे हरितक्रांती यशस्वी करण्यात शीख शेतकऱ्यांचे योगदान मोलाचे आहे. शीखांमध्ये स्थलांतर प्रवृत्ती अधिक

असून त्यांनी देशात तसेच विदेशात म्हणजेच इंग्लड, कॅनडा, ऑस्ट्रेलिया, अमेरिका या देशामध्ये स्थलांतर करून तेथील उद्योग-व्यवसाय यात मोठे नाव कमावलेले आहे. माल वाहतूक, हॉटेल व दुकानदारी इत्यादी व्यवसायात हे स्थलांतरित शीख गुंतलेले आढळतात. प्रारंभापासून शीख हे लढाऊ वृत्तीचे असल्याने त्यांनी लष्करी सेवेत मोठ्या प्रमाणावर प्रवेश केलेला आहे. केंद्राच्या प्रशासकीय सेवांमध्ये मात्र त्यांचे प्रमाण नगण्य आहे. मात्र पंजाबमधील प्रशासकीय सेवांत त्यांचे प्रमाण सर्वात जास्त आहे. शीखांमध्येही श्रीमंत व गरीब वर्ग असून सरदारांची आर्थिक स्थिती मझबिंच्या तुलनेत अधिक उत्तम आहे. तसेच इतरांच्या तुलनेत शीखांचे राहणीमान बरेचसे उच्च दर्जाचे असलेले दिसून येते.

**४. आचारसंहिता :**

शीख धर्मातील आचारसंहिता 'रहित मर्यादा' म्हणून ओळखली जाते. ही मर्यादा गुरूग्रंथसाहिबातील शिकवण व शीख परंपरा यावर आधारित आहे. व्यक्तीला ही आचार संहिता बदलता येत नाही. ती बदलावयाचा अधिकार केवळ 'सरबत खालसा' नामक संघटनेस आहे. शीखांची प्राथमिक केंद्रे व संघटनेचे प्रतिनिधी परस्परसंमतीने निर्णय घेतात. तरच म्हणजेच धर्मपीठे व त्यांचे जत्थेदार हे लौकिक व सामाजिक जीवन विषयीचे निर्णय घेतात.

**५. राजकारण :**

देशाच्या राजकारणात शिखांचा सहभाग कमी असला तरी पंजाबमध्ये ते राजकीयदृष्ट्या सक्रीय व संघटीत आहेत. तेथे ते स्वबळावर मंत्रिमंडळ स्थापन करताना दिसतात. संघटीत चळवळीद्वारे त्यांनी स्वतंत्र पंजाब राज्य पदरात पाडून घेतलेले आहे. मध्यंतरी त्यांनी स्वतंत्र खलिस्तानची मागणी करून त्यासाठी काही गटांनी अतिरेकी कारवाया केल्या. त्यासाठी परदेशातील शिखांनी प्रोत्साहन व निधी पुरविला. सुवर्णमंदिरात शस्त्रास्त्रे साठा करून दहशतवादी कृत्ये सुरू केली. त्यातून राष्ट्रीय एकात्मतेसमोर मोठे आव्हान निर्माण झाले. त्यामुळे या मंदिरात लपलेल्या दहशतवाद्यांना नेस्तनाबूत करण्यासाठी इंदिरा गांधीनी लष्करी कारवाई केली. त्याचा सूड म्हणून शीख अतिरेक्यांनी तत्कालीन लष्कर प्रमुख अरूण वैद्य व पंतप्रधान इंदिरा गांधी यांची हत्या केली. पुढे केंद्र शासन व शीखांचे नेते संत लोंगोवाल यांच्यात पंजाब करार झाला. त्यानुसार शीखांनी पुढे खलिस्तानची मागणी सोडून दिली. आज पंजाबात लोकशाही व्यवस्था प्रस्थापित होऊन सुरळीतपणे चालू आहे. पंजाबमधील शीख मुक्तपणे राजकारणात भाग घेतात. मात्र पंजाबबाहेरील शिखांना मात्र अशी संधी फारशी मिळत नाही.

**सत्यधर्म**

महात्मा फुले यांनी ब्राह्मणांचे वर्णवर्चस्वाच्या विरूध्द ऐतिहासिक संघर्ष केला. फुल्यांनी ब्राह्मणी वर्चस्वाला प्रथम पासूनच आव्हान दिले, किंबहुना त्यांच्या सार्वजनिक जीवनाचा प्रारंभ त्या संघर्षापासून झाला आणि तो संघर्ष त्यांनी जन्मभर सतत चिकाटीने हिरिरीने चालू ठेवला. स्थापना ही ज्योतीबांच्या आयुष्यातील एक महत्त्वाची घटना होय. त्या काळात ब्राह्मण भिक्षुक अडाणी समाजाला फसवत आणि लुबाडून घेत ज्योतिबांना या गोष्टीचा तर राग येईल ''काय म्हणून तुम्ही हा जुलूम सहन करता?'' असे ते

लोकांना विचारत आपल्या सर्व क्षुद्र आणि गरीब समाजाच्या दुर्दशेचे कारण म्हणजे हा ब्राह्मण धर्म आहे असे त्यांचे ठाम मत होते. जो ब्राह्मण चांभाराला घासभर अन्न सुध्दा देत नाही, त्याला क्षेत्राकडून दान घेण्याचा काहीही अधिकार नाही असे त्यांचे स्पष्ट मत होते, ज्योतिबा लोकांना सांगत आपले हक्क मागून मिळत नसतात, ते झगडा करून मिळवले पाहिजेत, कनिष्ठ वर्गात धर्मजागृती विचार जागृती निर्माण करण्यासाठी त्यांनी पुणे येथे २४ सप्टेंबर १८७३ रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना केली, त्यालाच 'सत्यधर्म' असे म्हणतात.

**सत्यधर्माची तत्त्वे**

धार्मिक व सामाजिक गुलामगिरी नष्ट करणे हा या धर्माचा मुख्य उद्देश होता. ''सर्वसाक्ष जगत्पती । त्याला नकोच मध्यस्ती ।'' असे या धर्माचे ब्रीदवाक्य होते. या धर्माची तत्त्वे स्पष्ट करताना महात्मा फुले म्हणतात, ''ब्राह्मण, भट, जोशी व उपाध्य इत्यादी वरिष्ठ लोकांच्या दास्यत्वातून सामान्य लोकांना मुक्त करण्याकरिता व आपल्या मतलबी ग्रंथांच्या आधारे हजारो वर्षे शूद्र लोकांना नीच मानून गफलतीने कुटत आहेत. समाज सुधारणेच्या क्षेत्रातही ही पहिली चळवळ होती.

**सत्यधर्माची तत्त्वे**

१. परमेश्वर एक आहे, तो सर्वव्यापी, निर्गुण, निराकार आहे.

२. सर्व मानव परमेश्वराची लेकरे आहेत. त्यामुळे जातिभेद किंवा लिंगभेद मानू नये.

३. सर्वशक्तिमान परमेश्वराची प्रार्थना किंवा भक्ती करण्याचा सर्वांना अधिकार आहे.

४. सत्य हाच खरा धर्म असल्यामुळे परमेश्वराच्या प्रार्थनेसाठी मध्यस्थांची गरज नाही.

५. माणसाला जातीने नव्हे तर गुणाने श्रेष्ठत्व प्राप्त होते.

६. पुनर्जन्म, कर्मकांड व जपतप इत्यादी गोष्टी अज्ञानमूलक आहेत.

७. सर्वांशी बंधुभावाने वागावे, दुर्लबांना मदत करावी.

८. कोणताही धर्मग्रंथ ईश्वरनिर्मित नाही.

९. परमेश्वरच हा विश्वाचा निर्माता आणि पालनकर्ता आहे.

१०. शिक्षणाचा प्रचार करावा, प्राणीमात्रावर दया करावी.

**सार्वजनिक सत्यधर्म**

**१. फुल्यांच्या ब्राह्मणविरोधाचा अर्थ :**

फुलेही ब्राह्मणांच्या विरूध्द होते याचा खरा अर्थ तत्कालीन संदर्भातच समजला पाहिजे. त्याचा खरा अर्थ असा की फुले चातुर्वण्याचे निर्माते, नेते आणि शास्ते ब्राह्मणांच्या विरूध्द होते; जन्मजात उच्चनीचतेच्या विरूध्द होते. पूर्वकर्मानुसार जन्मजात विषमता हा निसर्गाचा, समाजाचा व धर्माचा पाया आहे.

या चातुर्वर्ण्याच्या सिध्दांताचे फुले कट्टर विरोधक व वैरी होते. या अन्याय, विषम, समाजपध्दतीचे निर्माते व नेते ब्राह्मण म्हणून फुल्यांचा त्यांच्याविरूध्द विशेष रोख होता. या विषम वर्णव्यवस्थेने अवघा समाज, त्यांचे सर्वांगीण जीवन, त्यांचे भूतभविष्य सर्व व्यापून टाकले आहे. ब्राह्मणाकडे ज्ञानाची, शिक्षणाची, नेतृत्त्वाची संपूर्ण मक्तेदारी चातुर्वर्ण्याधिष्टीत हिंदू धर्माने कायमची दिलेली आहे. आणि इतरजणांच्या, विशेषतः स्त्री, शूद्र-अतिशुद्रांच्या माथी कायमची गुलामगिरी, हीन, लाचार, अवस्था लादलेली आहे. तोच त्यांचा धर्म आहे, त्यातच त्यांनी आपले भाग्य समजले पाहिजे, या भयानक धारणेविरूध्द फुल्यांचे सर्वंकष बंड होते, सर्वंकष युध्द होते.

**२. चातुर्वर्ण्याच्या चौकटीत साधुसंताची करूणा :**

फुल्यांची ही सर्वंकष बंडखोरी सर्वार्थाने ऐतिहासिक ठरावी एवढी तीची झेप होती, आवाका होता, आदेश-आवेश होता. हिंदू धर्मातील अन्यायाविरूध्द, विषमतेविरूध्द पूर्वीही अनेक थोर साधुसंतांनी निषेधाचे आवाज उठवले होते, पण ते केवळ करूणेच्या भावनेने त्या सर्व साधुसंतांच्या मते ही समाजरचना मुळात योग्यच होती कर्मसिध्दांत हा शास्त्रशुध्दच होता. दलितांबद्दल दया दाखवावी, त्यांचे दुःख दैन्य सौम्य करावे पण त्यात विषमतेपासून सुटका नव्हती, कारण निसर्गाने, परमेश्वराने ती योजलेली होती. त्यामुळे फुल्यांच्या पूर्वीचे साधुसंत, सर्व विचारक-महात्मे चातुर्वर्ण्यांच्या चौकटीतच घुटमळत होते. ही विषमता किंचित सौम्य करून ते तिला दलित बहुजन समाजाची मान्यताच एक प्रकारे मिळवीत होते. विषम चातुर्वर्ण्य प्रथेला मुळापासून या साधुसंतांचा विरोध तर नव्हताच पण उलट ती ईश्वर-निर्मिती आहे, समाजधारणेला आवश्यक आहे, अशीच त्यांची मनोमन धारणा होती.

**३. ऐहिक गुलामगिरी आणि परमार्थिक लोकशाही :**

आणि अशा या विषम, अन्याय समाजपध्दतीचे निर्माते, नेते व शास्त्रे हे जन्मजात ब्राम्हणच आहेत, दुसरे कोणीही असूच शकत नाहीत, अशीच साधुसंतांची श्रध्दा होती. नामदेवापासून तुकोबा-चोखोबापर्यंत जे वेगवेगळ्या हीन, दीन जातींमधील संत निर्माण झाले, त्यांनी करूणेने, वेदनेने मधून मधून कितीही आर्त उद्‌गार काढले, तरी त्यांना चातुर्वर्ण्य मुळात मान्यच होते. ब्राह्मणांचे जन्मजात गुरूपदही मान्यच होते. ब्राह्मण कितीही भ्रष्ट झाला तरी तो श्रेष्ठच आहे, अशीच त्यांची श्रध्दा होती. दलित, शोषित, हीन, दीन, समाजाला जास्तीत जास्त दिलासा त्यांनी दिला तो भक्तीचा-भागवत धर्माचा. पण त्याचा महिमा फक्त वारकरी दिंडीपुरता आणि चंद्रभागेच्या वाळवंटापुरताच मर्यादित होता. विठ्ठलाच्या मंदिराची पायरी तो कधीही चढू शकला नाही! त्यांची सारी करूणा, भावना इहलोकसाठी मुळी नव्हतीच; ती केवळ परलोकासाठीच होती ती ऐहिक मानवी समता नव्हती, ती तथाकथित 'अध्यात्मिक लोकशाही' होती!

तेंव्हा श्रुति-स्मृति-पुराणोक्त कठोर चातुर्वर्ण्य काय किंवा भागवत धर्मातील दयार्द्र भक्तिमार्ग काय स्त्री-शुद्र-अतिशूद्रांना कसलाच सुटकेचा मार्ग नव्हता! आणि तसा असणेही चातुर्वर्ण्य धर्माने सर्वथा आणि सतत अशक्यच करून सोडले होते.

**४. संपूर्ण समता मानवतावादी प्रेरणा :**

म्हणून महात्मा फुले हे केवळ चातुर्वर्ण्यावर-ब्राह्मण श्रेष्ठत्त्वावर-एकूण विषमताधिष्टीत हिंदू धर्मावर आघात करून थांबले नाहीत. तो त्यांचा बंडखोरीचा केवळ आवश्यक आणि प्राथमिक असा अपरिहार्य अविष्कार होता. पण त्याहूनही श्रेष्ठ अशी फुल्यांची प्रेरणा होती, शिकवण होती. ती म्हणजे संपूर्ण समतेची, बंधुभावाची, मानवतेची, विश्वकुटुंबाची. त्यामध्ये वर्ण-जात तर सोडाच, पण देश, धर्म हे कृत्रिम, मनुष्यनिर्मित भेदभाव आहेत; त्यामुळे मूठभर स्वार्थी लोकांचाच स्वार्थ साधतो त्यासाठी ते सामान्य जनतेमध्ये नसते भेदभाव, विषमता, रागद्वेष निर्माण करतात. यापासून कोणताही वंश, धर्म, देश मुक्त नाही, म्हणून या सर्वांचा विलय करून त्याहून श्रेष्ठ अशा मानवतेची, मानवी समानतेची, स्वातंत्र्याची, विश्वकुटुंबाची प्राणप्रतिष्ठा केली पाहिजे ही खरी फुल्यांची श्रेष्ठ प्रेरणा होती, शिकवण होती.

**५. जग, सत्य, सुंदर व प्रेममय :**

मानवता, मानवांची संपूर्ण समता ही फुल्यांची निष्ठा होती. त्यामध्ये स्त्री-पुरूष, काळे-गोरे, हिंदू-अहिंदू, देशी-परदेशी, मराठी-अमराठी असल्यांपैकी एकही भेद नव्हता. त्यांच्या मनात याबद्दल यत्किंचितही किंतू किंवा किल्मिष नव्हते.

फुल्यांचे जग खरे होते, सत्य होते; ते मायामय नव्हते. ते दगडा-मातीचे, नद्या-पर्वतांचे, भौतिक जग होते. त्या जगात दु:ख, दैन्य जरूर होते; पण तो त्याचा अपरिर्वनीय स्वभावधर्म नव्हता. ते अपरिहार्य नव्हते, बदलू शकत होते. म्हणूनच त्यांनी एकूण जगाला कधीच दु:खमय मानले नाही. दु:ख ही जगाची स्थिती-स्थायीभाव त्यांनी मानला नाही. तर सुख आनंद आणि त्याची निर्मिती हा मानला. त्यांना जगात द्वेष, घृणा जरूर दिसली. पण तीही त्यांनी जगाची स्थिती मानली नाही; ती स्थायीभाव समजले नाहीत. त्यांचे जग प्रेममय-करूणामय होते.

फुल्यांचे जग सत्य, सुदंर, आनंदमय, प्रेममय होते असत्य-मायामय, दु:खमय-द्वेषमय किंवा ओंगळ नव्हते.

म्हणूनच फुले संन्याशी नव्हते, निवृत्तीमार्गी नव्हते पंचमहाभूतांना, निसर्गाला शत्रू समजणारे नव्हते, मनुष्याच्या इंद्रियांना-वासनांना-भावनांना विषमय, पापमय मानणारे नव्हते. फुले ही संसारी, प्रवृत्तीमार्गी, प्रयत्नवादी, निसर्गाला मित्र मानणारे, सुखाला पवित्र मानणारे होते. त्यांचे हे निकोप, प्रसन्न दर्शन, ही आशावादी प्रवृत्ती, ही भौतिक दृष्टी हिंदू परंपरेपासून त्याचप्रमाणे इतरांपासून अगदी वेगळीच होती.

**६. परिवर्तनाचे आव्हान :**

फुल्यांना दु:ख-दैन्य, द्वेष-घृणा, भेद-विषमता यांची जाणीव जरूर होती तीव्र तिखट जाणीव होती. पण हे सर्व बदलू शकते ही त्यांची नितांत श्रध्दा होती. अपौरूषेय, अपरिवर्तनीय, अपरिहार्य असे काही नाही हे परिवर्तन, बदल होऊ शकतात, झाले पाहिजेत अशी त्यांची धारणा होती.

आणि हे परिवर्तन करणारी कोणतीही दैवी शक्ती नाही, त्यासाठी अवताराची आवश्यकता नाही, नवस-सायासाची गरज नाही. जे काय परिवर्तन घडवून आणावयाचे ते आपले आपणच, हवे तसे, हवे त्या पध्दतीने घडवून आणू शकतो, ही फुल्यांची नितांत श्रध्दा होती. ज्यांचे दैन्य-दुख दूर करावयाचे ते त्यांना स्वत:च, स्वप्रयत्नांनी करावे लागणार आहे उच्चवर्णीयांच्या कृपेने, दयेने ते केव्हाही होणारे नाही, याबद्दल त्यांच्या मनात शंका नव्हती.

**७. अनोखा धर्म :**

फुल्यांच्या धर्मात ईश्वर आहे पण तो केवळ निर्माता म्हणून. निर्माता म्हणजे 'पुरूषरूपी' ईश्वर नव्हे. निर्माता म्हणण्याऐवजी फुले 'निर्मिक' म्हणत त्याचे पुरूषरूप नाही हे स्पष्ट करण्यासाठी ते ईश्वराला 'मा-बाप' असे स्त्री-पुरूष संयुक्तरूपी नाव देत! यातही त्यांच्या सत्यधर्मातील स्त्री पुरूष समानतेचा आग्रह व्यक्त होतो! ते ईश्वर मानत असले तरी तो केवळ निर्माता-निर्मितीला निमित्त-मात्र एवढाच आहे, जवळजवळ निसर्गरूप आहे, हे तत्वरूप आहे. फुल्यांचा ईश्वर व्यक्तीरूप नाही, त्यामुळे फुल्यांना मूर्तिपूजा सर्वस्वी वर्ज्य आहे. त्याचप्रमाणे पूजा, पूजेसाठी उपाध्यय, पूजासाहित्य, मंत्र, आरत्या इत्यादी सर्व फुले फुल्यांच्या दृष्टीने बाद आहेत. अर्थातच उपासना, ध्यान-धारणा, उपास-तापास, व्रत-वैकल्ये त्यांना सर्वथैव व त्याज्य आहेत. त्याचप्रमाणे फुल्यांच्या ईश्वराचा कोणी प्रेषित नाही त्याचा संदेश नाही, अर्थात परमेश्वर प्रणित कोणताही ग्रंथ किंवा उपदेश किंवा आदेशरूप वचने नाहीत. त्यांनी स्वत: जरी या धर्माची स्थापना केली असली तरी ते स्वत:कडे निर्मिक ईश्वरातर्फे कोणतेही खास स्थान किंवा भूमिका घेत नाहीत. ते स्वत: असलेच तर इतरांप्रमाणे केवळ सत्यशोधक आहेत. त्यांचा धर्म सत्यधर्म आहे आणि त्या सत्याचा शोध घेणारे ते सर्वच सत्यशोधक आहेत.

**८. सत्य धर्म हा सार्वजनिक धर्म :**

फुल्यांचा सत्यधर्म हा वैयक्तिक नाही, कारण वैयक्तिक मोक्ष-मुक्ती किंवा आत्मिक शांती-समाधान यावरही त्यांचा भर नाही. त्यासाठी तंत्र-मंत्र नाहीत, संत-महंत नाहीत, मध्यस्थ-उपाध्याय नाहीत. त्यांची दक्षिणा नाही, काही एक नाही, ईश्वराकडे मध्यस्थी करायला कोणाचीही गरज नाही, गुरू नाही, आत्मानुभव नाही, काही एक नाही. ईश्वराला आमिष नाही, लाच नाही, यज्ञ नाही, बळी नाही, नवस नाही, नवस फेडण्यासाठी बकरे-कोंबडे नाही. प्रसाद नाही, कौल नाही, अंगारा-धुपारा नाही, काही एक नाही.

म्हणून त्यांच्या धर्मातर्फे सत्याशिवाय दुसऱ्या कशाचाही आग्रह नाही आणि हे सत्यसुध्दा शास्त्र, ज्ञान, विज्ञान, चिंतन यांच्या साह्याने शोधून काढावयाचे आहे, ते अचिंत्य, अज्ञेय, अपौरूषेय, अपरिवर्तनीय नाही.

फुल्यांच्या सत्यधर्माचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे तो सार्वजनिक आहे, वैयक्तिक नाही. त्यात समाजाचा विचार प्राधान्य करून आहे आणि त्यांच्या समाजाच्या कल्पनाही अगदी स्पष्ट आहेत. समाज म्हणजे सर्व मानव. वंश-देश भाषा संस्कृती निरपेक्ष असा अखिल मानव समाज. अर्थात ते मानवाचा किंवा समाजाचा उल्लेख करताना स्त्री-पुरूष असा संयुक्त उल्लेख आवर्जून करतात.

### ३.३.८ शिवधर्म

**प्रस्तावना :**

धर्म ही मानवी समाजाची गरज आहे. माणूस हा धर्माला श्रेष्ठ मानत असतो. हिंदू, मुस्लीम, बुद्ध , ख्रिश्चन, पारशी असे अनेक लोक धर्म असताना नवीन धर्माची गरज का वाटली असावी धर्म कोणी स्थापना केला? याचा आढावा आपण पुढे घेणार आहोत.

**स्थापना:**

वेदिक धर्मा पासून अलिप्त होऊन नवा मानवतावादी आणि समतावादी विचारधारा धर्म म्हणजे शिवधर्म होय. या धर्माची स्थापना १२ जानेवारी २००५ रोजी सिंदखेड राजा या ठिकाणी लाखो अनुयायांच्या उपस्थितीत झाली आहे. बहुतांशी भारतीय समाज का हिंदू धर्मीय आहे. हिंदू धर्मामध्ये असमानता व चातूर्वरणाचा पुरस्कार केला आहे. याच्या अगदी उलट विचारसरणीशी ही शिवधर्माची आहे. समता व मानवता ही तत्त्वे शिवधर्माची मूलतत्त्वे आहेत. जनमानसात विज्ञानवादी, विवेकवादी विचाराचा प्रसार आणि प्रचार व्हावा, समाजात एकोपा नांदावा या दाव्यासाठी शिवधर्म कार्यरत आहे. शिवधर्माच्या स्थापनेमध्ये डॉ. आ. हं. साळुंखे, पुरुषोत्तम खेडेकर, प्राध्यापक मा. म. देशमुख, प्रा. अशोक राणा, गंगाधर बनबरे, प्रवीण गायकवाड, श्रीमंत कोकाटे आदीचा सहभाग होता.

**विचारधारा:**

धर्म ही मानवी जीवनाच्या सर्व अंगाला स्पर्श करणारी व प्रभाव टाकणारी अत्यंत महत्त्वाची अशी बाब आहे. मानवी संस्कृतीच्या उद्‌यापासून आजच्या आधुनिक कालखंडापर्यंत विकासाच्या प्रत्येक टप्प्यावर जगभरात धर्माने मानवी जीवन प्रभावित केले आहे. भारतीय समाजामध्ये धर्म, संस्कृती आणि तत्त्वज्ञान एकत्रितपणे विकसित झालेले आहेत. त्यामुळे बहुतांश धार्मिक दर्शने धर्माच्या नावाने विकसित झालेली आहेत. ही बाब भारतीय जनमानसावरील धर्माचा अंत्यंत प्रभाव अधोरेखित करते. धर्म हा सर्व समाजाला धारण करणार, त्याला नैतिक सामाजिक आणि सांस्कृतिक दिशा देणारा संपूर्ण समाजाला विकासाची संधी देणारा असतो. भारतीय समाजामध्ये या सर्व बाबींची पूर्तता करणारा मानव धर्म म्हणजे शिवधर्म अनेक वर्षे आचरणात होता. परंतु भारतीय समाजामध्ये वैदिक धर्माच्या आगमनापासून व त्याचा अंमल सुरू झाल्यापासून त्या धर्माने भारतीय समाजात टोकाची विषमता व शोषण व्यवस्था निर्माण केली आहे. या विषमतेच्या विरोधात व समतावादी व्यवस्था निर्माण करण्यासाठी चार्वाक, जैन, बौद्ध, लिंगायत, वारकरी महानुभाव, शिख इत्यादी अनेक धर्म प्रवाहानी, या धर्म प्रवाहाच्या उदगात्यांनी व अनुयायांनी सतत अथक संघर्ष केला आहे. आधुनिक काळात असे प्रयत्न सार्वजनिक सत्यधर्म, मराठा धर्म व नवबौद्ध धम्म इत्यादी कडून झाले. शहाजी महाराज व जिजामाता यांनीही सन १६८९ दरम्यान बेंगलोर येथे मराठा धर्मपीठ स्थापन केले होते. ते धर्मपीठ आज गोसावी मठ म्हणून कर्नाटक राज्याच्या गॅझेटियर मध्ये तशी नोंद आहे. या मराठा मठास मोठा मान सन्मान मिळतो भवानीनगर, बेंगलोर शहरात मठाची भव्य वास्तू तसेच जागा ही आहे. मानवी समाजाचा, विशेषता भारतीय समाजाचा सर्वांगीण सर्वव्यापी व सर्व समान विकास करावयाचा असेल

आणि उन्नत, विज्ञानवादी, विवेकवादी, समतावादी, निर्मळ निरामय नवसमाज निर्माण करावयाचा असेल, तर धर्म हा कळीचा मुद्दाठरतो. धर्मक्रांतीतूनच मानवी हिताची समाज क्रांती शक्य होऊ शकते याचा विचार करूनच मराठा सेवा संघाने आपल्या पंचसूत्री मध्ये धर्म सत्तेचा अग्रक्रमाने समावेश धर्मसत्ता म्हणजे धर्म ही मानवी जीवन प्रभावित करणारी अत्यंत प्रभावशाली सत्ता तिचा उपयोग सर्व समाजाच्या सर्वांगीण उत्थानासाठी करणे, माता ही समितीची ओळख व निर्माती आहे याच भावनेने मराठा सेवा संघ आणि जिजामाता हे प्रेरणास्थान स्वीकारले खऱ्या अर्थाने जिजामाता जगातील सर्व स्त्रियांचे प्रत्यक्ष प्रतिनिधित्व करतात. शिवधर्माच्या चिकित्सेमध्ये वैदिक ब्राह्मणी धर्म प्रवाहाचा व त्याच्या जनमानसातल्या प्रतिमेचा अभ्यास करणे, विविध धर्म अभ्यासकांची चर्चासत्र आयोजित करणे, विविध प्रथा, परंपरा, सण, उत्सव कर्मकांड या चिकित्सक अभ्यास करणे, या बाबीचा तर्कनिष्ठ अभ्यास करून शिवधर्माची मांडणी करण्यात आलेली आहे. शिवधर्माच्या विचारधारे मध्ये भारतीय समाजाची हजारो वर्षाची वाटचाल व येथील समाज वास्तव, लोकमानस याचे चिंतन करण्यात मानवतावादी, समतावादी, विज्ञानवादी व कालसंगत, नित्य परिवर्तनवादी असे गाथेचे स्वरुप असून कोणताही कट्टरवाद स्वीकारलेला नाही. ही गाथा म्हणजे अंतिम आहे असा कोणताही दावा नाहीं व पुढील पिढ्यांना कालसंगत, योग्य व विधायक बदल करण्याचे स्वातंत्र्य आहे. धर्म हा माणसाच्या शोषणाचे शस्त्र न बनता त्याच्या फुलण्याचे साधन बनवा अशी धारणा शिवधर्माची असून अत्यंत लवचिक स्वीकारलेला आहे. ही गाथा जास्तीत जास्त निर्दोष व कल्याणकारी बनवण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे. अत्यंत सोप्या भाषेत मांडणी केलेली आहे. शिव संकल्पना प्रेरक महामानव, संस्कार, विविध सण यांचे स्वरूप स्पष्ट करण्यात आलेले आहे. शिवधर्मा मध्ये त्याशिवाय सर्व संस्कार व विधी करण्याची तरतूद करून पुरोहित शाहीचे उच्चाटन करण्यात आले आहे. स्वातंत्र्य, समता, विश्वबंधुत्व व न्याय या शिवधर्माच्या मूळ तत्त्वाला ही गाथा उजागर करते. मानवी जीवन आनंदमय होऊन विश्वात समता निर्माण व्हावी, माणसा-माणसातील संघर्ष संपुष्टात यावा व चराचरातील सजीव सहज जीवन जगता यावे, ही कामना यातून पूर्ण व्हावी, अशी भूमिका आहे.

बहुजन समाजाचे ऐतिहासिक दाखले दिल शिवधर्मात शिवतत्त्व हेच शिवधर्माचे एकमेव अधिष्ठान मानले गेले आहे. संस्कृत पंडित विद्या विशारद धर्मशास्त्राचे अभ्यासक डॉ. आ. हं. साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली या धर्मातील लोकांनी कशाप्रकारे आचरण करावे, धार्मिक विधी कोणत्या असाव्यात यासाठी शिवधर्मगाथा यासाठी ग्रंथाची निर्मिती केलेली आहे. या ग्रंथात प्रमाणे शिवधर्माची विचारधारा असून आचरण देखील आहे.

**शिवधर्म आणि कार्यकारणभाव:**

शिवधर्म विश्वातील सत्य घटनेचा कार्यकारणभाव जाणून घेण्यासाठी मानव समूहाला चेतना देतो. विश्वातील कोणतीही घटना घडण्या पाठीमागे कार्यकारणभाव असतो. शिवधर्म हा धर्मातील मूळ दोष दाखवण्याचा प्रयत्न करतो. एखादी अतिमानवी शक्ती सृष्टीचे नियम डावलून आपल्या इच्छेनुसार तिच्यामध्ये हस्तक्षेप करू शकते, हे पहिले गृहितक आहे. यज्ञयाग, पूजा अर्चा इत्यादी प्रकारच्या कर्मकांडाद्वारे त्या अतिमानवी शक्तीला अनुकूल करून घेता येते, हे दुसरे गृहीतक होय ही दोन्ही ग्रहीतके अज्ञानावर

आधारलेल्या आहेत म्हणून चुकीची आहेत. पण ती चुकीची आहेत याचा अर्थ सृष्टीमध्ये अतिमानवी शक्ती नाहीत असे मात्र नाही हे शिवधर्म सांगतो. आकाशात चमकणाऱ्या विजेसारख्या अतिमानवी शक्ती सृष्टीमध्ये आहेत. आणि अध्याप या विषयी मानवाला कळलेल्या नाहीत, अशा प्रकारच्या अनेक शक्ती असू शकतील परंतु त्या शक्ती ही सृष्टीच्या नियमबद्धतेच्या त्या अधीन आहेत. त्या शक्तीला अनुकूल करून घेण्यासाठी ही नियमबद्धता जाणून घेणे आणि मग त्या ज्ञानाच्या आधारे सृष्टीची रचना अनुकूल करून घेण्यासाठी धडपड करणे आवश्यक असते. स्वाभाविकच, एखादा यज्ञ करणारा मनुष्य आणि त्या यज्ञाने प्रसन्न होणारी विशिष्ट देवता यांच्यातील देवघेव, करार इत्यादी सृष्टीतील फेरफार अवलंबून असत नाहीत हे शिवधर्म सांगतो. सृष्टीतील नियमबद्धता हाच ईश्वर कसे मांनले, तरी या ईश्वरला जाण्यासाठी व अनुकूलन करून घेण्यासाठी सृष्टी नियम जाणून घेणे, हाच मार्ग उरतो. स्वाभाविकच, कोणत्याही अतिमानवी शक्तीना अनुकूल करून घेण्यासाठी केल्या जाणाऱ्या मानसिक उपासना, वा प्रार्थना आणि शारीरिक कारणे ही निरुपयोगी असतात हे शिवधर्म शिकवण देतो. उदा. धर्मामध्ये देवीचा कोप हे कारण आणि विशिष्ट रोग हे कार्य मानले जाते. धर्मानी मांडलेला हा कार्यकारणभाव चुकीचा असल्याचे आता सिद्ध झाले आहे असे विवेचन शिवधर्मातून स्पष्ट होते. विशिष्ट जंतू वगैरे कारण आणि विशिष्ट रोग हे कार्य, असा कार्यकारणभाव आता निसंदिग्ध पणे स्पष्ट झाला आहे. धर्मामध्ये यज्ञ, नवस इत्यादी हे कारण आणि पाऊस, पुत्रप्राप्ति इत्यादी कार्य असा कार्यकारणभाव मांडला जातो तो विज्ञाननिष्ठ मार्गाने तपासून सत्य आहे का पाहणे गरजेचे आहे हे शिवधर्म स्पष्ट करतो. नवस, यज्ञ वास्तु मानणारे लोक यांनी स्वतःच्या विवेकावर विश्वास ठेवून याची पडताळणी करावी हा मार्ग शिवधर्म देतो. विश्वामध्ये कोठेही चमत्कार होत नाही याची जाणीव माणसाला करून देण्याचे कार्य शिवधर्म करतो. धर्माच्या बाबतीत अवास्तव सांगणे ही बाब धर्माच्या अस्तित्वावर आघात करणारी आहे याचे स्पष्टीकरण शिवधर्म देतो. धर्म आत्मसंरक्षणाच्या गरजेतून निर्माण झाला. सृष्टीतील संकटापासून मानवाचे रक्षण करणे, हे धर्माचे उद्दिष्ट होते त्या संकटा मागचे कारण त्यांनी शोधून काढले होते आणि त्या कारणाला दूर करण्याचा उपाय ही शोधून काढला होता. या मार्गाने मनुष्य सुरक्षित होणार होता. आपले जीवन आनंदाने भरणार होता. संकटापासून स्वतःला वाचवणार होता. अवघ्या सृष्टीला जाणून घेऊन नियंत्रित करणार होता, अनुकूलन करून घेणार होता. सामान्य लोकांना धर्माचे तसे आश्वासन होते परंतु वास्तविकपणे धर्माचे स्वरूप अविवेकी,अवैज्ञानिक बनले. शिवधर्म धर्मातील सत्य बाबी शोधण्याचा आणि त्याचा पाठपुरावा करण्याचा मार्ग सुचवतो. सत्याचा मार्ग वास्तवाकडे जाणार असतो तर असत्याचा मार्ग अंधकारात, दारिद्र्यात, असंतोषात, अराजकतेत घेऊन जाणारा असतो असा संदेश शिवधर्म देतो. थोडक्यात सांगायचे झाल्यास शिवधर्म हा माणसाला मानवता, सत्य, अहिंसा, समता, स्वातंत्र्य, न्याय, व वैश्विक मानवी मूल्याचे जतन करण्याचा जोपासना करण्याचा मार्ग दाखवतो. शिवधर्म माणसाला विश्वबंधुत्वाची जपणूक करण्याचा मार्ग दाखवतो. शिवधर्म विज्ञानावर आधारित असून अज्ञानाचा नायनाट करतो. सत्याचा स्वीकार असत्याला नाकारतो व मानवाला स्वयं प्रकाशित होण्याचा मार्ग खुला करतो.

**शिव संकल्पना:**

मनाला प्रसन्न करणारे कल्याणकारक प्रत्येकाला स्वतःच्या विविध क्षमतांचे भान देणारे, आपल्या क्षमता साकार करण्याचा मार्ग दाखवणारे, प्रत्येकाला इतर मानवाशी आणि मानवेतर अशा सर्व चराचर सृष्टीशी निकोप रीतीने जोडणारे आणि आनंददायक असे सत्य स्वरूप सुंदर तत्त्व म्हणजे 'शिव' होय. मानवी जीवनात जे जे उत्तम, उदात्त, निकोप, न्यायाचे माणुसकीचे आणि मानवाच्या सर्व अतशक्ती विधायक मार्गाने फुलवणारे असे असते, तेथे सगळे शिव् संकल्पनेत अंतर्भूत होते.

शिव म्हणजे शंकर आणि पार्वती हे बहुजनांचे श्रद्धास्थाने आहेत. त्याने यज्ञ आणि कर्मकांडे यांचा अवलंब केलेला नाही. शिव हे नाव छत्रपती शिवाजी महाराज या नावाच्या देखील साधर्म्य असल्याने नवीन स्थापित होणाऱ्या धर्माला शिवधर्म हे नाव देण्यात आलेले आहे.

**शिव धर्माचे स्वरूप:**

शिव तत्व हेच शिवधर्माचे एकमेव अधिष्ठान म्हणता येईल. आपले आणि इतरांचे जीवन आनंदमय करणे हे मानवाचे साध्य आहे. त्या सध्याच्या विविध साधना पैकी धर्म एक महत्त्वाचे साधन आहे. शिवधर्म हे जीवनात तत्वाची प्राप्ती करण्याचे साधन आहे. मानवी संबंध आणि एकूण मानवी जीवन निकोप आनंदाने भरून टाकण्याचे विज्ञान म्हणजे शिवधर्म होय. वरील विवेचनावरून आपण शिवधर्म म्हणजे काय? त्याचे स्वरूप आणि संकल्पना स्पष्ट होतात.

**प्रेरक महामानव:**

**१) निर्ऋती:**

निर्ऋती ही सिंधू संस्कृतीच्या काळातील एक अतिशय महान स्त्री होती. पृथ्वी बरोबर तुलना करावी इतकी महान श्रेष्ठ होती. नवनिर्मिती, समृद्धी, उज्वल यश, आनंद याचे प्रतिक असलेली निरूत्ती बहुजनांच्या जीवनाला विधायक दिशा देणारी होती म्हणून तिचा प्रेरक महामानव म्हणून आदर्श घेण्यात आलेला आहे.

**२) बळीराजा:**

बळीराजा हा महान पूर्वज होता आज देखील बहीण भावाला अवताना 'इडा पिडा टळो बळीचे राज्य येवो' अशी सदिच्छा व्यक्त करततात. बळी हा शेतकऱ्यांचा राजा होता त्याचे राज्य समतावादी राज्य होते म्हणून शिवधर्म बळीराजाचे स्मरण कृतज्ञतापूर्वक करतो.

**३) जिजाऊ:**

जिजाऊ हे महाराष्ट्राचे प्रेरणास्थान आहे. त्यामुळे त्यांच्या विचाराचे आचरण शिवधर्म करतो. कोणत्याही कार्याचा आरंभ जिजाऊ वंदनेने केला जातो. स्त्रीत्वाचा आणि मातृत्वाचा आदर यातून शिवधर्म व्यक्त करीत असतो.

## ४) वर्धमान महावीर:

वर्धमान महावीर हे मानव जातीला नैतिक मूल्य चे योगदान देणारे अतिशय श्रेष्ठ असे महापुरुष होते. त्यांनी आपली इंद्रिये आणि विकार जिंकल्याने जिंकणारा या अर्थाने ते जीन बनले. जैन हा शब्द जीन या शब्दापासून बनलेला आहे. त्यांचे विचार शिवधर्माचे आदर्श असतील.

## ५) गौतम बुद्ध:

समस्त मानव जातीला सत्य आणि अहिंसा आणि शांततेचा संदेश देणारे महापुरुष गौतम बुद्ध मानवी चिंतनाला अत्यंत उदात्त पातळीवर घेऊन जाण्याचे अतुलनीय कार्य केले आहे. सर्वसामान्य लोकांना त्यांच्या व्यक्तिमत्व असलेल्या अंत:शक्तीचे भान देण्याबरोबर त्या अंत:शक्ती साकार करण्याचा मार्ग त्यांनी दाखवला. त्यांची ज्ञान निष्ठा असाधारण होती. आजच्या विज्ञानातील कार्यकारण संबंधाची तत्वे सैद्धांतिक स्वरूपात त्यांनी अडीच हजार वर्षांपूर्वी सांगून ठेवली होती. वरील महामानवांच्या आचार-विचार हे शिवधर्माचे आदर्श आहेत. महामानवानी सांगितलेल्या विचारावर शिवधर्म मार्गक्रमण करेल. जे जे म्हणून समतावादी आणि मानवतावादी विचार असतील ते सर्व विचार शिवधर्म जोपासत आहे.

## ६) शिवधर्म संस्कार:

इतर धर्माचा तुलनेत इशू धर्मातील संस्कार हे सरस बनले आहेत. विवाहामध्ये स्त्री-पुरुषांची संमती ही महत्त्वाची मानली गेली आहे. विवाह विधिसाठी पुरोहिताला नकार दिलेला आहे. त्याचबरोबर इतर प्रथांना देखील विरोध केलेला आहे. इतर कोणतेही कर्मकांड न करता दोघेही शपथ घेऊन विवाहविधी पूर्ण केला जातो. विधवा पुनर्विवाहाला पूर्ण पाठिंबा दिला आहे. घटस्फोट घेण्याचा अधिकार देखील शिवधर्मा मध्ये देण्यात आलेला आहे. कुंकू, बांगड्या, मंगळसूत्र, अलंकारिक याबाबतचे धारण करण्याचा अथवा नकार देण्याचे स्वातंत्र्य देखील स्त्रीला दिलेले आहे.

## ६) समारोप:

वरील विवेचनावरून असे लक्षात येते की, शिवधर्म हा विज्ञान वादाला जवळ करणारा आहे. विवेकवादी विचारावर विश्वास ठेवून समतावादी आणि मानवतावादी स्वरूपाचे जीवन जगण्याचा मार्ग शिवधर्म दाखवतो. कर्मकांडे, अंधश्रद्धा, अडकून न राहता महामानवाने दिलेल्या विचारावर श्रद्धा ठेवून आपले जीवन व्यतीत करावे असा संदेश शिवधर्म देतो. व्यसन करू नका भारतीय संविधानाचे तंतोतंत पालन करावे, माणसामाणसातील भेद करू नये अशी शिकवण देणारा धर्म म्हणजे शिवधर्म होय. असा हा शिवधर्म महाराष्ट्रातील बुलढाणा जिल्ह्यातील सिंदखेड राजा या जिजाऊ मा साहेबांच्या जन्मस्थळी स्थापन झालेला आहे. परंतु या धर्माचा प्रचार आणि प्रसार हव्यात प्रमाणात होताना मात्र दिसून येत नाही.

## ३.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

**योग्य पर्याय निवडून खालील विधाने पूर्ण करा.**

१. हिंदू धर्माचा.............हा पवित्र ग्रंथ आहे.

अ. बायबल ब. कुराण क. वेद ड. पंचशील

२. इस्लाममधील धर्माचरणास..............म्हणतात.

अ. प्रार्थना ब. पूजा क. जप ड. नमाज

३. पैगंबराचे जन्मस्थान.............आहे.

अ. काशी ब. पाकिस्तान क. इराण ड. मक्का

४. बौध्द धर्माचे संस्थापक...........आहेत.

अ. अल्ला ब. गौतम बुध्द क. श्रीकृष्ण ड. विवेकानंद

५. बौध्द धर्मातील पंचशील तत्व............याला म्हणतात.

अ. अहिंसा ब. हिंसा क. चोरी ड. व्याभिचार

६. ट्रिनीटी सिध्दांत.........या धर्मामध्ये आहे.

अ. शीख ब. हिंदू क. मुस्लिम ड. ख्रिस्ती

७. ख्रिस्ती धर्माचे संस्थापक........आहेत.

अ. मोहम्मद पैगंबर ब. श्रीकृष्ण क. बौध्द ड. यशू

८. जैन लोक संख्या जास्त प्रमाणात...........समाजात आढळून येते.

अ. ग्रामीण ब. आदिवासी क. शहरी ड. परदेशी

९. शीख धर्माचा पवित्र ग्रंथ.........आहे.

अ. बायबल ब. गुरूग्रंथसाहिब क. कुराण ड. गीता

१०. महात्मा जोतिबा फुले यांनी हा............धर्म स्थापन केला.

अ. शिवधर्म ब. जैन धर्म क. हिंदू धर्म ड. सत्य धर्म

११. शिवधर्माची स्थापना कोठे झाली.

अ. शिवनेरी ब. सिंदखेड राजा क. पुणे ड. सातारा

१२. शिवधर्माची स्थापना केव्हा झाली?

अ. १२ जानेवारी २००५ ब. १ एप्रिल २००६

क. १२ मार्च २०१३ ड. १४ एप्रिल २०११

## ३.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

| | | | |
|---|---|---|---|
| १. वेद | २. नमाज | ३. मक्का | ४. गौतम बुध्द |
| ५. अहिंसा | ६. ख्रिस्ती | ७. महमंद पैगंबर | ८. शहरी |
| ९. गुरू ग्रंथ साहिब | १०. सत्यधर्म | ११. सिंदखेड राजा | १२. १२ जानेवारी २००५ |

## ३.६ सरावासाठी प्रश्न

१. हिंदू धर्माचे स्वरूप स्पष्ट करा.

२. हिंदू धर्मातील आचार पध्दती सांगा.

३. बौध्द धर्माची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

५. बौध्द धर्मातील अष्टांग मार्ग सांगा.

६. ख्रिस्ती धर्मातील मूलतत्त्वे सांगा.

७. जैन समुदायाची स्थिती स्पष्ट करा.

८. शीखधर्मातील धर्मश्रध्दाची चर्चा करा.

९. सार्वजनिक सत्य धर्म विषयी चर्चा करा.

१०. शिवधर्माचे स्वरूप स्पष्ट करा.

## ३.७ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ


१. वैद्य प्रभाकर (२०१६) महात्मा फुले आणि त्यांची परंपरा लोक वाङ्मय गृह, मुंबई

२. कऱ्हाडे वीणा, २०१२ महात्मा ज्योतिबा फुले लोक वाङ्मय गृह, मुंबई

३. नलगे दिलीप २०१३ रिया पब्लिकेशन, कोल्हापूर

४. खंडागळे चंद्रकांत; धर्माचे समाजशास्त्र, (२०२१) सौ. मायादेवी चंद्रकांत खंडागळे सांगली.

५. डोईफोडे ज्योती (२०११) भारतीय समाज संरचना व परिवर्तन, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.

६. पुंडलिक विद्याधर, धर्माचे समाजशास्त्र (२००३) कॉन्टिनेटल प्रकाशन.


❑❑❑

# घटक – ४
# धर्म आणि सामाजिक परिवर्तन
## (Religion and Social Change)

**अनुक्रमणिका**

४.० उद्दिष्ट्ये

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

 ४.२.१ सामाजिक-धार्मिक चळवळी

 ४.२.२ धर्म आणि हिंसा

 ४.२.३ धर्माचे बाजारीकरण

 ४.२.४ धर्मनिरपेक्षता आणि राष्ट्रीय एकात्मता

४.३ सारांश

४.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

४.५ स्वयं अध्ययनाच्या पश्नांची उत्तरे

४.६ संदर्भासाठी पुस्तके

## ४.० उद्दिष्ट्ये

- या घटकाच्या अध्ययनानंतर आपणास विविध सामाजिक-धार्मिक चळवळी कोणकोणत्या आहेत हे समजून घेता येणार आहे.
- तसेच धर्म आणि हिंसा याचा संबंध कसा आहे, धर्म आणि हिंसेचे नेमके नाते कोणते आहे हे समजून घेता येईल.
- त्याशिवाय सध्या 'धर्माचे बाजारीकरण' कशा पद्धतीने समाजात होत आहे. हे सविस्तर समजून घेता येणार आहे.

## ४.१ प्रस्तावना

कोणताही मानवी समाज हा गतीमान, परिवर्तनशील असतो. या परिवर्तनाची गती कधी मंद तर कधी जलद असू शकते. समाजातील मूल्ये, नियमने, श्रद्धा, कल्पना, जीवन जगण्याची पद्धती, त्यांचे सामाजिक वर्तन, सामाजिक संबंध आदी बाबींमध्ये वेगवेगळ्या गतीने परिवर्तन होत असते. म्हणजेच समाजातील परिवर्तन हे अटळ असते. परंतु हे परिवर्तन आपोआप घडून येत नाही तर या परिवर्तनाला काही कारणे कारणीभूत असतात.

सामाजिक परिवर्तन करण्यासाठी लोक वैयक्तिक पातळीवर किंवा सामुहिक पातळीवर संघटितपणे प्रयत्न करत असतात त्याला सामाजिक चळवळ असे म्हणतात. परिवर्तनाला जबाबदार असणाऱ्या घटकांपैकी चळवळी या एक महत्त्वाचा घटक म्हणून उल्लेख करता येतो. समाजात सकारात्मक बदल व्हावेत म्हणून आणि काही वेळा नकारात्मक गोष्टींना विरोध करण्यासाठीही चळवळी घडवून आणल्या जातात.

सामाजिक चळवळींना अत्यंत जूना असा इतिहास आहे. प्रत्येक मानवी समाजात फार पूर्वी पासूनच चळवळी झालेल्या दिसून येतात. चळवळींमध्ये विविध प्रकारचे वर्तन समूहाकडून केले जाते. यामध्ये कधी कधी बहिष्कार, निदर्शने, मोर्चे, बंद, हिंसात्मक गोष्टी घडवून आणल्या जातात. सामाजिक चळवळ ही सामुदायिक वर्तनाच्या परिवर्तनाची प्रक्रिया आहे. हा सामुहिक प्रयत्न सतत व दीर्घकाळ चालू राहातात. सामाजिक चळवळ ही एक निरंतर प्रक्रिया आहे.

थोडक्यात सामाजिक चळवळी या सामाजिक परिवर्तनाला चालना देण्याचा किंवा विरोध करण्याचा निरंतर सामुहिक प्रयत्न होय.

**व्याख्या :**

**१) टर्नर आणि किलिन :** ''समाजात किंवा समाजाचा घटक असलेल्या एखाद्या समुहाच्या बाबतीत बदल करण्यासाठी किंवा बदलाचा विरोध करण्यास सातत्याने करण्यात आलेले सामुहिक प्रयत्न म्हणजे सामाजिक चळवळ होय.''

**२) नेल स्मेलसर :** सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यासाठी किंवा त्याला विरोध करण्यासाठी केलेला संघटित असा सामुहिक प्रयत्न म्हणजे सामाजिक चळवळ होय.

**३) हर्बट ब्लुमर :** जीवनात नवीन सामाजिक सुव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी केलेले सामुहिक साह्य म्हणजे सामाजिक चळवळ होय.

वरील व्याख्यांचा परामर्श घेता सामाजिक चळवळ म्हणजे सामुहिक प्रयत्नांद्वारे समाजात स्थित असणाऱ्या व्यवहार विचार, सामाजिक संबंधामध्ये परिवर्तन घडवून आणणे होय.

मूल्यसंघर्ष, सामाजिक विसंघटन, सामाजिक अन्याय अशी काही सामाजिक चळवळींची महत्त्वाचा कारणे सांगता येतील. या सामाजिक चळवळीमध्ये सर्वच लोक सहभागी होतात का? या प्रश्नाचे उत्तर नाही

असे द्यावे लागेल. सामाजिक चळवळीबाबत काहीच लोक संवेदनशील असतात. जे सीमांत समुहातील आहेत, ज्यांच्यावर अन्याय झाला आहे, बेघर आहेत, जे समुहापासून अलिप्त असतात, जे समायोजन करू शकत नाहीत असे लोक यात सहभागी होतात, तर काही लोक प्रतिष्ठा मैत्री या उद्देशानेही चळवळीमध्ये सहभागी होतात.

सामाजिक चळवळ ही अस्वस्थता, प्रोत्साहन, संघटन आणि संस्थाकरण या चार अवस्थेतून जात असते.

या प्रकरणामध्ये सामाजिक धार्मिक चळवळींचा आढावा घेण्यात आलेला आहे. सामाजिक चळवळींचे वर्गीकरण करणे तसे सोपे काम नाही. सामाजिक चळवळीचे विविध प्रकार आहेत त्यामुळे वेगवेगळ्या प्रकारानुसार सामाजिक चळवळींचे वर्गीकरण केले जाते. परंतु समाजात अनेक प्रकारच्या चळवळी असतात त्या संपूर्णतः आर्थिक, राजकीय, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक आहेत हे ठरविणे वादग्रस्त ठरेल. म्हणूनच सामाजिक चळवळींचे तात्त्वीक दृष्टीकोणातून काही आदर्श प्रकार केले जातात, त्यामध्ये स्थलांतर, अभिव्यक्ती, आदर्शवादी, सुधारणा, क्रांतीकारक, प्रतिकार, पुनरुज्जीवनवादी चळवळ तर जॉन फार्ले यांनी विरोधी, सुधारणा, क्रांतीकारी, प्रतिगामी, धार्मिक, सामुदायिक, व्यक्तिगत संप्रदाय अशा काही चळवळी विशद केल्या आहेत. यातील धार्मिक चळवळी या प्रभावी धार्मिक किंवा सांस्कृतिक व्यवस्थेतील काही पैलुंना विरोध करतात किंवा पर्याय सूचविले जातात तेव्हा त्या चळवळीस धार्मिक चळवळ असे म्हणतात. धार्मिक चळवळ ही आध्यात्मिक किंवा पारलौकीक गोष्टींशी संबंधित असते.

साधारणपणे १९ व्या शतकाच्या प्रारंभीच्या काळात देशात अनेक समाजसुधारकांनी सुधारणावादी चळवळी सुरू केल्या. त्यामध्ये बुद्धीप्रामाण्यवाद व मानवतावाद यासारख्या मूल्यांवर भर दिलेला आहे. भारतातील सामाजिक चळवळींनी सामाजिक परिवर्तनात महत्त्वाची भूमिका वठवलेली दिसते. ब्रिटीशांच्या राजवटीमध्ये व्यक्तीस्वातंत्र्य, समता, बंधुता या अनुषंगाने अनेक चळवळी घडून आल्या. त्यापैकी ब्राह्मो समाज, आर्य समाज, प्रार्थना समाज, सत्यशोधक समाज, रामकृष्ण मिशन, ब्राह्मणेत्तर चळवळ, डॉ. आंबेडकरांची चळवळ अशा अनेक चळवळींनी सामाजिक धार्मिक परिवर्तनात महत्त्वाचे योगदान दिलेले दिसून येते. या चळवळी निर्माण होण्याच्या पाठीमागे पाश्चात्त्य संस्कृतीचा प्रभाव, धर्मांतर, प्राचीन संस्कृतीचे श्रेष्ठत्व, जातीव्यवस्था व ब्राह्मणी वर्चस्वाचे निर्मूलन या कारणांनी उभ्या राहिल्याचे दिसते.

यानंतर थोडक्यात आपण या चळवळींची माहिती घेणार आहोत.

**१) ब्राह्मो समाज :** राजाराम मोहनरॉय यांनी कलकत्ता येथे ब्राह्मो समाज ही संघटना समाजातील अनिष्ट प्रथांचे उच्चाटन करून सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यासाठी तयार केली. त्यानंतर केशवचंद्र सेन यांनी ब्राह्मो समाजाला शक्तीशाली बनवले. इस्लाम धर्मातील एकेश्वरवाद, ख्रिस्ती धर्मातील नीतीविषयक तत्त्वे, हिंदू धर्मातील पावित्र्यविषयक संकल्पना, पाश्चात्य समाजातील बुद्धीप्रामाण्यवाद यांचा स्वीकार करून ब्राह्मो समाजाने सुधारणा चळवळ सुरू केली. ईश्वर हा एकच आहे. सार्वत्रिक एक धर्म निर्माण करणे हे या समाजाचे उद्दिष्ट होते.

उपासनेतील मूर्तीपुजा, नैवैद्य दाखवणे, बळी देणे इ. प्रकार योग्य नाहीत हे पटवून देण्यासाठी ब्राह्मो समाजाने सामाजिक चळवळ संघटित केली. सती प्रथा, बालविवाह, विधवा पूनर्विवाहाला बंदी अशा अनिष्ट प्रथेविरुद्ध लोकांमध्ये जनजाग्रती करण्यासाठी ब्राह्मो समाजाने प्रयत्न केले. स्त्रियांच्यावरील शोषण थांबविण्यासाठी जनजागृती घडवून आणली. १८६३ मध्ये केशवचंद्र सेन यांनी स्त्री प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी 'वामबोधिनी' नावाचे स्वतंत्र नियतकालिक सुरू केले. १८९६ मध्ये महाराष्ट्रात पंडिता रमाबाई यांनी विधवा पुनर्वसनासाठी 'शारदा सदन' ही संस्था व १८९६ मध्ये महर्षी कर्वे यांनी हिंगणे येथे महिला आश्रम सुरू केले.

हिंदू धर्मातील दोष दूर करून धर्मांतराची लाट थोपविण्यासाठी ब्राह्मो समाजाची स्थापना झालेली होती. पण या चळवळीमुळे सनातन मंडळी व ब्राह्मो समाज मंडळी यात संघर्ष निर्माण झाला. त्यातून पुढे बंगालमध्ये धार्मिक सुधारणा चळवळ सुरू झाली.

या समाजाने अनेक देवता वाद, कर्मकांड, पुरोहितांचे वर्चस्व, स्वार्थ इ. ना विरोध करून उदार धार्मिक विचार समाजापुढे मांडले. एकूणच या समाजाने १९ व्या शतकात समाज प्रबोधनाचे कार्य सुरू केले. जरी ही सा. सुधारणेची चळवळ बहुजनांपर्यंत पोहोचलेली नसली तरी या चळवळीने आधुनिक भारताचा पाया रचला हे नाकारता येत नाही.

**२) प्रार्थना समाज :** प्रार्थना समाजाची स्थापना १८६७ मध्ये मुंबई येथे डॉ. पांडुरंग आत्माराम तर्खडकर, न्या. महादेव गोविंद रानडे, डॉ. रामकृष्ण भांडारकर इ. च्या मार्गदर्शनाखाली स्थापना झाली.

प्रार्थना समाजाला मूर्तीपूजा मान्य नव्हती, धार्मिक रूढी, अंधश्रद्धा यांचा त्याग यावर प्रार्थना समाजाने भर दिलेला होता, बालविवाह बंदी, स्त्रियांबाबत उदारमतवादी दृष्टिकोन निर्माण करणे, या प्रकारची कार्ये प्रार्थना समाजाची होती. याशिवाय महत्त्वाचे म्हणजे या समाजाने महाराष्ट्रात धार्मिक व सामाजिक सुधारणा करण्याचे कार्य केले.

धार्मिक सुधारणेमध्ये, हिंदू धर्मातील बहुदेवतावाद, मूर्तिपुजा, अवतार कल्पना, कर्मकांडाचे स्तोत्र इ. अनिष्ट प्रथांना त्याज्य ठरविले, आणि विशुद्ध मनाने केलेली प्रार्थना हीच खरी ईश्वरभक्ती असा प्रचार केला. त्यामुळे धार्मिक जागृतीस चालना मिळाली. तसेच हिंदू धर्मातील अनावश्यक कर्मकांडाचे माजलेले स्तोम कमी करून प्रार्थना व सेवा हा ईश्वरभक्तीचा साधासोपा मार्ग दाखवला.

**३) आर्य समाज :** आर्य समाजाची स्थापना स्वामी दयानंद सरस्वती यांनी १८७५ मध्ये केली, आणि १८७७ मध्ये लाहोर येथे आर्य समाजाच्या घटनेस अंतिम स्वरूप देण्यात आले. नंतरच्या काळात भारतासह आफ्रिका, मॉरिशस, सिंगापूर, बँकाक, या देशातही या समाजाच्या शाखा निघाल्या.

वेद हा ईश्वर निर्मित आहे. वेद ज्ञानाचे भांडार आहे म्हणून वेदनिर्णय मानावा. तसेच ईश्वराच्या आराधनेसाठी मध्यस्थांची गरज नसते. असे तत्त्व मानले गेले. हिंदू धर्मातील दोष कमी करून त्यात सुधारणा घडवून आणणे, स्त्री-पुरुष समानतेसाठी प्रयत्न करणे, दलित पिडीत, वंचितांना धर्मांतरापासून रोखणे, स्त्री-

पुरुष समानतेसाठी प्रयत्न करणे, विधवा आश्रमाची सुरुवात केली. मूर्तिपूजेस विरोध केला. कर्मकांड, अंधश्रद्धेला विरोध केला. एकेश्वरवादाचा पुरस्कार केला. कर्मकांड अंधश्रद्धा यावर हल्ला चढविला.

आर्य समाजाने धर्मसुधारणा व राष्ट्रवाद याची सांगड घालण्याचा प्रयत्न करण्यात आला. व्यक्तीने वैयक्तिक हितापेक्षा समाजहितास महत्त्व देण्यात आले यासाठी जनजागृती करण्यात आली.

**सत्यशोधक समाज :**

महात्मा फुले यांनी १८७३ मध्ये सत्यशोधक समाजाची स्थापना केली. या समाजाचे महत्त्वाचे वैशिष्ट्ये म्हणजे कोणत्याही जातीधर्माच्या व्यक्तिस या समाजाचे सदस्य होता येत होते.

सत्यशोधक समाजाची काही तत्त्वे निश्चित केलेली होती. त्यामध्ये ईश्वर हा एक असून तो सर्वव्यापी, निर्गुण, निर्वीकार आणि सत्य स्वरूपाचा आहे. ईश्वरावर भक्ती करण्याचा अधिकार सर्वांचा असून त्यासंदर्भात भटभिक्षुकांच्या मध्यस्थीची गरज नाही. तसेच मनुष्य हा जातीने नाही तर कर्माने श्रेष्ठ ठरतो. पुनर्जन्म, कर्मकांड, व्रतवैकल्ये, जपतप इ. गोष्टी या अज्ञानमूलक आहेत. अशा या मानवतावादी तत्त्वांची पेरणी सत्यधर्माच्या अनुषंगाने महात्मा फुले यांनी केली आहे.

या समाजाच्या माध्यमातून हिंदू धर्मातील पुनर्जन्म, कर्मकांड, व्रतवैकल्य, जपतप, ध्यानधारणा, उपवास, नवस, तीर्थयात्रा इ. गोष्टी या आज्ञानाच्यामुळे निर्माण झालेल्या असून त्यांचा त्याग केला पाहिजे. तसेच धर्म हा सृजनशील व मानवी कल्याण साधणारा असतो. याशिवाय जातिव्यवस्थेत ब्राह्मणवर्गाला श्रेष्ठ स्थान होते, त्यांनी बहुजन समाजावर गुलामगिरी लादली होती. त्यांच्या विरोधामध्ये आवाज उठविण्याचे काम या समाजाने केले. ईश्वराबाबत 'निर्मिकाची संकल्पना त्यांनी मांडली. तसेच समतेचा पुरस्कार करून बालविवाह, विधवा विवाहबंदी, स्त्रीशिक्षणास बंदी केशवपन इत्यादी अनिष्ठ प्रथांना मूठमाती देऊन स्त्री उद्धाराचे कार्य केले.

या समाजाच्या माध्यमातून समता व मानवतेचा संदेश देऊन लोकजागृती घडवून सामाजिक परिवर्तनास चालना दिलेली दिसून येते.

एकूणच विविध चळवळींच्या माध्यमातून धार्मिक, सामाजिक सुधारणेचा प्रयत्न करण्यात आले.

## ४.२.२ धर्म आणि हिंसा :

मानवी जीवनामध्ये धर्माला अत्यंत महत्त्वाचे आणि विशेष स्थान आहे. धर्म हा मानवी समाजाचा एक अविभाज्य घटक आहे. जवळपास सर्वच मानवी समूहांवर कोणत्या ना कोणत्या धर्माचा प्रचंड मोठा असा पगडा किंवा प्रभाव असतो. जसा तो सर्वच मानवी समूहात आहे तसाच तो अगदी मानवाच्या समूहाच्या सुरवातीपासून ते आजपर्यंतच्या अत्यंत प्रगत आणि बुद्धीमान समाजातही अस्तित्वात आहे. प्रगत तंत्रज्ञानाच्या युगातही, मानव चंद्रावर, मंगळावर जाऊन आलेला असला तरी अनेक बाबतीत मानव जेव्हा असहाय्य होतो अशा वेळी तो धार्मिक बाबींचा आश्रय घेताना दिसतो, म्हणजेच तो मानवाच्या मनामध्ये अत्यंत खोलवर गेलेला आहे पिढ्यानपिढ्या मनावर झालेले अनेक धार्मिक संस्कार, आहे तसे

स्विकारण्याची वृत्ती, धर्मचिकित्सा न करता परंपरा पालन करणे अशा मानवाच्या वर्तनामुळे धर्माला आजही तितकेच महत्त्वाचे स्थान आहे किंबहुना धर्माचे महत्त्व शतकानुशतके अबाधित आहे.

धर्माचा अभ्यास करणारे स्वतंत्र असे धर्मशास्त्र आहे. परंतु समाजशास्त्रामध्ये धर्माचा अभ्यास हा सामाजिक दृष्टीकोणातून केला जातो. धर्माला एक सामाजिक तथ्य मानून अभ्यास करणे, अशा एका अभिनव दृष्टीकोणातून मांडणी केली जाते.

धर्माच्या उदयासंदर्भात मांडणी करताना डॉ. विद्याधर पुंडलिक यांनी 'धर्माचे समाजशास्त्र' या पुस्तकामध्ये असे विवेचन केले आहे की, धर्माचा समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून अभ्यास करणे म्हणजे धर्माचा गाभा काय या विषयाकडे न जाता धर्म हा एक विशिष्ट वर्तनप्रकार आहे. या वर्तनप्रकारामागील घटक आणि त्याचे प्रकार काय आहेत, यांचा अभ्यास करणे हे उद्दिष्ट आहे.

वास्तविक 'धर्म' हा शब्दाचा साधा सरळ अर्थ आहे 'धारणा'. जीवन जगण्याच्या संदर्भातील जी चांगली मूल्ये आहेत, ती मूल्ये अंगीकारून कृती करणे आपल्या सद्सदविवेक बुद्धीला प्रमाण मानून जगणे याला वास्तविक धर्म/धारणा असे म्हटले जाते.

'धर्म' ही एक वैयक्तिक बाब आहे. प्रत्येक व्यक्तीने कोणत्या धर्माचे पालन करावयाचे याचेही अधिकार प्रत्येकाला दिलेले आहेत. परंतु या वैयक्तिक धर्माच्या पलिकडे समूहाचा म्हणून एक धर्म असतो, आणि मग जन्माधिष्ठित असणाऱ्या धर्माचा मुखवटा घेवून विविध धर्माचे समूह तयार होतात आणि या समूहापुढे वैयक्तिक धर्म हा झाकला जातो. त्याला असणारे स्वतंत्र अस्तित्व विरून जावून समूहाला एक सदस्य या भूमिकेतून व्यक्ती काम करू लागते. अशा वेळी 'समूहश्रेष्ठतेची' भावना निर्माण होवून, किंवा आपल्या धर्माचे अस्तित्व टिकावे म्हणून, स्वामित्व अबाधित राहावे म्हणून विविध धर्म समूह एकमेकांकडे शत्रु म्हणून बघतात आणि मग धर्माच्या रक्षणासाठी शस्त्र उचलले जातात, बॉम्बस्फोट घडवून आणले जातात, कत्तली केल्या जातात, हिंसाचाराच्या विविध घटना समाजात घडवून आणल्या जातात.

या मुद्द्यामध्ये आपण 'धर्म आणि हिंसा' या विषयावर सविस्तर अध्ययन करणार आहोत.

धर्माच्या रक्षणासाठी वाट्टेल तो त्याग करण्याची तयारी या धार्मिक समूह सदस्यांची असते. धर्माच्या नावाखाली हिंसाचार, रक्तपाताचे वर्तन अशा सदस्यांकडून होताना आपण बघत आहोत. एवढेच नव्हे तर खुद्द ईश्वराचीच तशी आज्ञा असते असे पटवून 'दहशत' पसरवली जाते आणि दुर्दैवाने 'धार्मिक तेढ' 'धार्मिक दहशतवाद' जन्माला घातला जातो, आणि आज आपण पाहातो आहोत की जगभर 'धार्मिक दहशतवादाने थैमान घातले आहे. सत्तालालसेपोटी धार्मिक श्रद्धास्थानांना मध्यभागी ठेवून राजकीय पोळी भाजून घेण्यासाठीही अशी हिंसक कृत्ये ठरवून घडवून आणली जातात.

वास्तविक जगभरातल्या सर्वच धर्मांची शिकवण ही एक नियंत्रित, सुव्यवस्थित, शांत, सुसंस्कृत जीवन देणारी आहे. माणसाला शांतीचा संदेश देणारी, सर्वांना समान मानणारी, 'मानवतावादी' हीच मूळ संकल्पना यात असनाऱ्या धर्माने दहशतवादी स्वरूप धारण केले आहे. असेच दुर्दैवाने म्हणावे लागेल.

**हिंसा आणि धर्माचं नातं :**

हिंसेचे कृत्य खरे तर अधर्माचे आहे धर्माचे नाही. परंतु आजच्या एकूण परिस्थितीचा विचार केला तर असे दिसते की शस्त्राच्या बळावर जगावर स्वामित्त्व गाजवू पाहाणारे लोक हे धर्माच्या नावाचा वापर करत आहेत. वेडी धर्मांधता याच्या पाठीमागे आहे. हिंसेची कारणे शोधताना दुर्दैवाने धर्माजवळच सापडतात. धर्माभिमान, दहशतीमध्ये परावर्तीत होताना दिसतो आहे. सातत्याने विविध कटकारस्थाने धर्माच्या नावावर करून अशांतता माजवण्याचा प्रयत्न हा जाणीवपूर्वकच केला जातो आहे. प्रसिद्ध लेखिका मंगला आठलेकर यांनी 'धर्म आणि हिंसा' या त्यांच्या अतिशय अभ्यासपूर्ण पुस्तकात हिंसेला धर्म कसा जबाबदार आहे याची विविध ऐतिहासिक उदाहरणे दिली आहेत. त्यांच्या मते माणसाच्या क्रौर्याचा इतिहास फार जुना आहे. ज्यांनी धर्म सांगितला त्यांनीच लढायलाही प्रवृत्त केलं. प्रत्येक धर्मामध्ये एक प्रेषित किंवा देवाचा अवतार असतोच. त्यांचे शब्द हे प्राणाहूनही प्रिय असतात तो शब्द पाळण्यासाठी आपल्या प्राणांची आहुती द्यायलाही मागेपुढे पाहात नाहीत. तसेच इतरांचे प्राण घेणेही काही वाईट कृत्य करतो असे वाटत नाही. यासंदर्भात कृष्णाचे उदाहरण दिलेले आहे. कृष्ण दृष्टांच्या निर्दालनावर भर देतो पण दुष्ट लोक कसे सुष्ट होतील यावर त्याचा भर नाही.

धर्मातील अंध भक्तीतूनच हिंसा जन्म घेते, तसेच प्रत्येक अधर्माचं कृत्य हे धर्माच्या प्रोत्साहनातून निर्माण होतो असे वाटण्याइतपत धर्म अधर्माला पाठिंबा देताना दिसतो आहे. जगभरामध्ये जी दहशतवादी कृत्ये घडतात त्याचे समर्थनही याच अर्थाने केले जाते की देवाच्या, अल्लाच्या आदेशाचं पालन केलेले आहे. असे कबूल करणाऱ्या, त्याची जबाबदारी काही संघटना घेत आहेत, म्हणजेच रक्तपात, बॉम्बस्फोट, विनाश, अशांती हे आपण फक्त धर्मासाठी करत अहोत अशा अविर्भावात आहेत. दहशतवादी, सत्तापिपासू लोकांच्या ह्या अतिशय निंदणीय खेळामध्ये सर्वसामान्यांचा नाहक बळी जाताना दिसतो आहे. अशा वेळी धर्म हा खरंच हिंसेला जबाबदार आहे. धर्माचं आणि हिंसेचं नातं ही अगदी जवळचं आहे असे वाटायला लागते. विविध धर्माच्या इतिहासाची पानं उलगडताना त्याची प्रचिती येते. इस्लाम व हिंदू, इस्लाम आणि ख्रिश्चन, ख्रिश्चन आणि ज्यू या धर्मियांमधील धर्म आणि हिंसेचे नाते किती घनिष्ठ आहे हे त्यांच्या विविध कृतीतून दिसून येते. म्हणूनच जगताना धर्म आणि हिंसेचा विचार हा एकत्रित होणेच महत्त्वपूर्ण आहे.

**हिंसा आणि परमेश्वरनिष्ठा :**

जगभरामध्ये दिसणाऱ्या हिंसेची मूळं शोधताना त्यातला एक धागा हा परंपराधिष्ठित असलेल्या परमेश्वरनिष्ठेमध्ये दिसतो. दहशतवादी हे देवाला मानणाऱ्या लोकांच्या श्रद्धाळूपणाचा अनेक वेळा गैरवापर करताना दिसतात. त्यांच्या देवावरच्या श्रद्धेला, देवासंदर्भात असणाऱ्या संवेदनशीलतेचाही फायदा घेताना दिसतात. प्रत्येक धर्मामध्ये वेगवेगळ्या नावांनी 'देव' या कल्पनेचे अस्तित्व आहे. परमेश्वर, अल्ला, गॉड, भगवान, अद्वितीय शक्ती, या नावाने ओळखले जाते आणि प्रत्येक धर्मातील सदस्य हा या देवासंदर्भात अत्यंत भावूक, संवेदनशील असतात. आणि मग या संदर्भात जर विरोधात जावून किंवा तार्कीक मांडणी करत असेल त्याला समाजातून कडव्या विरोधाला सामोरे जावे लागते. त्याची अनेक उदाहरणे आपल्यासमोर

मांडता येतील. उदा. तस्लिमा नसरीन, सलमान रश्दी, हिरसा अली, चित्रकार एम. एफ. हुसेन, यांना त्यांच्या देशामध्ये वेगवेळे कटू अनुभव आलेले आहेत 'देव' ही संकल्पना लोकांच्या भावना दुखावण्याचा, भडकावण्याचा आणि प्रचंड अशांतता मांडण्याचा विषय झाला आहे. कुठेतरी कुणीतरी एखाद्या मंदीरात एखाद्या मूर्तीला काही इजा केली, एखाद्या पुतळ्याची विटंबना अशा घटना वारंवार होताना दिसतात आणि त्यातून मग जाळपोळ, हाणामारी, तोडफोड, जिवे मारणे असे सामाजिक हिंसाचार होताना दिसतात. तिथे विभुतीपुजा, त्याला असणारे महत्त्व अधोरेखित होते आणि त्यातून हिंसा टोकाची होत जाते.

परमेश्वरावर किंवा एखाद्या मूर्तीवर असणारी अंधश्रद्धा ही व्यक्तीला सारासार विचार करण्यापासून बाजूला करते. आणि तार्कीकता, विज्ञान, सत्यापासून तो व्यक्ती बाजूला होतो. सत्ताविस्तार करण्यासाठी अती महत्त्वाकांक्षी लोक याच गोष्टींचा फायदा घेताना सर्व समाजात दिसतात.

वास्तविक हे कळायला हवे की मानवी संकटामध्ये मदत करण्यासाठी देव देवता, मूर्ती या येत नाहीत, देव मृत्यू थांबवत नाहीत, परंतु दुर्दैवाने देवाच्या नावाने हिंसा सुरू होते आणि समाज, माणुसकीचा विनाश होताना दिसतो.

जर अशाप्रकारच्या हिंसा, अशांतता थांबवायचे असेल तर देवाच्या संदर्भातील श्रद्धेला चिकित्सक पद्धतीने तपासून सत्याचा, माणुसकीचा मार्ग स्विकारण्याची फार मोठी गरज निर्माण झाली आहे.

**धर्मगुरू, बुवाबाजी आणि हिंसा :**

धर्म ही एक सामाजिक संस्था आहे आणि त्यांना चालवणारे विविध प्रकारचे व्यक्ती, धर्मपरंपरा, त्यातील असणाऱ्या विभुती व्यक्ती, पीठ आणि मठ संस्थापक असे अनेक गुंतागुंत करणारी संरचना धर्म ही एका अलौकिक गोष्टींवर असणारी श्रद्धा अशी व्याख्या बोलत असताना श्रद्धा आणि श्रद्धातत्त्वांवर आधारित असणाऱ्या सामाजिक संस्था या शुद्ध राहूच शकत नाहीत. तसेच त्या शोषणविरहितही राहू शकत नाहीत. धर्मव्यवस्थेमध्ये श्रद्धा ही व्यक्तीच्या वैयक्तिक स्वभावाचा, आडाणीपणाचा, भोळेपणाचा, दुबळेपणाचा फायदा घेण्याच्या शक्यताही जास्त असल्याचे दिसून येते.

कोणत्याही धर्माची संरचना ही देवकल्पना, विधिनिष्ठा, आचार, पावित्र्याच्या कल्पना, रूढी परंपरा आणि विभुतिमत्त्व यांनी बनलेली असते. यातील विभुतिमत्व म्हणजे या धर्मसंस्थांशी संबंधित काही व्यक्तींमध्ये काही दैवी, गुढ, अलौकिक शक्ती सामर्थ्य असते त्यामुळे त्या व्यक्ती भक्ताला संकटातून मुक्त करतात. अंगारे, उतारे, धुपारे, ताईत, बुका, गुलाल, प्रसाद, मणी, गंडेदोरे, अंगठ्या इ. प्रतिकांचा वापर करणारे बहुसंख्य बाबा बुवा, महाराज, स्वामी हे आपल्या भक्तांना संमोहित करताना दिसतात.

आज अशा प्रकारच्या बाबा, बुवा, महाराज यांचे मोठे पेव सुटलेले आहे. त्यांचे मठ म्हणजे करोडो रुपये कमाई करणारे, लैंगिक अत्याचार स्त्रियांवर करणारे, ढोंगीपणा, विकृतीचे भांडारच आहेत असे लक्षात येते. अशा या मठांमध्ये स्त्री पुरुष भक्तांचे लैंगिक, आर्थिक, मानसिक शोषणच मोठ्या प्रमाणावर केले जातात उदा. सत्यसाईबाबा जे पुटटपारथी येथील आश्रमात लैंगिक विकृत चाळे विद्यार्थ्यांबरोबर करायचे स्वतःच्या लैंगिक आनंदासाठी मुलांवर अत्याचार, दहशत पसरवणे अशी काळी कृत्ये त्यांनी आयुष्यभर

केली आणि त्यांना राजकारणी लोकांचा पाठिंबा असल्यामुळे त्यांचा हा कारभार राजरोसपणे चालूच राहिला. परंतु अतिरेकानंतर मात्र त्यांना त्यांच्याच भक्तांनी बाबांचे पितळ उघडे पाडले. परंतु दरम्यानच्या काळात बऱ्याच निष्पाप लोकांना त्यांच्या विकृतीला बळी पडावे लागले. अशाच प्रकारचे अनेक वाईट कृत्य करणारे असंख्य बाबा-बुवा आपल्याकडे आहेत त्यात स्वामी नित्यानंद, प्रेमानंद, स्वामी रामेश्वरानंद, गिरजी महाराज, गौरी शंकर स्वामी, स्वामी बालयोगी प्रेतवर्णी, कृपाळु महाराज, आसाराम बापू. अशी अनेक नावे बलात्कार, खुनांच्या प्रकरणामध्ये सापडतात. भगवान रजनीश यांचा एक भक्त ख्रिस्तोफर काण्डर जो अतिशय निष्ठावान होता तो नंतर असे म्हणतो - रजनीशांना लाखो डॉलर्स, सार्वभौम सत्ता, जनानखान आणि भरपूर ड्रग्ज हवे होते.

एकूणच धर्माच्या नावाखाली मोठेपणा प्राप्त झालेले असंख्य महाराज, बुवा हे अनेक अनैतिक वर्तने करताना दिसले आणि त्यांना पकडण्यात आले. हिंदूचे हे सगळे आध्यात्मिक गुरू मोक्ष, अधात्म, भक्ती भावाच्या नावाखाली वेगवेगळ्या प्रकारची हिंसा करताना दिसतात. तसेच चर्च मशिदीमध्ये लहान मुले, मुली, स्त्रियांवर अत्याचार होताना दिसून येतात. मशिदीमध्ये असणारे इमाम हे प्रार्थनेसाठी येणाऱ्या मुलांमुलींवर लैंगिक अत्याचार करतात अशी अनेक उदाहरणे समोर आलेली आहेत.

धर्म हिंसेला प्रोत्साहन देतो अशा निष्कर्षाला यायला लावणाऱ्या घटना आज जीवनाच्या जवळ जवळ प्रत्येक क्षेत्रात घडताना दिसतात.

**सांस्कृतिक अत्याचार : ऑनर किलींग :**

ऑनर किलिंगचा अर्थ प्रतिष्ठेच्या रक्षणासाठी केली जाणारी हत्या. ऑनर किलिंगच्या घटना या संस्कृती रक्षणासाठी घडवून आणल्या जातात. लिंगभेदावर आधारित समाजरचना आणि त्यातून स्त्रियांना दुय्यम मानून घराण्याच्या प्रतिष्ठेला काळीमा लावला म्हणून 'ती'ला कठोर शिक्षा, हिंसा केली जात आहे. ऑनर किलिंगचे उत्तरदायित्त्व हे धर्माकडेच जाताना दिसते. मुलीने आंतरजातीय विवाह केला, पळून जावून लग्न केले, परजातीतील मुलाबरोबर लग्न करणं, घटस्फोट घेणे अशा बाबी घराण्याची अप्रतिष्ठा करतात असा एक समज निर्माण केला जातो आणि त्यातून प्रामुख्याने मुलीला ठार मारण्यापूर्वी तिला तिची बाजू मांडण्याची संधीही दिली जात नाही.

घरातल्यांच्या विरोधात जावून आंतरधर्मीय विवाह करणाऱ्या मुलींना महाराष्ट्रासारख्या पुरोगामी राष्ट्रामध्येही ऑनर किलिंगच्या नावाखाली आपल्या पोटच्या मुलींना या जगातून नाहिसे केल्याच्या घटना दिसून येतात. उदा. आशा शिंदे, तसेच जळगावमधील मनिषा शिंदे यांची उदाहरणे आहेत. या दोघींच्या जन्मदात्यांनी त्यांच्या हत्या केल्या परंतु त्या किती समर्थनीय आहेत हेही दाखवण्याचा प्रयत्न समाजात केला गेला. यामध्ये जरी कुठलाही धर्मग्रंथ आपल्याला असे सांगत नाही की अशा प्रकारच्या विवाहानंतर हत्या करा परंतु स्त्रीच्या जगण्याला प्रत्येक धर्माने काही मर्यादा निश्चितपणाने घालून दिलेल्या आहेत हे मात्र नक्की.

ऑनर किलिंगच्या नावाखाली बहुसंख्या मुलींच्याच हत्या होताना दिसतात आणि मग त्यापाठीमागची कारणे तपासली की असे जाणवते की हे जाणीवपूर्वक, पद्धतशीरपणे या प्रकारची मानसिकता घडवली जाते.

'ऑनर किलिंग'च्या निमित्ताने सर्व धर्मात स्त्रीच समाजाच्या टिकेचं लक्ष्य होते हे वास्तव आहे. अनुषंगाने घडणारे असंख्य अत्याचाराची जबाबदारी धर्माकडे जाते हे मान्य करणे आवश्यक आहे.

स्त्रीवरील अत्याचाराला धर्माने मान्यता दिलेली आहे. त्याचं आणखी एक उदाहरण म्हणजे स्त्रीला 'डाकीण' ठरवणं, तिची हत्या करणं 'डाकीण' ही प्रथा आदिवासींमध्ये आजही अस्तित्वात आहे. समाजात असणाऱ्या अघोरी शक्ती अशा एखाद्या स्त्रीमध्ये असतात असा समज. मग गावावर येणारे नैसर्गिक संकट असेल किंवा एखादा साथीचा रोग असेल अशा सर्वच वाईट बाबींना ती कारणीभूत असते असा एक समज गावकऱ्यांचा असतो. मग त्यांचा अतोनात छळ केला. ती मुले खाते, चेटूक करते, रूप बदलते, मंत्रतंत्र करते, काळी जादू करते म्हणून तिला जिवंत जाळणे किंवा मारण्याचेही प्रकार बघायला मिळतात. २००९ मध्ये झारखंडमध्ये दोन बहिणींना डाकीणी ठरवून त्यांना मारण्यात आल्याची घटना थरकाप उडवणारी आहे. काही घटनांमध्ये तर डाकीणी ठरवलेल्या स्त्रियांना विवस्त्र अवस्थेत रस्त्यावरून चालायला लावणे, सामुहिक बलात्कार, त्यांचे स्तन कापणे, दात तोडणे, प्राण्यांचे रक्त प्यायला लावणे अशी कृत्ये केली गेली.

धर्माच्या नावाचा वापर करून असा कित्येक स्त्रियांचा डाकीण म्हणून जगभरात बळी दिला गेला आणि अजूनही जातो आहे.

एकूणच धर्मातूनच अत्यंत भयानक, विदारक मन सुन्न करणाऱ्या हिंसा मोठ्या प्रमाणात होताना दिसतात. हे सर्व प्रकार कमी करायचे असतील तर अंधश्रद्धा सोडून डोळसपणाने धर्माकडे बघणे, चिकित्सा करणे आणि शांततापूर्ण, सहकार्यात्मक आणि खऱ्या अर्थाने धर्माकडून आलेला दयाभाव, करुणा, माणूसकी, मानवतावाद, मानसिक संतुलन या गोष्टी अंगीकारल्या पाहिजेत तरच धर्माला लागलेला हिंसेचा कलंक दूर होणार आहे, आणि जगाला शांती मिळणार आहे.

### ४.२.३ धर्माचे बाजारीकरण :

धर्माची चिकित्सा किंवा धर्माचे तार्कीक पद्धतीने शोध घेण्याचा प्रयत्न अनेक विचारवंतानी घेवून समाजाला धर्म हा व्यक्तीला आदर्श जीवनमूल्ये देतो हे सांगण्याचा वारंवार प्रयत्न केलेला निदर्शनास येतो. ज्या महाराष्ट्रात धर्म विचारांचा शोध बुद्धीने घेण्याचा प्रयत्न झाला त्याच महाराष्ट्रात उलट चित्र फार मोठ्या प्रमाणात दिसत आहे ते म्हणजे धर्मावर असणारी अंधश्रद्धा. डोळसपणाकडे डोळे झाक करून धर्माची कर्मकांडे व त्याद्वारे धर्माबद्दलचा अभिमान, अस्मिता, अहंकार कुरवाळण्याचा किंबहुना त्याला मोठेपणा देण्याचा प्रयत्न होत गेला. व्यक्तीच्या धर्मभावनांचे व्यापारीकरण, बाजारीकरण, विकृतीकरण आणि त्याचे राजकारणही मोठ्या प्रमाणात चालू असल्याचे चित्र जवळपास सर्वच धार्मिक स्थळांच्या ठिकाणी दिसून येते खरं तर हे दुर्दैवच म्हणावे लागेल.

परंपरेने चालत आलेल्या रूढी परंपरांचे जतन करण्यासाठी, यात्रा जत्रा करण्यासाठी सर्वसामान्य माणसे कर्ज काढताना दिसतात. व्रतवैकल्य, सणवार यामध्ये सामान्य जनता व्यस्त आहे. त्याचा गैरफायदा घेणारे अनेक गट तयार झालेले आहेत. लोकवर्गणी हा धार्मिक गोष्टींसाठी अधिक खर्च केले जात आहे. आरोग्य, शिक्षण यापेक्षाही अधिक पैसा व देवाधर्मासाठी, देवळांचे जीर्णोद्धार नवीन मंदीरे उभे करणे यासाठी जास्तीत जास्त वापरला जातो.

मानवी जीवनामध्ये धर्माला वैशिष्ट्यपूर्ण स्थान आहे आणि अत्यंत दीर्घ असा इतिहास आहे. जीवनाचे सर्व आयाम धर्मकल्पनेच्या प्रभुत्वाने व्यापले गेलेले आहेत. सर्व जीवनावर धर्माचीच सत्ता फार दीर्घकाळ चालली आहे. धर्म हा व्यक्तीला जन्मतः मिळतो. परंतु प्रत्येकजण धर्माचा विवेकी विचार करताना दिसत नाही. धर्मविचारांचा बुद्धीने विचार अत्यंत कमी लोक करताना दिसतात. संतानी आपल्या शिकवणीतून चांगली मूल्ये सांगितली, आचरणातही आणली परंतु सर्वसामान्य जनतेने मात्र ते स्विकारले नाही. कर्मकांडे, बुवाबाजी, गंडे, दोरे, उतारे, धुपारे यावर संतानी नकारात्मक भूमिका मांडली, सत्य सांगण्याचा प्रयत्न केला परंतु दुर्दैवाने कर्मकांडाचे आणि उत्सवी धर्माचे साम्राज्य अबाधितच राहिले.

सर्वधर्मसमभावाची भूमिका मांडली जाते. परंतु धर्मा-धर्मात तेढ निर्माण करण्याचे द्वेष निर्माण करण्याचे काम अनेक लोक करताना दिसतात. एका धर्माच्या अनुयायांवर दुसऱ्या धर्माचे अनुयायी हे आक्रमक होतात. हिंसाचार होताना दिसत आहे. धार्मिकतेलाच धर्मांध बनवणाऱ्या शक्ती फोफावत आहेत. वास्तविक धर्माची धार्मिकता ही नैतिकतेकडे वळवण्याचा प्रयत्न हा संतांच्या, समाजसुधारकांच्या माध्यमातून घडला परंतु दुर्दैवाने जाणीवपूर्वकपणे धर्मांधता वाढवण्याचाच प्रयत्न सुरू आहे.

राष्ट्राचे संविधान धर्मनिरपेक्षता सांगणारे आहे. प्रत्येक धर्माचा आदार करणारे आहे. परंतु राजकीय स्वार्थीसाठी, सत्तेसाठी धर्माचा नकारात्मक पद्धतीने वापर करून घेतला जात आहे.

गेल्या काही वर्षात विविध सण दहीहंडी, नवरात्र, गणेशोत्सव यांचे सारेच स्वरूप पालटले आहे. यात भक्तीभावापेक्षाही अर्थकारण जास्त मोठ्या प्रमाणात होत आहे. सणांचे 'इव्हेंट' केलेले आहेत. गणपतीमध्ये देणग्या गोळा करताना होणारी दहशत, मग प्रायोजक मिळवणे, मोठमोठ्या जाहिराती, मंडप, आरास, 'सेलिब्रेटी' त्यांचे कार्यक्रम, मानधन यावर होणारा खर्च हा पाण्यासारखा असतो. त्यानंतर दहीहंडी सारख्या सणांमध्ये युवकांना हाताशी घेवून दही हंडीचे १० थर लावले तर लाखोंची बक्षीसे जाहीर केली जातात. त्यात राजकीय नेते पैसे, बक्षिसे जाहीर करून आपले मतदान पक्के करून घेतात. तसेच विविध धार्मिक सणांमध्ये दक्षिणारूपात कोट्यावधींची उलाढाल होताना दिसते. सणांच्या साजरीकरणात बाजारीकरणच मोठ्या प्रमाणावर होताना दिसते. सण हे विविध मार्गातून पैसा कमविण्याचे साधन होत आहे. त्यातून सणांचे पावित्र्य किंवा जो आनंद, समाधान मिळतो ते कमी होत आहे. धार्मिक सणांच्या व्यावसायिकतेचे स्वरूप बाजारीकरणास भाग पाडत आहे. सद्यःपरिस्थितीमध्ये सणांचे बाजारीकरण झाल्यामुळे सणांचा मूळ उद्देश बाजूला पडून प्रचंड मोठा आवाज, दिखावूपणा, मोठेपणा, राजकारण्यांचा हस्तक्षेप, अंदाधुंद नाचगाणी, डी. जे. आवाज यामुळे ध्वनीप्रदूषण, पाणी प्रदूषण, अपघातांचे प्रमाण वाढले आहेत. कानांबरोबर मनेही बधिर झाली आहेत.

विविध देवस्थानांमध्ये दर्शनासाठी लांबच लांब रांगा दिसून येतात. १०-१० तास रांगेत उभे ताटकळत उभे राहावे लागते. उदा. तिरुपती बालाजीच्या मंदीर VIP दर्शन घेण्यासाठी ५००-१००० ते ५००० पर्यंत पैसे मोजावे लागतात. एकाच मंदीरात एकाच देवासाठी एकच नारळ दहा, पंधरा वेळा विकला जातो आणि पुन्हा पुन्हा तोच नारळ देवासमोर ठेवला जातो. देवाला, देवळात दिल्या जाणाऱ्या देणग्या, प्रसादातून, मिळवले जाणारे उत्पन्न हे दररोजचे कोट्यावधी रुपयांची उलाढाल होताना दिसते.

जो सण आहे त्या देवाची मूर्ती, सणात घालावयाचे कपडे, विशिष्ट प्रसाद, विशिष्ट खेळणी याद्वारेही मोठ्या प्रमाणावर बाजारीकरण होत आहे. म्हणजेच सणांचे भक्तीभावाचे रूप जाणून त्याचे निव्वळ बाजारीकरण झाल्याचेही दिसते. ते स्वरूप अत्यंत बीभत्स झाले आहे. अनेकवेळा मिरवणुकांमध्ये द्वेष, मत्सरामुळे एकमेकांमध्ये राग, घुसमट, गट-तट, राजकारणी लोकांचे गट-तट यातून वाद, मारामारी, प्रसंगी खून पडतानाही दिसतात. गेल्या २० ते २५ वर्षात सणांचे चढत्या श्रेणीने बाजारीकरण होत असून ते अधिक विद्रुप, समाजविघातक असे स्वरूप धारण केलेले आहे.

वास्तविक धर्म वैयक्तिक पातळीवर पाळला तर या गोष्टी घडणार नाहीत किंबहुना सामाजिक पातळीवर साजरा करताना त्याच्या मूळ उद्देशापासून दूर न जाता साजरा केला तरी सण हे सणच राहातील. धार्मिक व्यवहार हे चुकीच्या पद्धतीने होत असल्यामुळे सर्वसामान्य जनताच यामध्ये ओढली जात आहे. श्रद्धेच्या नावाखाली पैसे उकळले जाताना दिसतात. प्रत्येक मोठ्या मंदीराची एक स्वतंत्र भक्कम अर्थव्यवस्था तयार झाली आहे. त्याद्वारे दररोज कोट्यावधींची उलाढाल होताना दिसते आहे.

हे सर्व थांबवायचे असेल तर धर्मनिरपेक्षतेचा संविधानातील आशय जनमानसात रुजविणे त्यावरचा अधिक मूलगामी उपाय आहे. त्यासाठी एका व्यापक कृतिशील जनसंवादाची आणि कृतिशीलतेची गरज आहे. म. फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या सर्वांनी धर्माचे विवेकीकरण संघटीतपणे करणे ही काळाची गरज आहे असे प्रतिपादन केले.

**४.२.४ धर्मनिरपेक्षता आणि राष्ट्रीय एकात्मता :**

**'धर्मनिरपेक्षता', संकल्पना, अर्थ, स्वरूप :**

धर्मनिरपेक्षतेची संकल्पना प्रथम 'जॉज जेकब हॉलिओक' यांनी १८४६ मध्ये मांडली. अर्थात केवळ विचारस्वातंत्र्य याच अर्थाने ही संकल्पना वापरली. धर्मनिरपेक्षता ही संकल्पना दुहेरी अर्थाने वापरली जाऊ शकते असे मत एम. आर. बेगे यांनी मांडले आहे. सर्वधर्माचे पालन करणे अगर कोणत्याही धर्माचे पालन न करणे.

राज्याच्या संदर्भात धर्मनिरपेक्ष विचार म्हणजे अनेक धर्मीयांचे राज्य, कोणताही एक अधिकृत धर्म न मानणारे राज्य असा त्याचा अर्थ होतो. धर्मनिरपेक्षता या संकल्पनेचा अर्थ समजून घेण्यासाठी खालील व्याख्यांचा विचार करता येतो.

**१) पंडित नेहरू :** ''प्रत्येक धर्माच्या व्यक्तीला आपल्या वैयक्तिक धर्माचे, विधींचे स्वातंत्र्य आहे, तो कोणताही धर्म स्विकारू शकतो.''

**२) महात्मा गांधी :** ''सर्वधर्म समभाव म्हणजे धर्मनिरपेक्षता होय. प्रत्येक नागरिकास कोणताही धर्म स्विकारण्याचा अधिकार आहे. सर्वसामान्य कायद्याचे पालन मात्र सर्वांनी करणे अगत्याचे आहे. म्हणून प्रत्येक राज्यात धर्मनिरपेक्षता हवी. धर्म ही वैयक्तिक बाब असून राज्याने त्यात हस्तक्षेप करू नये.''

**३) मौलाना अबुल :** ''प्रत्येक नागरिक कोणत्याही धर्माचा असो त्या सर्वांना समान नागरी अधिकार प्राप्त होणे म्हणजे धर्मनिरपेक्षता होय.''

जे राज्य घटनात्मकदृष्ट्या कोणत्याही विशिष्ट धर्माशी बांधील नाही. तसेच ते कोणत्याही विशिष्ट धर्माला प्रोत्साहन देत नाही. व्यक्ती व समाजाला धार्मिक स्वातंत्र्याची हमी देते ते राज्य म्हणजे धर्मनिरपेक्ष राज्य होय. भारत हे धर्मनिरपेक्ष राज्य आहे. भारताचे घटनाकार, शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानामध्ये धर्मनिरपेक्षतेचे तत्त्व समाविष्ट करून देशाची अखंडता टिकवून ठेवण्यावर भर दिलेला आहे.

धर्मनिरपेक्षतेचे स्वरूप समजावून घेण्यासाठी भारताची राज्यघटना काय प्रतिपादित करते याकडे लक्ष वेधने महत्त्वाचे वाटते. भारतीय समाजाने धर्मनिरपेक्षतेचे धोरण स्विकारले. सर्वांना समान वागणूक, धर्मभेदावरून कोणताही भेदभाव करू नये, समाज हा अधिकाधिक प्रगतिशील, विज्ञाननिष्ठ करण्यासाठी धार्मिक श्रद्धा दूर सारून सारासार विचार केला गेला आणि धर्मनिरपेक्षता हे स्वतंत्र भारताचे एक महत्त्वाचे मूल्य ठरले.

भारतीय राज्यघटना धर्मनिरपेक्ष आहे म्हणजेच, राज्यघटनेनुसार कोणताही विशिष्ट धर्म राज्याचा धर्म म्हणून मानलेला नाही, कोणत्याही धर्माला इतरांपेक्षा महत्त्व दिलेले नाही. धर्माचरण ही सार्वजनिक बाब नसून वैयक्तिक बाब ठरेल. शासकीय धोरणामध्ये धर्माचा अडसर दूर केला जाईल. धार्मिक अंधश्रद्धा, धर्मांधता इ. साठी धर्माचा वापर केला तर शासन त्याला विरोध करेल. धर्माचा वापर जर हिंसाचारासाठी, अशांतता पसरवण्यासाठी केला तर कडक कारवाई करण्यात येईल. धर्माच्या नावावर जनतेची फसवणूक होत असेल तर शासन त्यावर आक्षेप घेईल.

अशा उदात्त दृष्टिकोणाचा विचार भारतीय राज्यघटना करते. सर्व धर्मांना समान वगणूक देण्याचा प्रयत्न राज्यघटनेद्वारे करण्यात आला आहे. सर्व धर्मांना एका सूत्रामध्ये बांधून एक अखंड राज्य बनवण्याचा प्रयत्न केला गेला.

आधुनिक समाजव्यवस्थेमध्ये समन्वयवादी दृष्टिकोन अंमलात आणला गेला आणि धर्मनिरपेक्षता हे एक महत्त्वाचे मूल्य बनले. धर्मनिरपेक्षतेचे तत्त्व अत्यंत महत्त्वपूर्ण आहे ते म्हणजे समाजविकास साधण्यासाठी, धर्माधर्मातील संघर्षावर नियंत्रण साधण्यासाठी, तारतम्य विवेक जागृत ठेवण्यासाठी, सर्वधर्म समभावाची जपणूक करण्यासाठी तसेच व्यक्तीचा निकोप विकासासाठी, धार्मिक सहिष्णुता वाढवण्यासाठी, धर्म निरपेक्षतेचा उपयोग होतो.

असे असले तर धर्मनिरपेक्षता हे मूल्य वास्तविकपणे रूजले आहे का? भारतीय राजकारण धर्मापासून अलिप्त आहे का? सर्वांसाठी समान कायदा व समान वागणूक आहे का असे प्रश्न समोर येतात. या अनुषंगाने भारतातील धर्मनिरपेक्ष तत्त्वाची सत्यता जाणून घेणे महत्त्वाचे आहे.

भारतीय राज्यघटना ही धर्मनिरपेक्ष असूनही धर्म राजकारणात अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावताना दिसतो आहे. राजकीय नेते राजकीय हेतुंच्या पूर्ततेसाठी धर्माचा वापर मोठ्या प्रमाणात करत आहेत. धर्म हे राजकारण खेळण्याचे प्रभावी हत्यार आहे. समान धर्मियांचे संघटन वाढत आहे. आपआपल्या धर्मियांच्या गुप्त बैठका होणे, शस्त्रास्त्रे गोळा करणे, हिंसाचार घडवून आणने या गोष्टी धार्मिक नेते करताना दिसतात. त्यातून धार्मिक दंगली घडतात.

म्हणजेच खऱ्या अर्थाने धर्मनिरपेक्षता निर्माण करण्यासाठी धर्मनिरपेक्ष मने असणे आवश्यक आहे. समाजप्रबोधन, जनजागरण मोहिमांमधून धर्मनिरपेक्षतेची भावना वाढीस लागण्यासाठी प्रयत्न होणे आवश्यक आहे.

धर्मनिरपेक्षता वाढीस लावण्यासाठी प्रत्येक व्यक्तीला इतर धर्मियाबद्दल आदर वाटणे गरजेचे आहे. इतर धर्मातील चांगल्या तत्त्वांचा स्विकार व आदरभाव वृद्धींगत करणे, धर्मापेक्षा व्यक्ती महत्त्वाचा आहे. शिक्षणामध्ये प्रथमपासूनच सर्वधर्म समभाव दृष्टीचा वापर केला जावा. सर्वात महत्त्वाचे म्णजे राजकीय नेत्यांनी कोणत्याही धर्माच्या भावना उत्तेजित करू नये. स्वार्थासाठी धर्म, जातींचा आधार न घेता धर्मनिरपेक्ष वृत्तीचा अंगीकार करावा आणि राष्ट्रीय एकता निर्माण करण्याचे प्रयत्न जाणीवपूर्वक करणे आवश्यक आहे.

**राष्ट्रीय एकात्मता :** संघटन ही प्रत्येक राष्ट्राची शक्ती असते. त्या राष्ट्रातील व्यक्तींमध्ये एकता असणे म्हणजे ते राष्ट्र बलवान, शक्तीशाली, सामर्थ्यशाली असते कारण एकात्मतेच्या आधारावरच आपण परकीय शक्तीपासून विजय मिळवू शकतो. एकता हा भारतीय संस्कृतीचा फार मोठा आधार आहे.

भारतीय समाजाचा विचार करता भारतामध्ये अनेकविध समस्या आपल्यासमोर आहेत. त्यापैकी राष्ट्रीय एकात्मतेची समस्या ही गंभीर स्वरूप धारण करताना दिसत आहे. ज्या राष्ट्रात एकात्मता नसते तिथे देशाचे भवितव्य अंधारलेले असते, धोका निर्माण होतो. राष्ट्रीय एकात्मता नसणे ही मानवानेच निर्माण केलेली समस्या आहे. भारत हा विविधतेने नटलेला देश आहे. या विविधतेतून एकता प्रस्थापित करणे ही मोठी जिकीरीची बाब आहे.

व्यक्ती जीवन जगत असताना दया, क्षमा, शांती असे गुण स्विकारत असला तरी आपसात वैमनस्य, संघर्ष, द्वेष या भावनाही असतात. परंतु जेव्हा राष्ट्रीय एकात्मतेचा विचार केला जातो तेव्हा व्यक्तींनी स्वार्थी प्रवृत्ती न ठेवता इतरांबद्दल, समाजाबद्दल एक व्यापक दृष्टीकोन ठेवला पाहिजे 'मी' पेक्षा 'आम्ही'ची भावना वाढीस लागली पाहिजे.

राष्ट्रीय एकात्मता ही कोणत्याही राष्ट्राची प्रमुख आधारशीला असते. एकच भुप्रदेश, एकच वंश, भाषा, एक धर्म, एकच संस्कृती असणारा समाज म्हणजे राष्ट्रीय एकता असणारा समाज मानला जातो. परंतु

भारतात विविध धर्म, पंथ, जाती, भाषा, संस्कृतींचा वारसा आहे. याच विविधतेतून एकता साधण्यासाठी प्रयत्न केले जातात. स्वातंत्र्यापूर्वी आणि स्वातंत्र्यानंतरही हे प्रयत्न अखंडपणे सुरूच आहेत.

राष्ट्रीय एकात्मता जोपासणे म्हणजे धर्म, वंश, भाषा, जात हे सर्व भेद गळून पडणे आणि आम्ही सर्व भारताचे नागरिक आहोत ही भावना रूजुवात करणे होय.

डॉ. ब्रीज मोहन यांच्या मते, ''राष्ट्रीय एकात्मता ही अशी एक मानसिक, सामाजिक प्रक्रिया आहे की ज्यात सर्व प्रकारचे समूह आपापल्या संकुचित निष्ठा ओलांडून राष्ट्राने स्विकारलेल्या उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी समान सहाभागी होतात.''

म्हणजे राष्ट्रीय एकात्मता निर्माण होण्यासाठी सामाजिक, भावनिक एकात्मता या दोन्हींचा समन्वय घडून येणे महत्त्वाचे आहे.

जेव्हा समूहनिष्ठा, भाषा, प्रांत, धर्म, जात, वंश, भेद बाजूला सारून व्यक्ती राष्ट्रप्रेमाने, राष्ट्रहितासाठी एकत्र येतात, राष्ट्रहिताची जपणूक करतात तेव्हाच खरी राष्ट्रीय एकात्मता साधता येते. परंतु दुर्दैवाने या राष्ट्रीय एकात्मतेच्या मानसिक प्रक्रियेमध्ये जातीयता, धर्मांधता, भाषावाद, सांप्रदायिकता, प्रादेशिक वाद, आर्थिक विषमता, स्वार्थी राजकारण, भ्रष्टाचार, हिंसात्मक आंदोलने, सदोष शिक्षण व्यवस्था, सामाजिक असुरक्षितता असे असंख्य अडथळे आपणास लक्षात येतात. या सर्व अडथळ्यांना बाजूला सारून त्यावर विचारपूर्वक उपाय योजने महत्त्वाचे आहे. बालमनाची संस्कारक्षमता वाढवणे, शैक्षणिक गुणवत्ता वाढवणे, धर्माबद्दलची, जातीबद्दलची अहंकारी भावना वृद्धींगत न करणे, सर्व धर्म समभाव, बंधुता, सौजन्य, सहकार इत्यादी भावना व्यक्तींमध्ये रुजवात करणे, राष्ट्रीय चारित्र्याची निर्मिती करणे, बहुभाषिक करण्याचा प्रयत्न, निकोप राजकारण, देशभक्ती, राष्ट्रभक्तीची जोपासना, संयम, स्वार्थी अहंकारी वृत्तीचा त्याग, या बाबी जर प्रत्येक व्यक्तीमध्ये पेरता आल्या तर नक्कीच राष्ट्रीय एकात्मता ही समस्या राहाणार नाही आणि प्रत्येक भारतीय व्यक्ती गुणागोविंदाने, सुरक्षित वातावरणामध्ये जीवन व्यतीत करेल यामध्ये तीळमात्र शंका नाही.

वरीलप्रमाणे राष्ट्रीय एकात्मतेबाबतचे विवेचन करता येईल.

**स्वयं अध्ययन प्रश्न :**

१) सामाजिक चळवळींचा अर्थ लिहा.

२) सामाजिक चळवळींचे विविध प्रकार शिद करा.

३) 'धर्म आणि हिंसा' यावर निबंध लिहा.

४) धर्माच्या बाजारीकरणाचे स्वरूप विशद करा.

५) 'धर्मनिरपेक्षतेची' संकल्पना स्पष्ट करा.

**अधिक वाचनासाठी पुस्तके :**

१) Salve R. N. : Buddhsim & Education, Shriti Jaipur, 2008

२) Baird, Robert D. : "Relition in Modern India", Manohav, Delhi, 1995

३) डॉ. विद्याधर पुंडलिक : ''धर्माचे समाजशास्त्र'', कॉन्टनेंटल प्रकाशन, २००३.

४) मंगला आठलेकर : ''धर्म आणि हिंसा'', राजहंस प्रकाशन, पुणे, २०१७.

❑❑❑

# घटक : १

# नागर समाजशास्त्राचा परिचय

## (Introduction to Urban Sociology)

**घटक संरचना**

१.१ प्रस्तावना

१.२ उद्दिष्टे

१.३ विषय विवेचन

१.३.१ नागर समाजशास्त्राची व्याख्या व अभ्यासविषय

१.३.२ नागर समाजशास्त्राचे स्वरूप

१.३.३ नागर समाजशास्त्राचे महत्त्व

१.४ स्वयंः अध्ययनासाठी प्रश्न

१.५ सारांश

१.६ स्वयंःअध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.७ स्वाध्याय/गृहपाठ

१.८ चिंतन आणि कार्य

१.९ अधिक वाचनासाठी पुस्तके

## १.१ प्रस्तावना (Introduction)

समाजशास्त्र हे अगदी अलिकडील काळात म्हणजे १९ व्या शतकाच्या पूर्वार्धाच्या शेवटच्या टप्प्यात उदयास आलेले सामाजिक शास्त्र (Social Science) आहे. मानव समाजाचा सर्वांगिण व पद्धतशीर अभ्यास समाजशास्त्र करते. अखिल मानव समाजाचे ग्रामीण समाज (Rural Society) आणि नागर (शहरी) समाज (Urban Society) असे दोन प्रकार पडतात. या दोन्ही समाजांचा परस्परसंबंध येत असला तरी त्यांच्यामध्ये अनेक बाबतीत भिन्नता आहे. तसेच त्यांच्या समस्याही भिन्न आहेत. त्यामुळे या दोन्ही समाजांचे यथार्थ आकलन होण्यासाठी त्यांचा स्वतंत्रपणे अभ्यास करणे योग्य ठरेल असे समाजशास्त्रज्ञांना वाटू लागले. त्यातूनच ग्रामीण समाजाचा अभ्यास करणारे ते ग्रामीण समाजशास्त्र (Urban Sociology) आणि नागर समाजाचा अभ्यास करणारे ते नागर समाजशास्त्र. अशा समाजशास्त्राच्या दोन शाखा उदयास आल्या आहेत. आज या दोन्ही शाखांचा मोठ्या प्रमाणावर विकास झाला असून कांही अभ्यासक त्यांना

स्वतंत्र विज्ञानाचा दर्जा देताना दिसतात. प्रस्तुत ग्रंथात तुम्ही नागर समाजशास्त्र या शास्त्राचा अभ्यास करणार आहात.

## १.२ उद्दिष्टे (Objectives)

या अध्ययन घटकाच्या अभ्यासानंतर तुम्हाला –

- नागर समाजशास्त्राची व्याख्या सांगता येईल.
- नागर समाजशास्त्राचा अभ्यासविषय व व्याप्ती स्पष्ट करता येईल.
- नागर समाजशास्त्राचे स्वरूप व महत्त्व समजावून घेता येईल.

## १.३ विषय विवेचन (Presentation of Subject Matter)

या पहिल्या अध्ययन घटकात तुम्ही नागर समाजशास्त्राचे अभ्यासक्षेत्र समजावून घेणार आहात. अभ्यासाच्या सोयीसाठी हा घटक तीन विभागात विभागलेला आहे. पहिल्या विभागात नागर समाजशास्त्र म्हणजे काय हे समजण्यासाठी कांही मान्यवर समाजशास्त्रज्ञांनी नागर समाजशास्त्राच्या दिलेल्या व्याख्या नमूद केल्या आहेत. तसेच या शास्त्राचा अभ्यासविषय व व्याप्ती ही स्पष्ट केलेली आहे. दुसऱ्या विभागात नागर समाजशास्त्राचे स्वरूप आणि तिसऱ्या विभागात त्याचे महत्त्व विशद केलेले आहे.

### १.३.१ नागर समाजशास्त्राची व्याख्या, अभ्यासविषय आणि व्याप्ती

(Definition and Subject matter of Urban Sociology)

**व्याख्या :** नागर समाजशास्त्र म्हणजे काय हे समजण्यासाठी कांही मान्यवर समाजशास्त्रज्ञांनी नागर समाजशास्त्राच्या केलेल्या पुढील व्याख्या तुम्ही अभ्यासणार आहात.

१. नागर समाजाचा म्हणजेच नागरी सामाजिक संबंधांचा आणि त्या संबंधातून उद्‌भवणाऱ्या सामाजिक समस्यांचा वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास करणारी समाजशास्त्राची एक शाखा म्हणजे नागर समाजशास्त्र होय. – **प्रा. चंद्रकांत खंडागळे.**

२. नागर समाजशास्त्र हे सामाजिक क्रिया, सामाजिक संबंध सामाजिक संस्था या सर्वांवर पडणाऱ्या नागरी जीवन पद्धतीच्या प्रभावाचा आणि नागरी जीवन पद्धतीवर आधारित आणि तिच्याद्वारे विकसित होणाऱ्या सभ्यतेचा अभ्यास करणारे शास्त्र आहे. – **ई. ई. बर्गेल**

३. नागरी सामाजिक जीवन आणि नागरी समस्या यांचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे नागर समाजशास्त्र होय. – **ए. टी. हॉबहाऊस**

४. नगर किंवा नागर समुदायाबरोबर नागरीकरण आणि नगरवाद यांची चर्चा करणारी समाजशास्त्राची शाखा म्हणजे नागर समाजशास्त्र होय. – **जे. ए. क्विन्न**

५. नागरी सामाजिक जीवन आणि संघटन यांच्या अभ्यासाशी एकनिष्ठ असलेले किंवा वाहिलेले समाजशास्त्रातील एक स्वतंत्र क्षेत्र म्हणजे नागर समाजशास्त्र होय. – **विल्यम पी. स्कॉट**

६. नागर समाजशास्त्र हे शहरात आणि नगरात राहणाऱ्या व्यक्तींचे जीवन आणि समाज यांच्याशी संबंधित आहे. – **नेल्स एण्डरसन**

७. नागरी पर्यावरणातील व्यक्तींबरोबरच नागरी समूहांच्या परस्परसंबंधाचा अभ्यास म्हणजे नागर समाजशास्त्र होय. – **लॉरी नेल्सन**

वरील व्याख्यांवरून हे स्पष्ट होते की नागर समाजशास्त्र ही समाजशास्त्राची एक शाखा आहे. या शाखेत नागर समाजातील म्हणजेच शहर (Town) आणि नगर (City) यांमध्ये राहणाऱ्या लोकांच्या परस्परसंबंधांचा, सामाजिक जीवनाचा, सामाजिक संघटनांचा व सामाजिक समस्यांचा अभ्यास होतो.

**अभ्यास विषय:** वरील विविध व्याख्यांवरून नागर समाजशास्त्राच्या अभ्यासविषयाची व व्याप्तीची सर्वसाधारण कल्पना येते. नागर समाजशास्त्राचा अभ्यास विषय व व्याप्ती यांची सविस्तर कल्पना येण्यासाठी कांही मान्यवर अभ्यासकांनी या संदर्भात मांडलेली मते अभ्यासणे अधिक उचित ठरेल.

१. **श्रीमती एल. डब्ल्यू. ब्राइस** आणि **बेंजामिन खान** यांनी आपल्या Introduction to Urban Sociology या ग्रंथात नागर समाजशास्त्राचा अभ्यासविषय स्पष्ट करताना म्हटले आहे की, ''नागर समाजशास्त्र ही समाजशास्त्राची नवीन व महत्त्वपूर्ण शाखा असून ती नगरांचा (Cities) आणि नगरांशी संबंधित असलेल्या सर्व समस्यांच्या अभ्यासाशी संबंधित आहे. ह्या नागरी समस्या (Urban Problems) मानवी समस्या असून त्यांची सोडवणूक ही मानवी दृष्टिकोनातूनच मानवाकडून झाली पाहिजे.'' यावरून नागर समाजशास्त्रात १) नगरांचा अभ्यास व २) नागरी समस्यांचा अभ्यास अंतर्भूत असल्याचे स्पष्ट होते.

२. **गार्डन इरिक्सन** यांनी आपल्या Urban Behaviour या ग्रंथात नागर समाजशास्त्रात पुढील चार बाबींचा अभ्यास होतो असे नमूद केलेले आहे.

१) नगर नियंत्रण

२) नागरी सामाजिक संरचना

३) नागरी सभ्यता व संस्कृती

४) नागरी सामाजिक संघटन

इरिक्सन यांनी असेही म्हटले आहे की, ''एक सामाजिक विज्ञान म्हणून नागर समाजशास्त्र हे नागरी सामाजिक जीवनाची निर्मिती करणाऱ्या संपूर्ण परिस्थितीचा व आंतरसंबंधांचा अभ्यास करण्यामध्ये रूची (रस) घेते. हे शास्त्र नागरी सामाजिक जीवनाच्या केवळ एखाद्याच अंगाचे नव्हे तर सर्व अंगांचे (पैलूंचे) विवेचन करते.

३. **पार्क आणि बर्गेस** यांनी आपल्या The Urban Community या ग्रंथात नागर समाजशास्त्राच्या अभ्यास विषयाचे पुढील तीन भाग पाडलेले आहेत.

**अ) परिस्थितीशास्त्र** (Ecology) : यामध्ये भौगोलिक आणि नैसर्गिक परिस्थितीचा अभ्यास समाविष्ट आहे. वेगवेगळ्या ठिकाणाची भौगोलिक व नैसर्गिक परिस्थिती वेगवेगळी असते आणि तिचा मानवाचे जीवन, व्यवहार, परस्परसंबंध, जीवन पद्धती इत्यादीवर प्रभाव पडत असतो. नागर समाजशास्त्र हे नागरी समुदायावर प्रभाव टाकणाऱ्या भौगोलिक व नैसर्गिक परिस्थितीचा अभ्यास करते. पार्क व बर्गेस यांनी परिस्थितीशास्त्राचे मानव परिस्थितीशास्त्र (Human Ecology) आणि सामाजिक परिस्थितीशास्त्र (Social Ecology) असे दोन भाग पाडलेले आहेत.

ब) **सामाजिक संघटन** (Social Organization) **-** नागर समाजशास्त्र नागरी सामाजिक संघटनाचा अभ्यास करते. नागरी सामाजिक संघटन हे ग्रामीण सामाजिक संघटनापेक्षा वेगळे असते. नागरी सामाजिक संघटनामध्ये प्राथमिक समूह, संस्था व संघटना यांना कमी महत्त्व असते. नागर समाजशास्त्र हे नागर समुदायातील कुटुंब, जाती, वर्ग, आर्थिक संस्था, मनोरंजन संस्था, राजकीय संस्था इत्यादींचा सविस्तर अभ्यास करते.

**क) सामाजिक विघटन** (Social Disorganization) : नागर समाजशास्त्र हे नागरी जीवनातील विघटनकारी शक्तींचा व प्रक्रियांचाही अभ्यास करते. ग्रामीण जीवनापेक्षा नागरी जीवन हे विविध गंभीर व संकीर्ण समस्यांनी ग्रस्त असल्याचे आढळते. नागर समाजशास्त्र हे गलिच्छ वस्ती, गुन्हेगारी व बालगुन्हेगारी, वेश्याव्यवसाय, भिक्षावृत्ती, मद्यपान, मादक पदार्थांची व्यसनाधिनता, भ्रष्टाचार, दारिद्र्य, बेकारी इत्यादी नागरी समस्यांचा अभ्यास करते.

वरील अभ्यासकांच्या तसेच इतरही कांही अभ्यासकांच्या मतांच्या आधारे नागर समाजशास्त्राच्या अभ्यासात किंवा व्याप्तीत पुढील गोष्टींचा समावेश होतो.

**१. नागर समुदायाचा अभ्यास :** नेल्स एण्डरसन यांनी म्हटल्याप्रमाणे नागर समाजशास्त्रात नागर समुदायाचा म्हणजेच शहरांचा (Towns) व नगरांचा (Cities) अभ्यास केला जातो. त्यादृष्टीने नागर समुदाय म्हणजे काय? त्याची कोणती वैशिष्ट्ये आहेत? नागर समुदायाची भौतिक रचना कशी आहे? नागर समुदायाचे म्हणजेच शहरांचे व नगरांचे विविध निकषांच्या आधारे कोणकोणते प्रकार पडतात? इत्यादी प्रश्नांचा ऊहापोह नागर समाजशास्त्रात केला जातो.

२. **नागरी जीवनपद्धतीचा अभ्यास :** नागर समाजशास्त्र हे नगरातील लोकांच्या जीवनपद्धतीचा किंवा जीवनशैलीचा (Life-style) अभ्यास करते. नागरी जीवनपद्धती ही ग्रामीण जीवनपद्धतीहून खूपच वेगळी असते. तिच्यावर नैसर्गिक पर्यावरणापेक्षा मानव निर्मित (कृत्रिम) पर्यावरणाचा अधिक प्रभाव असतो. शास्त्रीय व तांत्रिक ज्ञानावर आधारलेल्या यंत्रांचा व तंत्रांचा वापर नागरी समुदायातील लोक मोठ्या प्रमाणावर करतात. या गोष्टीचा त्यांचे राहणीमान, आचारविचार, खाणेपिणे, वेशभूषा-केशभूषा इत्यादींवर

मोठा प्रभाव पडलेला असतो. यातूनच या समुदायात एक वेगळी जीवनशैली उदयास आलेली असते. यालाच लुईस वर्थने नगरवाद (Urbanism) असे म्हटले आहे. नागर समाजशास्त्र हे नागरी पर्यावरणातील अशा जीवनपद्धतीचा अभ्यास करते.

३. **नागरी सामाजिक संघटनाचा अभ्यास :** पार्क व बर्गेस यांनी नागरी सामाजिक संघटनांचा अभ्यास हा नागर समाजशास्त्राचा एक महत्त्वाचा विभाग मानला आहे. सामाजिक संघटनाच्या अभ्यासात सामाजिक संस्था, सामाजिक समूह, सामाजिक स्तरीकरण व्यवस्था व इतर यंत्रणांचा समावेश होतो. त्यामुळे नागर समाजशास्त्र हे नागर समाजातील कुटुंब व विवाह यासारख्या सामाजिक संस्थांचा, आप्तसंबंधी समूह (Kinship groups) व व्यावसायिक समूह (Occupational groups) यासारख्या सामाजिक समूहांचा, जातिव्यवस्था व वर्गव्यवस्था यासारख्या सामाजिक स्तरीकरण व्यवस्थेचा तसेच नगरातील नगरपरिषद व महानगरपालिका यासारख्या प्रशासकीय यंत्रणांचा म्हणजेच स्थानिक स्वराज्यसंस्थांचा अभ्यास करते.

४. **नागरी सामाजिक प्रक्रियांचा अभ्यास :** नागर समाजातील व्यक्ती-व्यक्ती, व्यक्ती-समूह आणि समूह-समूह यांच्यात घडणाऱ्या सामाजिक आंतरक्रियांचा म्हणजेच प्रक्रियांचा अभ्यास नागर समाजशास्त्र करते. त्यादृष्टीने नागर समाजातील सहकार्य, स्पर्धा, संघर्ष इत्यादी सामाजिक प्रक्रियांचे साधार विवेचन केले जाते.

५. **आर्थिक जीवनाचा अभ्यास :** नागर समाजात अर्थव्यवस्थेस प्राधान्य दिले जाते. येथील अर्थव्यवस्था ही उद्योगप्रधान असते. शहरात विभिन्न प्रकारचे उद्योगधंदे स्थापन झालेले असतात. या उद्योगधंद्यांचा लोकांच्या केवळ आर्थिकच नव्हे तर सामाजिक, सांस्कृतिक व मानसिक जीवनावरही मोठा प्रभाव पडलेला असतो. त्यामुळे नागर समाजशास्त्रात उद्योगधंद्यांचा व औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेचा सांगोपांग अभ्यास केला जातो. नागर समाजातील आर्थिक-औद्योगिक संस्था व संघटनांचा सामाजिक संदर्भात अभ्यास केला जातो. औद्योगिकीकरण व यांत्रिकीकरण यांचा नागरी जीवनावरील प्रभाव ही अभ्यासला जातो.

६. **राजकीय जीवनाचा अभ्यास :** शहरे किंवा नगरे ही आज राजकीय जीवनाची किंवा राजकारणाची केंद्रे बनलेली आहेत. नगरातील लोक हे राजकीयदृष्ट्या अधिक जागरूक बनलेले आढळतात. कारण नगरात अनेक राजकीय संस्था, संघटना, पक्ष व दबावगट कार्यरत असतात. त्यांची राजकीय विचारसरणी ही भिन्न भिन्न असते. आपापल्या विचारसरणीचा प्रभाव वाढविण्याचा ते सतत प्रयत्न करीत असतात. त्यामुळे नागरी समाज जीवनावर राजकीय घडामोडींचा मोठा प्रभाव पडत असतो. म्हणून नागर समाजशास्त्रात शहरातील राजकीय घडामोडींचा अभ्यास केला जातो.

७. **धार्मिक जीवनाचा अभ्यास :** साधारणपणे असे मानले जाते की ग्रामीण समाजाच्या तुलनेत नागर समाजात धर्माचा प्रभाव व महत्त्व कमी असते. तथापि वस्तुस्थिती अशी आहे की सर्वच प्रमुख धार्मिक संघटनांची कार्यालये व क्रियाविधी ह्या खेड्यापेक्षा शहरात अधिक प्रमाणात आढळतात. या धार्मिक संघटना व त्यांचे नेते हे प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे कोणत्या ना कोणत्या आर्थिक, राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक

शक्तींशी संबंधित असतात. त्यामुळे शहरातील जीवनावरही धार्मिक संस्था, संघटना व विचारसरणीचा कमीजास्त प्रभाव पडतच असतो. नागर समाजशास्त्र ह्या धार्मिक प्रभावाचाही अभ्यास करते.

८. **नागरीकरणाच्या प्रक्रियेचा अभ्यास :** नागर समाजशास्त्र हे नागरीकरणाच्या प्रक्रियेचाही अभ्यास करते. आधुनिक काळात जगातील सर्वच समाजात ग्रामीण लोक मोठ्या प्रमाणावर शहरांकडे वा नगरांकडे स्थलांतर करू लागले आहेत. त्यामुळे नगरांचा आकार व लोकसंख्या वाढत चालली आहे. तसेच नगरातील जीवनशैलीचा (Life-style) प्रभावही वाढत चालला आहे. या प्रक्रियेसच स्थुलमानाने नागरीकरण म्हणतात. नागर समाजाचा अभ्यास करताना नागरीकरणाच्या प्रक्रियेची कारणे, नागरीकरणाचे प्रवाह व सिद्धांत, नागरिकरणाचे परिणाम इत्यादींचा अभ्यास केला जातो.

९. **नागरी समस्यांचा अभ्यास :** नागर समाजशास्त्र हे नागरी समस्यांचाही अभ्यास करते. औद्योगिकीकरण, नागरीकरण, दळणवळणाची व वाहतुकीची प्रगत साधने, वाढती लोकसंख्या इत्यादी घटकांचा प्रभाव पडून नागर समाजात दारिद्र्य, बेकारी, गुन्हेगारी व बालगुन्हेगारी, वेश्याव्यवसाय, भिक्षावृत्ती, मद्यपान व मादक पदार्थांची व्यसनाधिनता, वाहतुकीची कोंडी व अपघात, पर्यावरणाचे प्रदूषण इत्यादी अनेक गंभीर समस्या उद्‌भवल्या असून त्यांची तीव्रता वाढत चालली आहे. त्यामुळे या समस्यांची कारणे व त्यावरील उपाययोजना यांचा ऊहापोह या शास्त्रात केला जातो.

१०. **नगर नियोजनाचा अभ्यास :** नागर समाजशास्त्र हे नगर नियोजनाचाही अभ्यास करते. नागरी समस्यांची सोडवणूक करून नगरांचा पद्धतशीर विकास करणे, नगरांची पुनर्रचना करणे यालाच नगर नियोजन म्हणतात. नगरांच्या विकासासाठी केल्या जाणाऱ्या सर्व कार्यक्रमांची व योजनांची चर्चा नागर समाजशास्त्रात केली जाते. त्यादृष्टीने नगर नियोजनाचा अर्थ, प्रकार, तत्त्वे, नगर नियोजनाची अंमलबजावणी, त्याच्या मार्गातील अडथळे इत्यादींचा अभ्यास ह्या शास्त्रात केला जातो.

११. **सामाजिक परिवर्तनाचा अभ्यास :** ग्रामीण समाजापेक्षा नागर समाजात सामाजिक परिवर्तनाची गती अधिक आहे. नागरी सामाजिक संबंध व सामाजिक संस्था, नागरी जीवन पद्धती, इत्यादीमध्ये वेगाने परिवर्तन घडून येत आहे. त्यामुळे नागर समाजाचा अभ्यास करताना ह्या परिवर्तनाचे स्वरूप व कारणे, तसेच त्याची गती व दिशा ह्यांचा अभ्यास केला जातो.

### १.३.२ नागर समाजशास्त्राचे स्वरूप (Nature of Urban Sociology)

नागर समाजशास्त्राची व्याख्या, अभ्यास विषय व व्याप्ती अभ्यासल्याने या शास्त्राच्या स्वरूपाची सर्वसाधारण कल्पना येते. त्याच्या स्वरूपाची अधिक सविस्तर, परिपूर्ण व सुस्पष्ट कल्पना येण्यासाठी पुढील मुद्दे अभ्यासावे लागतात.

१. **नागर समाजशास्त्र हे एक विज्ञान आहे :** कारण ते नागर समाजाचा वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास करते. वैज्ञानिक पद्धती ही अभ्यासाची एक विशेष पद्धती आहे. या पद्धतीने एखाद्या विषयाचा अभ्यास करताना सर्वप्रथम त्या विषयाशी संबंधित असलेल्या घटनांची निरीक्षणाद्वारे वस्तुनिष्ठ माहिती गोळा करतात.

यालाच **तथ्य संकलन** (Collection of Data) असे म्हणतात. नंतर त्या माहितीचे किंवा तथ्यांचे **संश्लेषण** (Synthesis), **विश्लेषण** (Analysis) व **वर्गीकरण** (Classification) केले जाते. नंतर या माहितीच्या आधारे घटनाघटनांमधील परस्परसंबंधाविषयी एखादा अंदाज (तर्क वा कयास) म्हणजेच अभ्युपगम किंवा गृहीतकृत्य (Hypothesis) केले जाते. पुढे त्या अभ्युपगमाची प्रथम प्रचिती (Verification) घेतली जाते व नंतर त्याची सिद्धी (Proof) केली जाते. त्यानंतर अशा सिद्ध झालेल्या अभ्युपगमाचे **सामान्यीकरण** (Generalization) करून त्याला सामान्य नियमाचे (General Law) रूप दिले जाते. आणि शेवटी या नियमाचा अगोदरच्या नियमांशी समन्वय साधला जातो. याला **स्पष्टीकरण** (Explaination) असे म्हणतात. अशा पद्धतीने एखाद्या विषयाला लागू पडणारे अनेक नियम शोधून काढले व त्यांची सुव्यवस्थित रचना केली की त्यास शास्त्र किंवा विज्ञान असे म्हणतात. कोणत्याही विषयाचे या पद्धतीने मिळविलेले ज्ञान विज्ञान ठरते. म्हणूनच एखाद्या विशिष्ट विषयाशी संबंधित असलेली ज्ञानाची सुव्यवस्थित रचना म्हणजे विज्ञान होय. (Science is a systematic body of knowledge pertaining to a particular subject matter) अशी व्याख्या आपणास करता येते. वेगवेगळ्या विषयांचा वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास होऊ लागल्याने वेगवेगळी विज्ञाने (शास्त्रे) उदयास आलेली आहेत. प्रत्येक शास्त्र आपल्या अभ्यासविषयास लागू पडणारे नियम शोधून काढते. उदा. पदार्थ विज्ञान जडद्रव्यांचा (Matters) अभ्यास करून त्यासंबंधीचे नियम शोधून काढते. उदा. मागणी पुरवठ्याचा नियम. नागर समाजशास्त्र देखील असेच एक शास्त्र आहे. नागर समाज हा त्याचा अभ्यासविषय आहे. नागर समाजाचा वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास करून त्यासंबंधीचे सामान्य नियम ते शोधून काढते. म्हणून ते एक विज्ञान ठरते.

२. **नागर समाजशास्त्र हे एक अनुभवाधिष्ठीत (Empirical) विज्ञान आहे** अनुभवनिरपेक्ष शास्त्रे (Non-empirical sciences) आणि अनुभवाधिष्ठीत शास्त्रे (Empirical Sciences) असे एक शास्त्रांचे वर्गीकरण आहे. ज्या शास्त्रातील नियम (ज्ञान) हे केवळ बौद्धिक चिंतनातून स्फुरलेले असतात व त्यांचे प्रामाण्यही (सत्यता) केवळ बुद्धीच्या साह्यानेच तपासले जाते त्यासाठी अनुभवाची गरज नसते त्या शास्त्रांना अनुभवनिरपेक्ष शास्त्रे म्हणतात. उदा. तर्कशास्त्र आणि गणित. याउलट ज्या शास्त्रातील नियमांची उभारणी ही अनुभवाच्या आधारे झालेली असते व त्यांचे प्रामाण्यही अनुभवाच्याच आधारे तपासले जाते त्या शास्त्रांना अनुभवाधिष्ठित (अनुभवावर आधारलेली) शास्त्रे असे म्हणतात. उदा. पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र, जीवशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र इत्यादी. हैड्रोजन व ऑक्सिजन यांच्या संयोगातून पाणी तयार होते हा रसायनशास्त्रातील नियम किंवा हरितद्रव्य बनविण्यासाठी वनस्पतींना सूर्यप्रकाशाची गरज असते हा वनस्पतीशास्त्रातील नियम, केवळ बौद्धिक चिंतनाद्वारे कधीच समजला नसता. त्यासाठी अनुभवाची गरज भासते. म्हणून ही शास्त्रे अनुभवाधिष्ठीत शास्त्रे ठरतात. नागर समाजशास्त्र हे देखील असेच एक अनुभवाधिष्ठीत शास्त्र आहे. कारण त्यातील नियमांची उभारणी ही नागर समाजातील सामाजिक घटनांच्या आधारे होते. नागर समाजशास्त्र हे केवळ बौद्धिक चिंतन न करता नागरी सामाजिक घटनांचा अनुभव घेऊन त्याआधारे नागरी जीवनाविषयीचे सामान्य नियम शोधून काढते म्हणून ते अनुभवाधिष्ठीत शास्त्र ठरते.

**३. नागर समाजशास्त्र हे तथ्यात्मक किंवा वस्तुनिष्ठ** (Positive) **विज्ञान आहे :** तथात्मक शास्त्रे (Positive Sciences) आणि आदर्शात्मक शास्त्रे (Normative Sciences) असेही एक शास्त्रांचे वर्गीकरण आहे. जी शास्त्रे आपल्या विषयाचा अभ्यास आदर्शांच्या (Ideals) किंवा मूल्यांच्या (Norms or Values) संदर्भात करतात त्यांना आदर्शवादी शास्त्रे म्हणतात. उदा. तर्कशास्त्र, नीतिशास्त्र व सौंदर्यशास्त्र. याउलट जी शास्त्रे आपल्या विषयाचा अभ्यास तथ्यांच्या किंवा वस्तुस्थितीच्या (Facts) संदर्भात करतात त्यांना तथ्यात्मक शास्त्रे असे म्हणतात. उदा. पदार्थविज्ञान, रसायनशास्त्र, जीवशास्त्र, अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, समाजशास्त्र इत्यादी. आदर्शात्मक शास्त्रे 'काय असावे (What ought to be)' या प्रश्नाचा तर तथ्यात्मक शास्त्रे काय आहे (What is) या प्रश्नाचा अभ्यास करतात. नीतिशास्त्र हे मानवाचे वर्तन आदर्श स्वरूपात कसे असावे यादृष्टिकोनातून मानवी वर्तनाचा अभ्यास करते. आणि त्यानुसार मानवी वर्तनात योग्य-अयोग्य किंवा चांगले-वाईट असा भेद करते. याउलट नागर समाजशास्त्र हे शहरी लोकांचे वर्तन प्रत्यक्षात कसे आहे यादृष्टीकोनातून अभ्यासते. त्यामध्ये योग्य-अयोग्य किंवा चांगले-वाईट असा भेद न करता शहरी लोकांचे वर्तन जसे आहे तसा स्वरूपात अभ्यासते. म्हणून ते तथ्यात्मक शास्त्र ठरते.

**४. नागर समाजशास्त्राकडे पूर्वकथन क्षमता (Power of prediction) आहे.** कोणत्याही शास्त्रातील नियम हे समान परिस्थितीत सर्वत्र खरेच ठरतात. त्यामुळे त्या नियमांच्या आधारे पूर्वकथन करता येते. जी स्थिती आता उपलब्ध नाही तिच्याविषयी कांहीतरी निवेदन (Statement) करणे म्हणजे पूर्वकथन होय. पूर्वकथन हे भविष्यकाळाप्रमाणेच भूतकाळासंबंधीचेही असते. उदा. खगोलशास्त्रातील नियमांच्या आधारे भविष्यात केव्हा व कोठे ग्रहणे होतील हे अचूकपणे सांगता येते. पुरातत्त्वशास्त्रातील नियमांच्या आधारे उत्खननात सापडलेल्या वस्तूंचा कालावधी सांगता येतो. नागर समाजशास्त्रातील नियमांच्या आधारेही असे पूर्वकथन करता येते. ज्या विशिष्ट परिस्थितीत सामाजिक घटनांचा अभ्यास करून नागर समाजशास्त्र निष्कर्ष काढते तीच परिस्थिती इतरत्र विद्यमान असेल तर तेथेही ते निष्कर्ष हमखासपणे लागू पडतील असे कथन नागर समाजशास्त्र करू शकते. समान परिस्थितीत विशिष्ट घटना घडून येतील असे पूर्वकथन हे शास्त्र करते. तसेच अशा पूर्वकथन क्षमतेच्या आधारे नागरी समस्या सोडविण्यासाठी व नागर समाजाचा विकास घडवून आणण्यासाठी कांही कार्यक्रम ही हे शास्त्र सुचवू शकते. तथापि येथे एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे व ती म्हणजे नैसर्गिक शास्त्रांचे निष्कर्ष हे अधिक निश्चित व काटेकोर असल्याने त्यांच्या साह्याने अधिक अचूक पूर्वकथन करता येते. नागर समाजशास्त्राचे (इतरही सामाजिक शास्त्रांचे) निष्कर्ष हे तितकेसे निश्चित व काटेकोर नसल्याने त्यांच्या साह्याने केलेले पूर्वकथन हे नेहमीच अचूक ठरेलच असे नाही.

**५. नागर समाजशास्त्र ही समाजशास्त्राची एक शाखा आहे :** नागर समाजशास्त्राचा उदय हा अलिकडील काळात विसाव्या शतकाच्या प्रारंभी झाला असला तरी त्याने अल्पावधीतच खूपच प्रगती केलेली आहे. नागर समाजाविषयी शास्त्रशुद्ध असे विपूल ज्ञान त्याने उपलब्ध करून दिलेले आहे. त्यामुळे ते एक स्वतंत्र विज्ञान आहे असे वाटू शकते. तथापि ते स्वतंत्र विज्ञान नसून समाजशास्त्राची ती एक विशेष शाखा (Branch) आहे असेच बहुसंख्य समाजशास्त्रज्ञ मानतात. कारण समाजशास्त्रातील अभ्यासपद्धती, सिद्धांत व संकल्पना यांचा वापर करून नागर समाजाचा अभ्यास हे शास्त्र करते. म्हणूनच विल्यम स्कॉट हे

नागर समाजशास्त्रास 'नागरी सामाजिक जीवन व संघटन यांचा अभ्यास करणारे समाजशास्त्राचे एक स्वतंत्र क्षेत्र मानतात. नेल्स एण्डरसन हे देखील ग्रामीण समाजशास्त्राप्रमाणेच नागर समाजशास्त्रासही समाजशास्त्राची एक शाखा मानतात. थोडक्यात समाजशास्त्र हे समाजाचा अभ्यास करते. तर नागर समाजशास्त्र हे केवळ नागर समाजाचा अभ्यास करते. त्यामुळे ते समाजशास्त्राची एक शाखा ठरते.

थोडक्यात नागर समाजशास्त्र हे नागर समाजाचा वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास करणारे अनुभवाधिष्ठीत व तथ्यात्मक विज्ञान असून त्याच्याकडे पूर्वकथन क्षमता आहे आणि ते समाजशास्त्राची एक शाखा आहे.

### **१.३.३ नागर समाजशास्त्राचे महत्त्व** (Importance of Urban Sociology)

नागर समाजशास्त्राची व्याख्या, अभ्यासविषय व स्वरूप अभ्यासल्यानंतर तुम्ही या शास्त्राचे महत्त्व समजावून घेणार आहात. पुढील मुद्यांच्या आधारे या शास्त्राचे महत्त्व स्पष्ट करता येईल.

१. **नगर – मानवी सभ्यतेचे केंद्र :** नागर समाजशास्त्र हे नगरातील लोकांच्या जीवनाचा अभ्यास करते. नगरे ही प्राचीन काळापासून मानवाच्या सभ्यतेची (Civilization) केंद्रे असल्याचे आढळते. जगातील विविध प्राचीन सभ्यतांचा (उदा. सिंधु संस्कृती, इजिप्तची संस्कृती, रोमन व ग्रीक संस्कृती इ.) उदय व विकास हा नगरातच झालेला होता. आधुनिक काळात तर मानवाच्या सभ्यतेच्या व संस्कृतीच्या विकासात नगरांचेच मोठे योगदान असल्याचे आढळते. नवी मूल्ये, नवे विचार, नव्या कल्पना, नवीन शोध, इत्यादींचा उदय हा नगरांमध्येच होतो व तेथूनच या गोष्टींचे संक्रमण खेड्यांमध्ये होते. त्यामुळे आधुनिक नगरे ही मानवी सभ्यतेची व संस्कृतीची खरीखुरी केंद्रे बनली आहेत. मानवाने नगरे वसविली असली तरी नगरांनीच मानवास सभ्य किंवा सुसंस्कृत मानव (Civilized man) बनविली आहे. थोडक्यात मानवी सभ्यतेचा इतिहास म्हणजे नगरांचा इतिहास असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. म्हणून मानवी सभ्यता व संस्कृती समजावून घ्यावयाची झाल्यास आपणास नगरांचा अभ्यास करणे अनिवार्य ठरते. नागर समाजशास्त्र हे नगरांचा व तेथील लोकांच्या जीवनाचा सर्वांगिण व पद्धतशीर अभ्यास करणे. म्हणून त्यास महत्त्व प्राप्त होते.

२. **निम्म्या जगाचे शास्त्र :** मानवाच्या सामूहिक जीवनाच्या उत्क्रांतीच्या प्रक्रियेत प्रथम खेडी व नंतर नगरे उदयास आली. प्रदीर्घ काळापर्यंत म्हणजेच औद्योगिक क्रांती होईतोपर्यंत जगातील बहुसंख्यांक लोक हे खेड्यांतच राहात होते. त्यामुळे नगरांपेक्षा खेड्यांनाच अधिक महत्त्व होते. औद्योगिक क्रांतीनंतर हे चित्र पालटले. नगरे ही उद्योग, व्यापार, शिक्षण, आरोग्य सुविधा, प्रशासन, दळणवळण, मनोरंजन इत्यादींचे केंद्रे बनली. परिणामी खेड्यातील लोक नगरांकडे स्थलांतर करू लागले. त्यामुळे पूर्वीच्या नगरांचा विस्तार होऊ लागला. कांही नवी नगरे ही उदयास येऊ लागली. यातूनच नगरात राहणाऱ्यांची संख्या उत्तरोत्तर वाढत चालली आहे. आज जगातील एकूण लोकसंख्येच्या जवळजवळ निम्मी लोकसंख्या ही नगरात वास्तव्य करते. त्यामुळे नगरांचा व तेथील लोकांच्या जीवनाचा अभ्यास करणारे नागर समाजशास्त्र हे जगातील निम्म्या लोकांचे शास्त्र ठरते. म्हणून ते महत्त्वाचे ठरते.

३. **नगरांचे यथार्थ आकलन :** नागर समाजशास्त्र हे नगरांचा व तेथील लोकांच्या परस्परसंबंधांचा, त्यांच्या जीवनपद्धतीचा व सामाजिक संस्थांचा व संघटनांचा तसेच नागरी समस्यांचा वैज्ञानिक पद्धतीने

अभ्यास करते. त्यामुळे आपणास नगरांचे म्हणजेच नागर समाजाचे समग्र व यथार्थ ज्ञान मिळते. परिणामी नगरातील लोकांविषयीचे व जीवनाविषयीचे आपले पूर्वग्रह, गैरसमजूती, काल्पनिक मते इत्यादी दूर होण्यास मदत होते. थोडक्यात नागर समाजशास्त्र हे नागरी जीवनाच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक इत्यादी सर्व अंगाविषयीचे समग्र व वैज्ञानिक ज्ञान पुरवित असल्याने ते महत्त्वाचे ठरते.

४. **सामाजिक समायोजनासाठी उपयुक्त :** आधुनिक काळात दळणवळणाच्या प्रगत साधनांमुळे खेड्यांचा व नगरांचा परस्परांशी घनिष्ठ संपर्क येत आहे. हे दोन्ही विभाग आपापल्या गरजापूर्तीसाठी एकमेकांवर अवलंबून आहेत. नगर हे खेड्यावर अन्नधान्य, दूध, भाजीपाला, फळे, कारखान्यासाठी लागणारा कच्चा माल इत्यादीसाठी अवलंबून आहे. तर खेडे हे नगरावर रोजगार, शिक्षण, प्रशिक्षण, आरोग्य सुविधा, चैनीच्या वस्तू व कारखान्यातून तयार होणारा पक्का माल इत्यादीसाठी अवलंबून आहे. त्यामुळे खेडे व नगर ही परस्परावलंबी बनली आहेत. आज जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे संपूर्ण जग हेच एक जणू गाव बनले आहे. त्यामुळे वेगवेगळ्या जीवनपद्धीचे लोक एकत्र येणे अपरिहार्य बनले आहे. अशा परिस्थितीत खेड्यातील व नगरातील लोकांना परस्परांच्या जीवनपद्धतीचे ज्ञान असणे आवश्यक ठरते. अन्यथा सामाजिक असमायोजनाची समस्या निर्माण होऊ शकते. म्हणून नागर समाजशास्त्र हे केवळ नगरातीलच नव्हे तर खेड्यातील लोकांच्या दृष्टीनेही उपयुक्त ठरते. या संदर्भात लॉरी नेल्सन म्हणतात की ग्रामीण किंवा शहरी व्यक्तीस आपला समाज सोडून इतर समाज कोणत्या परिस्थितीत राहतो हे माहित नसेल तर ती व्यक्ती पुरेशी सुशिक्षित आहे असे म्हणता येणार नाही. नागर समाजशास्त्रामुळे आपणास ग्रामीण व नागर समाजातील साम्यभेदांचे व परस्परसंबंधाचे ज्ञान होते. आणि हे ज्ञान असलेल्या व्यक्तीस कोणत्याही समाजाशी समायोजन साधणे सुलभ जाते. थोडक्यात आजच्या बदलत्या परिस्थितीत नागर समाजशास्त्राचे ज्ञान सामाजिक समायोजनाच्यादृष्टीने उपयुक्त ठरते.

५. **नागरी समस्यांची सोडवणूक :** नागरी समस्यांची सोडवणूक करण्यासाठी नागर समाजशास्त्राचे ज्ञान उपयुक्त ठरते. नागर समाजशास्त्र हे नागरी जीवनातील दारिद्र्य, बेकारी, गुन्हेगारी, भिक्षावृत्ती, वेश्याव्यवसाय, एड्स, प्रदूषण इत्यादी समस्यांचा शास्त्रीयदृष्टीने अभ्यास करते. या समस्यांची कारणे शोधून काढून त्यांच्या निर्मूलनाचे उपायही हे शास्त्र सूचविते. त्यामुळे नागरी समस्यांच्या सोडवणुकीसाठी किमान त्यांची तीव्रता कमी करण्यासाठी हे शास्त्र उपयोगी पडते. नगरातील विविध समस्यांविषयी लोकमत जागृत करणे, त्या समस्यांविरुद्ध लोकमत संघटीत करणे व त्या समस्येच्या निर्मूलनासाठी आखलेली उपाययोजना यशस्वी करणे इत्यादी कार्ये नागर समाजशास्त्रीय संशोधनाच्या आधारे पार पाडता येतात. उदा. शहरी लोकांना गलिच्छ वस्त्यांचे (झोपडपट्टीचे) आरोग्यावर व नैतिक जीवनावर होणाऱ्या दुष्परिणामांची जाणिव करून देऊन गलिच्छ वस्ती सुधारणा कार्यक्रम यशस्वी करता येतो. उद्योगधंदे, वाहतूक साधने, नागरी कचरा इत्यादीमुळे नागरी पर्यावरणाचे होणारे प्रदूषण कसे घातक आहे हे पटवून देऊन पर्यावरणाच्या संरक्षणाचे व संवर्धनाचे कार्यक्रम यशस्वी करता येतात.

६. **नगर नियोजनाच्यादृष्टीनेही उपयुक्त :** नागर समाजशास्त्र हे नगर नियोजनाच्यादृष्टीने उपयुक्त ठरत असल्याने त्यास महत्त्व आहे. आज औद्योगिकीकरण व नागरीकरण या दोन प्रक्रियांची गती वाढत

चालली आहे. या वाढीस व्यवस्थित रूप देण्यासाठी नियोजनाची गरज भासते. नागर समाजशास्त्र हे नगर नियोजनाचे स्वरूप, तत्त्वे, अंमलबजावणी तसेच नगर नियोजनाच्या मार्गातील अडथळे, नगर नियोजनाचे विविध प्रकार इत्यादींचा सविस्तर ऊहापोह करते. नगर नियोजन कोणत्याही प्रकारचे असो त्यासाठी अगोदर नगराच्या रचनेचे सविस्तर अध्ययन उपलब्ध असेल तरच ते नगर नियोजन यशस्वी होऊ शकते. नागर समाजशास्त्र हे नगररचनेचे यथार्थ व संपूर्ण ज्ञान उपलब्ध करून देते त्यामुळे नगर नियोजनाच्यादृष्टीने हे शास्त्र उपयुक्त ठरते.

७. **नगर विकासासाठी उपयुक्त :** नागर समाजशास्त्र हे नगर विकासाच्यादृष्टीनेही उपयुक्त ठरते. नगर नियोजनाचा मूळ उद्देश हा नगर विकास घडवून आणणे हा असतो. आज जगातील सर्वच नगरे ही विविध समस्यांनी ग्रासलेली आहेत. या समस्यांची सोडवणूक करून नगरांचा विकास करण्यासाठी विविध कार्यक्रम व योजना आखल्या व राबविल्या जात आहेत. तथापि नगरांचे व तेथील समस्यांचे शास्त्रीय ज्ञान नसलेल्या लोकांनी जर ह्या कार्यक्रमांची व योजनांची आखणी व अंमलबजावणी केली तर मात्र नगर विकास होणे असंभव आहे. नागर समाजशास्त्र हे नागरी जीवन व समस्यांचे शास्त्रशुद्ध ज्ञान उपलब्ध करून देते. त्यामुळे अशा ज्ञानाच्या आधारे आखलेले व राबविलेले नगर विकासाचे कार्यक्रम हमखासपणे यशस्वी ठरू शकतात. म्हणून नागर समाजशास्त्र हे महत्त्वाचे ठरते.

अशाप्रकारे विविध दृष्टिकोनातून नागर समाजशास्त्रास महत्त्व आहे. आज नगरांची संख्या व नागरीकरणाची गती वाढत आहे. नागरी जीवन पद्धतीचा प्रभाव खेड्यातील लोकांवरही वाढत आहे. त्यामुळे नगरे, नागरीकरण व नागरी जीवनपद्धती यांचा अभ्यास करणाऱ्या नागर समाजशास्त्राचे महत्त्वही वाढत चालले आहे.

## १.४ स्वयंःअध्ययनासाठी प्रश्न (Check Your Progress)

खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

१. अखिल मानव समाजाचे कोणते दोन प्रकार आहेत?

२. नागर समाजशास्त्राची कोणतीही एक व्याख्या द्या.

३. नागर समाजशास्त्रास तथ्यात्मक शास्त्र का मानले जाते?

४. नागर समाजशास्त्रातील निष्कर्षांच्या साह्याने केलेले पूर्वकथन नेहमी अचूक ठरेलच असे का म्हणता येत नाही?

५. नागरी समस्यांच्या सोडवणुकीसाठी नागर समाजशास्त्राचे ज्ञान कसे उपयुक्त ठरते?

## १.५ सारांश (Let us Sum up)

या अध्ययन घटकात तुम्ही नागर समाजशास्त्राची व्याख्या, अभ्यासविषय, स्वरूप आणि महत्त्व इत्यादी बाबी अभ्यासलेल्या आहेत. नागर समाजाचा म्हणजेच नागरी सामाजिक संबंधाचा व या संबंधातून

उद्‌भवणाऱ्या सामाजिक समस्यांचा वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास करणाऱ्या समाजशास्त्राच्या शाखेस नागर समाजशास्त्र असे म्हणतात. नागर समाजशास्त्रात नागर समुदाय, नागरी जीवन पद्धती, नागरी सामाजिक संघटन, नागरी सामाजिक प्रक्रिया, नागर समाजातील आर्थिक, राजकीय व धार्मिक जीवन, नागरीकरणाची प्रक्रिया, नगर नियोजन व नागर समाजातील परिवर्तन इत्यादी बाबींचा सविस्तर व पद्धतशीर अभ्यास केला जातो. नागर समाजशास्त्राचे स्वरूप समजावून घेण्यासाठी तुम्ही पुढील मुद्दे अभ्यासलेले आहेत. १) नागर समाजशास्त्र हे एक विज्ञान आहे. २) ते अनुभवाधिष्ठीत विज्ञान आहे. ३) ते तथ्यात्मक विज्ञान आहे. ४) त्याच्याकडे पूर्वकथन क्षमता आहे. ५) ते समाजशास्त्राची एक शाखा आहे. आधुनिक काळात नागर समाजशास्त्रास खूपच महत्त्व प्राप्त झालेले आहे. कारण नागर समाज हा मानवी सभ्यतेचे व संस्कृतीचे केंद्र आहे. हे शास्त्र नागर समाजाविषयी वस्तुनिष्ठ वा वैज्ञानिक माहिती पुरविते. या शास्त्रातील ज्ञानाच्या आधारे अनेक सामाजिक समस्यांची सोडवणूक करता येते. तसेच नगर नियोजन, नगर विकास व नगरांची पुनर्रचना इत्यादीसाठी ही या शास्त्रातील ज्ञान उपयोगी पडते. म्हणून नागर समाजशास्त्राच्या अभ्यासास महत्त्व प्राप्त झाले आहे.

## १.६ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे (Answers to check your progress)

१. अखिल मानव समाजाचे ग्रामीण समाज व नागर समाज असे दोन प्रकार पडतात.

२. नागर समाजाचा म्हणजेच नागरी सामाजिक संबंधांचा आणि त्या संबंधातून उद्‌भवणाऱ्या सामाजिक समस्यांचा वैज्ञानिक पद्धतीने अभ्यास करणारी समाजशास्त्राची एक शाखा म्हणजे नागर समाजशास्त्र होय.

३. नागर समाजशास्त्र हे शहरी लोकांच्या वर्तनात योग्य-अयोग्य किंवा चांगले-वाईट असा भेद न करता त्यांचे वर्तन जसे आहे अशा स्वरूपात अभ्यासते म्हणून ते तथ्यात्मक शास्त्र मानले जाते.

४. नागर समाजशास्त्राचे निष्कर्ष हे तितकेसे निश्चित व काटेकोर नसल्याने त्यांच्या साह्याने केलेले पूर्वकथन हे नेहमीच अचूक ठरेलच असे म्हणता येत नाही.

५. नागर समाजशास्त्र हे नागरी समस्यांची कारणे व उपाययोजना यासंबंधीचे शास्त्रीय ज्ञान देत असल्याने ते ज्ञान नागरी समस्यांच्या सोडवणुकीसाठी उपयुक्त ठरते.

## १.७ स्वाध्याय/गृहपाठ (Exercise/Home Assignment)

**अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. नागर समाजशास्त्राची व्याख्या देऊन त्याचा अभ्यास विषय स्पष्ट करा.

२. नागर समाजशास्त्राची व्याख्या देऊन त्याचे स्वरूप स्पष्ट करा.

**ब) टीपा लिहा.**

१. नागर समाजशास्त्राचे महत्त्व

२. नागर समाजशास्त्राचे स्वरूप

## १.८ चिंतन आणि कार्य (Reflection and Action)

ग्रामीण समाजशास्त्र व नागर समाजशास्त्र या दोन शाखांची तुलना करा आणि त्यांच्यातील साम्यभेदांची नोंद करा.

## १.९ अधिक वाचनासाठी पुस्तके (Suggested Readings)


१. Urban Sociology - E. E. Bergel.

२. Urban Sociology - Anderson Nels and Ishwaran K.

३. नगरीय समाजशास्त्र - शशी के जैन - रिचर्स पब्लिकेशन्स जयपूर, १९९६.

४. नगरीय समाजशास्त्र - शारदा तिवारी, अर्जुन पब्लिशिंग हाऊस, नई दिल्ली, २००४.


❑❑❑

# घटक : २

# नागर समाजशास्त्रातील प्रमुख संकल्पना

## (Major Concepts in Urban Sociology)

**घटक संरचना**

२.१ प्रस्तावना

२.२ उद्दिष्टे

२.३ विषय विवेचन

  २.३.१ नागर समुदाय

  २.३.२ नगरवाद

  २.३.३ ग्रामीण नागर भिन्नता

२.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

२.५ सारांश

२.६ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.७ स्वाध्याय/गृहपाठ

२.८ चिंतन आणि कार्य

२.९ अधिक वाचनासाठी पुस्तके

## २.१ प्रस्तावना (Introduction)

पहिल्या घटकात नागर समाजशास्त्राची व्याख्या, अभ्यासविषय, स्वरूप, महत्त्व इत्यादींचा अभ्यास केल्यानंतर आता तुम्ही या दुसऱ्या घटकात नागर समाजशास्त्रातील कांही प्रमुख संकल्पना अभ्यासणार आहात. एखाद्या शास्त्राचे यथार्थ आकलन होण्यासाठी त्यातील महत्त्वाच्या संकल्पनांची ओळख करून घेणे आवश्यक असते. नागर समाजशास्त्राचे यथार्थ आकलन होण्यासाठी त्या शास्त्रातील ''नागर समुदाय, नगरवाद व ग्रामीण - नागर भिन्नता'' या तीन संकल्पना आपण अभ्यासणार आहात. त्यामुळे या घटकांचे तीन विभागात विभाजन केलेले आहे. पहिल्या विभागात नागर समुदाय या संकल्पनेची, दुसऱ्या विभागात नगरवाद या संकल्पनेची, तिसऱ्या विभागात ग्रामीण-नागर भिन्नता या संकल्पनांची चर्चा केलेली आहे.

## २.२ उद्दिष्टे (Objectives)

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर तुम्हास –

- नागर समुदायाचा अर्थ व वैशिष्ट्ये सांगता येतील.
- नगरवाद या संकल्पनेचा अर्थ व वैशिष्ट्ये स्पष्ट करता येतील.
- ग्रामीण व नागर समुदायातील भिन्नता समजावून घेता येईल.

## २.३ विषय–विवेचन (Presentation of Subject-Matter)

यानंतर आपण नागर समुदाय, नगरवाद, ग्रामीण–नागर भिन्नता व ग्रामीण–नागर सातत्य या चार संकल्पनांचे क्रमशः सविस्तर विवेचन करणार आहोत.

### २.३.१ नागर समुदाय (Urban Community)

**अर्थ व व्याख्या :**

नागर समुदाय हा मानवी समाजाच्या विकासातील अत्यंत प्रगत टप्पा आहे. आधुनिक काळात नागर समाजास अनेक दृष्टीने खूपच महत्त्व प्राप्त झालेले आहे. तथापि प्राचीन काळापासून मानव समाजात नगरे अस्तित्वात असल्याचे दिसून येते. नगर हा शब्द city (सिटी) या इंग्रजी शब्दाचे भाषांतर आहे. city हा शब्द लॅटीन भाषेतील civitous (सिविटॉस) या शब्दापासून बनला असून त्याचा अर्थ 'नागरीकता' असा आहे. तथापि यावरून नगर म्हणजे काय याचा स्पष्ट बोध होत नाही. नगर म्हटले की आपल्या डोळ्यांसमोर मोठा आकार, दाट लोकवस्ती, पक्की व उंच घरे, माणसांची गर्दी, वाहतूक साधनांनी गजबजलेले रस्ते, विविध उद्योगधंदे, बाजारपेठा, व्यवसाय, शिक्षण प्रशिक्षण संस्था, धर्मस्थळे, करमणुकीची साधने यासारख्या असंख्य गोष्टी उभारतात. तरी परंतु नगराची सर्वसामान्य अशी समाजशास्त्रीय व्याख्या करणे कठीण आहे. वेगवेगळे निकष वापरून व्याख्या करण्याचे प्रयत्न केले जातात. ते निकष पुढीलप्रमाणे :

१) **लोकसंख्या :** जास्त लोकसंख्येच्या वस्तीस नगर असे म्हणतात. पण ही व्याख्या समाधानकारक नाही. कारण वेगवेगळ्या देशात याबाबत वेगवेगळी स्थिती आढळते. उदा. फ्रान्समध्ये २०००, अमेरिकेत २५००, भारतात ५००० तर नेदरलँडमध्ये २००००, तर डेन्मार्कमध्ये केवळ २५० लोकसंख्येच्या वस्तीला नगर मानले जाते. लोकसंख्येची घनता विचारात घेऊन बऱ्याचवेळा लोकसंख्येची घनता जास्त असलेल्या वस्तीला नगर म्हटले जाते. परंतु नेमक्या किती लोकसंख्येच्या घनतेच्या आधारावर खेडे व शहर यामध्ये भेद करावा हे ठरविण्यात अडचण येते. कारण ऑस्ट्रेलिया न्यूझिलंड यासारख्या देशातील कांही नगरामध्ये लोकसंख्येची घनता केवळ १० आहे तर कांही नगरात ती ३५० इतकी आहे. भारतात कमीत कमी ४०० इतकी लोकसंख्येची घनता नागर समुदायासाठी आवश्यक मानली आहे.

२) **व्यवसाय :** व्यवसाय हा निकष लावून बिगरशेती व्यवसाय असणाऱ्या वस्तीस नगर म्हटले जाते. यासंदर्भात **डब्ल्यू. एफ. विलफॉक्स** म्हणतात, 'जेथे निर्वाहाचा प्रमुख आधार शेती असतो ते खेडे व जेथे

शेती व्यवसाय अजिबात नसतो ते शहर होय' पण ही व्याख्या ही निर्दोष नाही. कारण कांही देशातील अनेक लहान लहान खेड्यात बिगरशेती व्यवसाय चालतो. मग त्यांना नगर म्हणावयाचे काय?

३) **पर्यावरण व जीवनपद्धती :** या निकषांच्या आधारे खेडे व नगर यामध्ये भेद केला जातो. खेड्यातील पर्यावरण नैसर्गिक असते तर शहरात मानवनिर्मित पर्यावरणाचा प्रभाव असतो असे म्हटले जाते. तसेच खेड्यापेक्षा शहरातील जीवनपद्धती अधिक पुढारलेली किंवा सुधारलेली (Civilized) असते असाही फरक सांगितला जातो. तथापि अशी तुलना योग्य ठरत नाही. **मॅकायव्हर** म्हणतात त्याप्रमाणे ग्रामीण समुदाय कोठे संपतो व नागर समुदाय कोठे सुरू होतो यांमध्ये निश्चित सीमारेषा आखणे अवघड आहे. आजच्या बदलत्या परिस्थितीत शहरालगतच्या खेड्यांमध्ये नागरी जीवनपद्धतीचा शिरकाव झाला असून तेथेही मानवनिर्मिती वा कृत्रिम पर्यावरणाचा प्रभाव वाढत आहे. याउलट मोठमोठ्या शहरातील झोपडपट्ट्या व गरिबांच्या वस्त्यांमध्ये ग्रामीण जीवन पद्धतीची लक्षणे आढळतात. सारांश शुद्ध ग्रामीण व शुद्ध नागरी असे समुदाय आज दिसून येत नाहीत.

थोडक्यात नागर समुदायाची व्याख्या करणे अवघड आहे. तथापि कांही समाजशास्त्रज्ञांनी केलेल्या व्याख्या पुढीलप्रमाणे :

१) **प्रा. चंद्रकांत खंडागळे :** साधारणपणे मर्यादित भूप्रदेशातील दाट व विजातिय स्वरूपाची लोकसंख्या, बिगरशेती व्यवसाय, बाजारपेठा, शैक्षणिक, आरोग्य, दळणवळण व करमणूक सुविधांची विपुलता, दुय्यम संबंधाचे प्राबल्य, कृत्रिम पर्यावरणाचा अधिक प्रभाव इत्यादी वैशिष्ट्यांनी युक्त असलेल्या मानवी वस्तीस नगर किंवा नागर समुदाय असे म्हणतात.

२) **लेवीस ममफोर्ड :** इतिहासावरून हे स्पष्ट होते की नगर असे केंद्र आहे की जेथे समुदायातील अधिकतम शक्ती व संस्कृतीचे केंद्रीकरण झालेले असते. शहर हे सामाजिक संबंधाच्या समग्रतेचे प्रतिक व स्वरूप असते. ते धर्म, व्यवसाय, न्याय व ज्ञान यांचे महत्त्वपूर्ण केंद्र असते.

३) **थियोडार्सन आणि थियोडार्सन :** नगर म्हणजे असा समुदाय की ज्यामध्ये लोकसंख्येची घनता अधिक असते, बिगरशेती व्यवसायांना प्राधान्य असते, संकीर्ण श्रमविभाजनातून उदयास आलेले उच्च दर्जाचे विशेषीकरण आणि स्थानिक स्वराज्य संस्थांची औपचारीक व्यवस्था आढळते. या व्याख्येत शहराची प्रमुख वैशिष्ठ्ये स्पष्ट झाली आहेत.

४) **भारताच्या १९९१ च्या जनगणना अहवालानुसार** 'जेथे नगरपालिका, महानगरपालिका, कँटोनमेंट बोर्ड आहे, किमान लोकसंख्या ५००० व काम करणाऱ्या पुरुषांपैकी शे. ७५ पुरुष बिगरशेती व्यवसायात असून लोकसंख्येची घनता दर चौ. कि. मी. ला किमान ४०० आहे असे क्षेत्र नागरी समुदाय ठरते.' याशिवाय नव्याने विकसित झालेले क्षेत्र, विकास प्रकल्पाच्या निमित्ताने स्थापन झालेल्या वसाहती, रेल्वे वसाहती, महत्त्वाची पर्यटन केंद्रे यांचाही नागर विभागात समावेश केला जातो.

**नागर समुदायाची वैशिष्ट्ये :**

**१) मानवनिर्मित पर्यावरण :** नागर समुदायावर नैसर्गिक पर्यावरणापेक्षा मानवनिर्मित पर्यावरणाचा अधिक प्रभाव असतो. हा समुदाय निसर्गापासून कांहीसा दूर असल्याने त्याच्यावर नैसर्गिक घडामोडींचा प्रत्यक्ष प्रभाव फारसा पडत नाही. शहरी लोक आपल्या गरजापूर्तीसाठी निसर्गावर फारसे अवलंबून न राहता विज्ञान तंत्रज्ञानावर आधारलेल्या मानवनिर्मित कृत्रिम उपकरणांचा वापर करण्यावर विशेष भर देतात. ग्रामीण लोक पाण्याची गरज नदी, ओढा, तलाव याद्वारे भागवितात. याउलट शहरी लोक कृत्रिम पाणीपुरवठ्याची सोय करून ही गरज भागवितात. शहरात उन्हाळ्यात थंड हवा मिळविण्यासाठी पंखा-कूलर, एअरकंडिशन अशी कृत्रिम साधने वापरतात.

या मानवनिर्मित पर्यावरणाचा शहरी समुदायावर परिणाम झालेला दिसतो. शहरी लोक अधिक जिज्ञासू व चिकित्सक बनलेले असतात. निसर्गात व समाजजीवनात घडणाऱ्या घटनांकडे ते वैज्ञानिक दृष्टीने पाहतात. घटना घटनांमधील कार्यकारण संबंध शोधण्याचा खटाटोप करतात. वैज्ञानिक व तांत्रिक ज्ञानाच्या प्रभावामुळे शहरी लोक अंधश्रद्धा, देवभोळ्या कल्पना, अशास्त्रीय व आतार्किक विचार व दैववादीवृत्ती इत्यादीपासून बऱ्याच प्रमाणात दूर असतात. विज्ञानवाद, बुद्धिवाद, प्रयत्नवाद इत्यादीच्या आधारे कृत्रिम पर्यावरण तयार करून आपले जीवन अधिक सुसह्य व समृद्ध बनविण्याचा प्रयत्न शहरी लोक करतात.

**२) बिगरशेती व्यवसाय :** नागर समुदायातील लोकांचे व्यवसाय बिगरशेती स्वरूपाचे असतात. शहरात विविध तऱ्हेचे व्यवसाय उपलब्ध असतात. उद्योगधंदे, कारखाने, व्यापारपेठा, शिक्षणसंस्था, करमणूक केंद्रे, वाहतूक व संदेशवहनाची व्यवस्था आणि शासकीय-निमशासकीय कार्यालये इत्यादींची शहरात रेलचेल असते. आणि या सर्वांमध्ये काम करून शहरी लोक आपला निर्वाह चालवित असतात. हे सर्व व्यवसाय बिगरशेती व्यवसाय म्हणून ओळखले जातात. शहरात शेतीसाठी आवश्यक असणाऱ्या वस्तूंचे उदा. अवजारे, खते, जंतुनाशके, कीटकनाशके इ. चे. उत्पादन करणारे व शेतीमालावर प्रक्रिया करणारे उद्योगही असतात. अशा उद्योगातही काही शहरी लोक गुंतलेले असतात. असे उद्योग ही बिगरशेती व्यवसायच ठरतात.

**३) मोठा आकार :** नागर समुदाय आकाराने मोठा असतो. शहराची लोकसंख्या खेड्याच्या तुलनेत जास्तच असते. शिवाय शहरात लोकसंख्येची घनता देखील जास्त असते. मर्यादित जागेवर हजारो, लाखो व कांही शहरात तर करोडो लोक दाटीवाटीने रहात असतात. शहरी समुदाय उद्योगधंद्याचे, व्यापाराचे, रोजगाराचे, शिक्षणाचे केंद्र असल्याने सभोवतालच्या भागातून लोक शहरात सतत स्थलांतर करीत असतात. त्यातूनच शहराचा आकार किंवा विस्तार वाढत जातो. नगराच्या भोवती उपनगरे अस्तित्वात येतात व त्यातूनच कांहींना महानगराचे स्वरूप येते. दळणवळणाच्या प्रगत साधनांमुळे शहराचे आकारमान वाढण्यास मदत होते.

**४) सामाजिक विजातीयता :** नागर समुदायात विजातीयता मोठ्या प्रमाणावर असते. विविध व्यवसायांची उपलब्धता व दळणवळणाची प्रगत साधने यामुळे देशाच्या विविध भागांतून भिन्न वंशाचे, भिन्न

धर्मांचे, भिन्न जातींचे, भिन्न भाषेंचे व भिन्न संस्कृतीचे लोक शहरात एकत्र आलेले असतात. त्यांची सामाजिक-सांस्कृतिक तसेच आर्थिक पार्श्वभूमी भिन्न भिन्न असते. अशा लोकांचे लहान लहान समूह शहरात अस्तित्वात येतात. त्यामुळे त्यांच्यामध्ये आचारविचार, श्रद्धामूल्ये, जीवनविषयक दृष्टिकोन व जीवनपद्धती इत्यादीबाबतीत विविधता निर्माण होते. लोकसंख्येतील या विविधतेलाच सामाजिक विजातीयता म्हणतात.

५) **सामाजिक सहिष्णुता :** नागर समाज सामाजिकदृष्ट्या विजातीय असला तरी देखील त्यामध्ये सामाजिक सहिष्णुता मोठ्या प्रमाणावर असते. मोठी लोकसंख्या व लोकसंख्येतील विविधता यामुळे शहरात व्यक्तीचा विभिन्न वंशाच्या, जातीच्या, धर्माच्या, भाषेच्या, वर्गाच्या लोकांशी संबंध अपरिहार्यपणे येत असतो. या सर्वांच्या आशाआकांक्षा आवडीनिवडी, वृत्तीप्रवृत्ती, मतेमूल्ये व आचारविचार भिन्न भिन्न असतात. तथापि आपले हितसंबंध साध्य करताना शहरी व्यक्तीला इतरांच्या मताबद्दल, चालिरीतीबद्दल, धर्मश्रद्धा व धर्माचरणाबद्दल सहिष्णुता दाखविणे भाग पडते. त्यांच्या कांही गोष्टी आपणाला पटत नसल्यातरी त्यांच्याबद्दल सामंजस्याचे धोरण ठेवावे लागते. इतरांच्या जातीधर्माचा, वंशाचा, भाषेचा, संस्कृतीचा, आर्थिक व शैक्षणिक स्थितीचा विचार न करता शहरी लोकांना परस्पराशी सहकार्य करावे लागते. एकत्र बसून खाणेपिणे, प्रवास, करमणूक व कामधंदा या गोष्टी कराव्या लागतात. लोकांच्या वैयक्तिक किंवा खाजगी जीवनात न डोकावण्याची वृत्ती ठेवावी लागते. यातूनच शहरी समुदायात सामाजिक सहिष्णुता निर्माण झालेली असते.

६) **दुय्यम संबंध :** शहरी समुदाय दुय्यम समूह असतो. लोकसंख्या ही जास्त, दाट व विजातीय असल्याने लोकांच्या परस्परसंबंधात घनिष्ठता, निकटता व आत्मियता नसते. व्यक्ती परस्परांना नावाने परिचित नसतात. त्यांच्यात समोरासमोरचा संपर्क नसतो, त्यांच्यातील संबंध औपचारिक, कामापुरते, व्यक्तिनिरपेक्ष, करारात्मक व साधनरूप स्वरूपाचे असतात. परस्परसंपर्कासाठी वृत्तपत्रे, फोन, रेडिओ, टेलिव्हीजन अशा संपर्क साधनांचा वापर केला जातो. थोडक्यात शहरातील लोकांचे परस्परसंबंध प्राथमिक नसतात, तर दुय्यम स्वरूपाचे असतात. त्यामुळेच शहरी व्यक्ती प्रचंड गर्दीत राहूनही बऱ्याचदा एक प्रकारचा एकाकीपणा अनुभवीत असते.

७) **दुय्यम समूहांचे नियंत्रण :** नागर समुदायातील लोकांचे संबंध दुय्यम स्वरूपाचे असल्याने त्यांच्या वर्तनाचे नियंत्रण देखील दुय्यम समूहांकडूनच होत असते. शहरी लोकांच्या परस्परसंबंधात औपचारिकता, करारात्मकता, उपयुक्तता अधिक असल्याने कुटुंब, शेजार, आप्तजन यासारखे प्राथमिक समूह त्यांच्या वर्तनाचे नियंत्रण करण्यास अपूरे व असमर्थ ठरतात. तसेच लोकसंख्येतील विविधतेमुळे रुढी, प्रथा, परंपरा, धर्मश्रद्धा, मूल्ये यासारखी सामाजिक नियमने देखील कुचकामी ठरतात. त्यामुळेच व्यक्तीच्या वर्तनावर नियंत्रण ठेवण्यासाठी दुय्यम समूहांवर अवलंबून रहावे लागते. शहरात कायदा, पोलीस, न्यायालय, तुरुंग यासारख्या दुय्यम समूहांकडून सामाजिक नियंत्रणाचे कार्य औपचारिकपणे पार पाडले जाते.

८) **ऐच्छिक मंडळांची विपुलता :** नागर समुदायात ऐच्छिक मंडळे मोठ्या प्रमाणावर असतात. आचार विचार, श्रद्धामूल्ये, आवडीनिवडी, वृत्तीप्रवृत्ती याबाबतीत शहरी लोकांमध्ये खूपच विविधता असते. ही विविधताच ऐच्छिक मंडळांच्या स्थापनेसाठी पूरक व पोषक ठरते. शहरातील या विविधतेतच समान आवडीनिवडी, अशाआकांक्षा, छंद, सवयी व हितसंबंध असणारे लोकही भरपूर असतात. असे लोक एकत्र येऊन ऐच्छिक मंडळे स्थापन करतात. राजकीय पक्ष, कामगार संघटना, सांस्कृतिक मंडळ, क्रीडा मंडळ, व्यायाम मंडळ, महिला मंडळ, तरुण मंडळ, वाङ्मय मंडळ, रोटरी क्लब व लायन्स क्लब यासारख्या ऐच्छिक मंडळांची शहरात रेलचेल असते. व्यक्ती आपल्या विविध हितसंबंधाची पूर्तता करण्यासाठी एकाच वेळी अनेक मंडळांचे सदस्यत्व स्वीकारते. शहरी कुटुंबाच्या रचनेत व कार्यात अलिकडे खूपच परिवर्तन घडून आल्याने कुटुंब पूर्वीसारखे शिक्षण, आरोग्य, मनोरंजन, व्यक्तिमत्त्व विकास याबाबतची कार्ये करण्यास समर्थ नाही. त्यामुळे या गरजांच्या पूर्ततेसाठी शहरी व्यक्तिंना ऐच्छिक मंडळावरच अवलंबून रहावे लागते. ही परिस्थिती देखील मंडळांच्या स्थापणेस कारणीभूत ठरते.

९) **व्यक्तिवाद :** नागरी समुदायातील पर्यावरण व्यक्तिवाद व व्यक्तिस्वातंत्र्य यांना पोषक असते. शहरात विभिन्न व्यवसाय, विभिन्न ऐच्छिक मंडळे आणि व्यक्तिमत्त्व विकासाची विविध साधने उपलब्ध असतात. व्यक्ती आपल्या आवडीनिवडीनुसार त्यांचा उपयोग करून स्वतःचा विकास घडवून आणू शकते. आपल्या अंगच्या गुणांच्या आधारे सत्ता, संपत्ती, प्रतिष्ठा मिळवू शकते. व्यक्तीच्या विकासाच्या मार्गात जात, धर्म, रूढी, परंपरा, कुटुंब, कूल इत्यादींचा अडसर फारसा येऊ शकत नाही. व्यक्ती स्वतःचे निर्णय स्वतःच घेण्यास व घेतलेल्या निर्णयानुसार कृती करण्यास स्वतंत्र असते. आपल्या इच्छेप्रमाणे आयुष्य जगू शकते. इतरांचा फारसा विचार न करता एक प्रकारचे स्वतंत्र व स्वयंकेंद्रित जीवन ती जगू शकते. सारांश शहरी पर्यावरण व्यक्तिमत्त्व विकासास अनुकूल असते. त्यामुळे व्यक्तीच्या मनावर व्यक्तिवादाचा व व्यक्तिस्वातंत्र्याचा प्रभाव आढळतो.

१०) **श्रमविभाजन व विशेषीकरण :** नागरी समुदायात श्रमविभाजन व विशेषीकरणास मोठाच वाव असतो. औद्योगिक, तांत्रिक, व्यापार, शैक्षणिक, सांस्कृतिक इत्यादी सर्वच क्षेत्रात सूक्ष्म श्रमविभाजन दिसून येते. या विविध क्षेत्रात व्यक्ती आपल्या पात्रतेनुसार विशिष्ट कार्ये करीत असतात. एकाच व्यवसायात अकुशल, अर्धकुशल, कुशल, तज्ज्ञ, विशेषज्ञ, असे अनेक सेवक काम करीत असतात. प्रत्येकजण एखाद्या विशिष्ट कामातील तज्ज्ञता मिळवण्यासाठी धडपडत असतो. उदा. वैद्यकीय व्यवसायात हृदयरोगतज्ज्ञ, बालरोगतज्ज्ञ, स्त्रीरोगतज्ज्ञ, दंतरोगतज्ज्ञ, नाक कान घसा तज्ज्ञ, छातीच्या रोगाचा तज्ज्ञ, मानसोपचार तज्ज्ञ असे विशेषीकरण दिसून येते. हे श्रमविभाजन व विशेषीकरण व्यक्तीची बुद्धिमत्ता, पात्रता, शिक्षण, प्रशिक्षण इत्यादीवर आधारलेले असते.

११) **सामाजिक गतिशीलता :** शहरी समुदायात सामाजिक गतिशीलतेला मोठाच वाव असतो. व्यक्तिवाद, व्यक्तिस्वातंत्र्य, विशेषीकरण इत्यादीमुळे शहरात 'अर्जित दर्जाला' महत्त्व असते. त्यामुळे व्यक्तीला स्वकर्तृत्वाने आपल्या सामाजिक दर्जात किंवा सामाजिक स्तरात बदल घडवून आणता येतो. कनिष्ठ स्तरातील व्यक्ती स्वप्रयत्नाने वरिष्ठ स्तरात जाऊ शकते. कनिष्ठ सामाजिक दर्जा असलेली व्यक्ती

सत्ता, संपत्ती, उच्च शिक्षण, कलाकौशल्ये, इत्यादीचे संपादन करून श्रेष्ठ दर्जा मिळवू शकते. क्लार्क असलेली व्यक्ती कलेक्टर होऊ शकते. परंतु याच्या उलट ही होऊ शकते. कर्तृत्वशून्य किंवा अकार्यक्षम व्यक्ती उच्च स्तरातून कनिष्ठ स्तरावर फेकली जाऊ शकते. रावाचा रंक होऊ शकतो. एकंदरीत शहरात सामाजिक गतिशीलता मोठ्या प्रमाणावर असते. दळणवळणाची प्रगत साधने आणि विविध व्यवसायांची उपलब्धता यामुळे गतिशीलतेस चालना मिळते. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाणे आणि एक व्यवसाय किंवा नोकरी सोडून दुसरा व्यवसाय वा नोकरी करणे शहरात शक्य असते. व्यक्तीला राहण्याची जागा, व्यवसाय व सामाजिक दर्जा इत्यादीत बदल करणे सोपे जाते.

**१२) क्षेत्रिय नियोजन :** शहरात मर्यादित जागेवर असंख्य लोक दाटीवाटीने राहतात. त्यातच शहराची लोकसंख्या सतत वाढत असते. त्यामुळे जागेची टंचाई निर्माण होते. त्यामुळे लोकांमध्ये राहण्यासाठी व व्यवसायासाठी जागा मिळविण्यासाठी स्पर्धा सुरू होते. त्यामुळे विविध व्यवसाय, उद्योगधंदे, केंद्रे, कार्यालये इत्यादींचे शहराच्या विभिन्न भागात नियोजन केले जाते. शहराच्या मध्यवर्ती भागात स्थानिक स्वराज्य संस्था, शासकीय कार्यालये, विविध व्यापारी केंद्रे यासारखी अत्यावश्यक सेवा व मूलभूत वस्तू पुरविणारी केंद्रे स्थापन झालेली असतात. डॉक्टर्स, वकिल, ऑडिटर्स, चार्टर्ड अकौंटंटस्, इत्यादी श्रेष्ठ व्यावसायिक शहराच्या मध्यवर्ती भागात व्यवसाय स्थापण्यावर भर देतात. त्यामुळे मध्यभागातील जागेची मागणी वाढून किंमती वाढतात. त्यामुळे लोक सभोवतालच्या भागात घरे बांधतात. त्यामुळे एकाच भागात राहणाऱ्या लोकांची जीवनपद्धती बरीचशी समान असते. शहरातील वस्तीस्थानांच्या भिन्नतेबरोबरच लोकांच्या जीवनपद्धतीतील भिन्नता चटकन लक्षात येते. शहरातील क्षेत्रिय नियोजनामुळे शहरी समुदायाची रचना कशी आहे याची कल्पना येते.

### २.३.२ नगरवाद (Urbanism)

नगरवाद ही नागर समाजशास्त्रातील महत्त्वाची संकल्पना आहे. नागरी पर्यावरणामध्ये राहणाऱ्या लोकांची विशिष्ट अशी एक जीवनपद्धती असते. या लोकांचे राहणीमान, बोलणे-चालणे, खाणेपिणे, शिष्टाचार, वेशभूषा, केशभूषा इत्यादी बाबी वैशिष्ट्यपूर्ण असतात आणि त्याबाबत हे लोक विशेष जागरूक असतात. अशी जागरूकता इतर लोकांमध्ये विशेषतः ग्रामीण लोकांमध्ये सहसा आढळत नाही. नगरातील लोकांची ही जी वैशिष्ट्यपूर्ण जीवनपद्धती किंवा जीवन जगण्याचा एक विशिष्ट मार्ग वा शैली (Way of life or life-style) असते तिला उद्देशूनच नगरवाद ही संज्ञा वापरली जाते. नगरवाद या संज्ञेचा अर्थबोध होण्यासाठी कांही मान्यवर समाजशास्त्रज्ञांची मते विचारात घेणे उचित ठरते.

**१. लुईस वर्थ :** नगरवाद ही संकल्पना लुईस वर्थ या समाजशास्त्राने विकसित केलेली आहे. आपल्या एका लेखात त्याने ''नगरवाद हा जीवनाचा एक मार्ग आहे. (Urbanism is a way of life.)" अशा शब्दात नगरवादाचा अर्थ स्पष्ट केलेला आहे. लुईस वर्थच्या मते नगरात राहणारी प्रत्येक व्यक्ती ही नगरातील जीवन पद्धतीचा स्वीकार करतेच असे नाही. तसेच नगरवाद हा केवळ नगरापुरताच मर्यादित असतो असेही नाही.

२. **नेल्स एण्डरसनच्या** मते नगरवाद ही एक जीवनपद्धती आहे. जी केवळ शहर (Town) आणि नगर (City) यांच्यापुरतीच मर्यादित नाही तर तिचा प्रभाव महानगरांपासून सुरू होतो.

३. **विल्यम स्कॉटच्या** मते ''सापेक्षतः लहान आकाराच्या क्षेत्रात मोठ्या लोकसंख्येचे केंद्रिकरण झाल्याचा परिणाम म्हणून निर्माण झालेल्या सामाजिक आंतरक्रियेच्या व संस्कृतीच्या प्रतिमानांस नगरवाद म्हणतात.'' संकीर्ण श्रमविभाजन, उच्चदर्जाचे तंत्रज्ञान, उच्च गतिशीलता आर्थिक कार्यांच्या पूर्तीसाठी समाजातील सदस्यांमध्ये असलेले परस्परावलंबन आणि व्यक्तिनिरपेक्ष सामाजिक संबंध ही नगरवादाची वैशिष्ट्ये आहेत.

**नगरवादाची वैशिष्ट्ये (Characteristics of Urbanism)**

लुईस वर्थ यांनी नगरवादाची पुढील तीन वैशिष्ट्ये सांगितली आहेत.

१. **अस्थिरता किंवा अल्पकालिनता** (Transiency) नगरवाद ही एक विशिष्ट अशी जीवन पद्धती असून या जीवनपद्धतीत लोकांचे परस्परांशी येणारा संबंध हे अल्पकाळ टिकणारे म्हणजेच क्षणिक स्वरूपाचे असतात. त्यामुळे त्यांच्या संबंधात स्थिरता नसते. नागरी जीवनात प्रत्येक व्यक्ती अत्यंत व्यस्त असते तसे स्पर्धा ही मोठ्या प्रमाणावर असते. त्यामुळे इतरांना भेटण्यासाठी लोकांकडे पुरेसा वेळच नसतो. आपल्या जवळच्या आप्तमित्रांकडे जाण्यासही त्यांना फुरसत नसते. त्यामुळे लोकांचे परस्परांशी घनिष्ठ व अनौपचारिक संबंध प्रस्थापित होऊ शकत नाहीत. त्यामुळे जे कांही संबंध येतात ते बहुतांशी औपचारिक, अस्थिर, अल्पकालिक व कामापुरते असतात.

२. **दिखाऊपणा किंवा कृत्रिमता** (Superficiality) नागरी जीवनपद्धतीत दिखाऊपणा, नाटकीपणा किंवा कृत्रिमता मोठ्या प्रमाणावर असते. नागरी लोकांचे जीवन अत्यंत व्यस्त, गुंतागुंतीचे व औपचारिक स्वरूपाचे असते. त्यामुळे इतरांशी घनिष्ठ, मनमोकळेपणाचे, आपुलकीचे संबंध प्रस्थापित करण्यासाठी लागणारा वेळ त्यांच्याकडे नसतो तसेच त्याबाबतची इच्छाशक्तीही नसते. इतरांच्या सुखदुःखात मनापासून सहभागी होणे त्यांना जमत नाही. त्यामुळे नागरी जीवनात केवळ शिष्टाचार पाळला जातो. जे कांही संबंध जोडले जातात त्यामुळे दिखाऊपणा व कृत्रिमपणाच अधिक असतो.

३. **अपरिचितता** (Anonymity) नगरात लोकांची प्रचंड गर्दी असते. जो तो आपल्याच घाईत व नादात वावरत असतो. प्रत्येकजण एक प्रकारच्या अनोळखी किंवा अपरिचित वातावरणात राहात असतो. गर्दीत राहूनही व्यक्ती एकाकी असते. ती बहुसंख्य लोकांना ओळखत नसते तसेच बहुसंख्य लोकही तिला ओळखत नसतात. व्यक्ती ज्यांना ओळखते किंवा जे लोक व्यक्तिला ओळखतात अशा लोकांचा समूह अत्यंत लहान असतो. आणि त्या समूहातील लोकांचे संबंध देखील जुजबी, कामचलाऊ, तात्पुरते व अत्यंत औपचारिक स्वरूपाचे असतात.

**नेल्स एण्डरसन** आणि **के. ईश्वरन** यांनी नगरवादाची पुढील वैशिष्ट्ये सांगितलेली आहेत.

१. **मुद्राप्रधान अर्थव्यवस्था** (Money Oriented Economy) नगरातील लोकांचा परस्परांशी फारसा परिचय नसतो. तसेच त्यांच्या सर्वच गरजांची पूर्तता ही पैशाद्वारे होत असते. त्यामुळे लोक पैशाला

खूपच महत्त्व देत असतात. नागर समुदायातील कोणत्याही वस्तू व सेवांची खरेदी–विक्री ही पैशाच्या माध्यमातूनच होते. सर्व आर्थिक व्यवहाराचा केंद्रबिंदू हा पैसा असतो. त्यामुळे नागरी अर्थव्यवस्था ही मुद्राप्रधान असते.

२. **लिखित प्रमाण** (Written Records) नागरी जीवनपद्धतीत लोक परस्परांशी सहसा तोंडी व्यवहार करीत नाहीत. त्यांच्यामध्ये जो कांही व्यवहार किंवा करार होतो तो प्रामुख्याने लिखीत स्वरूपाचा असतो. अनेक महत्त्वाचे व्यवहार तर कोर्ट स्टँपवर साक्षीदाराच्या सहीनेच होतात. मोठ्या प्रमाणावरील पैशाची देवघेव ही रोखीने न होता चेक वा ड्राफ्ट यांच्या साह्याने होते. आणि असे लिखीत व्यवहार आवश्यक व योग्य ही मानले जातात. कारण नागरी लोकसंख्या ही अत्यंत विजातीय स्वरूपाची असते. म्हणजे लोक वेगवेगळ्या वंशाचे, धर्माचे, जातीचे, प्रांतांचे असतात. ते परस्परांना अपरिचित असतात त्यामुळे फसवणूक होण्याची दाट शक्यता असते. म्हणून बहुतेक व्यवहार लिखीत स्वरूपात होतात आणि त्यातील अटींचे पालन न झाल्यास पोलीस, न्यायालय अशा औपचारिक नियंत्रण साधनांची मदत घेतली जाते व ही साधने लिखीत प्रमाणावरच (पुराव्यावरच) विश्वास ठेवतात. म्हणून नागरी जीवनात प्रत्येक व्यवहाराची कागदोपत्री नोंद ठेवण्यावर विशेष भर दिला जातो.

३. **शोध आणि तंत्र यांची विविधता** (Diversity of investigation and techniques) नागरी जीवनात तंत्रविद्या ही खूपच विकसित असते आणि विविध क्षेत्रांत नित्य नवे शोध लागत असतात. ही तंत्रविद्या व शोध मानवाच्या गरजा पूर्ण करतात त्याच्या सुखसोयीत वाढ करतात, शिवाय मानवी संबंध अधिकाधिक संकीर्णही बनवितात. मानवी जीवनात नवनव्या समस्याही निर्माण करतात. आणि या समस्यांची सोडवणूक करण्यासाठी नवीन व्यवस्था निर्माण केल्या जातात.

४. **संघटीत आणि दृढ प्रशासन** (Organized and strict Administration) नागरी जीवनातील विशालता, संकीर्णता व अपरिचितता या गोष्टींशी सामना करण्यासाठी संघटीत व दृढ प्रशासनाची आवश्यकता असते. नागरी जीवनात गृहबांधणी वाहतूक, दळणवळण, साफसफाई, वीज, पाणी, गलिच्छ वस्ती सुधारणा, समाजकल्याण कुटुंब नियोजन, व्यापार इत्यादी क्षेत्रात विभिन्न कार्ये पार पाडावी लागतात. आणि त्यासाठी संघटीत व दृढ प्रशासनाची गरज असते.

५. **सांस्कृतिक शोध** (Cultural Investigation) नागरी जीवनात भौतिक जीवनात परिवर्तन वेगाने होत रहाते. आणि त्याचा परिणाम म्हणून सांस्कृतिक जीवनात ही परिवर्तन घडून येण्यास चालना मिळते. नवनवीन सांस्कृतिक तत्त्वे उदयास येऊन नागरी संस्कृती विकसित होत राहते. तथापि भौतिक परिवर्तनाच्या तुलनेत सांस्कृतिक परिवर्तनाची गती मंद असते. त्यामुळे समाजात सांस्कृतिक पश्चायनाची स्थिती निर्माण होऊन अनेक समस्या निर्माण होतात. असे असले तरी भौतिक विकासामुळे नागरी जीवनात नवीनवी सांस्कृतिक तत्त्वे समाविष्ट होत असतात.

### २.३.३ ग्रामीण आणि नागर समुदायातील भिन्नता (भेद किंवा फरक) (Rural-Urban differences)

प्रास्ताविक : समुदायाचे ग्रामीण समुदाय (गाव किंवा खेडे) व नागर समुदाय (नगर किंवा शहर) असे दोन प्रकार पडतात. त्यापैकी नागर समुदायाचा समग्र व पद्धतशीर अभ्यास नागर समाजशास्त्रात होतो. नागर

समुदायाचे परिपूर्ण व यथार्थ आकलन होण्यासाठी या दोन्ही समुदायांचा तुलनात्मक अभ्यास करून ग्रामीण समुदाय नागर समुदायाहून कसा भिन्न आहे म्हणजेच त्यांच्यात कोणते भेद आहेत हे समजावून घ्यावे लागते.

**अडचणी :**

तथापि त्यांच्यातील भेद स्पष्ट करण्यामध्ये पुढील अडचणी आहेत.

१) **सार्वत्रिक व्याख्येचा अभाव :** ग्रामीण व नागर समुदाय यांची सर्वत्र लागू पडेल अशी व सर्वांना मान्य होईल अशी व्याख्या करणे अत्यंत कठीण आहे. खेडे म्हणजे काय व नगर म्हणजे काय हे आपणास कळते. तथापि त्यांची समाधानकारक व्याख्या करता येत नाही. म्हणूनच **बर्गेल** म्हणतो की नगर म्हणजे काय हे प्रत्येकास माहित आहे पण त्याची कोणीही समाधानकारक व्याख्या दिलेली नाही.

२) **लोकसंख्येचे प्रमाण :** खेडे कमी लोकसंख्येचे तर नगर जास्त लोकसंख्येचे असते असे स्थूलपणे म्हटले जाते. पण लोकसंख्येच्या आधारे त्यांच्यात स्पष्टपणे भेद करणे कठीण जाते. कारण त्यासाठी वेगवेगळ्या देशात वेगवेगळे प्रमाण स्वीकारलेले दिसते. उदा. फ्रान्समध्ये २०००, अमेरिकेमध्ये २५००, भारतात ५००० तर जपानमध्ये ३०,००० लोकसंख्येच्या वस्तीला शहर मानले जाते.

३) **अंशाचा फरक :** खेडे व शहर हे मानवी वस्तीचे म्हणजेच समुदायाचे दोन प्रकार असून समुदाय जीवनाची प्रमुख वैशिष्ट्ये दोन्हीमध्येही आढळतात. फक्त त्या वैशिष्ट्यांमध्ये अंशाचा म्हणजे प्रमाणाचा फरक (Difference of degree or quantity) आढळतो. खेड्यात शहरांची कांही वैशिष्ट्ये आढळतात तर शहरातही खेड्यांची कांही वैशिष्ट्ये आढळतात. शहराजवळील खेड्यात नागरी जीवनाचे कांही अंश आढळतात तर शहरातील कामगारवस्त्या व झोपडपट्ट्या यांच्यात ग्रामीण जीवनाची झलक पहावयास मिळते. म्हणून त्यांच्यात स्पष्ट अशी विभाजनरेषा आखता येत नाही. म्हणून **मॅकायव्हर** म्हणतात की, 'नगर कोठे संपते व खेडे कोठून सुरू होते हे ठरविणारी विभाजनरेषा आखणे कठीण आहे.'

४) **पर्यावरणातील भिन्नता :** खेड्यातील व शहरातील पर्यावरण वेगवेगळे असते. तथापि एकाच शहरातील वेगवेगळ्या भागात वेगवेगळे पर्यावरण आढळते. उच्चभ्रू श्रीमंतांची कॉलनी, पांढरपेशा मध्यमवर्गीयांचे अपार्टमेंटस्, कामगारांची चाळ व गरिबांची झोपडपट्टी यांच्यातील पर्यावरण वेगवेगळे असते. त्यामुळे यापैकी नेमक्या कोणत्या पर्यावरणाची तुलना खेड्यातील पर्यावरणाशी करावयाची असा प्रश्न पडतो.

५) **बदलते स्वरूप :** या दोन्ही समुदायातील भेद दर्शविण्यामधील एक प्रमुख अडचण अशी की या दोन्ही समुदायाचे स्वरूप बदलत आहे. औद्योगिकीकरण, नागरीकरण, दळणवळणाची प्रगत साधने इ. मुळे त्यांच्यातील संपर्काचे प्रमाण खूपच वाढले आहे. त्यामुळे त्यांच्यातील अंतर झपाट्याने कमी होत आहे. शहरातील अनेक नागरी सुविधा (उदा. शाळा, महाविद्यालये, बँका, कृत्रिम पाणीपुरवठा, वीज, पक्के रस्ते, दळणवळणाची साधने इ.) खेड्यात उपलब्ध होऊ लागल्या आहेत. त्यामुळे एखाद्या वस्तीस कोठपर्यंत खेडे म्हणावयाचे व तिला शहर म्हणण्यास केंव्हा सुरुवात करावयाची हे ठरविणे कठीण जात आहे.

थोडक्यात आज शुद्ध ग्रामीण समुदाय व शुद्ध नागर समुदाय आढळत नाही. त्यामुळे त्यांच्यात स्पष्ट भेद दर्शविणे कठीण जाते. **गिस्ट व हेलबर्ट** म्हणतात त्याप्रमाणे ग्रामीण व नागर समुदाय यांच्यातील विभाजन हे समुदाय जीवनाच्या वस्तुस्थितीपेक्षा (Facts of community life) सैद्धांतिक संकल्पनेवर (Theoretical Concepts) अधिक आधारलेले आहे.

असे असले तरी ग्रामीण व नागर समुदायात कांही भेद दाखविले जातात. **सोराकिन व झिम्मरमन** यांनी 'Principles of Rural Urban Sociology' या ग्रंथात कांही निकष वापरून या दोन्ही समाजातील भेद स्पष्ट केले आहेत.

**भेद :**

१) **व्यवसायातील भिन्नता :** शेती हा ग्रामीण लोकांचा प्रमुख व्यवसाय आहे. शेतीशिवाय इतरही कांही व्यवसाय (उदा. पशुपालन, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, विणकाम, लोहारकाम, सुतारकाम इ.) ग्रामीण लोक करतात. तथापि हे व्यवसाय प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे शेतीशीच निगडीत असतात. म्हणून त्यांना जोडधंदे किंवा पूरक व्यवसाय असे म्हणतात. याउलट शहरी लोकांचे व्यवसाय बिगरशेती स्वरूपाचे असतात. लहानमोठे उद्योग, कारखाने, व्यापारपेठा, विविध वस्तूंची विक्री केंद्रे, आरोग्य सेवेची केंद्रे, सल्लादायी केंद्रे, वाहतूक व संदेशवहनाची व्यवस्था, शिक्षणसंस्था, बँका, विमा कंपन्या, शासकीय व निमशासकीय कार्यालये इ. ची शहरात रेलचेल असते आणि त्यांच्यामध्ये काम करून शहरी लोक निर्वाह चालवतात. या सर्व व्यवसायांना बिगरशेती व्यवसाय म्हणतात. शहरात शेती व्यवसायासाठी आवश्यक असणाऱ्या वस्तूंचे उदा. खते, जंतूनाशके, शेती अवजारे इ. चे उत्पादन व विक्री करणारे व्यवसाय असतात आणि त्यामध्ये ही कांही शहरी लोक गुंतलेले असतात. असे व्यवसायही बिगरशेतीच मानले जातात. थोडक्यात खेड्यात शेती हा एकमेव प्रमुख व्यवसाय असल्याने तेथे व्यवसायाची एकविधता आढळते तर शहरात अनेक व्यवसाय असल्याने तेथे व्यवसायाची अनेकविधता आढळते.

२) **पर्यावरणातील भिन्नता :** ग्रामीण समुदायावर नैसर्गिक पर्यावरणाचा अधिक प्रभाव असतो. शेती व्यवसायामुळे ग्रामीण लोकांचा निसर्गाशी घनिष्ठ संबंध येतो. त्यांच्या बहुतांशी गरजांची पूर्तता निसर्गाकडून होते. उदा. त्यांची पाण्याची गरज नदी, ओढे, तलाव यांच्याद्वारे, तर इंधनाची गरज जंगलाद्वारे पूर्ण होते. म्हणून ते निसर्गावर अवलंबून असतात. गरजपूर्तीसाठी ते निसर्गाला शरण जातात. त्यांना नैसर्गिक घडामोडींचे (ऊन, वारा, पाऊस) शास्त्रीय ज्ञान नसल्याने ते नैसर्गिक शक्तींना देवदेवता (उदा. जलदेवता, वायुदेवता, अग्निदेवता, वनदेवता) मानून त्यांची पूजा करतात. त्यामुळे ते दैववादी, अंधश्रद्धा बनलेले दिसतात. त्यांचे आर्थिकच नव्हे तर सामाजिक व सांस्कृतिक जीवनही नैसर्गिक पर्यावरणाने प्रभावित झालेले असते. त्यांचे आचारविचार, सवयी, श्रद्धा, दृष्टिकोन, सणसमारंभ, विविध कला इ. बाबी निसर्गाशी मोठ्या प्रमाणावर निगडीत असतात. याउलट शहरी समुदायावर नैसर्गिक पर्यावरणापेक्षा मानवनिर्मित (कृत्रिम) पर्यावरणाचा अधिक प्रभाव असतो. नैसर्गिक पर्यावरणाचा प्रत्यक्ष प्रभाव शहरी जीवनावर फारसा पडत नाही. शहरी लोक आपल्या गरजापूर्तीसाठी निसर्गावर फारसे अवलंबून न राहता विज्ञान-तंत्रज्ञानावर आधारलेल्या कृत्रिम

उपकरणांचा वापर करण्यावर जास्त भर देतात. उदा. पाण्यासाठी कृत्रिम पाणीपुरवठ्याची व्यवस्था करतात. इंधन म्हणून लाकडाऐवजी एल.पी.जी. गॅस व वीज वापरतात. उन्हाळ्यात थंड हवा मिळविण्यासाठी कूलर, पंखा, एअरकंडिशनर वापरतात. विज्ञान व तंत्रज्ञानाच्या प्रभावामुळे शहरी लोक चिकित्सक, बुद्धिवादी, विज्ञानवादी, प्रयत्नवादी बनलेले असतात. अंधश्रद्धा, देवभोळ्या कल्पना, अशास्त्रीय विचारसरणी यांपासून ते दूर राहतात. निसर्गाला शरण न जाता त्याचे शास्त्रीय ज्ञान मिळवून त्याच्यावर मात करण्याचा प्रयत्न करतात. कृत्रिम पर्यावरण उभारून आपले जीवन सुखी व सुसह्य करण्याचा प्रयत्न करतात. थोडक्यात, ग्रामीण लोकांच्या मनोवृत्तीवर व जीवनावर नैसर्गिक पर्यावरणाचा तर शहरी लोकांच्या मनोवृत्तीवर व जीवनावर मानवनिर्मित पर्यावरणाचा अधिक प्रभाव असतो.

३) **आकारातील भिन्नता :** ग्रामीण समुदाय आकाराने लहान असतो. कारण शेती हा मुख्य व्यवसाय असल्याने शेतीसाठी (धान्य लागवडीसाठी) मोठ्या भूभागाची (जमिनीची) गरज भासते. त्यामुळे राहण्यासाठी (वस्तीसाठी) कमी जागा वापराची लागते. याउलट शहरी समुदाय आकाराने मोठा असतो. शहराची लोकसंख्या खेड्याच्या मानाने जास्त असते. मर्यादित जागेवर हजारो, लाखो, करोडो लोक दाटीवाटीने राहतात. शहरे ही उद्योगाची, व्यापाराची, रोजगाराची, शिक्षणाची, भौतिक सोयीसुविधांची केंद्रे असल्याने सभोवतालच्या प्रदेशातील लोक शहराकडे सतत स्थलांतर करीत असतात. त्यातूनच शहराचा आकार किंवा विस्तार वाढत जातो. नगराच्या भोवती उपनगरे अस्तित्वात येतात व त्यातूनच काहींना महानगराचे स्वरूप येते. दळणवळणाच्या प्रगत साधनांमुळे शहरांचे आकारमान वाढण्यास मदत होते. थोडक्यात ग्रामीण समुदाय लहान तर शहरी समुदाय मोठ्या आकाराचा असतो.

४) **लोकसंख्येच्या घनतेतील भिन्नता :** ग्रामीण समुदायात केवळ लोकसंख्याच नव्हे तर लोकसंख्येची घनता देखील कमी असते. दर चौरस कि.मी. मागे किती लोक वास्तव्य करतात यावरून लोकसंख्येची घनता ठरविली जाते. खेड्यातील लोक एकतर शेतात घरे बांधून राहतात किंवा शेताजवळच्या जागेवर राहतात. तसेच खेड्यात रोजगाराच्या संधीही कमीच असतात. परिणामी तेथे लोकसंख्या व तिची घनता कमीच राहते. याउलट शहरी समुदायात लोकसंख्या व लोकसंख्येची घनताही खूपच जास्त असते. शहरात रोजगाराच्या, शिक्षणाच्या संधी विपुल प्रमाणात असल्याने शहराभोवतालच्या प्रदेशातून लोक शहराकडे सतत स्थलांतर करतात. त्यामुळे तेथील लोकसंख्या वाढत राहते. शिवाय शहरात कारखाने, दुकाने, कार्यालये, रस्ते, शाळा, बागा, क्रीडांगणे इ. साठी जागा राखीव ठेवली जाते. त्यामुळे रहात्या जागेची टंचाई निर्माण होते. परिणामी कमीत कमी जागेत जास्तीत जास्त लोकांना निवास करणे भाग पडते. उंच उंच इमारती (अपार्टमेंटस्) व दाटीवाटीच्या झोपडपट्ट्या उभ्या राहतात. परिणामी लोकसंख्येची घनता वाढत जाते. थोडक्यात ग्रामीण समुदायात लोकसंख्येची घनता कमी तर शहरी समुदायात जास्त असते.

५) **लोकसंख्येची सजातीयता व विजातीयता याबाबतची भिन्नता :** ग्रामीण समुदायात लोकसंख्येची सजातीयता आढळते. खेड्यातही विविध जातीधर्माचे व वर्गाचे लोक राहत असले तरी त्यांचे जीवन प्रत्यक्ष–अप्रत्यक्षपणे शेती ह्या एकाच व्यवसायावर आधारलेले असते. त्यामुळे त्यांच्या मानसिकतेत व जीवनपद्धतीत मोठ्या प्रमाणावर एकविधता (एकसारखेपणा) आढळते. त्यांचे आचारविचार, श्रद्धामूल्ये, रूढीपरंपरा,

सणसमारंभ, सवयी, भाषा, वेषभूषा, केशभूषा, भोजनव्यवस्था इ. बाबतीत बहुतांशी समानता आढळते. यालाच लोकसंख्येची सजातीयता म्हणतात. याउलट शहरी समुदायात लोकसंख्येची विजातीयता अधिक असते. कारण शहरात उद्योगधंद्याची, शिक्षणाची उपलब्धता असल्याने सभोवतालच्या प्रदेशातून भिन्न भिन्न वंशाचे, धर्माचे, जातीचे, भाषेचे संस्कृतीचे लोक शहरात एकत्र आलेले असतात. त्यांची आर्थिक-सामाजिक व सांस्कृतिक पार्श्वभूमी भिन्न भिन्न असते. त्यामुळे त्यांचे आचारविचार, श्रद्धामूल्ये, रूढीपरंपरा, सणसमारंभ, सवयी, भाषा, वेषभूषा, केशभूषा, भोजनव्यवस्था इ. बाबी भिन्न भिन्न असतात. या भिन्नतेलाच लोकसंख्येची विजातीयता म्हणतात. थोडक्यात ग्रामीण समुदायात लोकसंख्येची सजातीयता तर शहरी समुदायात लोकसंख्येची विजातीयता असते.

६) **गतिशीलतेतील भिन्नता :** ग्रामीण समुदायात गतिशीलतेस फारसा वाव नसतो. गतिशीलता म्हणजे एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्याची क्रिया होय. गतिशीलता ही तीन प्रकारची असते.

**(अ) भौगोलिक गतिशीलता :** म्हणजे एका भौगोलिक ठिकाणाहून दुसऱ्या भौगोलिक ठिकाणाकडे जाणे होय. उदा. एक गाव किंवा शहर सोडून दुसऱ्या गावी किंवा शहरी जाणे होय.

**(ब) व्यावसायिक गतिशीलता :** म्हणजे शेती सोडून नोकरी किंवा व्यापार करणे.

**(क) सामाजिक गतिशीलता :** म्हणजे एका सामाजिक दर्जाकडून किंवा स्तराकडून दुसऱ्या सामाजिक दर्जाकडे किंवा स्तराकडे जाणे होय. उदा. कनिष्ठ सामाजिक दर्जात बदल करून उच्च सामाजिक दर्जा मिळविणे.

ग्रामीण समुदायात या तिन्ही प्रकारच्या गतिशीलतेस फारशी संधी नसते. कारण तेथे शेतीशिवाय इतर व्यवसाय फारसे उपलब्ध नसतात. त्यामुळे व्यक्ती शेती व्यवसायातच गुंतली जाते. शिवाय खेड्यातील लोकांमध्ये जिव्हाळ्याचे, आत्मियतेचे संबंध असतात. त्यामुळे आपले गाव, आपले कुटुंब, आपले शेत, आपले आप्तमित्र इ. ना. सोडून दुसरीकडे जाणे व्यक्तीला नकोसे वाटते. त्यामुळे खेड्यात व्यावसायिक व भौगोलिक गतिशीलतेस फारसा वाव मिळत नाही. तसेच खेड्यात व्यक्तीचा सामाजिक दर्जा किंवा स्थान किंवा स्तर हा जन्म, जात, व्यवसाय, लिंग, वय इ. च्या आधारे निश्चित होतो व त्याला रूढीपरंपरेची मान्यता असते. अज्ञान, निरक्षरता, रूढीप्रियता, अंधश्रद्धा, दैववादीवृत्ती इ. मुळे रूढीपरंपरेची बंधने झुगारून देण्याचे धाडस व्यक्तीकडे नसते. म्हणून परंपरेने मिळालेला दर्जा (अर्पित दर्जा) व्यक्ती निमूटपणे स्वीकारते. स्वकतृत्वाने त्यात बदल करण्याची संधीही तिला फारशी मिळत नाही. अशाप्रकारे ग्रामीण समाजात गतिशीलतेस वाव नसतो. याउलट शहरी समुदायात तिन्ही प्रकारच्या गतिशिलतेस मोठा वाव असतो. शहरात व्यक्तिवाद, व्यक्तिस्वातंत्र्य, दळणवळणाची प्रगत साधने, शिक्षण-प्रशिक्षणाच्या सोयी व विविध व्यवसाय इ. उपलब्ध असल्याने व्यक्ती आपल्या पात्रतेत वाढ करून एका ठिकाणाहून दुसरीकडे जाऊ शकते. एक व्यवसाय किंवा नोकरी सोडून दुसरा व्यवसाय किंवा नोकरी करू शकते. तसेच कनिष्ठ स्तरातील व्यक्ती स्वकर्तृत्वाने उच्च शिक्षण, सत्ता, संपत्ती, कलाकौशल्ये इ. प्राप्त करून त्याआधारे उच्च सामाजिक स्तर वा दर्जा मिळवू शकते. उदा. क्लार्कचा कलेक्टर होऊ शकते. याउलट कर्तृत्वशून्य वा अकार्यक्षम व्यक्ती उच्च

स्तरातून कनिष्ठ स्तराकडे फेकली जाऊ शकते. उदा. कारखानदाराचा कामगार होऊ शकतो. अशाप्रकारे शहरात व्यावसायिक, भौगोलिक व सामाजिक गतिशीलतेस खूपच वाव असतो. थोडक्यात ग्रामीण समुदायात सामाजिक गतिशीलतेस फारसा वाव नसतो तर शहरात तो असतो. यासंदर्भात **सोराकिन व झिम्मरमन** म्हणतात की, 'ग्रामीण समुदाय घागरीतील शांत पाण्यासारखा तर शहरी समुदाय किटलीतील उकळत्या पाण्यासारखा आहे. स्थिरता हा पहिल्याचा तर गतिशीलता हा दुसऱ्याचा गुण आहे.

**७) स्थलांतराच्या दिशेतील भिन्नता :** ग्रामीण लोक हे प्रामुख्याने शहराकडे स्थलांतर करतात. म्हणजे ते वेगळ्या प्रकारच्या पर्यावरणामध्ये स्थलांतर करता. औद्योगिक क्रांतीनंतर जगात सर्वत्रच ग्रामीण समुदायाचे मोठ्या प्रमाणावर विघटन सुरू झाले. त्यामुळे खेड्यातून लोक शहराकडे स्थलांतर करू लागले. यालाच नागरीकरण म्हणतात. नागरीकरणाची ही प्रवृत्ती दिवसेंदिवस वाढतच आहे. याउलट शहरी लोक हे प्रामुख्याने एका शहराकडून दुसऱ्या शहराकडे किंवा शहराच्या एका विभागाकडून दुसऱ्या विभागाकडे स्थलांतर करतात. म्हणजेच ते समान पर्यावरणामध्ये स्थलांतर करतात. साधारणपणे शहरात जन्मलेली व वाढलेली व्यक्ती खेड्याकडे स्थलांतर करीत नाही. तसेच खेड्यातून शहराकडे गेलेली व तेथे रुळलेली व्यक्तीही पुन्हा खेड्याकडे स्थलांतर करण्यास सहसा राजी नसते असा अनुभव आहे.

**८) सामाजिक स्तरीकरणातील भिन्नता :** ग्रामीण तसेच शहरी समुदायातही सामाजिक स्तरीकरण आढळते. तथापि ग्रामीण समुदायातील विविध सामाजिक स्तरांमध्ये किंवा वर्गांमध्ये लक्षणीय असा फरक जाणवत नाही. कारण ग्रामीण लोकांचे एकूणच राहणीमान निम्न (हलक्या) दर्जाचे आहे. दुसरे म्हणजे ग्रामीण लोक मूलतः साधी राहणी पसंत करतात. त्यामुळे तेथील उच्च व कनिष्ठ स्तरातील लोकांच्या राहणीमानात विशेष फरक नसतो. गरीब, मध्यम, श्रीमंत यांचे राहणीमान, सवयी, आचार, विचार, श्रद्धामूल्ये व एकंदर जीवनपद्धती यांच्यात विशेष तफावत नसते. याउलट शहरी समुदायातील विविध सामाजिक स्तरांमध्ये किंवा वर्गांमध्ये लक्षणीय फरक जाणवतो. शहरातील स्तरीकरण म्हणजे वर्गव्यवस्था ही आर्थिक स्थितीवर आधारलेली असते. शहरात अतिउच्चभ्रू व विलासी जीवन जगणारे गर्भश्रीमंत असतात. खाऊन पिऊन सुखी असणारे मध्यम लोकही असतात तसेच अत्यंत निकृष्ट राहणीमान असणारे कनिष्ठ स्तरातील गरीब लोकही असतात. आणि या तिन्ही वर्गाच्या आर्थिक तसेच सामाजिक-सांस्कृतिक जीवनात कमालीची तफावत असते. त्यामुळे शहरातील स्तरीकरण प्रकर्षाने लक्षात येते.

**९) सामाजिक आंतरक्रियेच्या स्वरूपातील भिन्नता :** ग्रामीण लोकांत प्रत्यक्ष स्वरूपाची सामाजिक आंतरक्रिया घडून येते. कारण खेड्याचा लहान आकार, कमी लोकसंख्या, समान व्यवसाय व संदेशवहनाच्या प्रगत साधनांची कमतरता इ. मुळे खेड्यातील लोकांचा परस्परांशी घनिष्ठ असा समोरासमोरचा नित्य संपर्क येतो. त्यामुळे त्यांच्या आत्मियतेचे, जिव्हाळ्याचे व सहकार्याचे संबंध प्रस्थापित होतात. याउलट शहरी लोकांत अप्रत्यक्ष स्वरूपाची सामाजिक आंतरक्रिया घडून येते. कारण शहराचा मोठा आकार, जास्त लोकसंख्या, विभिन्न व्यवसाय, संदेशवहनाच्या प्रगत साधनांची विपुलता इ. मुळे शहरी लोकांचा परस्परांशी घनिष्ठ असा समोरासमोरचा नित्य संपर्क येत नाही. त्यामुळे त्यांच्यात होणारी सामाजिक आंतरक्रिया ही अप्रत्यक्ष वा सांकेतिक स्वरूपाची असते. शहरी लोक एकाच समुदायात रहात असूनही ते परस्परांशी

आंतरक्रिया करण्यासाठी टपाल, वृत्तपत्रे, दूरध्वनी, आकाशवाणी, दूरदर्शन, इंटरनेट, ई-मेल अशा साधनांचा अधिक वापर करतात. त्यामुळे त्यांच्या संबंधात फारसी आत्मियता, जिव्हाळा व सहकार्य भावना नसते.

**१०) सामाजिक नियंत्रण व्यवस्थेतील भिन्नता :** ग्रामीण समुदायातील सामाजिक नियंत्रण व्यवस्था अनौपचारिक (Informal) स्वरूपाची असते. लहान आकार व कमी लोकसंख्या यामुळे खेड्यातील लोकांचे परस्परांशी अत्यंत घनिष्ठ, समोरासमोरचे, आत्मियतेचे, सहकार्याचे व व्यक्तिगत स्वरूपाचे संबंध असतात. अशा संबंधांना प्राथमिक संबंध म्हणतात आणि ग्रामीण लोकांच्या वर्तनाचे नियंत्रण अशा प्राथमिक संबंधाद्वारे अनौपचारिकपणे पण प्रभावीरित्या होत असते. कुटुंब, शेजारी, आप्तसंबंधी (नातलग), मित्रपरिवार इ. प्राथमिक समूह व्यक्तीच्या वर्तनाचे नियंत्रण करतात. त्यासाठी लोकमत, लोकरूढी, लोकनीती, धर्मकल्पना, सामाजिक व नैतिक मूल्ये इ. अनौपचारिक साधनांचा (सामाजिक नियमांचा) वापर करतात. याउलट शहरातील सामाजिक नियंत्रण व्यवस्था ही औपचारिक (Formal) असते. मोठा आकार व जास्त लोकसंख्येमुळे शहरी लोकांचे परस्परसंबंध हे अत्यंत औपचारिक, अप्रत्यक्ष, कामचलाऊ, करारात्मक व व्यक्तीनिरपेक्ष असतात. त्या संबंधात जिव्हाळा, घनिष्ठता, निकटता नसते. अशा संबंधास दुय्यम संबंध म्हणतात. शहरी लोकांच्या वर्तनाचे नियंत्रण अशा दुय्यम संबंधाद्वारे औपचारिकपणे केले जाते. शहरात सामाजिक नियंत्रण करण्यासाठी कुटुंब, शेजारी, मित्र, नातलग इ. प्राथमिक समूह अपुरे व असमर्थ ठरतात. तसेच शहरी लोकसंख्या विजातीय असल्याने लोकमत, लोकरूढी, लोकनीती, धर्मकल्पना, मूल्ये इ. साधनेही नियंत्रण ठेवण्यास कुचकामी ठरतात. म्हणून शहरात सामाजिक नियंत्रणासाठी कायदा, पोलीस, न्यायालय, तुरुंग अशी औपचारिक साधनेच वापरली जातात.

## २.४ स्वयं:अध्ययनासाठी प्रश्न (Check Your Progress)

१. नागर समुदायाची एक व्याख्या द्या.

२. लुईस वर्थ यांनी नगरवादाची कोणती तीन वैशिष्ट्ये सांगितलेली आहेत?

३. ग्रामीण व नागर समुदायातील कोणतेही तीन फरक सांगा.

४. ग्रामीण-नागर सातत्य ही संकल्पना कोणी मांडली?

## २.५ सारांश (Let us sum up)

या अध्ययन घटकात तुम्ही नागर समुदाय, नगरवाद, ग्रामीण-नागर भिन्नता व ग्रामीण-नागर सातत्य या चार संकल्पना समजावून घेतल्या आहेत. शहर किंवा नगर म्हणजे नागर समुदाय होय. कृत्रिम पर्यावरणाचा प्रभाव, बिगरशेती व्यवसाय, मोठा आकार, सामाजिक विजातियता, सामाजिक सहिष्णूता, दुय्यम संबंध, दुय्यम समूहांचे नियंत्रण, ऐच्छिक मंडळांची विपूलता व्यक्तिवादाचा प्रभाव, श्रमविभाजन व विशेषीकरण, सामाजिक गतिशीलतेस वाव व क्षेत्रिय नियोजन ही नागर समुदायाची वैशिष्ट्ये आहेत. नगरवाद म्हणजे नगरात किंवा शहरात राहणाऱ्या लोकांची विशिष्ट अशी जीवनपद्धती किंवा जीवनशैली होय. लुईस वर्थ यांनी नगरवादाची ''अस्थिरता, कृत्रिमता व अपरिचितता'' ही तीन प्रमुख वैशिष्ट्ये सांगितलेली आहेत. यानंतर

तुम्ही ग्रामीण व नागर समुदायातील भिन्नता म्हणजेच फरक अभ्यासले आहेत. या दोन समुदायात व्यवसाय, पर्यावरण, आकार, लोकसंख्येची घनता, लोकसंख्येची सजातियता व विजातियता, गतिशीलता, स्थलांतराची दिशा, सामाजिक स्तरीकरणाचे स्वरूप, सामाजिक आंतरक्रियांचे स्वरूप व सामाजिक नियंत्रणाची व्यवस्था इत्यादी मुद्यांच्या आधारे कशी भिन्नता आहे हे समजावून घेतले आहे.

## २.६ स्वयं:अध्ययन प्रश्नांची उत्तरे (Answers to Check Your Progress)

१. साधारणपणे मर्यादित भूप्रदेशातील दाट व विजातीय स्वरूपाची लोकसंख्या, बिगरशेती व्यवसाय, बाजारपेठा, शैक्षणिक, आरोग्य, दळणवळण व मनोरंजन सुविधांची विपुलता, दुय्यम संबंधाचे प्राबल्य, कृत्रिम पर्यावरणाचा प्रभाव इत्यादी वैशिष्ट्यांनी युक्त असलेल्या मानवी वस्तीस नागर समुदाय असे म्हणतात.

२. लुईस वर्थ यांनी नगरवादाची अस्थिरता, कृत्रिमता व अपरिचितता ही तीन वैशिष्ट्ये सांगितलेली आहेत.

३. ग्रामीण व नागर समुदायातील तीन फरक पुढीलप्रमाणे आहेत.

   अ) ग्रामीण समुदायात शेती तर नागर समुदायात बिगरशेती व्यवसाय चालतो.

   ब) ग्रामीण समुदायावर नैसर्गिक तर नागर समुदायावर मानवनिर्मित पर्यावरणाचा प्रभाव अधिक असतो.

   क) ग्रामीण समुदायात लोकसंख्येची घनता कमी तर नागर समुदायात ती जास्त असते.

४. रॉबर्ट रेडफिल्ड यांनी ग्रामीण-नागर सातत्य ही संकल्पना मांडली.

## २.७ स्वाध्याय/गृहपाठ (Exercise/Home Assignment)

**अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. नागर समुदायाची व्याख्या देऊन त्याची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

२. ग्रामीण व नागर समुदायातील फरक स्पष्ट करा.

**ब) टीपा लिहा.**

१. नगरवाद - एक जीवनमार्ग

२. ग्रामीण व नागर समुदायातील फरक स्पष्ट करण्यामध्ये येणाऱ्या अडचणी.

३. नागर समुदायाच्या व्याख्येसाठी वापरले जाणारे निकष.

## २.८ चिंतन आणि कार्य (Reflection and Action)

- नगराच्या जवळ असलेल्या एका खेड्यास भेट द्या. आणि त्या खेड्यात नागरी जीवनाच्या कोणकोणत्या पैलूंचा शिरकाव झालेला आहे याची नोंद करा.
- एका नगराचे निरीक्षण करा. आणि त्यामध्ये ग्रामीण जीवनाचे कोणकोणते पैलू आढळतात याची नोंद करा.

## २.९ अधिक वाचनासाठी पुस्तके (Suggested Readings)


१. प्रा. चंद्रकांत खंडागळे, भारतीय समाज - प्रकाशिका सौ. मायादेवी खंडागळे, सांगली, १९९८.

२. प्रा. चंद्रकांत खंडागळे, ग्रामीण समाजशास्त्र - प्रकाशिका सौ. मायादेवी खंडागळे, सांगली, २००५.

३. शशी के जैन, नगरीय समाजशास्त्र - रिसर्च पब्लिकेशन्स, जयपूर, १९९५.


❑❑❑

# घटक – ३
# नागरीकरणाची प्रक्रिया
# (Process of Urbanization)

**घटक संरचना**


३.१ उद्दिष्ट्ये

३.२ प्रस्तावना

३.३ विषय विवेचन

    ३.३.१ नागरीकरणाचा अर्थ आणि स्वरूप

    ३.३.२ नागरीकरणाची कारणे

    ३.३.३ नागरीकरणाचे परिणाम

३.४ सारांश

३.५ स्वयं अध्ययना प्रश्नांची उत्तरे

३.६ सरावासाठी प्रश्न

३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


## ३.१ उद्दिष्ट्ये

या तिसऱ्या घटकाच्या अभ्यासानंतर विद्यार्थ्यांना वा आपणास,

- सदरील घटकात नागरीकरणाचा अर्थ आणि स्वरूप यावर चर्चा केली जाणार आहे.
- दुसऱ्या उपविभागामध्ये नागरीकरणाची कारणे यांची चर्चा केली जाईल.
- नागरीकरणाचा समाजव्यवस्थेवरील परिणामाचा अभ्यास या भागामध्ये केला जाईल.
- ग्रामीण समाजातील रचना आणि त्यामध्ये झालेले परिवर्तन लक्षात येईल.

## ३.२ प्रस्तावना

प्रस्तुत प्रकरणात नागरीकरणाची प्रक्रियाचा अभ्यास केला जाणार आहे. नागरीकरण (शहरीकरण) ही नागर समाजशास्त्रातील एक महत्त्वपूर्ण संकल्पना आहे. प्राचीन काळापासून मानवी समाजात नगरे वा शहरे आढळून येतात. परंतु नागरीकरणाची प्रक्रिया ही आधुनिक काळात सुरू झाली. औद्योगिक क्रांतीनंतर नागरीकरणाची प्रक्रिया प्रथम युरोपियन राष्ट्रांत व त्यानंतर इतर पाश्चिमात्त्य राष्ट्रांत सुरू झाली. आजच्या काळात ही प्रक्रिया सार्वत्रिक बनली असून नागरीकरण होणे हे आधुनिकतेचे व विकासाचे एक प्रमुख लक्षण मानले जात आहे. या प्रक्रियेस कोणती कारणे जबाबदार आहेत. तसेच या नागरीकरणाच्या प्रक्रियेमुळे समस्त समाजव्यवस्थेवर कशा स्वरूपाचे परिणाम होतात इत्यादीचा अध्ययन या नागर समाजशास्त्रातील तिसऱ्या प्रकरणात केला गेला आहे.

## ३.३ विषय विवेचन :

नागरीकरण किंवा शहरीकरण ही नागर समाजशास्त्रातील एक महत्त्वपूर्ण संकल्पना आहे. प्राचीन काळापासून मानवी समाजात नगरे वा शहरे आढळून येतात. घटक तीनमध्ये आपण नागरीकरणाची प्रक्रिया- यामध्ये नागरीकरणाचा अर्थ, व्याख्या व स्वरूप या पहिल्या उपविभागात अभ्यास करणार आहोत. दुसऱ्या उपविभागात नागरीकरण घडून येण्याकरीता कोणकोणती कारणे जबाबदार आहेत त्याचा अभ्यास करणार आहोत आणि या प्रकरणाच्या शेवटचा उपविभाग यामध्ये नागरीकरणाचा मानवी समाजावरील परिणाम हे अभ्यासणार आहोत. थोडक्यात, भारतातील नागरीकरणाच्या प्रक्रियेचा संक्षिप्त आढावा प्रस्तुतच्या प्रकरणात घेण्यात आला आहे.

### ३.३.१ नागरीकरणाचा अर्थ आणि स्वरूप :

नागरीकरणाचा स्थूलमानाने अर्थ सांगत असताना नागरी क्षेत्रात वा नगरात राहणारी लोकसंख्या वाढत जाणे असा होतो. थोडक्यात ग्रामीण भागातील लोकांनी नागरी क्षेत्राकडे स्थलांतर करणे म्हणजे नागरीकरण होय. काही वेळा नगरांची किंवा शहरांची वाढ, विस्तार, विकास होणे या अर्थानेही नागरीकरण या संज्ञांचा वापर केला जातो. म्हणजेच नगरात राहणाऱ्यांची संख्या व नगराची किंवा शहरांची होणारी वाढ या प्रक्रियेला नागरीकरण असे म्हटले जाते.

नागरीकरणाचा अर्थ अधिक सुस्पष्ट होण्याकरीता काही अभ्यासकांनी नागरीकरणाच्या व्याख्या सांगितल्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे-

**१) चंद्रकांत खंडागळे :**

यांच्या मते नागरीकरण म्हणजे, ज्या प्रक्रियेत नागरी पर्यावरणाने प्रभावित होऊन सभोवतालच्या प्रदेशातील, विशेषतः ग्रामीण भागातील लोक नागरी वा शहरी भागाकडे स्थलांतर करतात आणि नागरी विभागातील बिगरकृषी व्यवसाय व जीवनशैली यांचा स्वीकार करतात या प्रक्रियेस नागरीकरण असे म्हणतात.

२) **ई. ई. बर्गेल :**

ग्रामीण समुदायाचे नागर समुदायात रुपांतर होण्याच्या प्रक्रियेस नागरीकरण म्हणतात. (Urbanization is a process in which rural community is transformed into urban community)

३) **डब्ल्यू. एस. थॉम्पसन :**

कृषी व्यवसायाशी संबंधित असलेल्या लहान समुदायातील लोकसंख्या जेव्हा प्रामुख्याने उद्योग, व्यापार, शासकीय व्यवहार चालत असलेल्या मोठ्या समुदायाकडे स्थलांतरीत होत असेल तर त्या प्रक्रियेस नागरीकरण असे म्हणतात.

४) **विल्यम स्कॉट :**

नागरीकरण ही ग्रामीण भागाकडून नागरी भागांकडे लोकसंख्येचे होणारे स्थलांतर आहे. या स्थलांतराचा परिणाम म्हणून ग्रामीण भागापेक्षा शहरी वा नागरी भागात राहणाऱ्यांचे लोकसंख्या वाढत जाते. या प्रक्रियेला नागरीकरण म्हणतात. तसेच नागरीकरण म्हणजे नागरी वर्तन प्रतिमानांचा व विचार प्रकारांचा प्रसार होणे होय.

वरील नागरीकरणाचा अर्थ आणि व्याख्या यावरून हे स्पष्ट होते की, नागरीकरण म्हणजे लोकांनी ग्रामीण भागांकडून नागरी वा शहरी भागाकडे स्थलांतर करणे, तसेच कृषी व्यवसायाच्या जागी बिगरकृषी व्यवसायाचा स्विकार करणे होय.

**नागरीकरणाचे स्वरूप :**

नागरीकरण ही संकल्पना अधिकाधिक सुस्पष्ट होण्याकरीता याठिकाणी आपण नागरीकरणाच्या स्वरूपाचे अध्ययन करणार आहोत.

१) **स्थलांतर-प्रक्रिया** (Process of Migration)

नागरीकरण ही लोकसंख्येच्या स्थलांतराची प्रक्रिया आहे. या नागरीकरणाच्या प्रक्रियेत सभोवतालच्या प्रदेशातील विशेष करून लहान आकाराच्या समुदायातील किंवा खेड्यातील लोक हे तुलनेने मोठ्या आकाराच्या समुदायाकडे किंवा नगराकडे अथवा औद्योगिक केंद्राकडे स्थलांतर करीत असतात. संयुक्त राष्ट्रसंघाच्या (U.N.O.) एका अहवालानुसार नागरीकरणानुसार नागरीकरणाच्या प्रक्रियेद्वारे लोकसंख्या एका निश्चित निर्धारित आकाराच्या समुहाकडून मोठ्या आकाराच्या समुहामध्ये विलीन वा एकत्रित होत असते.

थोडक्यात नागरीकरणाची प्रक्रिया ही स्थलांतरणाची प्रक्रिया असल्याचे दिसून येते.

२) **आधुनिक प्रक्रिया** (Modern Process)

नागरीकरण ही आधुनिक कळातील प्रक्रिया आहे. मानव समाजात प्राचीन काळापासून शहरे (Towns) व नगरे (Cities) अस्तित्वात आहेत. मानवी संस्कृतीइतकीच नगरे ही प्राचीन आहेत. परंतु प्राचीन काळात नागरीकरणाची प्रक्रिया ही प्रचलित आहेत. परंतु प्राचीन काळात नागरीकरणाची प्रक्रिया ही

प्रचलित नव्हती. ही प्रक्रिया आधुनिक काळात सुरू झाली. औद्योगिक क्रांतीनंतर प्रथम इंग्लंड व त्यानंतर इतर युरोपियन राष्ट्रात आणि त्यानंतर ती इतर पाश्चात्य राष्ट्रात या प्रक्रियेची सुरुवात झाली आणि त्यानंतर तिचा प्रसार पौर्वात्य राष्ट्रातही पोहचले. आज सर्वत्रच नागरीकरण ही अनिवार्य प्रक्रिया मानली जाते.

### ३) **सामाजिक प्रक्रिया** (Social Process)

नागरीकरण प्रक्रिया ही केवळ एका भौगोलिक स्थानाकडून दुसऱ्या भौगोलिक स्थानाकडे स्थलांतरणाची म्हणजेच भौगोलिक गतिशीलतेची प्रक्रिया नसून ती एक सामाजिक प्रक्रियासुद्धा आहे. समाजशास्त्रीयदृष्ट्या आपणास असे म्हणता येईल की नागरीकरण ही नागरी जीवनपद्धतीच्या वैशिष्ट्यात वाढ होण्याची प्रक्रिया आहे. अशा वैशिष्ट्यांनी युक्त असलेली मनोवृत्ती लोकांमध्ये विकसित होणे नागरीकरणात अभिप्रेत आहे. ग्रामीण लोकांनी नगराकडे स्थलांतर करणे व बिगर कृषी व्यवसाय स्विकारणे एवढेच नागरीकरणासाठी पुरेसे नाही तर त्यांच्या आचार-विचार, मुल्ये, राहणीमान, जीवनशैली इत्यादी गोष्टींतही नागरी पर्यावरणाच्या अनुषंगाने परिवर्तन घडून आले पाहिजे. याच अर्थाने विल्यम स्कॉट हे नागरीकरणास नागरी वर्तन प्रतिमानांचा आणि विचार पद्धतीचा (Mode of thought) प्रसार होणे असे मानतात. थोडक्यात नागरीकरणाच्या प्रक्रियेत केवळ भौगोलिक गतिशीलता आढळून येत नाही तर सामाजिक गतिशीलता देखील घडून येत असते. यामध्ये नागरी मुल्याचा विस्तार होतो. व्यवहारामध्ये बदल जसा होतो तसे त्या बदलत्या वातावरणाशी ग्रामीण लोक तादात्मीकरणाचा वा समायोजन करून घेण्याचा प्रयत्न करीत असतात. त्यामुळे नागरीकरण ही एक सामाजिक प्रक्रिया आहे.

### ४) **नगरवादाहुन वेगळी प्रक्रिया** (Different from urbanism)

बहुतांशी वेळा नागरीकरणाच्या प्रक्रियेचा संबंध नगरवादाशी (Urbanism) जोडल्याचे आढळते. परंतु नागरीकरण ही नगरवादाहून भिन्न किंवा वेगळी अशी प्रक्रिया आहे. लुईस वर्थ यांनी नागरीकरणास एक प्रक्रिया (Process) मानले आहे. तर नगरवादास एक स्थिती (Situation) मानले आहे. एस. बी. क्विन आणि डी. बी. कारपेंटर यांनी त्यांच्या "The American City" या ग्रंथात असे नमूद केले आहे की, ''नगरात निवास करण्याच्या स्थितीशी तादात्म्य (समरस, समन्वय) प्रस्थापित करणे म्हणजे नगरवाद होय आणि नागरी निवासाच्या जीवनपद्धतीशी तादात्म्यीकरण प्रस्थापित करण्यास नागरीकरण असे म्हणतात.'' नगरवााद ही नगरात राहणाऱ्या लोकांचा जीवन जगण्याचा मार्ग किंवा शैली (पद्धती) आहे. नागरीकरणाची प्रक्रिया ह्या जीवनशैलीतस समृद्ध करते. ज्या लोकांना ह्या जीवनशैलीचा परिचय नाही त्यांच्यापर्यंत ही जीवनशैली पोहचविण्याचे कार्य नागरीकरणाची प्रक्रिया करते. थोडक्यात नागरीकरण ही नगरवादाचा प्रसार व विस्तार करणारी प्रक्रिया आहे असे म्हणता येईल.

### ५) **औद्योगिकरणाशी संबंधीत** (Related to industrialization)

नागरीकरणाची प्रक्रिया ही औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेशी घनिष्टपणे संबंधित आहे. कारण यामध्ये औद्योगिकीकरणा पाठोपाठ नागरीकरण सुरू होते असे मानले जाते. काही विद्वानांच्या मते या दोन्ही प्रक्रिया

नेहमी हातात हात घालून वाटचाल करीत असतात. नागरीकरण हे आर्थिक विकासाचे लक्षण मानले जाते. त्यामुळे ज्या भागात आर्थिक विकासाची प्रक्रिया सुरू आहे त्या समाजात नागरीकरणाची प्रक्रिया चालू असते. तसेच आर्थिक विकास करू इच्छिणाऱ्या समाजात औद्योगिकीकरणावर भर दिला जातो. औद्योगिकीकरणामुळे नवीन उद्योग केंद्रे अस्तित्वात येतात तर काहीवेळा जुन्या उद्योगकेंद्राचा विकास साधण्यावर भर दिला जातो. अशा उद्योगकेंद्रात नागरी सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात. परिणामी अशा केंद्राकडे सभोवतालच्या प्रदेशातून लोक नोकरी, धंदा, व्यापार, शिक्षण, प्रशिक्षण इत्यादीच्या निमित्ताने ओढले जातात. त्यातूनच नागरीकरणाची प्रक्रिया सुरू होते.

## ६) **नागरीकरणाच्या पूर्वावश्यकता** (Prereguisites of Urbanization)

नागरीकरणाची प्रक्रिया सुरू होण्यासाठी अगोदर काही गोष्टींची पूर्तता होणे आवश्यक असते. ग्रामीण भागातून नगराकडे लोकांचे स्थलांतर होण्यासाठी वाहतुकीच्या (मोटार, रेल्वे, जहाज, विमान इ.) आणि संदेशवहनाच्या (टपाल, तारायंत्र, टेलिफोन, रेडिओ) इत्यादी प्रगत साधनांचे जाळे उभारलेले असले पाहिजे. तसेच त्यांच्यात वरचेवर विकास घडवून आणला पाहिजे. तसेच नगरात जमीन, पाणी, निवाऱ्याची साधने, वस्तूंच्या देवाणघेवाणाची व्यवस्था, इत्यादी बाबींचीही उपलब्धता असली पाहिजे. काही अभ्यासकांच्या मते नागरीकरणासाठी विशिष्ट मनोवृत्ती किंवा दृष्टीकोनही निर्माण झालेला असावा लागतो.

## ७) **नागरीकरणाच्या अवस्था :**

नागरीकरणाच्या प्रक्रियेची गती ही औद्योगिकीकरणाच्या गतीवर अवलंबून असते. त्यामुळे औद्योगिकीकरणाच्या विकासाच्या अवस्थांनुसार नागरीकरणाच्याही विविध अवस्थांमधून विकास होत जातो. त्यालाच नागरीकरणाच्या अवस्था (Phases of Urbanization) असे म्हणतात. त्या अवस्था पुढीलप्रमाणे आहेत–

### अ) **पहिली अवस्था** (First Phase)

पहिल्या अवस्थेत नागरीकरणाची सुरुवात प्रथमतः संथ गतीने होते. या अवस्थेत एखाद्या समाजात औद्योगिकीकरणाला नुकतीच सुरुवात झालेली असते. त्यामुळे त्यावर आधारलेल्या नागरीकरणासही फारसा वेग आलेला नसतो. प्रक्रियेचा प्रारंभ मात्र निश्चित रूपाने झालेला असतो. दुसऱ्या अवस्थेला आवश्यक असणारी पोषक परिस्थिती निर्माण करण्याचे कार्य पहिल्या अवस्थेकडून केले जाते. नागरीकरणासाठी आवश्यक असणाऱ्या गरजा उदाहरणार्थ – जमीन, निवारा सहित्य, पाणीपुरवठा सामुहिक जीवनासाठी आवश्यक असणाऱ्या आर्थिक, सामाजिक यंत्रणा (मालमत्ता, श्रम, सेवा व वस्तुंची देवाणघेवाण व्यवस्था इत्यादी संरक्षण व्यवस्था, प्रशासन आणि नवीन मनोवृत्ती किंवा दृष्टीकोण इत्यादी बाबी या पहिल्या अवस्थेत उपलब्ध झालेल्या असतात.

### ब) **दुसरी अवस्था :**

औद्योगिकरणाचा वेग या दुसऱ्या अवस्थेत बराचसा वाढलेला असतो. अनेक औद्योगिक नगरे अस्तित्वात येतात. जुन्या औद्योगिक नगरात स्थलांतरीत लोकांचे प्रमाण खूपच वाढलेले असते. त्यामुळे

त्यांचे नुतनीकरण होते. अशा नगरांतून नागरी समस्यांची सुरुवातही झालेली असते. औद्योगिकरणाची गती वाढल्याने त्यावर अवलंबून असलेल्या नागरीकरणाचीही गती वाढते.

**क) तिसरी अवस्था :**

या तिसऱ्या अवस्थेत नागरीकरणाची कमाल पातळी (उच्चांक) गाठली जाते. कारण या अवस्थेत औद्योगिकीकरणाची प्रक्रिया पूर्ण होत आलेली असते. औद्योगिक विकास पूर्णपणे झालेला असतो. तसेच नागरीकरणाच्या प्रक्रियेमुळे बहुतेक सर्व समस्यानी उग्र स्वरूप धारण केलेला असतो. या समस्येच्या निर्मुलनाकरीता उपाययोजना कराव्या लागतात काही धोरणाची, उपक्रमांची आखणी करावी लागते.

**ड) चौथी अवस्था :**

या शेवटच्या अवस्थेत नागरीकरणाची गती थंडावते (कमी) होते. औद्योगिकरण पूर्ण झाल्याने त्यावर अवलंबून असलेल्या नागरीकरणाची गती होते हे नैसर्गिक असते. अशावेळी नागरीकरणाची प्रक्रिया पूर्ण झाली असे मानले जाते.

अशा प्रकारे वरील चार अवस्थेतून नागरीकरणाची प्रक्रिया विकसीत होऊन पूर्णत्वाला पोहचते.

**८) सामाजिक परिवर्तनाचा घटक :**

सामाजिक परिवर्तनास जबाबदार असणाऱ्या अनेक घटकांपैकी नागरीकरण हा महत्त्वाचा घटक असतो. नागरीकरणामुळे पारंपारिक सामाजिक संस्था, सामाजिक मुल्ये, सामाजिक जीवन पद्धती, सामाजिक संरचना, इत्यादीमध्ये लक्षणीय परिवर्तन घडून येते हे आजपर्यंतच्या अभ्यासावरून सिद्ध झालेले आहे. संयुक्त कुटुंबाच्या जागी विभक्त कुटुंब अस्तित्वात येते. धर्मसंस्थेचे महत्त्व कमी होते. अर्थसंस्थेत परिवर्तन होते. लोकांचे राहणीमान, मनोवृत्ती, अभिवृत्ती, सामाजिक संबंध यामध्ये अमुलाग्र बदल घडून येतात. अनौपचारिकतेच्या जागी औपचारिक अशा शास्त्रीय व तांत्रिक शिक्षणास महत्त्व येते, नवीन समस्येते वाढ होते, अशाप्रकारची परिवर्तन नागरीकरण प्रक्रियेमुळे घडून येते.

अशाप्रकारचे नागरीकरणाचा अर्थ, व्याख्या आणि स्वरूप यांचे सविस्तर विश्लेषण वरील विविध मुद्द्यांच्या आधारे करता येते.

## **३.३.२ नागरीकरणाची कारणे** (Causes of Urbanization)

नागरीकरणाची प्रक्रिया या तिसऱ्या घटकामधील पहिल्या उपविभागात नागरीकरणाचा अर्थ व स्वरूप याचे विस्ताराने अध्ययन केल्यानंतर या प्रकरणाच्या दुसऱ्या उपविभागात नागरीकरणास जबाबदार असणाऱ्या कारणांचा किंवा घटकांचा अभ्यास करणार आहोत. ग्रामीण भागातून लोकांचे नगराकडे स्थलांतर होणे हा नागरीकरणाच्या प्रक्रियेतील महत्त्वाचा भाग आहे. ह्या स्थलांतराने ज्या घटकांमुळे चालना मिळते त्या घटकांना नागरीकरणाची कारणे असे म्हणता येते. नागरीकरणास जबाबदार असणाऱ्या कारणाचा पुढीलप्रमाणे अभ्यास करता येईल.

**१) औद्योगिकीकरण** (Industrialization)

औद्योगिकीकरण हे नागरीकरणाचे प्रमुख कारण मानले जाते. औद्योगिक क्रांतीनंतर मानव समाजात औद्योगिकीकरणाची प्रक्रिया सुरू झाली. शास्त्रीय शोधावर आधारलेली यंत्रे व तंत्रे उदयास येऊन त्यांचा उत्पादन प्रक्रियेत वापर होऊ लागला. त्यातून कारखाना उत्पादन पद्धतीचा उदय झाला. आर्थिक विकासाकरीता मोठमोठे कारखाने म्हणजेच उद्योगधंदे सुरू केले जाऊ लागले. उद्योगधंद्यांचे केंद्रीकरण होऊ लागले. या भागात नोकरी, व्यवसाय, व्यापार करण्याच्या उद्देशाने ग्रामीण भागातील लोक मोठ्या संख्येने शहरात वा नगरात येऊन स्थलांतर करू लागले. यातूनच काही नवीन शहराचा उदय झाला तर जुन्या शहरांचा विस्ताव व विकास होऊ लागला. याप्रकारे औद्योगिकीरणामुळे नागरीकरणास चालना मिळाली. उदा. सुमारे ३०० वर्षापूर्वी कोळ्यांची वस्ती असलेल्या मुंबई बेटाचे ब्रिटीश राजवटीत औद्योगिक केंद्रात रूपांतर होत गेले आणि आज भारतातील प्रथम क्रमांकाचे नगर बनले आहे. तसेच इ.स. १९११ मध्ये एक लहान गाव असलेल्या जमशेटपूरमध्ये 'टिस्को' हा पोलाद कारखाना सुरू केल्यानंतर त्याचे नगरात रुपांतर झाले. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतात औद्योगिकरणास चालना दिली व त्यातूनच भारतात नागरीकरणाची गती वाढली. अशाप्रकारे औद्योगिकरण हा नागरीकरणास जबाबदार ठरणारा मुलभूत घटक आहे.

**२) दळणवळणाची वा वाहतुकीची व संप्रेषणाची प्रगत साधने :**

दळणवळणाची प्रगत साधने हे नागरीकरणास जबाबदार असणाऱ्या कारणांपैकी एक आहे. औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेत कच्चा व पक्का माल तसेच मनुष्यबळ यांची वाहतूक करण्यासाठी व संदेश त्वरीत पाठविण्याकरीता संप्रेषणाच्या प्रगत साधनांची गरज असते. यातूनच मोटार, ट्रक, रेल्वे जहाज, विमान अशी वाहतुकीची साधने आणि टपाल, तारायंत्र, दुरध्वनी, वायरलेस, फॅक्स अशी संदेशवहनाची साधने उदयास आली. जमीन पाणी व आकाश ह्या तीन मार्गावर दळणवळण साधनांचे जाळे विणले गेले. परिणामी लोकांना ग्रामीण भागातून नगरांकडे स्थलांतर करणे सहजसुलभ झाले. दळणवळणाच्या, वाहतुकीच्या तसेच संप्रेषणाच्या प्रगत साधनामुळे लहान-लहान गावे ही शहरे वा नगराशी व औद्योगिक केंद्राशी जोडली गेली. परिणामी सभोवतालच्या प्रदेशातील लोकसंख्येचे स्थलांतर मोठ्या प्रमाणावर होऊन नागरीकरणास चालना मिळाली आहे.

**३) व्यापार आणि व्यवसाय** (Trade & Occupation)

एखादा व्यवसाय किंवा व्यापार करून पैसा कमावण्याच्या हेतूने एखाद्या मध्यवर्ती नगराकडे ग्रामीण लोक, दुसऱ्या नगरातील लोक, एवढेच नव्हे तर परदेशातील लोकही धाव घेतात. म्हणजेच एखाद्या शहरास वा नगरास व्यापाराच्या दृष्टीने महत्त्व प्राप्त झाल्यास त्याकडे स्थलांतर करण्याचे प्रमाण वाढत जाते व नागरीकरणास चालना मिळते. भारतात कानपूर व अहमदाबाद यांचा याच कारणामुळे विस्तार मोठ्या प्रमाणात वाढत आहे.

**४) शिक्षण** (Education) :

शिक्षण हे देखील नागरीकरणास जबाबदार कारण ठरले आहे. एखाद्या नगरात, शहरात किंवा गावात एक किंवा अधिक शैक्षणिक संस्था सुरू होतात. त्यामुळे शिक्षण घेण्यासाठी विद्यार्थ्यांची व त्यांना हव्या असणाऱ्या सोयीसुविधा पुरविणाऱ्या लोकांची त्या नगरात, शहरात किंवा गावात गर्दी होऊ लागते व त्यातून नागरीकरणास गती मिळते. यामध्ये इ.स. १८५७ साली मुंबई, कलकत्ता, मद्रास (चेन्नई) येथे विद्यापीठे सुरू झाली. पुढे या नगरांतून व्यावसायिक व तांत्रिक शिक्षणसंस्थांची संख्या वाढत गेली. त्यामुळे या नगरांकडे शिक्षणप्रेमी मंडळींनी मोठ्या प्रमाणावर स्थलांतर केले. आणि 'विद्येचे माहेरघर' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुणे शहराच्या वाढीमध्ये शिक्षण ह्या घटकाचा मोठा वाटा आहे.

**५) राजकीय घटक** (Political Factor)

एखाद्या शहरास वा नगरास राजधानीचा दर्जा मिळाल्यानंतर त्याची झपाट्याने वाढ होते. असे शहर राजकीय, प्रशासकीय कार्याचे प्रमुख केंद्र बनते. तसेच लष्करीदष्ट्याही त्यांचे महत्त्व वाढते. परिणामी सभोवतालच्या भागातील लोक अशा शहराकडे मोठ्या प्रमाणावर स्थलांतर करू लागतात व नागरीकरणास चालनाा मिळते. भारतातील दिल्ली, भोपाळ, हैद्राबाद इत्यादींची वाढ होण्यात त्यांचा राजधानी म्हणून असलेला दर्जा मोठ्या प्रमाणावर कारणीभूत आहे.

**६) धार्मिक क्षेत्र** (Religious Centre)

धार्मिकदृष्ट्या महत्त्व प्राप्त झालेल्या क्षेत्राकडे लोक मोठ्या प्रमाणावर स्थलांतर करतात. परिणामी त्या क्षेत्राचे नगरात रुपांतर होते. भारतात हे चित्र विशेषत्वाने दिसून येते. वाराणसी, गया, मथुरा, अलाहाबाद इत्यादी धार्मिक क्षेत्रे आज मोठी नगरे बनलेली आहेत. सुमारे ५० वर्षापूर्वी एक छोटेसे खेडे असलेले शिर्डी हे गाव (जि. अहमदनगर) यांचे धार्मिक महत्त्व वाढले आणि त्यांचे शहरात रुपांतरीत झाले आहे.

**७) पर्यटन केंद्र** (Tourist Centre)

एखादे थंड हवेचे ठिकाण, निसर्गरम्य ठिकाण, एखादा महत्त्वपूर्ण वैशिष्ट्यपूर्ण प्रसिद्ध पावलेले ठिकाण इत्यादीमुळे हौसी पर्यटक मंडळी खेचली (ओढली) जातात. त्यांना आवश्यक असलेल्या सोयीसुविधा पुरविणारे व्यापारी, विक्रेते त्या ठिकाणी येऊन दुकाने, हॉटेल, खानावळ, लॉज अशी केंद्रे सुरू करतात. पुढे त्या ठिकाणाचा पर्यटन केंद्र म्हणून विकास होत जातो व त्याचे नगरात रुपांतर होते. उदा. म्हैसूर, उटी, मसुरी इ.

**८) लोकसंख्या वाढ** (Population Growth)

जागतिक लोकसंख्या अलिकडील काळात मोठ्या प्रमाणात वाढत चालली आहे. वाढत्या लोकसंख्येच्या गरजा पूर्ण करण्यास खेड्यासारखे लहान समुदाय असमर्थ ठरत आहे. शिवाय वाढती लोकसंख्या खेड्यातील शेती व्यवसायात सामावली जाऊ शकत नाही. परिणामी, खेड्यातील लोक नोकरी,

व्यवसाय, व्यापार, रोजगार व अन्य सोयीसुविधा मिळविण्यासाठी जवळपासच्या नगरांकडे स्थलांतर करीत आहेत. यामुळे देखील नागरीकरणास वेग आलेला आहे.

**९) नागरी जीवनाचे आकर्षण** (Attraction of Urbanlife)

आधुनिक काळात शहरे व नगरे ही उत्पादन, वितरण, शिक्षण, मनोरंजन, संरक्षण, प्रशासन, राजकारण इत्यादीची केंद्रे बनली आहेत. त्याचा परिणाम शहरात कारखाने, दुकाने, बाजारपेठा, बँका, हॉटेल, लॉज, शाळा, चित्रपट व नाट्यगृहे, क्लब, दवाखाने, बागा, क्रीडांगणे, व्यायामशाळा अशा विविध सोयीसुविधा उपलब्ध असतात. परिणामी नागरी जीवन हे आकर्षक, चैनीचे व चकचकीत बनलेले असते त्याचा परिणाम नागरी जीवनाचे आकर्षण निर्माण होऊन ग्रामीण लोक नगरात किंवा शहरात वास्तव्यासाठी येऊ लागले आहेत. परिणामी नागरिकरणास चालना मिळाली आहे.

अशाप्रकारे नागरीकरणास वरील विविध कारणांनी चालना मिळते. ही कारणे नागरीकरणास जबाबदार ठरतात.

**३.३.३ नागरीकरणाचा परिणाम** (Consequences of Urbanization)

सामाजिक परिवर्तनास चालना देणारी एक महत्त्वपूर्ण प्रक्रिया म्हणजे नागरीकरण होय. कारण नागरीकरणाचा प्रभाव मानवी जीवनाच्या सर्व क्षेत्रात परिवर्तन घडून मोठी चालना मिळालेली आहे. त्यामुळे नागरीकरणाचा प्रभाव किंवा परिणाम जाणून घेणे आवश्यक ठरते. नागरीकरणाचा कुटुंब, जातीसंस्था, वर्गव्यवस्था, स्त्रियांचा दर्जा, नागरी व ग्रामीण जीवन इत्यादींवर पडलेला प्रभाव वा परिणाम कोणता होता. तो पुढीलप्रमाणे सांगते येईल.

**अ) नागरीकरणाचा कुटुंबावरील परिणाम वा प्रभाव**

नागरीकरणाचा कुटुंबसंस्थेवर कोणता प्रभाव पडतो तो प्रभाव वा परिणाम पुढीलप्रमाणे सांगता येईल.

**१) कुटुंबाच्या आकारात बदल :**

नागरीकरणाच्या प्रभावामुळे संयुक्त कुटुंबपद्धतींच्या जागी विभक्त किंवा केंद्र कुटुंबपद्धती स्थापन करण्याची प्रवृत्ती वाढत चालली आहे. पती, पत्नी व त्यांची अविवाहीत अपत्ये यांचा समावेश केंद्र कुटुंबात होऊ लागला. तसेच लहान आकाराचे कुटुंब नागर समाजात अनेक दृष्टीने सोयीचे ठरू लागले. नागरीकरणामुळे व्यक्तीवादी वृत्तीत वाढ, राहत्या जागेची टंचाई, उच्च जीवनमान, पती-पत्नी दोघेही नोकरी करणे, धावपळीची जीवनशैली इत्यादीमुळे कुटुंबाचा आकार लहान ठेवणे सोयीचे वाटू लागले. संतती नियोजन साधनांच्या माध्यमातून प्रजोत्पादनाद्वारे वाढणारा कुटुंबाचा आकार मर्यादीत करणे शक्य झाले आहे. अशाप्रकारे नागरीकरणाचा कुटुंबसंस्थेवर परिणाम होऊन संयुक्त कुटुंबाच्या जाती विभक्त वा केंद्र कुटुंबाने स्थान घेतलेले दिसून येते.

### २) पितृसत्ताक एकाधिकारशाहीचा ऱ्हास :

नागरी कुटुंबात कुटुंबप्रमुख पुरुषाच्या एकाधिकारशाहीचा ऱ्हास होत आहे. पती हाच कुटुंब प्रमुख असला तरी त्याला इतर सदस्यांच्या म्हणजे पत्नी व मुलांच्या मतांचा, आवडीनिवडीचा, इच्छा आकांक्षाचा आदर करून निर्णय घ्यावा लागतो. मातापिता आपले निर्णय मुलांवर जबरदस्तीने लादत नाहीत व मुलेही प्रत्येक आज्ञा-आंधळेपणाने पालन करीत नाहीत. थोडक्यात नागरी समाजात पितृसत्ताक एकाधिकारशाहीचा ऱ्हास होऊन सर्व सदस्यांच्या मताचा आदर, मतस्वातंत्र्याचा आदर करून परस्पर सहमतीने निर्णय घेण्याचे समतावादी वातावरण निर्माण झालेले दिसून येते.

### ३) स्त्रियांच्या दर्जात वाढ :

भारतीय समाजव्यवस्था ही पितृसत्ताक कुटुंबपद्धती आहे. या कुटुंबामध्ये स्त्रियांना नेहमीच दुय्यम वा कनिष्ठ स्थान दिलेले दिसून येते. परंतु नागरीकरणामुळे स्त्रीचा कुटुंबातील दर्जा उंचावण्यास मदत झाली आहे. नागरी कुटुंबात पती हा पत्नीच्या सल्ल्याने अधिकार वापरतो किंवा पती पत्नीत अधिकाराचे विभाजन होत आहे. कुटुंबातील कामाच्या बाबतीत लिंगभेदावर आधारलेले कार्यविभाजन शहरात दिसून येत नाही. कमावत्या पत्नीला पती स्वयंपाक व अन्य घर कामात मदत करतो. नोकरी वा धंद्यामुळे घराबाहेर असणाऱ्या पुरुषास कुटुंबाच्या दैनंदीन व्यवहाराकडे लक्ष देणे शक्य नसते. त्यामुळे पत्नीच बाजार करणे, पोस्ट बँक इत्यादी ठिकाणी जाणे, मुलांना शाळेत नेणे-आणणे अशी कामे करते व त्याबाबतचे स्वातंत्र्य तिला मिळते. नोकरी करणारे जोडपे त्यांच्या सोयी व सवडीनुसार घरातील व घराबाहेरील कामे करतात. नागरी कुटुंबात मुलाप्रमाणेच मुलीला समान मानून तिच्या व्यक्तीमत्त्व विकासाकडे लक्ष दिले जात आहे.

### ४) व्यक्तीवादी दृष्टीकोणाचा पुरस्कार :

नागरीकरणामुळे व्यक्तीवादी दृष्टीकोन हळूहळू बळावत चालला आहे. नागर समाजात व्यक्तीला स्वकर्तृत्वाने शिक्षण, नोकरी, व्यवसाय, पैसा, प्रतिष्ठा मिळविण्याची संधी मोठ्या प्रमाणात असल्याने कुटुंबाच्या चालीरीती, आई-वडिलांच्या अपेक्षा यापेक्षा व्यक्तीगत इच्छा आकांक्षा महत्त्वाच्या ठरू लागल्या आहेत. स्वहिताच्या, व्यक्तीवादी दृष्टीकोणात वाढ होत आहे.

### ५) कुटुंबाच्या कार्यात बदल :

संयुक्त कुटुंबाचे केंद्र वा विभक्त कुटुंबात रुपांतर झाल्यामुळे कुटुंबाची अनेक कार्ये इतर संस्था, संघटना, मंडळे व समुह यांच्याकडे हस्तांतरीत झाली आहेत. प्रजोत्पादनाचे कार्य कुटुंबातच होत असले तरी त्यासाठी डॉक्टर्स, नर्स, प्रसुतीगृहे यांचे बालसंगोपन, तसेच वयोवृद्धांचे संगोपन हे कुटुंबात होत होते. परंतु आज बालसंगोपन व वयोवृद्धांचे संगोपनाकरीता विविध स्वयंसेवी संस्थाद्वारे केले जात आहे. लहान मुलांचा सांभाळ करण्यासाठी पाळणागृहे, शिशुसदन यांच्यावर अवलंबून राहावे लागत आहे. मुलांच्या औपचारिक, तांत्रिक व व्यावसायिक शिक्षणासाठी कुटुंब हे बालवाडीपासून विद्यापीठापर्यंतच्या शिक्षणसंस्थावर विसंबून रहावे लागते. करमणूक, खेळ, शिक्षण, आरोग्य याकरीता कुटुंबाबाहेरील पर्यावरणाचा व संस्थांचा प्रभाव

पडून त्यांची मनोवृत्ती कुटुंबनिरपेक्ष असे स्वहिताचा विचार अधिक बळावत चालला आहे. नागर समाजात व्यक्तीचा सामाजिक दर्जा व प्रतिष्ठा कुटुंबावरून निर्धारित न होता व्यक्तीच्या कर्तृत्वाने निर्धारीत होत आहे.

**६) समस्यांची निर्मिती :**

नागरीकरणाच्या प्रभावामुळे कांही कौटुंबिक समस्या निर्माण झाल्या आहेत. शहरातील विभक्त कुटुंबाकडून नात्यातील वृद्ध, अपंग, परितक्त्या व निराधार व्यक्तींचे योग्य काळजी व पालनपोषण केले जात नाहीत. वृद्धापकाळी ज्येष्ठ नागरीकांना कौटुंबिक संरक्षण मिळेनासे झाले आहे. त्याचा परिणाम भविष्यनिर्वाह निधी, निवृत्ती वेतन, आयुर्विमा, वृद्धाश्रम अशा सुविधा निर्माण झाल्या आहेत. तसेच बालसंगोपणाकरीता आज आपल्यास कुटुंबाचा सहवास पाहिजे इतका मिळत नाहीत, लहान कुटुंब, पती-पत्नी नाकरी करणारे, वेळेचा अभाव यामुळे मुलांचा भावनिक कोंडमारा होत आहे. त्यामुळे तरुणांच्या मते अनेक समस्या निर्माण होत आहेत.

**ब) नागरीकरणाचे जातीव्यवस्थेतील परिणाम** (Consequences of Urbanization on Caste System)

भारतीय समाजव्यवस्थेत जातीव्यवस्थेची पाळेमुळे खोलवर रुतलेली आहेत. परंतु नागरीकरणाचे जातीव्यवस्थेवरील खोलवर परिणाम होऊन, थोड्याफार प्रमाणात का असेना जातीव्यवस्थेवर शिथिल होण्यास मदत झाली आहे.

**१) अर्जित दर्जाला महत्त्व** (Importance to achieved Status)

शहरी समाजामध्ये विभिन्न जातीचे, धर्माचे, भाषेचे, व्यवसायाचे लोक एकत्र राहत असतात. या नागर समाजात व्यक्तीचा दर्जा व प्रतिष्ठा ह्या गोष्टी जात, जन्म, कुटुंब इत्यादीच्या आधारे निर्धारीत करणे अशक्य झाले आहे. त्यामुळे जन्मजात प्राप्त झालेल्या अर्पित दर्जापेक्षा अर्जित दर्जाला महत्त्व प्राप्त झाले आहे. नागरी पर्यावरणात सामाजिक गतिशीलतेस भरपूर वाव मिळतो. त्यामुळे स्वकर्तृत्वाने कनिष्ठ जातीतील व्यक्तींना, सत्ता, संपत्ती मिळवून त्याआधारे उच्च सामाजिक दर्जा संपादन करणे शक्य झाले आहे. कारण शहरात दर्जाच्या दृष्टीने शिक्षण व संपत्ती या घटकांना महत्त्व प्राप्त झाले आहे. जो व्यक्ती कर्तृत्वहीन असेल, जरी तो उच्च जातीतील व्यक्तीचा दर्जा कनिष्ठ मानला जाऊ लागला आहे. नागरीकरणामुळे जातीच्या आधारे व्यक्तीच्या सामाजिक दर्जाचे निर्धारण करणे अशक्य होऊन अर्जित वा संपादित दर्जाला महत्त्व प्राप्त झाले आहे.

**२) व्यवसाय निवडीचे स्वातंत्र्य** (Freedom of Choice of Occupation)

जाती व्यवस्थेची डॉ. जी. एस. घुर्ये यांनी जी वैशिष्ट्ये सांगितली आहेत, त्यानुसार भारतामध्ये जातीनुसार व्यवसायीक बंधन होते. परंतु नागरीकरणामुळे व्यवसाय निवडीचे स्वातंत्र्य उपभोगने शक्य झाले आहे. शहरी व्यवसाय हे जातीच्या चौकटीत बसत नसल्याने व्यावसायिक गतीशिलतेला वाव मिळाला आहे. शहरातील आधुनिक व्यवसायात जातीच्या आधारे नोकर भरती न करता, व्यक्ती कौशल्य, शैक्षणिक

पात्रतेच्या आधारे नोकरी दिली जाते. आधुनिक काळात प्रत्येक व्यक्ती आपल्या आवडीनुसार व्यवसाय निवडू लागला असून जातीनुसार व्यवसाय निर्बंध शिथिल होत आहे.

३) **खाणे-पिणे व सामाजिक संपर्काबाबतच्या निर्बंधाचे उच्चाटन** (Eradication of restrictions on eating & drinking and Social Contact)

नागरीकरणामुळे जातीचे खाणेपिणे व सामाजिक संपर्काबाबतच्या निर्बंधाचे उच्चाटन झाले आहे. आज विविध जातीचे, धर्माचे, वंशाचे, प्रादेशिक विविधतेचे लोक एकत्रित वावर करीत आहे. जातीचे निर्बंध कमी होऊन लोक आज खाण-पान व सामाजिक संपर्काबाबतचे निर्बंधाचे उच्चाटन होत आहे. पाश्चात्त्य संस्कृतीच्या प्रभावाने उच्च जातीतही मद्यसेवन व मांसाहार करू लागले आहेत. नाट्य, चित्रपटगृहे, शाळा, बँक, शासकीय कार्यालये एकत्रित काम करतात तसेच मोटार व रेल्वेतून प्रवास करतात. त्यामुळे सामाजिक संपर्क वाढलेला आहे. जातीचे निर्बंध शिथिल झाले आहेत.

४) **आंतरजातीय विवाहास चालना** (Promotion to intercaste-marriages)

नागर समाजात विभिन्न जातीधर्माच्या स्त्री-पुरुषांचा अनेक कारणामुळे निकटचा संबंध येऊ लागला. एकमेकांना ओळखण्याची, पारखण्याची पुरेसी संधी त्यांना मिळू लागली. त्यातूनच आकर्षण वाढून आंतरजातीय विवाहास चालना मिळाली आहे. कायदा व पुरोगामी व्यक्ती यांचा अशा विवाहास पाठिंबा व प्रोत्साहन मिळत आहे. नियोजित विवाहाबरोबरच प्रेमविवाहाचा स्विकार केला जात आहे. तसेच मुला-मुलींना त्यांच्या आवडीचा जोडीदार निवडीचे स्वातंत्र्य असल्यामुळे जातीचा अंतर्विवाहाचा नियम शिथिल होण्यास मदत झाली आहे.

५) **वर्गव्यवस्थेचा उदय** (Emergence of Class System)

नागरीकरणाच्या प्रभावामुळे वर्गव्यवस्थेचा उदय व वाढ होण्यास मदत होत आहे. शहरातील आधुनिक व्यवसायात विभिन्न जातीचे लोक एकत्र आले. त्यांचे हितसंबंध समान बनले व ते साध्य करण्यासाठी विभिन्न जातीचे लोक संघटित होऊ लागले. त्यांच्यामध्ये एकात्मता निर्माण होऊ लागला. ही परिस्थिती जातीव्यवस्थेच्या अस्तित्वास मारक ठरून वर्गव्यवस्थेच्या उदयास पोषक वातावरण निर्माण होत आहे.

६) **धर्माचा आधार नष्ट** (Destroyed of foundation of religion)

जातीव्यवस्थेला धर्माचा आधार आहे. परंतु नागरीकरणामुळे धर्माचा आधार नष्ट होण्यास मदत झाली आहे. नागरी पर्यावरण, बुद्धिवाद, तर्कशुद्धता, शास्त्रीय वा वैज्ञानिक दृष्टीकोण इत्यादीना पोषक वातावरण निर्माण झाले. त्यामुळे जातीसंस्था ही ईश्वरप्रणीत आहे आणि गतजन्मातील कर्माचे फळ म्हणून या जन्मी उच्च वा नीच जात मिळते ही विचारसरणी शहरी जीवनात अमान्य केली जाते. जातीव्यवस्था ही अशास्त्रीय असून तिचे समुळ उच्चाटन झाले पाहिजे. कारण जातीव्यवस्था ही सर्वांगीण विकासातील अडथळा आहे. असा नवीन दृष्टीकोण निर्माण होत आहे.

**क) नागरीकरणाचे वर्गव्यवस्थेतील परिणाम** (Consequences of Urbanization on class system)

जातीव्यवस्थेप्रमाणेच वर्गव्यवस्थेवरही नागरीकरणाचा प्रभाव पडलेला आहे. बहुसंख्य लोकसंख्येमध्ये विविधता हे वैशिष्ट्ये असून सर्वांचा सामाजिक दर्जामध्ये भिन्नता दिसून येत असून त्या समान सामाजिक दर्जा असलेल्या लोकांचा एक गट (समुह) तयार होत आहे. त्या गटास वर्ग असे म्हणतात. सामाजिक दर्जाच्या आधारावर समाजात श्रेष्ठ, कनिष्ठ वा मध्यम असे वर्ग अस्तित्वात येत आहे. प्रत्येक वर्गातील लोकांची आर्थिक स्थिती, अभिवृत्ती, वर्तनप्रकार, मुल्ये, विचारपद्धती, जीवनशैली यामध्ये समानता आढळून येत असून या समानतेमुळे त्यांच्यात आपण एका वर्गाचे सदस्य आहोत ही जाणीव निर्माण होऊन वर्गजाणीव निर्माण होत आहे. प्रत्येक वर्ग स्वतःच्या वर्ग श्रेष्ठत्व जपत असतो. वर्गव्यवस्थेवरील नागरीकरणाचा पडणारा प्रभाव पुढील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करता येईल.

**१) वर्गाच्या निर्धारकात बदल** (Change in determinants of class)

पारंपारिक समाजात व्यक्तीचा सामाजिक दर्जा आणि म्हणून सामाजिक वर्ग हा जन्म, वय, लिंग, वर्ण इत्यादी जैविक घटकांच्या म्हणजेच निर्धारकांच्या आधारे ठरत असे. उदा. ब्राह्मण जातीत जन्मलेल्या व्यक्तीचा वर्ग इतर जातीहून श्रेष्ठ मानला जाई. लिंगाच्या आधारे पुरुषांचा वर्ग स्त्रियांच्या वर्गापेक्षा श्रेष्ठ मानला जाई. वयाच्या आधारे वृद्धांचा वर्ग बालकांच्या वर्गापेक्षा श्रेष्ठ मानला जाई. नागरीकरणामुळे आज व्यक्तींचा वर्ग निर्धारित करणाऱ्या ह्या जैविक घटकांचे महत्त्व कमी झाले आहे. त्याऐवजी व्यक्तीचा दर्जा व वर्ग हा संपत्ती, सत्ता, शिक्षण, कलाकौशल्ये इत्यादी सामाजिक घटकांच्या म्हणजेच निर्धारकांच्या आधारे निर्धारित होऊ लागला आहे. व्यक्तीच्या अंगच्या गुणाच्या व कौशल्याच्या आधारे व्यक्तीचा सामाजिक दर्जा व वर्गनिर्धारित करण्यास प्राधान्य दिले जात आहे.

**२) नवीन वर्गाचा उदय** (Emergence of New Classes)

वर्गव्यवस्था सार्वत्रिक स्वरूपाची आहे. म्हणजे ती प्राचीन तसेच अर्वाचीन, प्रगत तसेच अप्रगत, ग्रामीण तसेच नागर अशा सर्व प्रकारच्या समाजात आढळते. प्राचीन राजेशाहीच्या काळात राजघराण्यातील व्यक्ती, सरदार व सामान्य प्रजा असे वर्ग होते. मध्ययुगीन संरजामशाहीच्या काळात सरंजाम वा जमीनदार व कुळे असे दोन वर्ग होते. औद्योगिक क्रांतीनंतर औद्योगिकीकरण व नागरीकरण सुरू झाले. नगरात मोठमोठे उद्योगधंदे स्थापन केले गेले. अशा या औद्योगिक नगरात भांडवलदार किंवा कारखानदार, प्रशासक किंवा कार्यकारी, कुशल तसेच अकुशल कामगार असे नवीन वर्ग उदयास आले. या वर्गाचे उच्च वर्ग, मध्यम वर्ग आणि कनिष्ठ वर्ग असे स्थुलमानाने प्रकार पडतात. हे वर्ग प्रामुख्याने व्यक्तीच्या आर्थिक स्थितीच्या आधारे पडलेले आहेत.

**३) जातीव्यवस्थेचे वर्गव्यवस्थेत रुपांतर** (Transformation of Caste System into class system.)

औद्योगिकीकरण व नागरीकरण यांचा प्रभाव पडून भारतातील औद्योगिक नागर समाजात जातीव्यवस्थेचे हळूहळू विघटन होत असून तिच्या जातीवर वर्णन केलेली वर्गव्यवस्था रूढ होत चालली आहे. भारतामधील

मोठमोठ्या नगरातील एकाच वर्गात विभिन्न जातीचे लोक एकत्र येत आहेत. म्हणजेच पूर्वी वेगवेगळा दर्जा असलेल्या जातींचा एकाच वर्गात समावेश होत आहे. त्यामुळे शहरात जातीची जाणीव कमी होत असून त्या जागी वर्गीयजाणीव विकसित होत चालली आहे. थोडक्यात वर्गव्यवस्थेतही जातीव्यवस्थेचे अवशेष मोठ्या प्रमाणावर दिसून येतात. नागरीकरणामुळे जातीचा प्रभाव पूर्णतः संपलेला आहे किंवा जातीव्यवस्था नष्ट झालेली आहे असे म्हणता येत नाही. परंतु थोड्याफार प्रमाणात जातीव्यवस्था हळूहळू शिथिल होत असून वर्गव्यवस्था मात्र हळूहळू विकसित होत आहे.

**४) उर्ध्वगामी सामाजिक गतिशीलतेस वाव** (Scope for upward social mobility)

पारंपारिक भारतीय समाजात उर्ध्वगामी सामाजिक गतीशीलतेला वाव नव्हता. म्हणजे व्यक्तीला स्वतःचा सामाजिक दर्जा व पर्यायाने वर्ग स्वकर्तृत्वाने बदलण्याची संधी उपलब्ध नव्हती. कनिष्ठ वर्गातील व्यक्ती उच्च वर्गात जाऊ शकत नाही. कनिष्ठ दर्जा व वर्ग असलेल्या सामान्य प्रजेला उच्च दर्जा असलेल्या राजकीय सत्ताधाऱ्यांच्या वर्गात प्रवेश करता येत नव्हता. जातीव्यवस्थेसारखा बंदिस्त स्तरीकरणमुळे कनिष्ठ जातीतील व्यक्तीला कोणत्याही गुणवान व कर्तृत्ववान असो उच्च जातीत म्हणजेच वर्गात प्रवेश करता येत नसे. जन्माने मिळणारी जात व जातीने प्राप्त होणारे सामाजिक स्थान वा दर्जा काहीही करून बदलता येत नसे. परंतु आधुनिक काळात मात्र औद्योगिकीकरण व नागरीकरण या प्रक्रियांचा प्रभाव पडून नागर समाजात उर्ध्वगामी सामाजिक गतीशिलतेस वाव मिळू लागला आहे.

**ड) नागरीकरणाचे स्त्रियांच्या दर्जावरील परिणाम** (Consequences of Urbanization on the Status of Women)

पारंपारिक भारतीय समाजाात संयुक्त कुटुंबपद्धतीच्या प्रभावामुळे सर्व अधिकार पुरुषांच्या हाती केंदीत झाले. स्त्रियांना मात्र कनिष्ठ दर्जा देऊन अनेक अधिकारांपासून त्यांना वंचित ठेवले गेले. त्यांना मतस्वातंत्र्य, विचारस्वातंत्र्य, शिक्षणाच्या अधिकारापासून वंचित ठेवले होते. जोडीदार निवडीचे स्वातंत्र्य नव्हते. थोडक्यात स्त्रियांना मुक्तपणे समाजात संचार करण्यास बंदी होती. तिचे कार्यक्षेत्र केवळ 'चुल-मुल' एवढ्यापुरतेच मर्यादित होते. परंतु नागरिकरणाचा स्त्रियांच्या दर्जावरील कोणकोणता प्रभाव वा परिणाम पडला त्यांचे अध्ययन पुढीलप्रमाणे करता येईल.

**१) स्त्रीशिक्षणास चालना :**

नागरीकरणामुळे स्त्रीशिक्षणास चालना मिळाली आहे. नागरी वातावरणात सर्वांना व्यक्तीवादास व व्यक्तीस्वातंत्र्यास पोषक असते. त्यामुळे स्त्री असो वा पुरुष असो त्यांना त्यांच्या व्यक्तीमत्त्वाचा विकास करण्याची पुरेपूर संधी प्राप्त होते. स्त्रियांना आज पुरुषाच्या बरोबरीने सर्व प्रकारचे शिक्षण घेऊ लागल्या आहेत. शिक्षणामुळे स्त्रीयांचा दर्जा सुधारण्यास चालना मिळत आहे.

**२) अर्थार्जन :**

परंपरागत ारतीय समाजात लिंगभेदावर आधारीत श्रमविभाजन अस्तित्वात होती. यामध्ये घरगुती कामे स्त्रीया करीत असे आणि अर्थाजनाचे काम पुरुष करीत होते. आज मात्र स्त्रीशिक्षण घेऊन तिच्या

व्यक्तीवादाचा प्रभाव, उच्च जीवनमानाची अपेक्षा वाढली आहे. वाढत्या महागाईत स्त्रिया देखील घराबाहेर पडून अर्थार्जन करू लागल्या आहेत.

### ३) कौटुंबिक अधिकारांची प्राप्ती

पारंपारिक भारतीय समाजव्यवस्था ही पित्तसत्ताक संयुक्त कुटुंब पद्धती होती. कुटुंबाचा कर्ता, प्रमुख म्हणून पुरुषाला अत्यंत महत्त्वाचे स्थान होते. परंतु नागरीकरणाच्या प्रभावामुळे तसेच शैक्षणिक जागृतीतून स्त्री पुरुष समानतेबाबत थोडीफार जागृती निर्माण होऊन स्त्रियांनाही कौटुंबिक बाबतीतील निर्णय प्रक्रियेत समावून घेण्याचा अधिकार प्राप्त होत आहे. जरी कुटुंबप्रमुख पुरुष असला तरी पत्नीच्या सल्ल्याने कौटुंबिक निर्णय घेतले जातात. आज घरगुती काम वा अर्थाजनाची कामे पती-पत्नी दोघे मिळून करीत आहेत. नागरीकरणामुळे स्त्रियांचे कुटुंबातील स्थान उंचावले आहे.

### ४) सार्वजनिक जीवनातील सहभाग

नागरीकरणामुळे स्त्रियांचा सार्वजनिक जीवनातील सहभाग वाढला आहे. शहरी समाजात व्यक्तीमत्त्व विकासाची व करिअर विकासाची विविध क्षेत्र व संधी उपलब्ध असतात. त्यामुळे स्त्रियांना आपल्या व्यक्तीमत्त्वाचा विकास करणे, करिअर घडविणे शक्य होऊ लागले आहे. आज स्त्रिया ह्या समाजकारण, राजकारण, कला, क्रिडा, साहित्य, गीतसंगीत, नृत्य, नाट्य, चित्रपट इत्यादी क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने कार्य करू लागल्या आहेत. त्यांचा सार्वजनिक क्षेत्रामध्ये सहभाग वाढून स्त्रियांचा दर्जा उंचावण्यास चालना मिळाली आहे.

### ५) स्त्री संघटना व स्त्री चळवळ

नागरीकरणामुळे स्त्रिया शिकू लागल्या असेन करिअर, नोकरी, व्यवसाय करत आहेत. आज प्रत्येक क्षेत्रात स्त्रियांनी आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर आपले स्थान सिद्ध केले आहे. स्त्रियांना त्याच्या मानवी हक्कांची व स्वातंत्र्याची जाणीव निर्माण झाली. त्यांच्यावर होणाऱ्या अन्याय-अत्याचारांची त्यांना जाणीव निर्माण होऊन त्या अत्याचाराविरोधात स्त्रिया संघटनेच्या माध्यमातून, चळवळी करून आवाज उठवू लागल्या आहेत. आज स्त्री-स्वातंत्र्य, स्त्रीवाद, स्त्रीमुक्ती चळवळ इत्यादी संकल्पनाचा उदय झाला आहे. अशाप्रकारे, नागरीकरणामुळे स्त्रियांचा दर्जा उंचावण्यास चालना मिळाली आहे.

## ड) नागरीकरणाचा नागरी जीवनावरील प्रभाव किंवा परिणाम

प्राचीन काळापासून नगरे समाजात अस्तित्वात आहेत. मात्र नागरीकरणाची प्रक्रिया ही आधुनिक आहे. या प्रक्रियेचा प्रभाव नगरांवर व नगरातील जीवनावरही लक्षणीय स्वरूपात पडलेला आहे.

### १) सामाजिक विजातीयतेत वाढ :

नागरीकरणामुळे नागरी जीवनातील सामाजिक विजातीयता (Social heterogeneity) वाढली आहे. नागरीकरणाच्या प्रक्रियेत सभोवतालच्या प्रदेशातील विविध वंशाचे, वर्गाचे, धर्माचे, जातीजमातीचे, भाषेचे,

प्रांताचे, व्यवसायाचे लोक नागरी समुदायांत एकवटले जातात. त्यांचे आचारविचार, रूढी, परंपरा, श्रद्धा, मुल्ये, खाणेपिणे, जीवनविषयक दृष्टीकोण, जीवनशैली इत्यादीमध्ये मोठी विविधता असते. अशाप्रकारे महानगरांमध्ये सामाजिक विजातीयता प्रचंड प्रमाणात निर्माण होत आहे.

**२) सामाजिक सहिष्णुतेत वाढ :**

नागरीकरणामुळे नागरी जीवनात सामाजिक विजातीयता निर्माण होत असली तरी त्याच्या जोडीने तेथे सामाजिक सहिष्णुताही निर्माण होत आहे. विविध समुह एकत्रित जीवन व्यतीत करीत असून परस्परांची जीवनपद्धती ही वेगळी असली तरी अनेकदा ती परस्परविरोधी देखील असते. अशावेळी या समुहांना आपले हितसंबंध साध्य करण्यासाठी परस्परांचे सहकार्य घ्यावेच लागते. त्यासाठी त्यांना इतरांच्या जीवनपद्धतीविषयी सहिष्णुता दाखविणे भाग पडते. एखाद्या समुहाची जीवनपद्धती आपणास पसंत असो-नसो परंतु त्याच्याशी तडजोडीने व समन्वयाने व्यवहार करणे आवश्यक ठरते. अशा समन्वयातून नागरी जीवनात सामाजिक सहिष्णुता निर्माण होते.

**३) सामाजिक संस्थांमध्ये परिवर्तन :**

नागरीकरणाचा प्रभाव हा सर्वच सामाजिक संस्थावर पडलेला दिसून येतो. यामध्ये विवाहसंस्था, कुटुंबसंस्था, धर्मसंस्था, शिक्षणसंस्था इत्यादीवर मोठ्या प्रमाणात परिवर्तन होत आहे. संयुक्त कुटुंबाच्या जागी आज विभक्त केंद्र कुटुंबात रुपांतर झाले. तसेच सिंगल पॅरेन्ट (Parents) कुटुंब दिसून येत आहे. बालविवाहाच्या जागी प्रौढविवाह, प्रेमविवाहात बदल झाला. धर्मसंस्थेचा प्रभाव हळूहळू ओसरला आहे. अर्थव्यवस्थेत आज अनेक नवनवीन उद्योगधंदे निर्माण होत आहेत. शैक्षणिक संस्था पूर्वी गुरूगृही जाऊन शिक्षण घेत होता. आज अनौपचारिक शिक्षणाच्या जाती औपचारिक संस्थामार्फत शिक्षण दिले जात आहे. अशाप्रकारे नागरीकरणाचा नागरी सामाजिक संस्थात परिवर्तन होत आहे.

**४) नागरी समस्यांत वाढ :**

नागरीकरणामुळे नागरी जीवनातील काही समस्यांची तीव्रता वाढली आहे. अनेक नवीन समस्या निर्माण झालेल्या आहेत. ग्रामीण लोकसंख्या नगरात वास्तव्यास येत असल्यामुळे नगरात अतिरीक्त लोकसंख्येचा, त्यांच्या निवाराची, जागेची समस्या या अतिरीक्त लोकसंख्येच्या पायाभूत सुविधा यामध्ये रस्ते, वीज, पाणी, आरोग्य शिक्षण, परिवहन गर्दी, प्रदुषण, झोपडपट्टीची, भिकारीची, गुन्हेगारीची वाढत्या ताणतणाव, धकाधकीचे जीवन वाढते व्यसनाधीनता अशा एक नाहीतर अगणित समस्यात नागरीकरणाच्या प्रभावातून नगरात निर्माण झाल्या आहेत.

**फ) नागरीकरणाचा ग्रामीण जीवनावरील प्रभाव वा परिणाम :**

नागरीकरणाचे परिणाम केवळ नागरी जीवनावरच झाले नसून ग्रामीण जीवनावरही झाले आहेत.

**१) अलगतेची समाप्ती :**

नागरीकरणाच्यामुळे दळणवळणाची प्रगत साधनांचे जाळे खेड्यापाड्यापर्यंत विस्तारीत होत गेले आहे. खेडी व नगरे यांच्यातील स्थलांतर झाल्यामुळे घनिष्ट संपर्क प्रस्थापित झाले आहेत. त्यामुळे भारतीय खेड्यांची बाह्य जगापासून असलेली अलगता संपुष्टात आलेली आहे.

**२) संप्रेषण साधनांचा प्रभाव :**

आज संप्रेषण साधने ग्रामीण भागातही पोहचली आहेत. त्यामुळे नागरी भागातील नवे ज्ञान, नवे विचार, नव्या कल्पना, नवीन मुल्ये, नवीन दृष्टीकोण, नवीन वर्तनप्रकार इत्यादींची खेडूतांना ओळख होऊन त्याच्या परंपरागत आचारविचारात, सवयीत व राहणीमानात बदल घडून येण्यात चालना मिळाली आहे.

**३) सामाजिक संस्थात परिवर्तन :**

ग्रामीण सामाजिक संस्थातही नागरीकरणाचा प्रभाव पडून परिवर्तन होत आहे. धर्माचे प्राबल्य कमी होऊन आधुनिक वैज्ञानिक दृष्टीने सर्व गोष्टीचा विचार करू लागले. संयुक्त कुटुंब संस्थेचे स्वरूप बदलून विभक्त वा केंद्र कुटुंबात रुपांतर होत आहे. विवाहसंस्थेत परिवर्तन झाले आहे. थोडक्यात नागरीकरणामुळे ग्रामीण कुटुंब विवाह, शिक्षण, धर्म इत्यादी संस्थांचे परिवर्तन होत आहे.

**४) आर्थिक जीवनात परिवर्तन :**

नागरीकरणामुळे ग्रामीण आर्थिक जीवनातही परिवर्तन होत चालले आहे. नागरीकरणामुळे खेडे व नगर यांच्यात नित्य संपर्क येऊ लागला आहे. आज खेड्यातील शेतकरी नागरी समुदायाच्या गरजा विचारात घेऊन अन्नधान्य, भाजीपाला, फळे, फुले व इतर नगदी पिके घेण्यावर भर देऊ लागला आहे. हा शेतीमाल शहरात विकून अधिकाधिक नफा मिळविण्याचा कल शेतकऱ्यांचा राहिला आहे. कृषी व्यवसायाला चालना मिळाली आहे. नागरीकरणामुळे परंपरागत बलुतेदारी पद्धतीवर प्रभाव पडला असून ती लोप पावत चालली आहे. नागरीकरणामुळे नागरी जीवनात निर्माण झालेल्या समस्यांची तीव्रता कमी करण्यासाठी शासन ग्रामीण लोकसंख्येचे नगरांकडे होणारे स्थलांतर रोखण्याचे प्रयत्न करू लागले आहे. त्यातून ग्रामीण भागात उद्योगधंदे उभारण्यास व तेथे नागरी सुविधा पुरविण्यास प्राधान्य मिळू लागले आहे. त्यातून ग्रामीण विकास होण्यास चालना मिळाली आहे.

अशाप्रकारे नागरीकरणाचा प्रभाव हा समाज संरचनेवर व कार्यावर पडलेला दिसून येतो.

## ३.४ सारांश :

प्रकरण तिसरे 'नागरीकरणाची प्रक्रिया' यामध्ये उपरोक्त विषय मांडणीमध्ये आपण नागरीकरणाचा अर्थ, व्याख्या आणि स्वरूप या पहिल्या उपघटकांचे सविस्तर विवेचन करण्यात आले आहे. या प्रकरणाच्या दुसऱ्या उपविभागात नागरीकरणास जबाबदार ठरणाऱ्या कारणांचा अभ्यास करण्यात आला आणि तिसऱ्या उपविभागात नागरीकरणाचा कुटुंबव्यवस्थेवरील, जातीव्यवस्थेवरील, वर्गव्यवस्थेवरील स्त्रियांच्यावरील, नागर

समाजावरील, ग्रामीण समाजावरील कोणता परिणाम वा प्रभाव पडला याचे सखोल असे विवेचन करण्यात आले.

## ३.५ स्वयं–अध्ययनासाठी प्रश्न व उत्तरे

**प्रश्न– खालील प्रश्नांची उत्तरे लिहा (रिकाम्या जागा भरा)**

१. कोणती प्रक्रिया ही ग्रामीण ते शहरी भागातील लोकसंख्या आणि ग्रामीण भागांऐवजी शहरी भागात राहणाऱ्या लोकसंख्येचे प्रमाण वाढवते.

२. घटस्फोटाचे प्रमाण कोणत्या समाजात अधिक प्रमाणात आढळते.

३. अर्जित दर्जाला अधिकचे महत्त्व कोणत्या समाजात प्राप्त होते.

४. ग्रामीण भागातील स्थलांतर करून शहरी भागात कोणत्या कारणामुळे येतात.

५. सामाजिक विविधता हे कोणत्या समाजाचे लक्षण आहे.

६. नागरीकरणामुळे संयुक्त कुटुंबाचे कोणत्या कुटुंबामध्ये रूपांतर होत आहे.

७. कोणत्या समाजात व्यक्तीवाद दृष्टीकोणाचा प्रभाव अधिक दिसून येतो.

८. नागरीकरण म्हणजे काय?

९. नागरीकरण ही कसली प्रक्रिया आहे.

१०. नागरीकरणामुळे कोणत्या सामाजिक गतिशिलतेस वाव मिळत आहे.

उत्तरे– १. नागरीकरण २. नागर ३. नागर

४. रोजगार, शिक्षण, नागर जीवनाचे आकर्षणातून

५. नागर ६. केंद्र वा विभक्त कुटुंबपद्धती ७. नागर समाज

८. नगरात राहणाऱ्यांची संख्या व नगरांची वा शहरांची होणारी वाढ या प्रक्रियेस नागरीकरण म्हणतात.

९. लोकसंख्येच्या स्थलांतराची प्रक्रिया आहे.

१०. उर्ध्वगामी सामाजिक गतिशिलतेला वाव मिळत आहे.

## ३.६ सरावासाठी प्रश्न

अ) टिपा लिहा.

१. नागरीकरणाचा अर्थ व व्याख्या सांगा.

२. नागरीकरणाचे स्वरूप स्पष्ट करा.

३. नागरीकरणाचा कुटुंबसंस्थेवरील परिणाम सांगा.

४. नागरीकरणाचा जातीसंस्थेवरील परिणाम

५. नागरीकरणाचा वर्गव्यवस्थेवरील परिणाम

६. नागरीकरणाचा स्त्रियांच्यावरील परिणाम

७. नागरीकरणाचा ग्रामीण समाजावरील परिणाम

८. नागरीकरणामुळे नागर समाजावरील परिणाम

ब) दीर्घोत्तरी प्रश्नांची उत्तरे लिहा.

१. नागरीकरणाचा अर्थ आणि स्वरूप स्पष्ट करा.

२. नागरीकरणाची कारणे विशद करा.

३. नागरीकरणाचा समाजव्यवस्थेवरील प्रभाव विशद करा.

## ३.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ


१. डॉ. बी. एम. कऱ्हाडे – ग्रामीण व नागरी समाजशास्त्र, पिंपळापुरे ॲण्ड क. पब्लिशर्स, नागपूर – २०११.

२. प्रा. चंद्रकांत खंडागळे – नागर समाजशास्त्र, सौ. मायादेवी चंद्रकांत खंडागळे, जुलै २०२१.

३. प्रा. एन. आर. राजपूत – ग्रामीण व नागरी समाजशास्त्र, अंशुल पब्लिकेशन्स, जानेवारी–२००४.


❑❑❑

# घटक – ४
# नागरी सामाजिक संरचना
## (Urban Social Structure)

**घटक संरचना**


४.१ प्रस्तावना

४.२ उद्दिष्टे

४.३ विषय विवेचन

 ४.३.१ नागरी कुटुंब: वैशिष्टये आणि परिवर्तन

 ४.३.२ नागरी सामाजिक स्तरीकरण: जात आणि वर्ग

 ४.३.३ नागरी व्यवसाय: वैशिष्टये आणि परिवर्तन

४.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

४.५ सारांश

४.६ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.७ स्वाध्याय/ गृहपाठ

४.८ चिंतन आणि कार्य

४.९ अधिक वाचनासाठी पुस्तके


### **४.१ प्रस्तावना** (Introduction)

या चवथ्या अध्ययन घटकात आपण नागरी सामाजिक संरचनेचा अभ्यास करणार आहात. सामाजिक संरचना (Social Structure) ही समाजशास्त्रातील महत्त्वाची संकल्पना आहे. समाजाचे यथार्थ आकलन होण्यासाठी सामाजिक संरचनेचा अभ्यास आवश्यक ठरतो. नागर समाजाचे आकलन होण्यासाठी नागरी सामाजिक संरचना अभ्यासावी लागते. हॅरि जॉन्सच्या मते, कोणत्याही वस्तूच्या विविध घटकांमध्ये असलेले पुष्कळशा स्थिर स्वरूपाचे परस्परसंबंध म्हणजे त्या वस्तूची संरचना होय. विविध सामाजिक समूह, संस्था, नियमने व मूल्ये इत्यादी समाजाचे घटक आहेत. या घटकांत बहुतांशी स्थिर व निश्चित स्वरूपाचे परस्परसंबंध प्रस्थापित झाले की समाजास संरचना प्राप्त होते. तिलाच सामाजिक संरचना असे म्हणतात. टॉलकॉट पार्सन्स यांच्या मते, परस्परसंबंधित संस्था, अभिकरणे आणि सामाजिक प्रतिमाने तसेच समूहात प्रत्येक व्यक्तीने धारण केलेले दर्जे व भूमिका यांच्या विशिष्ट मांडणीस किंवा व्यवस्थेस उद्देशून सामाजिक संरचना ही संज्ञा

वापरली जाते. नागरी सामाजिक संरचना समजावून घेताना तुम्ही या ठिकाणी नागर समाजातील कुटुंबाची वैशिष्ट्ये आणि परिवर्तन , सामाजिक स्तरीकरण व्यवस्था म्हणजेच जातिव्यवस्था व वर्गव्यवस्था आणि नागरी व्यवसायाची वैशिष्ट्ये आणि परिवर्तन यांचा अभ्यास करणार आहात.

## ४.२ **उद्दिष्टे** (Obejectives)

या घटकाच्या अध्ययनानंतर तुम्हास-

- नागरी कुटुंबाचे स्वरूप, वैशिष्ट्ये आणि परिवर्तन समजावून घेता येईल.
- नागरी सामाजिक स्तरीकरणाचे प्रकार असलेली जातिव्यवस्था व वर्गव्यवस्था यांचे स्वरूप स्पष्ट करता येईल.
- नागरी व्यवसायांचे स्वरूप, वैशिष्ट्ये आणि परिवर्तन विशद करता येईल.

## ४.३ **विषय विवेचन** (Presentation of Subject Matter)

या घटकात आपण नागरी सामाजिक संरचनेचा अभ्यास करणार आहात. विवेचनाच्या दृष्टीने या घटकाचे तीन भाग पाडलेले आहेत. पहिल्या भागात कुटुंबाची व्याख्या व नागरी कुटुंबाचे वैशिष्ट्ये व परिवर्तन यांचे विवेचन केलेले आहे. दुसऱ्या भागात सामाजिक स्तरीकरणाची व्याख्या आणि नागर समाजातील जातिव्यवस्थेची व वर्गव्यवस्थेची चर्चा केलेली आहे. तर तिसऱ्या विभागात नागरी व्यवसायाचे वैशिष्ट्ये व परिवर्तन स्पष्ट केलेले आहे.

### ४.३.१ **नागरी कुटुंब** (Urban Family)

**स्वरूप** (Nature)

नागरी कुटुंब हे आकाराने लहान असते. या कुटुंबात जास्तीत जास्त दोन पिढयांचे लोक एकत्र राहतात. परंतु ही एकत्र राहण्याची कालमर्यादा मुलांची लग्ने होईपर्यंतची असते. नागरी कुटुंबातील सदस्य संख्या कमी असली तरी ते परस्परांचे रक्त व विवाहसंबंधित असतात. नागरी कुटुंब हे तसे पूर्णार्थाने पितृप्रधान असते. सर्व सदस्य एकाच घरकुलात राहतात. मालमत्ता समाईक असते. कुटुंब मर्यादित असले तरी कर्ती व्यक्ती पुरुषच असते असे नाही; स्त्रीचासुद्धा बराच मोठा सहभाग असतो. कधी कधी स्त्रीच कुटुंबाचा व्यवहार चालविते. प्रत्येकाच्या व्यवसायात भिन्नता असते. दुकान वगैरे असेल तर समाईक. म्हणजे एकाच व्यवसायात सर्वजन व्यस्त असतात. येथे व्यवसाय अनेक असतात. सदस्यांना कोणताही व्यवसाय करण्याचे स्वातंत्र्य असते. सदस्यांवर सर्वांगीण नियंत्रण करणे कुटुंबाला शक्य नसते. दुय्यम यंत्रणा व्यक्तीवर नियंत्रण ठेवून असते. नागरी कुटुंबात अनेकांची एकवाक्यता, स्वयंसाध्यरूपी संबंध, सर्वसमावेशकता, भावनात्मकता आणि व्यक्तिनिष्ठता इत्यादींचा कमालीचा अभाव असतो.

नागरी सामाजिक संरचनेचा एक महत्त्वपूर्ण घटक असलेल्या कुटुंबसंस्थेचे स्वरूप तुम्ही समजावून घेणार आहात. त्यासाठी प्रथम कुटुंबाची व्याख्या व वैशिष्टये संक्षिप्त स्वरूपात समजावून घेऊ व त्यानंतर नागरी कुटुंबाची वैशिष्टये व परिवर्तन पाहू.

**कुटुंबाची व्याख्या** (Definition of family)

कुटुंब हा सामाजिक संरचनेचा एक प्रमुख घटक आहे. कुटुंब हे व्यक्तीच्या दृष्टीने कामतृप्ती, बालसंगोपन, समाजीकरण, शारीरिक व मानसिक संरक्षण तर समाजाच्या दृष्टीने संस्कृती-संक्रमण, सामाजिक नियंत्रण, समाज सातत्य राखणे इत्यादी कार्ये पार पाडते. म्हणून समाजशास्त्रात कुटुंबाच्या अभ्यासास अनन्यसाधारण महत्त्व दिले जाते. कुटुंब म्हणजे काय हे समजण्यासाठी त्याच्या काही मान्यवर समाजशास्त्रज्ञांनी केलेल्या व्याख्या पाहू.

१. **मॅकायव्हर आणि पेज:** प्रजोत्पादन व अपत्याचे संगोपन करण्यासाठी पर्याप्तपणे निश्चित व दीर्घकाळ टिकणाऱ्या लैंगिक संबंधावर आधारलेला समूह म्हणजे कुटुंब होय.

२. **मार्शल जोन्स:** कुटुंब ही लैंगिक संबंधावर आधारलेली एक सामाजिक संस्था असून प्रजोत्पादन व अपत्यांचे संगोपन ही तिची कार्ये आहेत.

३. **किंबाल यंग:** कुटुंब हा असा सामाजिक समूह आहे की ज्यामध्ये एक किंवा अनेक पुरुष आणि एक किंवा अनेक स्त्रिया आपल्या स्वत:च्या किंवा दत्तक घेतलेल्या अपत्यांसह निदान अपत्ये मोठी होईतोपर्यंत तरी एकाच घरात राहतात.

वरील व्याख्यांवरून कुटुंबाचा एक संस्था म्हणून तसेच एक समूह म्हणून विचार करता येतो. वेगवेगळी पदे व त्यांच्याशी संबंधित भूमिका, सदस्यांच्या वर्तनाचे नियम, त्यामागील उद्देश इत्यादी अमूर्त गोष्टींचा विचार करता कुटुंब ही एक सामाजिक संस्था ठरते. याउलट एकत्र येऊन परस्पर सहकार्याने निश्चित उद्दिष्टांची पूर्तता करणारा गट यादृष्टीने विचार करता कुटुंब एक सामाजिक समूह ठरतो.

**कुटुंबाची वैशिष्टये** (Characteristics of family)

जगातील सर्वच समाजात कुटुंब असून त्याची सामान्य वैशिष्टये पुढीलप्रमाणे आहेत.

**१. विवाह बंधन:**

कुटुंबाची उभारणी ही दोन किंवा अधिक भिन्न लिंगीय व्यक्तीतील विवाहसंबंधावर होते.

**२. रक्तसंबंध:**

कुटुंबातील सदस्यात रक्तसंबंध असतात. मातापिता व त्यांची अपत्ये यांच्यात रक्तसंबंध असतात. तसेच मातापित्यांचे ज्यांच्याशी रक्तसंबंध असतात त्यांच्याशीही अपत्यांचे रक्तसंबंध प्रस्थापित होतात. मात्र मातापिता व दत्तक मुले आणि सावत्र माता किंवा पिता व सावत्र मुले यांच्यातील रक्तसंबंध खरे नसून गृहीत धरलेले असतात.

३. **व्दिपक्षीयता:**

कुटुंब व्दिपक्षीय समूह आहे. त्यामध्ये पित्याकडील (काका, आत्या) आणि मातेकडील (मामा–मावशी) नातेवाईकांना महत्त्वाचे स्थान असते.

४. **समान निवासस्थान:**

साधारणत: कुटुंबातील सदस्य एकाच घरात निवास करतात. मात्र काही वेळा काही कुटुंबातील सदस्य वेगवेगळ्या ठिकाणी राहताना आढळतात.

मॅकाव्हर व पेज यांनी कुटुंबाची प्रभेदक वैशिष्टये पुढीलप्रमाणे सांगितलेली आहेत.

१. **सार्वत्रिकता:** मानव समाजाच्या विकासाच्या सर्व अवस्थांमध्ये व जगातील सर्वच समाजात कुटुंब आढळते. म्हणून कुटुंब सार्वत्रिक स्वरूपाचा समूह ठरतो.

२. **भावनात्मकता:** कामतृप्ती, प्रजोत्पादन, वात्सल्य, प्रेमसंपादन, वंशाभिमान, वंशवृध्दी, आर्थिक स्थैर्य, वस्तूवरील वैयक्तिक मालकी हक्क इत्यादी भावभावना कुटुंबाच्या मुळाशी आहेत.

३. **अग्रता:** कुटुंब हे व्यक्तीचे पहिले सामाजिक पर्यावरण असते. तिचा जन्म व पालनपोषण कुटुंबातच होत असल्याने व्यक्तीवर प्रभाव टाकणाऱ्या समूहात व संस्थात कुटुंब अग्रस्थानी असते.

४. **लघुआकार:** कुटुंब हा सर्वात लहान आकाराचा समूह आहे. कुटुंबातील सदस्यांची संख्या जीवशास्त्रीय नियमानुसार निश्चित होत असल्याने व्यक्तीला स्वइच्छेनुसार कुटुंबाचा आकार वाढविता येत नाही.

५. **सदस्यांचे उत्तरदायित्व:** इतर कोणत्याही समूहापेक्षा व्यक्तीला आपल्या कुटुंबाविषयी अधिक जबाबदारीची जाणीव असते. व्यक्ती केवळ स्वत:साठी नव्हे तर कुटुंबासाठी जगत असते; कुटुंबासाठी वाटेल तो त्याग व कष्ट करीत असते.

६. **सामाजिक नियंत्रण:** कुटुंबाचे स्वरूप कायम रहावे म्हणून विविध सामाजिक नियमनांच्या द्वारे कुटुंबाच्या विविध अंगाचे नियंत्रण केले जाते.

**नागरी कुटुंबाची वैशिष्ट्ये** (Characteristics of Urban family)

वर नमूद केल्याप्रमाणे कुटुंब हा जगातील सर्वच समाजात आढळणारा सामाजिक समूह आहे. आणि कुटुंबाची वरील वैशिष्टये ही जगातील सर्वच समाजातील सर्व प्रकारच्या कुटुंबात आढळतात. नागर समाजातील कुटुंबात ही ती वैशिष्ट्ये आढळतात. तथापि नागर समाजाची इतर काही खास अशी वैशिष्टये आहेत, जी ग्रामीण कुटुंबात किंवा आदिम कुटुंबात आढळत नाहीत किंवा अगदीच अल्प प्रमाणात आढळतात.

**केंद्र कुटुंब** (Nuclear family):

कुटुंबातील सदस्यांच्या संख्येच्या आधारे कुटुंबाचे केंद्र कुटुंब व संयुक्त कुटुंब असे दोन प्रकार पडतात. पती पत्नी व त्यांची अविवाहित अपत्ये एवढेच सदस्य (दोन पिढ्यांचे) असलेल्या कुटुंबास केंद्र कुटुंब म्हणतात. याउलट ज्या कुटुंबात पती-पत्नी, त्यांची विवाहित मुले व सुना, अविवाहित मुली, विवाहित व अविवाहित नातवंडे आणि इतरही काही जवळचे नातलग (दोनपेक्षा अधिक पिढयांचे) इत्यादी सदस्य एकत्र राहतात त्यास संयुक्त कुटुंब म्हणतात.

आधुनिक काळातील नागरी कुटुंब हे प्रामुख्याने केंद्र कुटुंब आहे. पारंपारिक किंवा औद्योगिक-पूर्व नगरातील कुटुंबे ही केंद्र तसेच संयुक्त अशा दोन्ही प्रकारची होती. मात्र औद्योगिक क्रांतीनंतर औद्योगिकीकरण व नागरीकरण यामुळे संयुक्त कुटुंबाची जागा हळूहळू केंद्र कुटुंबानी घेतली आहे. पतीपत्नी व त्यांची अविवाहित अपत्ये एवढेच सदस्य असलेले केंद्र किंवा विभक्त कुटुंब नागर समाजात अनेक दृष्टीने सोयीचे ठरत गेले व ते रूढ झाले आहे. साधारणत: नागरी कुटुंबातील मुले विवाहानंतर काहीकाळ मातापित्याच्या कुटुंबात राहतात आणि नंतर शक्यतो लगेच त्या कुटुंबापासून विभक्त होऊन स्वतंत्र असे वेगळे कुटुंब म्हणजेच केंद्र कुटुंब स्थापन करतात.

**लहान आकार:**

नागरी कुटुंब हे केंद्र किंवा विभक्त प्रकारचे कुटुंब असल्याने त्याचा आकार संयुक्त कुटुंबाच्या तुलनेत लहान असतो. व्यक्तिवादाचा प्रभाव, राहत्या जागेची टंचाई, उच्च जीवनमान टिकविण्याची आकांक्षा, स्त्रीने ही नोकरी धंदा करणे, नगरातील धावपळीचे जीवन इत्यादी कारणांमुळे नगरात कुटुंबाचा आकार लहान ठेवणे गरजेचे व सोयीचे ठरते. म्हणून पतीपत्नी व त्यांची अपत्ये यांच्याशिवाय इतर नातेवाईक नागरी कुटुंबात अडचणीचे ठरतात. तसेच संतती नियमनांच्या साधनांमुळे प्रजोत्पादनाव्दारे वाढणारा कुटुंबाचा आकार मर्यादित वा नियंत्रित ठेवणे शक्य झाले आहे. आज पित्याचाच व्यवसाय मुलाने पुढे चालविणे किंवा मातापित्याच्याच समुदायात (नगरात) मुलांना रोजगार मिळणे अवघड होत चालले आहे. त्यामुळे मुलांचे इतरत्र स्थलांतर करण्याचे प्रमाण वाढत चालले आहे. त्यामुळेही नागरी कुटुंबाचा आकार लहान ठेवणे शक्य होत आहे.

**३. पितृसत्ताक अधिकाराचा ऱ्हास:**

नागरी कुटुंबात कुटुंबप्रमुख असलेल्या पुरुषाच्या (पतीच्या वा पित्याच्या) एकाधिकारशाहीचा बऱ्यापैकी ऱ्हास झालेला आहे. नागरी कुटुंबात पती हाच कुटुंब प्रमुख असला तरी त्याला पत्नी व मुलांच्या मतांचा, आवडीनिवडीचा, आशाआकांक्षाचा आदर करून निर्णय घ्यावे लागतात. मातापिता आपले निर्णय मुलांवर सक्तीने लादत नाहीत व मुले ही मातापित्यांच्या प्रत्येक आज्ञेचे आंधळेपणाने पालन करीत नाहीत. मातापिता व प्रौढ मुलेमुली ही परस्पर सहमतीने कौटुंबिक निर्णय घेतात. म्हणजेच नागरी कुटुंब हे मोठया प्रमाणावर समतावादी असल्याचे आढळते. याचाच अर्थ असा की नागरी कुटुंबात एकाधिकारशाहीच्या जागी लोकशाही व्यवस्था अधिक आढळते.

४. **स्त्रियांचा उच्च दर्जा:**

नागरी कुटुंबात स्त्रियांचा दर्जा बराच उन्नत (उच्च) झालेला आहे. पती हा पत्नीच्या सल्ल्यानेच कौटुंबिक अधिकार वापरतो. किंवा पती पत्नीमध्ये ह्या अधिकारांचे विभाजन झालेले असते. कुटुंबातील कामाच्या बाबतीत लिंगभेदावर आधारलेले कार्यविभाजन शहरात टिकू शकत नाही. कमावत्या पत्नीला पती स्वयंपाक व इतर घरकामात मदत करतो. नोकरीधंद्यामुळे सतत घराबाहेर राहणाऱ्या पुरुषास कुटुंबाच्या दैनंदिन व्यवहाराकडे लक्ष देणे शक्य नसते. त्यामुळेच पती बाजारहाट करणे, पोष्टात, बँकेत जाणे, विविध बीले भरणे, मुलांना शाळेत नेणे-आणणे, त्यांचा अभ्यास घेणे इ. कामे करणे व त्याबाबतचे स्वातंत्र्य/अधिकार तिला प्राप्त होतात. नोकरी करणारे पतीपत्नी त्यांच्या सोयीनुसार व सवडीनुसार घरातील व घराबाहेरील कामे पार पाडतात. एकंदरीत नागरी कुटुंबात परिस्थितीजन्य समता प्रस्थापित झालेली असते. मुलाप्रमाणेच मुलींनाही अनेक अधिकार व स्वातंत्र्य दिले जाते. पत्नीला पायाची दासी न मानता 'सखी'/सहचारिणी मानले जाते. त्यामुळे स्त्रियांचा दर्जा उन्नत असलेला दिसतो.

५. **व्यक्तिवादाचा प्रभाव:**

नागरी कुटुंब हा एक सामाजिक समूह असला तरी त्याच्यावर समष्टीवादापेक्षा व्यक्तिवादाचा अधिक प्रभाव असतो. नागर समाजात व्यक्तिला स्वकर्तृत्वाने शिक्षण, नोकरी, व्यवसाय, पैसा, प्रतिष्ठा मिळविण्याची संधी मोठया प्रमाणावर असते. त्यामुळे मातापित्यांची इच्छा, कुटुंबाची गरज, कुलाचार इत्यादीपेक्षा व्यक्तिगत इच्छा-आकांक्षा अधिक महत्त्वाच्या ठरतात. शिक्षण, व्यवसाय, विवाह याबाबतचे निर्णय घेताना सदस्य कुटुंबाच्या हितापेक्षा स्वत:च्या हितास अधिक प्राधान्य देताना दिसतात.

६. **कुटुंबाची कार्ये:**

नागरी कुटुंबाची अनेक पारंपारिक कार्ये ही इतर संस्था, संघटना, समूह व मंडळे यांच्याकडे हस्तांतरीत झालेली आहेत. प्रजोत्पादनाचे कार्य हे आजही कुटुंबातच चालते. तथापि त्यासाठी डॉक्टर्स, नर्स, प्रसुतीगृहे यांचे तर बालसंगोपनासाठी बालरोग तज्ज्ञ, बाल आरोग्य केंद्रे यांचे सहाय्य व सल्ला घेतला जातो. नोकरीधंदा करणाऱ्या जोडप्यांना मुलांचा सांभाळ करण्यासाठी पाळणागृहे, शिशू सदन, अंगणवाडी इत्यादीवर अवलंबून रहावे लागते. मुलांच्या सर्व प्रकारच्या शिक्षणासाठी नागरी कुटुंब बालवाडीपासून विद्यापीठापर्यंतच्या शिक्षण संस्थांवर अवलंबून आहे. मुलांचे समाजीकरण व त्यांच्या वर्तनाचे नियंत्रण कुटुंबाच्या हातात फारसे राहिलेले नाही. मुलांचा बराचसा वेळ घराबाहेर जातो. त्यामुळे नोकरी करणारे मातापिता मुलांना शिस्त लावणे, त्यांच्यावर संस्कार करणे, त्यांचे मनोरंजन करणे यासाठी फारसा वेळ देऊ शकत नाहीत. करमणूक, खेळ, शिक्षण, स्वास्थ्य इत्यादीबाबत नागरी कुटुंबास इतर संस्थांवर अवलंबून रहावे लागते. त्यामुळे व्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वावर कुटुंबाबाहेरील हया संस्थांचा व पर्यावरणाचा मोठा प्रभाव पडतो; व त्यामुळे त्यांची वृत्ती कुटुंबनिरपेक्ष असे स्वहित पाहण्याची बनते. त्यातूनच कुटुंब सदस्यांच्या परस्परसंबंधात परिवर्तन होत राहते.

अर्थव्यवस्थेतील उत्पादन, वितरण, विनिमय व उपभोग या चार प्रक्रियांपैकी केवळ उपभोग हीच प्रक्रिया नागरी कुटुंबाच्या हातात राहिलेली आढळते. इतर प्रक्रिया इतर संस्था व संघटनांकडे हस्तांतरीत झाल्या आहेत. नागर समाजात व्यक्तीचा दर्जा व प्रतिष्ठा कुटुंबावरून निर्धारित न होता व्यक्तिच्या कर्तृत्वाच्या आधारे निर्धारित होतो. व्यक्तिला मिळालेला दर्जा व प्रतिष्ठा तिच्या कुटुंबाच्या पुढच्या पिढीत टिकून राहील याची शाश्वती आज राहिलेली नाही.

### ७. कुटुंबाशी संबंधित समस्या:

नागरी कुटुंबाशी संबंधित अशा अनेक समस्या आधुनिक काळात निर्माण झालेल्या आहेत. नगरातील केंद्र वा विभक्त कुटुंबात नात्यातील वृद्ध, अपंग, निराधार, परित्यक्ता इत्यादींना आश्रय मिळेनासा झाला आहे. व्यावसायिक, सामाजिक व भौगोलिक गतिशीलतेमुळे कमावती मुले व वृद्ध मातापिता यांच्यात भौतिक, भावनिक व आर्थिक दुरावा निर्माण झालेला आहे. त्यातून वृद्धांची समस्या तीव्र बनलेली आहे. वृद्धावस्थेत कौटुंबिक संरक्षण मिळेनासे झाल्याने भविष्य निर्वाह निधी, निवृत्ती वेतन, आयुर्विमा, वृद्धाश्रम इ. सुविधा निर्माण झाल्या आहेत. त्यामुळे उदरनिर्वाहास मदत होत असली तरी भावनिक दुरावा व एकाकीपणा नाहीसा होत नाही.

नागरी कुटुंबात पत्नीदेखील पतीप्रमाणेच सुशिक्षित व कमावती असल्याने ती कुटुंबात समान दर्जाची अपेक्षा करते आणि पतीकडून ती अपेक्षा पूर्ण न झाल्यास पती-पत्नी संबंधात वितुष्ट येते. कमावत्या स्त्रियांचे कुटुंबाकडे, मुलांकडे काहीसे दुर्लक्ष होते. यातून मुले बिघडतात, वाईट मार्गास लागतात. त्याबाबत पती-पत्नी परस्परांना दोषी ठरवितात. यातून ताणतणाव वाढत जातात आणि त्याचे पर्यावसन घटस्फोटात होते. घटस्फोटाचे वाढते प्रमाण हे नागरी कुटुंबाच्या दृष्टीने चिंताजनक बनले आहे.

### ८) निवासस्थान:

नागरी समाजातील सर्वजन एकाच घरात राहत असले तरी प्रत्येकाचा व्यवसाय, कामधंदा वा नोकरी परस्परांपेक्षा वेगळी असते. राहण्यासाठी घर अपूर्ण पडत असते. विवाह झाल्यानंतर मुलगा-सून दुसरीकडे राहतात. जुन्या घरात पती-पत्नी राहतात. नोकरी आणि घर यांचे अंतर फार असल्याने घर बदलण्याची भावना बळावते. यात तथ्य असले तरी ते पूर्ण सत्य नसते. ही एक सबब असते. येथे काहींची घरे प्रचंड मोठया आकाराची असतात तर काहींची कमालीची लहान असतात. लहान घर असणाऱ्या कुटुंबांतील अनेक सदस्य फूटपाथ वा सार्वजनिक मोकळ्या जागी आडोशाला झोपत असतात.

### ९) संबंध:

नागरी कुटुंबातील सर्व सदस्य हे परस्परांशी वैवाहिक आणि रक्तसंबंधीय नात्यांनी जोडलेली असतात. येथे पती-पत्नी वगळता सर्व सदस्यांचे नाते रक्तसंबंधावर आधारित असते. अपवाद दत्तक मुला-मुलींचा असतो. आई-वडील, मुले-मुली यांचे परस्परांशी असलेले नाते रक्तसंबंधीय असते.

### १०) स्वरूप:

नागरी समाजातील कुटुंबाचे स्वरूप विभक्त असते. सदस्यसंख्या कमी असते. जास्तीत जास्त दोन पिढयांचे लोकही एकत्र राहत नसतात. कुटुंबाला संयुक्तपण येतायेताच ते विभक्त होऊन बसते. निवासस्थान एकत्र नसले तरी ते सर्वांचे समाईक असते. अर्थातच नागरी कुटुंबाचा आकार लहान नि सदस्य संख्या प्रमाणाबाहेर नसते. मुलांचे पालनपोषण कुटुंबाबरोबरच इतर दुय्यम व्यवस्थेकडूनही करून घेतले जाते. स्त्रीचा दर्जा उंचावलेला नसला तरी ग्रामीण कुटुंबापेक्षा बराचसा मुक्त असतो. कुटुंब सर्वांची काळजी घेत असते. या काळजीत कर्तव्य असते. परंतु कुटुंबाला गतिमानता आणण्यासाठी प्रत्येकजन प्रयत्नशील असतो.

### ११) सापेक्षत: अस्थिर कुटुंब:

नागरी कुटुंब हे ग्रामीण कुटुंबाशी तुलना करता काहीसे अस्थिर असल्याचे जाणवते. नागरी कुटुंबातील सदस्यसंख्या कमी असते. तसेच कुटुंब सदस्यांवर व्यक्तीवादाचा मोठा पगडा असतो. त्यामुळे हे कुटुंब मोठे आघात सहन करू शकत नाही. कुटुंब प्रमुखाच्या मृत्यूने, अपघाताने वा नोकरीधंदा बुडाल्याने नागरी कुटुंब उघडयावर पडते. घटस्फोटाच्या वाढत्या प्रमाणामुळे हे कुटुंब चटकन उध्वस्त होते. कमावती मुले विभक्त झाल्याने वृद्ध मातापित्यांचे कुटुंब अस्थिर बनते. आई एका मुलाकडे तर पिता एका मुलाकडे अशी विभागणी झाल्यास मुळचे कुटुंब संपुष्टात येते.

**नागरी कुटुंबातील परिवर्तन** (Changing nature of urban family)

नागरीकरणाच्या प्रभावाखाली आलेल्या औद्योगिक नगर समुदायात कुटुंबांचे बदलते स्वरूप पुढील मुद्दयाच्या आधारे स्पष्ट करण्यात आलेले आहे.

### १. कुटुंबाचा आकार:

औद्योगिक नगर तथा नागरीकरणाच्या प्रभावाखाली शहरातील कुटुंबाचा आकार लहान असतो. कुटुंबात फक्त पती-पत्नी व त्यांची अविवाहित मुले-मुली यांचाच समावेश झालेला असतो. काही बाबतीत तर पती-पत्नीच कुटुंबात राहतात. मुले दुसरीकडे शिक्षण तथा नोकरीसाठी असतात. लहान मुलांना सुद्धा निवासीय शाळा-महाविद्यालयात ठेवले जाते. सांप्रत, कुटुंबाचा आकार मुद्दामच लहान असावा म्हणून प्रयत्न केले जातात. हा प्रयत्न जाणीवपूर्वक असतो. कुटुंबाचा मोठा आकार मुलामुलींचे विवाह होईपर्यंत टिकून राहतो. पुन्हा कुटुंबाचे स्वरूप पूर्वीसारखेच लहान बनते. करण लग्न झाले की विवाहित मुले माता-पित्यांपासून कोणत्यातरी सबबीखाली वेगवेगळी राहतात.

### २) अधिसत्ता:

नागरी कुटुंबाचा आकार लहान असला तरी सत्ता पुरुषाकडे असायला पाहिजे अशी सर्वसाधारण समजूत असते. परंतु वस्तुस्थिती यापेक्षा वेगळी असते. पती-पत्नी दोघेही कमवते असल्याने आणि दोघांनाही समान अधिकार प्राप्त झालेले असल्याने कर्त्या पुरुषाची कुटुंबावरील सत्ता तथा अधिकार संकुचित बनला आहे. समानतेच्या पातळीवर दोघांना सारखाच कौटुंबिक अधिकार असावा ही विचारसरणी वादळी बनली

आहे. कारण नगरातील प्रत्येक स्त्री ती गरीब असली तरीसुद्धा अर्थार्जन करीत असल्याने ती आर्थिक दृष्टीने स्वावलंबी बनली आहे. मुलाच्या नावापुढे पित्याप्रमाणेच मातेचे नावसुद्धा लावले जात आहे. तेव्हा सांप्रत नागरी कुटुंबाला मातृसत्ताक वा पितृसत्ताक न म्हणता समसत्ताक कुटुंब म्हणण्याची अवस्था निर्माण होऊ लागली आहे. नागरी समाजातील कुटुंब हे आधुनिक समजले जात असल्याने पत्नीबरोबरच मुलांचा सुद्धा कुटुंबात प्रभाव वाढलेला असतो. पत्नी आणि मुले-मुली यांच्या कलाने पुरुषास म्हणजे पती नि पिता या नात्याने आपले वर्तन ठेवावे लागते.

**३) सदस्यांतील आंतरसंबंध:**

कुटुंबाचा आकार लहान असल्याने सदस्यांतील संबंधात अधिक जिव्हाळा असतो. हेवेदावे वा रुसवेफुगवे असले तरी ते नाममात्र असतात. पती-पत्नींचे संबंध बरोबरीचे असल्यामुळे हक्कात समानता असते. पती-पत्नींप्रमाणेच माता-पिता व त्यांची मुले यांच्यातील संबंध जिव्हाळ्याचे व समजुतीवर आधारलेले असतात. कौटुंबिक वातावरण मुक्त स्वरूपाचे असते. सदस्य संबंधात अत्यंत जवळीक निर्माण झालेली असली तरी मुले-मुली मोठी झाल्यावर व त्यांचे विवाह झाल्यानंतर हे संबंध कायम राहत नाहीत. कारण कुटुंबातील सदस्य परस्परांपासून विभक्त होऊन वेगळे कुटुंब निर्माण करतात नि आपल्या मनाप्रमाणे जीवन जगतात.

**४) जीवनमान:**

नागरी कुटुंबाचे एकंदरीत जीवनमान हे पारंपरिक तथा ग्रामीण कुटुंबापेक्षा वरच्या पातळीवरचे असते. घर लहान असले तरी त्यात सर्व सोयींची पूर्तता करण्याचा कल असतो. सजावटीच्या बाबतीत हे कुटुंब अधिक दक्ष असते. फर्निचर, रेडिओ, पंखा, फ्रीज, टीव्ही, धुण्याचे मशीन इत्यादी सुखवस्तू व चैनीच्या वस्तू घरात असाव्यात असे सर्व सदस्यांचे एकमत असते. घरात विजेची शेगडी, गॅसची शेगडी, इस्त्री, पोळ्या करण्याचे व धुण्याचे यंत्र, अद्यावत भांडी इत्यादी असावीत असे स्त्रीला वाटत असते. तशी पूर्तताही केली जात असते. या सर्व वस्तूंमुळे श्रमात बचत होते. अधिक कष्ट वा श्रम, अधिक पैसा नि अधिक सुखसोयी इत्यादींवर या कुटुंबांचा भर असतो. जास्त पैसा मिळवून व सदस्य संख्या मर्यादित ठेवून जीवनात अधिकाधिक आनंद मिळविण्याचा प्रयत्न हे कुटुंब करीत असते.

**५) मंडळांचे वर्चस्व:**

नागरीकरणाच्या प्रभावाखाली आल्याने कुटुंबावर दुय्यम स्वरूपाच्या मंडळांचे वर्चस्व प्रस्थापित झाले आहे. हे प्रमाण सतत वाढत आहे. नागरी समाजात प्रत्येक सामाजिक संस्थेला असलेले महत्त्व कमी होऊ लागले आहे. कुटुंब, धर्म यासारख्या संस्थांचे कुटुंब सदस्यांवरील वर्चस्व कमी होऊ लागल्याने अनेकविध ऐच्छिक मंडळांनी व्यक्तिजीवनात प्रवेश केला आहे. नाटय मंडळ, चर्चा मंडळ, क्रीडा मंडळ, साहित्य मंडळ, महिला मंडळ, वृद्ध-तरुणांच्या सांस्कृतिक व असांस्कृतिक संघटना इत्यादींनी नगरातील लोकांच्या जीवनाला व्यापून टाकण्यास गेल्या कित्येक वर्षांपासून प्रारंभ केला आहे. व्यक्तींचा बराचसा वेळ या मंडळांच्या कार्यात खर्ची पडत आहे.

### ६) आप्तसंबंधीचे महत्त्व:

नागरी समाजात कुटुंबांचा आकार लहान झाला असल्यामुळे माता-पिता, आजा-आजी, सासरा-सासू, काका-काकू, दीर, जावा, नणंद इत्यादी नात्यातील माणसांना अजिबात स्थान उरलेले नाही. नातेसंबंधित व्यक्तींबद्दल आदर नि महत्त्व कमी झाले आहे. पती-पत्नी व त्यांची अविवाहित मुले म्हणजेच कुटुंब एवढाच अर्थ शिल्लक राहिला आहे. एकंदरीत या नातेवाईकांची नावे मुलाच्या दृष्टीने वाचण्यापुरती शिल्लक राहण्याच्या अवस्थेत पोहोचली आहेत.

### ७) कौटुंबिक अस्थिरता:

उद्योगधंद्याच्या वाढत्या प्रमाणामुळे नगरांचे नागरीकरण झाले असल्याने नागर समाजात जी विविधता निर्माण झाली आहे तिचा परिणाम कुटुंबाच्या स्थिरतेवर झाला आहे. पती-पत्नींचे संबंध समाजपातळीवर आल्यामुळे परस्परांवरील वर्चस्व, विशेष म्हणजे पतीचे पत्नीवरील वर्चस्व कमी झाले आहे. स्वाभिमान व स्वावलंबन वृत्तीमुळे पती-पत्नी परस्परांशी जुळवून घेण्यात पुढाकार घेण्याच्या परिस्थितीत नसतात. यामुळे मतभेदातून संघर्ष निर्माण होतो. मध्यस्थी कोणाचीच नसल्याने संघर्ष विकोपाला जाऊन त्याचा शेवट घटस्फोटाच्या पातळीवर येतो. या सर्व बाबींमध्ये दिवसेंदिवस वाढ होऊ लागल्याने नागरी कुटुंबाचे स्थिरत्व धोक्यात आले आहे.

### ८) स्त्री-पुरुष संबंध:

नागरी समाजात स्त्री-पुरुषांतील संबंधातील अंतर कमी होऊ लागले आहे. पुढे ते एकरूप होतात की काय अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. विविध प्रकारच्या सुख-सवलतींमुळे स्त्री घराबाहेर पुरुषांच्या सान्निध्यात बरोबरीने काम करू लागली आहे. शिक्षण, राजकारण, मनोरंजन, संशोधन, कारखाना, कार्यालय इत्यादी आणि आणखी कितीतरी क्षेत्रात स्त्री पुरुषांच्या बरोबरीने काम करू लागली आहे. कामाच्या ठिकाणी तसेच जाता-येता स्त्री-पुरुषांचे परस्परांना भेटण्याचे प्रमाण वाढू लागले आहे. शब्दातून प्रेमाचे प्रकटीकरण होऊन परस्परांबरोबर सिनेमा, नाटक, हॉटेल, सहल, बाग इत्यादी ठिकाणी जाणे-येणे वाढले आहे. जास्तीत जास्त जवळ आल्याने स्त्री-पुरुषांतील संकोच कमी होऊ लागला आहे. यामुळे विवाहपूर्व आणि विवाहानंतर लैंगिक संबंधाचे प्रमाण वाढले आहे. पती-पत्नी आपल्या निकोप नि सच्च्या प्रेमापासून व मुले आपल्या माता-पित्यांच्या जिव्हाळ्यापासून वंचित होत आहेत.

### ९) पालक-पाल्य संबंध:

मुले मोठी झाली की त्यांचे कार्यक्षेत्र नि मित्रसंबंध व्यापक होत असतात. शहरांचे नागरीकरण घडून आल्याने व अनेकविध बाबींची उपलब्धता निर्माण झाल्याने त्यांच्याविषयी मुलांत आकर्षण निर्माण होत असते. घरात आई-वडिलांचा बेबनाव नि सततचा संघर्ष परस्परांविषयी अनादर, नियमबाह्य वर्तन नि नको असलेल्या बाबींसंबंधीचा शब्दच्छल यांचा मुलांवर अनिष्ट परिणाम होत असतो. माता-पित्यांचे जास्त वेळ घराबाहेर राहणे आणि नोकरी-व्यवसायाची ठिकाणे परस्परांपासून अंतरावर असल्याने कुटुंबातील सदस्य कसे

नि कोणत्या प्रकारचे वर्तन करतात याचा कोणालाच थांगपत्ता नसतो. माता-पित्यांचा आदर्श, दरारा, भीतीयुक्त आदर वगैरे लुप्त होऊ लागल्याने मुले वयात आल्यानंतर मनाला वाटेल तसे वर्तन करू लागली आहेत. याचा परिणाम नागरी कुटुंबावर होऊ लागला असल्याने पाल्य आणि पालक परस्परांपासून दुरावले आहेत.

**१०) सुरक्षिततेचा अभाव:**

वैवाहिक संबंधांवरची जी नीतिविषयक पावित्र्याची पकड होती ती मुळातच संपल्यात जमा झाल्याने प्रत्येकाच्या बाबतीत भावनिक असुरक्षितता निर्माण झाली आहे. पती-पत्नीत केव्हा संघर्ष होऊन त्याचा केव्हा कडेलोट होईल या भीषण प्रसंगाची दोघांनाही शाश्वती नसते. त्यामुळे दोघेही उभ्या केलेल्या कुटुंबाच्या स्थिरतेबाबत साशंक असतात. माता-पित्यांच्या सततच्या अस्थिर कौटुंबिक जीवनात मुलांना सुद्धा असुरक्षितपणाच्या भावनेने ग्रासलेले असते. भविष्यात आपले काय नि कसे होईल याची भयानक जीवघेणी चिंता मुलांच्या मनात निर्माण होत असते. म्हणजे नागरी कुटुंबाचे भवितव्य सुरक्षिततेच्या बाबतीत उदासीन बनले आहे.

**११) विवाह विच्छेद:**

आधुनिक जीवनात विवाहाकडे 'करार' म्हणून पाहण्याचा एक नवीन स्थिरभाव विकसित होत आहे. स्त्रीला प्राप्त झालेले आर्थिक, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक आणि कौटुंबिक स्वातंत्र्य इत्यादींमुळे नागरी समाजात विवाह विच्छेदाचे तथा घटस्फोटाचे प्रमाण सातत्याने वाढत आहे. भौतिक परिस्थितीत स्त्रीचा सर्वांगीण बौद्धिक विकास होत असल्याने तिच्यात आत्मविश्वास आणि त्यातून स्वत्वाची जाणीव निर्माण झाली आहे. नागरी समाजात घटस्फोटाचे प्रमाण दिवसागणिक सातत्याने वाढतच आहे. एकंदरीत कुटुंब विघटनाच्या वाढत्या प्रक्रियेमुळे नागरी जीवन अस्थिर बनत आहे. शिक्षण आणि आर्थिक हव्यास किंवा मजबुरीने स्त्रीला घराबाहेर काढले आहे. पती-पत्नी या दोघांनाही एकाच ठिकाणी काम मिळणे शक्य नसते. अशा परिस्थितीत मजबुरी असेल वा मनाचा ढळलेला कल असेल! स्त्रीचे परपुरुषाच्या मोहाला बळी पडण्याचे प्रमाण वाढत आहे.

समाजशास्त्राच्या काही अभ्यासकांचे असे अनुमान आहे की, भारतीय नागरी कुटुंबावर पडलेला पाश्चिमात्य संस्कृतीचा प्रभाव, वाढते औद्योगिकीकरण, शिक्षणाचा प्रसार, स्त्री स्वातंत्र्य, मुक्त आर्थिक उदात्तीकरण आणि शहरांचे घडून आलेले प्रचंड नागरीकरण यामुळे येथील कुटुंबांचे भवितव्य निराशाजनक आहे. एवढेच नाही तर जागतिक पातळीवर एकविसाव्या शतकात कुटुंबाचे अस्तित्व नामशेष होते की काय अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

### ४.३.२ नागरी सामाजिक स्तरीकरण: जात आणि वर्ग

(Urban Social Stratification: Caste and Class)

कुटुंबाप्रमाणेच सामाजिक स्तरीकरण व्यवस्था ही सामाजिक संरचनेचा एक महत्त्वपूर्ण घटक आहे. त्यामुळे नागरी सामाजिक संरचनेचे स्वरूप समजण्यासाठी नागर समाजातील सामाजिक स्तरीकरणाचा अभ्यास करणे आवश्यक ठरते. म्हणून या ठिकाणी तुम्ही सामाजिक स्तरीकरणाचा अर्थ, प्रकार आणि भारतातील नागर समाजातील सामाजिक स्तरीकरणाचे दोन्ही प्रकार म्हणजे जातिव्यवस्था व वर्गव्यवस्था हया बाबींचा अभ्यास करणार आहात.

**सामाजिक स्तरीकरणाचा अर्थ आणि व्याख्या:**

कोणत्याही समाजातील सर्व लोकांचा सामाजिक दर्जा (किंवा स्थान) समान मानला जात नाही. विविध निकषांच्या आधारे (उदा. जन्म, वय, लिंग, सत्ता, संपत्ती, शिक्षण इ.) लोकांच्या सामाजिक दर्जात श्रेष्ठ, मध्यम कनिष्ठ असा भेद करून त्यांचे विविध गटात किंवा स्तरात विभाजन केले जाते. या विभाजनासच सामाजिक स्तरीकरण असे म्हणतात. पी. गिस्बर्ट यांच्या मते, श्रेष्ठ आणि कनिष्ठ अशा परस्परसंबंधाने परस्परांशी जोडलेल्या स्थायी समूहात किंवा प्रवर्गात समाजाचे झालेले विभाजन म्हणजे सामाजिक स्तरीकरण होय. **रेमंड मूरे** यांच्या मते, ''श्रेष्ठ-कनिष्ठ अशा सामाजिक एककात झालेली समतल विभागणी म्हणजे सामाजिक स्तरीकरण होय.'' **सदरलँड आणि वुडवर्थ** यांच्या मते, सामाजिक स्तरीकरण ही विभेदनाची किंवा आंतरक्रियेची अशी सरळ प्रक्रिया आहे की जिच्याव्दारे काही व्यक्ती इतरापेक्षा उच्च मानल्या जातात.

**नागरी समाजातील स्तरीकरणाचे स्वरूप:** (Nature of Stratification in Urban Society)

नागरी समाजात स्तरीकरणासाठी प्रत्येक व्यक्तीचा सामाजिक दर्जा विचारात घेतला जातो. समाजातील व्यक्तींच्या दर्जातील भिन्नतेमुळे येथे निरनिराळे स्तर दोन प्रकारांत विभागले गेलेले आहेत. कारण येथे व्यक्तीला दोन प्रकारे दर्जे प्राप्त झालेले असतात. एक जन्मजात दर्जा तर दुसरा अर्जित दर्जा. या दोन दर्जांना अनुसरून स्तरीकरणाचे दोन वर्ग पडलेले आहेत. पहिला वर्ग 'बंदिस्त वर्ग'. हा वर्ग व्यक्तीच्या जन्मजात दर्जास अनुसरून पडलेला आहे. दुसरा वर्ग 'मुक्त वर्ग' या नावाने ओळखला जातो. हा वर्ग व्यक्तीचा अर्जित दर्जा विचारात घेऊन निर्माण केलेला आहे. बंदिस्त वर्ग म्हणजे येथील हिंदू समाजातील जातीव्यवस्था. मुक्त वर्गव्यवस्था म्हणजे विविध जाती-धर्मातील लोकांनी मिळविलेल्या आर्थिक, सामाजिक, राजकीय आणि सांस्कृतिक दर्जा. तेव्हा नागरी स्तरीकरण व्यवस्थेत जातीव्यवस्था आणि वर्गव्यवस्था या दोन्हींचा विचार केला जातो.

**सामाजिक स्तरीकरणाचे प्रकार:**

सामाजिक स्तरीकरणाचे बंदिस्त (closed) स्तरीकरण व मुक्त (open) स्तरीकरण असे दोन प्रकार आढळतात.

**बंदिस्त स्तरीकरण:**

ज्या स्तरीकरणात व्यक्तीला जन्माने प्राप्त होणारा सामाजिक दर्जा वा स्थान तसेच स्वकर्तृत्वाने संधी नसते, त्यास बंदिस्त स्तरीकरण म्हणतात. या प्रकारात व्यक्ती ज्या सामाजिक स्तरात जन्मते तो स्तर मरेपर्यंत कायम राहते. एका सामाजिक स्तरातून दुसऱ्या सामाजिक स्तरात जाता येत नाही. म्हणजेच सामाजिक गतिशीलतेचा अभाव असतो. भारतातील जातिव्यवस्था (caste system) हे बंदिस्त स्तरीकरण आहे.

**मुक्त स्तरीकरण:**

ज्या स्तरीकरणात व्यक्तीला जन्माने प्राप्त होणारा सामाजिक दर्जा वा स्थान स्वकर्तृत्वाने बदलण्याची संधी असते त्यास मुक्त स्तरीकरण म्हणतात. या प्रकारात व्यक्ती ज्या सामाजिक स्तरात जन्मते तो स्तर व्यक्तीला बदलता येतो. म्हणजेच या प्रकारात सामाजिक गतिशीलतेस वाव असतो. पाश्चात्त्य समाजात उदयास आलेली वर्गव्यवस्था (class system) हे मुक्त सामाजिक स्तरीकरण आहे.

समकालीन भारतीय समाजात सामाजिक स्तरीकरणाचे हे दोन्ही प्रकार आढळतात. पारंपारिक भारतात जातिव्यवस्थेचे प्राबल्य होते तर आधुनिक भारतात जातिव्यवस्थेचा प्रभाव हळूहळू कमी होत चालला असून त्याजागी वर्गव्यवस्था हळूहळू रूजत चालली आहे. म्हणजेच भारतीय समाज विशेषत: नागर समाज हा सामाजिक स्तरीकरणाच्या दृष्टीने संक्रमणावस्थेत आहे असे म्हणता येईल. नागर समाजातील सामाजिक स्तरीकरणाचे स्वरूप समजण्यासाठी या दोन्ही प्रकारची म्हणजे जातिव्यवस्था व वर्गव्यवस्था यांची व्याख्या थोडक्यात अभ्यासू.

**जातीची व्याख्या:**

जातीचा अर्थ समजण्यासाठी ग्रीन यांची पुढील व्याख्या अभ्यासणे उचित ठरते. जात ही सामाजिक स्तरीकरणाची अशी व्यवस्था आहे की, जिच्यामध्ये निदान तत्त्वत: तरी व्यक्तिस आपला सामाजिक दर्जा बदलणे शक्य नसते. व्यक्तिला जन्माने प्राप्त होणारा दर्जा मरेपर्यंत कायम असतो. व्यक्तिचा व्यवसाय, निवासस्थान, जीवनपद्धती, व्यक्तिगत संपर्क, विवाहाचा जोडीदार निवडण्याचे क्षेत्र, मित्रपरिवार इत्यादी बाबी जन्माने निश्चित होतात. तसेच उच्च जातीतील व्यक्तींनी कनिष्ठ जातीतील व्यक्तींशी शारीरिक व सामाजिक संपर्क ठेवणे कमीपणाचे मानले जाते. जातिव्यवस्थेचे कायद्याने संरक्षण केलेले असून तिला धर्माची संमती आहे.

**जातिव्यवस्था:**

प्राचीन काळात भारतातील हिंदु समाज हा ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र या चार वर्गात म्हणजेच वर्णात विभागला गेला. प्रत्येक वर्णाचा व्यवसाय, सामाजिक दर्जा व जीवन पद्धती निर्धारित केली गेली. प्रारंभी व्यक्तीचा वर्ण तिच्या गुणकर्माच्या आधारे ठरत असे. पुढे मात्र तो गुणकर्माऐवजी जन्मावरून ठरू लागला. म्हणजे आईवडीलांचा जो वर्ण असेल तोच मुलाचा वर्ण मानला जाऊ लागला आणि व्यक्तीला वर्ण बदलण्यास मनाई केली. कालांतराने वर्णव्यवस्थेतील व्यवसाय, सामाजिक दर्जा, सामाजिक संपर्क, विवाह,

याबाबतच्या नियमांमध्ये भिन्नता वाढत जाऊन वरील चार वर्णामध्ये अनेक समूह व उपसमूह उदयास आले. आणि त्यांनाच अनुक्रमे जाती व उपजाती म्हटले जाऊ लागले. अशाप्रकारे वर्णव्यवस्थेतून अनेक जाती व उपजाती निर्माण होऊन त्यांच्यातील परस्परसंबंधात एक विशिष्ट व्यवस्था निर्माण झाली आणि तिलाच जातीव्यवस्था म्हटले गेले. अशा या जातिव्यवस्थेत व्यक्तीची जात जन्माने ठरू लागली व जातीवरून व्यक्तिचा सामाजिक दर्जा, व्यवसाय, विवाहाचा जोडीदार, सामाजिक संपर्काचे क्षेत्र व एकंदर जीवनपद्धती निश्चित होऊ लागली. आणि त्यामध्ये व्यक्तिला बदल करण्याचे स्वातंत्र्य नाकारले गेले. म्हणूनच जातिव्यवस्थेस बंदिस्त स्तरीकरण म्हटले जाते.

नागरी समाजात जातीव्यवस्थेला एक महत्त्व प्राप्त झालेले जाणवते. हिंदू समाजाची रचना ही जातीनिष्ठ समाजरचना असल्याने याची लागण इतर धर्मांना सुद्धा झाली आहे. हिंदू समाजाच्या संपर्कात आल्याने इतर धर्मीय समाजात श्रेष्ठ, कनिष्ठ अशा जाती निर्माण झालेल्या नसल्या तरी वेगवेगळ्या नावाने त्यांच्यात भेद असून श्रेष्ठ-कनिष्ठत्वाची भावना त्यांच्यातही आहे. हिंदू आणि इतर धर्मात सुद्धा मुख्य आणि पोटभेद खूप आहेत. हे भेद व्यवसाय, वंश आणि भाषेवरून पडलेले आहेत. जेथे भेद दिसून येतात तेथे नक्कीच जातीव्यवस्था आहे असे लक्षात येते. जात म्हणून जेथे फरक केला जातो तेथे विविध गटांची श्रेणीरचना निर्माण झालेली असते. श्रेष्ठ-कनिष्ठत्वाची भावना निर्माण झाल्याने श्रेष्ठ ते कनिष्ठ अशी जातीची उतरंड झालेली असते. प्रत्येक जातीचे स्वत:चे एक वेगळे वैशिष्टय असते. ते वैशिष्टय कसे जपले जाईल याची जात-सदस्यांना काळजी असते. तेव्हा जात म्हणजे नेमके काय याचे स्पष्टीकरण करताना मुजुमदार व मदन म्हणतात, जात हा एक बंदिस्त वर्ग आहे. म्हणजे जातीला वर्गासारखी मुक्तता नाही. जातीच्या जातीतच सर्व काही घडून यायला पाहिजे असा सामाजिक नियम आहे. प्रा. कुले म्हणतात, संपूर्णतः अनुवांशिकतेवर आधारलेल्या वर्गास जाती म्हणतात. कुले यांनी जातीचा आधार वंश असल्याचे प्रतिपादन केले आहे. सर हर्बर्ट रिस्ले यांनी, एक सामान्य नाव धारण केलेल्या विवक्षित मानवी अगर दैवी अशा लोकांकडून तो एकजिनसी समुदाय आहे अशी मान्यता पावलेल्या कुटुंबाचा समुच्चय म्हणजे जात होय जातीविषयी विशद केलेली ही रिस्लेची माहिती विशेष असे काही सांगून जाते की, त्यामुळे जातीचे स्वरूप लक्षात येते. जात ही प्रामुख्याने जन्मतत्त्वावर आधारलेली अशी एक स्तरीकरण व्यवस्था आहे. तसेच ती समाजाचे निरनिराळ्या भागात विभाजन करते व आपल्या सदस्यांवर खाणेपिणे, वैवाहिक संबंध, व्यवसाय व सामाजिक व्यवहार याबाबतीत कमी-अधिक प्रमाणात निर्बंध घालत असते.

व्यक्तीची जात तिच्या जन्मावरून ठरविण्यात येत असल्यामुळे जातीला जन्मतत्वाधारित गट असे म्हटले जाते. अनुवांशिकतेच्या तत्त्वाप्रमाणे व्यक्ती ज्या जातीच्या स्त्री-पुरुषांच्या पोटी जन्म घेते त्याच जातीची ती सदस्य बनते. तिचा जाती-दर्जा तिच्या जन्मावरून ठरविला जातो. एकदाच हा दर्जा मिळतो. तो बदलता येत नाही. ठरविले तरी जात बदलता येत नाही.

प्रत्येक जात एक ठळक व स्पष्ट गट असतो. दोन व्यक्तीमध्ये स्पष्ट अंतर दिसून येते. प्रत्येक जातीची व्यक्ती आपल्या जाती-दर्जानुसार कार्य करण्याचा प्रयत्न करीत असत. परंतु शहरात तशी परिस्थिती निर्माण होत नाही. व्यक्तीच्या कार्यावरून व्यक्ती कोणत्या जातीची आहे हे सहज लक्षात येत नाही. अर्थात,

वेगवेगळ्या जातींमध्ये निश्चित मर्यादा रेषा स्पष्ट असल्याने जात हा ठळक स्वरूपाचा गट असतो हे नागरी लोकांनाही मान्य करावे लागते.

सर्व जातींचा दर्जा समाज नसतो. काहींना श्रेष्ठ तर काहींना कनिष्ठ दर्जा प्राप्त झालेला असतो. जातीची ही स्तररचना श्रेष्ठ, मध्यम आणि कनिष्ठ अशा उतरत्या क्रमाने झालेली असते. नागरी भागातही ब्राह्मण जात वगळता इतर व्यक्तींच्या जातीचा क्रम निश्चित नसतो. काही ठिकाणी त्या वर तर काही ठिकाणी मध्य तर काही ठिकाणी त्या एकदम खालच्या क्रमावर गेलेल्या असतात. तेव्हा एकाच जातीला अनेक ठिकाणी वेगवेगळा दर्जा प्राप्त झालेला असतो. परंतु त्यात फारसा फरक नसतो एवढे मात्र निश्चित.

सद्य:परिस्थितीत पारंपरिक व्यवसायाची सक्ती कोणत्याही जातीवर केली जात नसली तर पूर्वी ती केली जात असे. बदलत्या परिस्थितीत सोयीनुसार शहरातील विविध जातींच्या लोकांनी वेगवेगळ्या व्यवसायांत प्रवेश केला आहे. पूर्वी नगरात सुद्धा आपल्याच जातीचा व्यवसाय करण्यावर भर दिला जात असे. तसे तिच्यावर बंधन होते. व्यक्तीने जर स्वत:चा व्यवसाय सोडून इतर जातीचा व्यवसाय करण्याचा प्रयत्न केला तर स्वजातीतून व दुसऱ्या जातीतून प्रखर विरोध केला जात असे. या कठोर नियमामुळे हिंदू समाजात अनेक उपजाती निर्माण झाल्या. प्रत्येकाला स्वत:चे व्यवसाय निश्चित करण्यात आले. व्यवसायांची श्रेष्ठ-कनिष्ठ तत्त्वानुसार क्रमवारी लावण्यात आली. काही व्यवसाय श्रेष्ठ तर काही व्यवसाय कनिष्ठ ठरले गेले. सांप्रत नागरी समाजात या बाबतीत कसलाही विचार केला जात नाही. अर्थात शहरातील प्रत्येक व्यक्तीला जात असते आणि तीचा व्यक्तीला अभिमान असतो.

जातीव्यवस्थेत निरनिराळ्या जातीच्या लोकांना परस्परांशी मुक्तपणे संबंध ठेवण्यास पूर्णपणे मनाई असे. खाणेपिणे, विवाह वगैरे प्रकारच्या संबंधावर बंधने होती. परंतु सगळ्याच जातींना अशी बंधने नव्हती. कनिष्ठ जातीच्या लोकांना वरिष्ठ जातीच्या लोकांकडे खाणेपिणे वगैरे बाबतीत बंधन नव्हते. फक्त श्रेष्ठ जातीच्या लोकांना कनिष्ठ जातींच्या लोकांकडे खाणेपिणे त्याज्य होते. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तींवर समाजाकडून बहिष्कृत होण्याची वेळ येत असे. सांप्रत, आजही शहरातून प्रत्येक जातीचे सांस्कृतिक आणि धार्मिक संबंधही अनेकदा आपापल्या जातीपुरतेच मर्यादित असतात. यामुळे प्रत्येक जात हा आंतर्विवाही गट समजला जातो. लग्नप्रसंगी आपल्याच जातीच्या लोकांना प्राधान्य दिले जाते. आपल्याच जातीत लग्न करायला पाहिजे ही सक्ती आजही नागरी समाजात करण्यात येते. अजूनही जातीबाहेर विवाह करण्यास समाजाची अजिबात मान्यता नसते. म्हणून नागरी समाजात खाणेपिणे वगैरे बाबतीत नियम शिथिल झालेले दिसून येत असले तरी जातीबाह्य लग्न अपवादानेच होत असतात. हा भेदाभेदीचा विषय अजूनही अमलात आणला जातो.

जातीव्यवस्थेला धार्मिक आधार मिळालेला आहे. कर्म व पुनर्जन्माच्या तत्त्वज्ञानाचा संबंध जातीव्यवस्थेसाठी जोडण्यात आलेला आहे. जात ही परमेश्वराने निर्माण केलेली असल्याने प्रत्येक जातीने घालून दिलेल्या नियमाप्रमाणे वर्तन ठेवले पाहिजे असे मानणारे लक्षावधी लोक नगरात आहेत. प्रत्येक जातीचे लोक आपापसात योग्य ते अंतर ठेवून धर्मनियमांना अनुसरून सैल पातळीवरून का होईना वर्तन करीत असतात. नियम मोडले जाऊ नयेत म्हणून येथे प्रत्येक जातीची स्वत:ची मूळ जातपंचायत असतेच

असे नाही; परंतु ती अपवादाने असलीच तर ही जातपंचायत धार्मिक आधार सोडून नियमबाह्य वर्तन करणाऱ्याला शिक्षा देण्याचा अयशस्वी प्रयत्न करीत असते.

समाजात वरिष्ठ जातींना अजूनही काही विशेष धार्मिक आणि सामाजिक अधिकार प्राप्त झालेले आहेत असे आढळून येते. काही जातींना विशेष अधिकार, प्रतिष्ठा, सवलती आणि दर्जा प्राप्त झालेले असल्याने त्यांचे स्थान उच्च प्रतीचे असते. उलट ज्यांना कोणत्याही प्रकारचे अधिकार, सवलती नाहीत अशी जातीच्या लोकांची अवस्था अतिशय केविलवाणी झालेली असते. शासनाने कित्येक नियम केले असले तरी नागरी समाजात त्यांचा फारसा प्रभाव पडलेला नाही. कायदा प्रत्यक्षात आमलात आणला जात नाही. तथापि, नागरी समाजात अशा प्रकारचे सामाजिक आणि धार्मिक निर्बंध पाळले जात नाहीत. कोणीही कोणाच्याबरोबर सामाजिक वर्तनव्यवहार करीत असतो. जात नि धर्मपातळीवरचे वर्तन व्यवहार निदान वरकरणी का होईना येथे जाणवत नाहीत.

**वर्गव्यवस्था:** (Class System)

**वर्गाचा अर्थ:**

समाजात अनेक लोक असतात. पण त्या सर्वांचे समाजातील स्थान किंवा दर्जा समान नसतो. जन्म, लिंग, वय, सत्ता, संपत्ती, शिक्षण इ. घटकांच्या आधारे त्यांच्या स्थानात किंवा दर्जात भेदभाव केला जातो. काही लोकांचे स्थान वा दर्जा कनिष्ठ तर काहींचा या दोन्हीच्या मध्ये मानला जातो. ज्यांचे स्थान व दर्जा समान असतो अशा लोकांचा एक समूह निर्माण होतो. या समूहासच साधारणपणे सामाजिक वर्ग असे म्हणतात आणि हा वर्ग त्याच्या सामाजिक दर्जाच्या दृष्टीने समाजातील इतर वर्गापेक्षा श्रेष्ठ किंवा कनिष्ठ असतो. एका सामाजिक वर्गात मोडणाऱ्या लोकांचे सामाजिक स्थान वा दर्जा जसा समान असतो तसेच त्यांची आर्थिक स्थिती, अभिवृत्ती, वर्तनप्रकार, सामाजिक मूल्ये व एकंदर जीवनपद्धती इ. गोष्टीही साधारणपणे समानच असतात. या समानतेमुळेच त्यांच्यात आपण सर्व एका वर्गाचे सदस्य आहोत अशी जाणीव निर्माण झालेली असते. या जाणीवेसच वर्ग-जाणीव असे म्हणतात. हया वर्ग जाणीवेमुळेच एक वर्ग दुसऱ्या वर्गाहून भिन्न ठरतो. प्रत्येक वर्ग समाजातील आपली वर्ग प्रतिष्ठा (Class prestige) जोपासण्याचा प्रयत्न करतो. अशा या वर्गव्यवस्थेत व्यक्तिला आपले सामाजिक स्थान वा दर्जा उंचावण्याची व त्याआधारे वर्ग बदलण्याची संधी असते. म्हणजेच वर्गव्यवस्थेत सामाजिक गतिशीलतेला वाव असतो. म्हणून वर्गव्यवस्था मुक्त सामाजिक स्तरीकरण ठरते.

**वर्गाच्या व्याख्या:**

**१) प्रा. चंद्रकांत खंडागळे:** ''सामाजिक वर्ग हा एखाद्या समाजात समान सामाजिक दर्जा असलेल्या लोकांचा असा समूह असतो की जो इतर समूहांपेक्षा श्रेष्ठ किंवा कनिष्ठ मानला जातो आणि आपल्या सदस्यांना दर्जा बदलण्याची संधी देतो.''

**२) हॉर्टन व हंट:** ''सामाजिक दर्जाच्या अधिक्रमी रचनेत समान स्थान असणाऱ्या लोकांचा स्तर म्हणजे सामाजिक वर्ग होय.'' (social class may be defined as a stratum of people of similar position in the social status hierarchy.)

**३) मॅकायव्हर व पेज:** ''सामाजिक वर्ग म्हणजे एखाद्या समुदायाचा असा कोणताही विभाग की जो त्याच्या सामाजिक दर्जामुळे इतर विभागापेक्षा वेगळा करता येतो.'' (social class in any portion of a community marked off from the rest by social status.)

**४) पी. गिसबर्ट:** सामाजिक वर्ग म्हणजे समाजात निश्चित दर्जा असणाऱ्या लोकांचा असा प्रवर्ग किंवा समूह आहे की त्या दर्जामुळे त्यांचे इतर समूहांशी असणारे संबंध स्थायी स्वरूपात निर्धारित झालेले असतात. (Social class is a category of group of persons having a definite status in society which permanently determines its relation to other groups.)

**५) टिश्लेर, व्हायटन आणि हंटर:** ''समान संधी, समान आर्थिक व व्यावसायिक स्थाने, समान जीवनशैली आणि समान अभिवृत्ती व वर्तनप्रकार असणाऱ्या लोकांचा प्रवर्ग म्हणजे सामाजिक वर्ग होय.'' (Social class consists of a category of people who share similar opportunities, similar economic and vocational positions, similar life-style and similar attitudes and behaviour)

**नागर समाजातील वर्ग:**

पारंपारिक समाजात धार्मिक वा अध्यात्मिक ज्ञान, शारीरिक शक्ती, सत्ता, राज्यव्यवस्थेतील विशिष्ट पद इत्यादी निकषांच्या आधारे वर्गाचे निर्धारण होत असे. आधुनिक समाजात मात्र व्यक्तिच्या अंगी असलेली गुणकौशल्ये, शैक्षणिक पात्रता, संपत्ती, व्यवसायाचे स्वरूप, उत्पादन साधने, राजकीय अधिकार किंवा सत्ता इत्यादींच्या आधारे वर्गाचे निर्धारण होते.

या विविध निर्धारकापैकी संपत्ती किंवा मालमत्ता हा निर्धारक (निकष) वर्गाचा सर्वात महत्त्वपूर्ण निर्धारक मानला जातो. आधुनिक अर्थप्रधान समाजव्यवस्थेत व्यक्तिचे सामाजिक स्थान किंवा दर्जा म्हणजेच वर्ग निर्धारित करण्यामध्ये संपत्तीला सर्वाधिक महत्त्व दिले जाते. कारण संपत्तीव्दारेच व्यक्तिला समाजात मानसन्मान, प्रतिष्ठा, सोयीसुविधा मिळते. त्यामुळे आज संपत्तीच्या आधारे उच्च वर्ग, मध्यम वर्ग आणि निम्न वर्ग असे तीन प्रकार पाडले जातात.

**उच्च किंवा श्रेष्ठ वर्ग:** (Upper or Higher Class)

समाजातील ज्या व्यक्तिकडे खूप संपत्ती असते, जे गर्भश्रीमंत असतात त्या व्यक्तिचा उच्च वर्गात समावेश होतो. हा वर्ग लोकसंख्येच्या दृष्टीने सर्वात कमी सभासद संख्या असलेला वर्ग असतो. पण तो समाजातील सर्वात शक्तीशाली वा प्रभावशाली वर्ग असतो. समाजातील उत्पादन साधनांचे व संपत्तीचे केंद्रीकरण या वर्गाच्या हाती झालेले असते. त्यामुळे या वर्गाकडे भौतिक सुखाच्या सर्व सोयीसुविधा

असतात. जीवनातील सर्व ऐषोरामाचा उपभोग हा वर्ग घेत असतो. अत्याधिक संपत्तीमुळेच या वर्गास समाजात प्रतिष्ठा, उच्च स्थान, अधिकार या गोष्टी प्राप्त होतात. या गोष्टी तसेच आपले हितसंबंध सुरक्षित ठेवण्यासाठी हा वर्ग संपत्तीचा हत्यार म्हणून वापर करीत असतो. आपल्या आशा आकांक्षा व गरजा पूर्ण करण्यामध्ये हा वर्ग सर्वात आघाडीवर व सामर्थ्यवान असतो.

भारतीय समाजातील मोठमोठे उद्योगपती, व्यापारी, राजकीय सत्ताधारी व्यक्ती (मंत्री, खासदार, आमदार), सार्वजनिक तसेच खाजगी क्षेत्रातील प्रशासकीय/व्यवस्थापकीय पदावरील उच्च अधिकारी, मोठमोठे सिनेकलावंत व अन्य कलाकार इत्यादींचा समावेश उच्च वर्गात करता येईल.

### २) **मध्यम वर्ग:** (Middle Class)

उच्च वर्गातील लोकांपेक्षा कमी पण निम्न वर्गातील लोकांपेक्षा अधिक संपत्ती असलेल्या व्यक्तिचा मध्यम वर्गात समावेश होतो. या वर्गातील लोकांकडे आर्थिक उत्पन्नाची निश्चित अशी साधने असतात. मात्र उत्पादन साधनांवर बहुधा त्यांचा एकाधिकार प्रस्थापित झालेला नसतो. आपल्या गरजा व आशा आकांक्षा पूर्ण करण्यासाठी हया वर्गास सतत कार्यरत राहावे लागते. या वर्गातील लोक विविध व्यवसायाशी, नोकऱ्यांशी, उद्योगधंद्यांशी, सेवाक्षेत्राशी संबंधित असतात. उच्च दर्जाची शारीरिक, बौद्धिक, मानसिक, व्यावसायिक कलाकौशल्ये या वर्गाकडे असतात व त्या आधारेच ते संपत्ती वा उत्पन्न मिळवित असतात. उच्च वर्गाच्या जीवनशैलीचे अनुकरण करून उच्च वर्गात समाविष्ट होण्याची इच्छा मध्यम वर्गातील व्यक्ती बाळगून असतात व त्यासाठी धडपडत असतात. विवाह, शिक्षण, गाडी, बंगला इत्यादीवर उच्च वर्गासारखा खर्च करू इच्छितात व तो करण्यासाठी त्यांना मोठी आर्थिक ओढाताण सहन करावी लागते.

भारतीय समाजातील डॉक्टर्स, इंजिनिअर्स, प्राध्यापक, वकील, लघुउद्योजक, मध्यम दर्जाच्या पदावरील शासकीय कर्मचारी इत्यादींचा मध्यम वर्गात समावेश करता येईल.

### ३) **निम्न किंवा कनिष्ठ वर्ग:** (Lower class)

ज्यांच्याकडे जीवन जगण्यासाठी आवश्यक असणारी संपत्ती नसते म्हणजेच जे दरिद्री वा गरीब असतात अशा व्यक्ती या वर्गात मोडतात, लोकसंख्येच्या दृष्टीने हा वर्ग समाजातील सर्वात मोठा वर्ग असतो. या वर्गाकडे बहुधा निश्चित उत्पन्न देणारी साधने नसतात त्यामुळे जगण्यासाठी या वर्गास अपार कष्ट करावे लागतात. कुटुंबातील सर्व सदस्यांना पैसा मिळविण्यासाठी कोणते ना कोणते काम करावे लागते. सर्वजण मिळून जीवनावश्यक गरजा पूर्ण करण्यासाठी धडपडत असतात. आणि त्यामध्ये ते बऱ्यापैकी यशस्वी होत असतात. मात्र दुय्यम गरजा पूर्ण करण्याची त्यांची आर्थिक कुवत नसते. या वर्गातील काही कुटुंबे आपल्या मुलाबाळांना शिक्षण देऊन निश्चित उत्पन्न देणारा एखादा धंदा वा नोकरी मिळवून देण्याची व त्याव्दारे मध्यम वर्गात प्रवेश करण्याची अभिलाषा बाळगून असतात. या वर्गास समाजात सर्वात कनिष्ठ स्थान असते. संपत्तीच्या अभावी सर्व क्षेत्रात ते मागासलेले असतात. सत्ता, संपत्ती, शिक्षण, सत्ता, अधिकार, मानसन्मान, प्रतिष्ठा इत्यादीपासून हा वर्ग वंचित राहिलेला असतो. नागर समाजातील अकुशल कामगार, सफाई कामगार, हमाल, घरगडी व मोलकरणी, रोजंदारी करणारे मजूर इत्यादींचा निम्न वर्गात समावेश होतो.

आधुनिक काळातील नागर समाजात वरील तीन प्रमुख वर्ग आढळतात. भारतातही हे तीन वर्ग उदयास आलेले आहेत. नागर समाजातील जातिव्यवस्थेचे हळूहळू विघटन होत असून तिच्या जागी वर वर्णन केलेली वर्गव्यवस्था रूढ होत चालली आहे. भारतातील मोठमोठया नगरातील एकाच वर्गात विभिन्न जातीचे लोक एकत्रित होत असून त्यांच्यातील जातीची जाणीव हळूहळू शिथील होत आहे व त्या जागी वर्गीय जाणीव विकसित होत चालली आहे.

**५.३.३ नागरी व्यवसाय:** (Urban Occupations)

नागरी कुटुंब आणि नागरी सामाजिक स्तरीकरण यांचे स्वरूप समजावून घेतल्यानंतर आता तुम्ही नागरी व्यवसायांचा अभ्यास करणार आहात. त्यासाठी प्रथम व्यवसाय म्हणजे काय हे समजावून घेणे उचित ठरेल.

**व्यवसायाचा अर्थ:**

मानवाला आपल्या निर्वाहविषयक गरजा भागविण्यासाठी व पर्यायाने आपले अस्तित्व टिकविण्यासाठी विविध वस्तू व सेवांचे उत्पादन करावे लागते. यासाठी मनुष्य शारीरिक, मानसिक व बौद्धिक श्रम करतो. आणि त्याचा मोबदला म्हणून त्याला मजुरी, वेतन किंवा मेहनताना मिळत असतो. मनुष्य हे जे काही करतो त्यास आर्थिक दृष्टिकोनातून कार्य (work) असे म्हणतात. याच अर्थाने, रेमंड फर्थ, उत्पन्न निर्माण करणारी क्रिया (an income producing activity) असे म्हणतो. व्यवसाय ही संज्ञा प्रामुख्याने विशेषिकृत आणि प्रस्थापित कार्याच्या प्रकारासाठी वापरली जाते. 'व्यवसाय ही अशाप्रकारची एक क्रिया आहे की जिच्याव्दारे मनुष्य जगण्यासाठी काही तरी कमावित असतो.' (It is an activity by which man earns something his livelihood.) थोडक्यात व्यवसाय हे उदरनिर्वाह चालविण्याचे एक साधन आहे. व्यवसाय ही संज्ञा शेती, उद्योग, व्यापार, शासकीय-निमशासकीय वा खाजगी सेवा, कला इत्यादींशी निगडीत आहे. उदरनिर्वाह चालविण्यासाठी मानवाला कोणत्या ना कोणत्या प्रकारचा व्यवसाय करावाच लागतो. विभिन्न प्रकारचे व्यवसाय हे आधुनिक आर्थिक जीवनाचे महत्त्वाचे वैशिष्टय आहे.

समाज कोणत्याही प्रकारचा असो तो आपल्या सदस्यांना निर्वाह चालविण्यासाठी विविध प्रकारचे व्यवसाय उपलब्ध करून देत असतो. या ठिकाणी तुम्ही नागर समाजातील व्यवसायांचे स्वरूप समजावून घेणार आहात.

**नागरी व्यवसायांची वैशिष्टये:**

नागरी व्यवसायांचे स्वरूप समजावून घेण्यासाठी नागरी व्यवसायांची वैशिष्टये अभ्यासावी लागतात.

**बिगर शेती व्यवसाय:** (Non-agricultural occupations)

अखिल मानव समाजाचे ग्रामीण समाज व नागर समाज असे दोन ठळक प्रकार पाडले जातात. आणि या दोन्ही समाजातील भेद स्पष्ट करताना ग्रामीण समाजातील व्यवसाय हे शेती व शेतीसंलग्न स्वरूपाचे असतात तर नागर समाजातील व्यवसाय हे बिगरशेती स्वरूपाचे असतात. असे म्हटले जाते.

नगरात किंवा शहरात विविध तऱ्हेचे व्यवसाय उपलब्ध असतात. अवजड उद्योग, लघुउद्योग, व्यापारपेठा, कारखाने, शिक्षणसंस्था, मनोरंजन केंद्रे, जीवनावश्यक वस्तुच्या खरेदी-विक्रीची केंद्रे, आरोग्य व वैद्यकीय सेवा पुरविणारी केंद्रे, विविध क्षेत्रातील सल्लादायी केंद्रे, वाहतूक व संदेशवहन यंत्रणा, शासकीय-निमशासकीय-खाजगी कार्यालये इत्यादींची नगरात रेलचेल असते. आणि त्यांच्यामध्ये काम/कार्य (work) करून शहरी लोक आपला उदरनिर्वाह चालवित असतात. हे सर्व व्यवसाय बिगरशेती व्यवसाय म्हणून ओळखले जातात. शहरात शेती व्यवसायाशी संबंधित असणाऱ्या वस्तूंचे-उदा. शेती अवजारे, रासयनिक खते, जंतुनाशके, कृत्रिम पाणी पुरवठयाची साधने इत्यादी उत्पादन करणारे उद्योगधंदे वा व्यवसाय देखील असतात. अशा व्यवसायातही अनेक शहरी लोक गुंतलेले असतात. आणि असे व्यवसायही बिगरशेतीच मानले जातात.

**कार्य विभाजन आणि विशेषीकरण:** (Division of work and specialization)

नागरी व्यवसायात मोठया प्रमाणावर कार्य विभाजन व विशेषीकरण झालेले दिसून येते. बहुतेक नागरी व्यवसाय हे संकीर्ण (गुंतागुंतीचे) असतात. कारण त्यामध्ये अनेक क्रिया-प्रक्रिया अंतर्भूत असतात. आणि या क्रिया-प्रक्रियांचे लोकांमध्ये वाटप झालेले असते. कोणी कोणते कार्य वा प्रक्रिया पार पाडावयाची हे निर्धारित केलेले असते. यालाच कार्य विभाजन असे म्हणतात. उदा. एखाद्या वस्त्रोद्योगात कापूस पिंजणे, सूत कातणे, वस्त्र विणणे, वस्त्रास रंग देणे, वस्त्रांवर नक्षी काढणे इत्यादी क्रियांचे वेगवेगळया कामगारामध्ये वाटप केलेले असते. आणि प्रत्येकजण आपल्या वाटयाचेच कार्य करीत असतो. कार्य विभाजनाप्रमाणेच विशेषीकरणही झालेले असते. कोणत्या तरी एकाच क्रियेत/प्रक्रियेत विशेष प्राविण्य वा कौशल्य संपादन करून केवळ तीच क्रिया/प्रक्रिया करणे म्हणजे विशेषीकरण होय. बहुतेक नागरी व्यवसाय हे विशेषीकृत (Specialized) झालेले असतात. आणि ते करणारे लोक विशेष तज्ज्ञ (Specialists) म्हणून ओळखले जातात. उदा. वैद्यकीय व्यवसायात मेंदुविकार तज्ज्ञ, नेत्ररोग तज्ज्ञ, बालरोग तज्ज्ञ, स्त्रीरोग तज्ज्ञ, शल्यविशारद तज्ज्ञ असे विशेषीकरण आढळते.

**शिक्षण-प्रशिक्षण:**

साधारणत: बहुतांशी नागरी व्यवसायात प्रवेश करण्यासाठी निर्धारित शैक्षणिक पात्रतेची आवश्यकता असते. आणि अशी पात्रता धारण करणाऱ्या व्यक्तींना एखाद्या व्यवसायात प्रवेश करण्यासाठी परस्परांशी स्पर्धा करावी लागते. वेगवेगळ्या व्यवसायासाठी वेगवेगळी पात्रता असते. आणि ती धारण केली तरच तो विशिष्ट व्यवसाय करता येतो. उदा. एखाद्यास वकिली व्यवसाय करावयाचा झाल्यास कायदेशास्त्रातील पदवी (LL.B.) असावी लागते. कारखान्यात कुशल कामगार होण्यासाठी आय. टी. आय. पदविका असावी लागते.

**नियमावली:**

नागरी व्यवसायांमध्ये खास नियमावली केलेली असते. बहुसंख्य नागरी व्यवसायात औपचारीक संघटन (Formal organization) असते. त्यामुळे व्यवसायातील कर्मचाऱ्यांची अधिक्रमी रचना तयार केलेली

असते. या रचनेतील प्रत्येक पदाची कर्तव्ये, जबाबदाऱ्या, अधिकार, सोयीसुविधा इत्यादी बाबी नियमांनुसार निर्धारित केलेल्या असतात. आणि प्रत्येकास त्या नियमानुसारच कार्य करावे लागते. नियमभंग करणाऱ्यास शिक्षेची तरतूद केलेली असत. थोडक्यात नागरी व्यवसायातील सर्व व्यवहार हे कोणा एका व्यक्तीच्या मर्जीनुसार नव्हे तर नियमानुसार चालत असतात.

**मुद्राप्रधान व्यवस्था:**

नागरी अर्थव्यवस्था ही मुद्राप्रधान व्यवस्था असते. त्यामुळे नागरी व्यवसायात होणारे सर्व व्यवहार हे मुद्रेच्या/पैशाच्या रूपात होत असतात. उत्पादन, विनीमय, वितरण, उपभोग इत्यादी सर्व प्रक्रियांचा केंद्रबिंदू हा पैसा असतो. पैशाचे व्यवहार हे तोंडी न करता प्रामुख्याने लिखीत स्वरूपात केले जातात. त्यासाठी चेक, हुंडी, डिमांड ड्रॉफ्ट अशी साधने वापरतात. प्रत्येक व्यवहाराची लिखीत स्वरूपात नोंद करून ती कागदपत्रे जपून ठेवली जातात.

**संघटन:**

नागरी विभागातील बहुसंख्य व्यवसायात दृढ संघटन आढळते. बहुतेक व्यावसायिकांनी आपल्या हितसंबंधांचे रक्षण करण्यासाठी संघटना स्थापन केलेल्या असतात. शहरात व्यापारी संघटना, कामगार संघटना, उद्योगपतींची संघटना, डॉक्टरांची संघटना, वकील संघटना यांच्याबरोबरच मोलकरणीची संघटना, हमालांच्या संघटना देखील असतात. या सर्व संघटना आपापल्या हितसंबंधाचे संरक्षण करण्यासाठी शासनावर/समाजावर दबाव टाकीत असतात. आपल्या सदस्यांमध्ये ऐक्य व जागृती निर्माण करण्यासाठी परिषदा अधिवेशने, शिबीरे इत्यादींचे आयोजन करीत असतात. बऱ्याच व्यवसायात एकापेक्षा अधिक संघटना स्थापन केलेल्या आढळतात.

**व्यावसायिक गतिशीलता** (Occupational Mobility)

नागर समाजात व्यावसायिक गतिशीलता मोठया प्रमाणावर असते. एक व्यवसाय सोडून दुसरा व्यवसाय स्वीकारण्याची संधी, मुभा व वाव असणे यास व्यावसायिक गतिशीलता असे म्हणतात. शहरी समाजात व्यवसायांची प्रचंड विविधता असते. त्यामुळे व्यक्तिला आपल्या आवडीनुसार व्यवसाय निवडण्याची संधी व स्वातंत्र्य उपलब्ध असते. नागरी जीवनात व्यक्तीला आपली पात्रता, गुणवत्ता, कौशल्य इत्यादीत वाढ करून अधिक उच्च दर्जाचे व अधिक उत्पन्नाचे व्यवसाय मिळविणे शक्य असते. कर्तृत्ववान व्यक्तिच्या व्यवसाय बदलण्याच्या मार्गात वर्ग, जात, धर्म, प्रदेश इत्यादी अडथळे सहसा येत नाहीत. स्पर्धा परीक्षाव्दारे साधा क्लार्क हा कलेक्टर बनू शकतो. मेहनत करून एखादा कामगार कारखानदार बनू शकतो.

**नागरी व्यवसायातील परिवर्तन:**

औद्योगीकपूर्व शहरात व्यावसायिक व सामाजिक गतीशीलतेस फारसा वाव नव्हता. लोक आपल्या कुटुंबात पिढ्यांपिढ्या चालत आलेलाच व्यवसाय बहुधा करीत असत. कुटुंबाचा व्यवसाय सोडून नवीन व्यवसाय स्वीकारण्याचे धाडस सहसा करीत नसत. कारण रोजगारच्या किंवा व्यवसायाच्या संधी मोठ्या

प्रमाणावर उपलब्ध नव्हत्या. त्यामुळे औद्योगीकपूर्व शहरात व्यावसायिक गतीशीलतेचा अभाव होता. याउलट औद्योगिक शहरात व्यावसायिक गतीशलतेस भरपूर वाव असतो. वाहतुकीच्या साधनामुळे शहरातील लोकांना आपल्या व्यावसायासाठी एका ठिकाणाहून दुसर्या ठिकाणी जाणे शक्य होत आहे. तसेच शहरी समाजात व्यवसायाच्या भरपूर संधी उपलब्ध होत असल्यामुळे लोकांना आपल्या आवडीप्रमाणे व्यवसाय निवडण्याची व बदलण्याची संधि उपलब्ध होते. थोडक्यात शहरी व्यासायामध्ये परिवर्तन होत आहे.

शहरी लोकांचे व्यवसाय बिगरशेती स्वरूपाचे असतात. लहानमोठे उद्योग, कारखाने, व्यापारपेठ, विविध वस्तूंची विक्री केंद्रे, आरोग्य सेवेची केंद्रे, सल्लादायी केंद्रे, वाहतूक व संप्रेषणाची व्यवस्था, शिक्षणसंस्था,बँका, विमा कंपन्या, शासकीय व निमशासकीय कार्यालये इत्यादींची शहरात रेलचेल असते आणि त्यांच्यामध्ये काम करून शहरी लोक निर्वाह चालवतात. या सर्व व्यवसायांना बिगरशेती व्यवसाय म्हणतात. शहरात शेती व्यवसायासाठी आवश्यक असणाऱ्या वस्तूंचे उत्पादन व विक्री करणारे व्यवसाय असत्तात आणि त्यामधे शहरी लोक गुंतलेले असतात. असे व्यवसाय ही बिगरशेतीच मानले जातात. थोडक्यात खेड्यात शेती हा एकमेव प्रमुख व्यवसाय असल्याने तिथे व्यवसायाची एकविधता आढळते तर शहरात अनेक व्यवसाय असल्याने अनेकविधता आढळते.

शहरी समुदायात गतीशीलतेस मोठा वाव असतो. शहरात व्यक्तिवाद, व्यक्ति स्वातंत्र्य, दळणवळनाची प्रगत साधने, शिक्षण प्रशिक्षणाच्या सोयी व विविध व्यवसाय इ. उपलब्ध असल्याने व्यक्ति आपल्या पात्रतेत वाढ करून एका ठिकाणाहून दुसरीकडे जाऊ शकते.एक व्यवसाय किंवा नोकरी सोडून दूसरा व्यवसाय किंवा नोकरी करू शकते. तसेच कनिष्ठ स्तरातील व्यक्ति स्वकर्तुत्वाने उच्च शिक्षण, सत्ता, संपती, कला कौशल्ये इ. प्राप्त करून त्याधारे उच्च सामाजिक स्तर वा दर्जा मिळवू शकते. उदा. क्लार्कचा कलेक्टर होऊ शकतो.याउलट कर्तव्यशून्य व अकार्यक्षम व्यक्ति उच्च स्तरातून कनिष्ठ स्तराकडे फेकली जाऊ शकते. उदा. कारखानदाराचा कामगार होऊ शकतो. अशाप्रकारे शहरात व्यावसायिक गतीशीलतेस खूपच वाव असतो.

भारतात ब्रिटिश राजवटीत शहरांमध्ये मोठमोठे उद्योगधंदे उभारण्यास प्रारंभ झाला. देशाचा आर्थिक विकास घडवून आणण्यासाठी शेतीविकसाबरोबरच औधोगिक विकासावर भर देण्यात आला. देशातील विविध शहरामध्ये विविध प्रकारचे उद्योगधंदे उभारले गेले. जुन्या शहरांची वाढ व विस्तार झाला तर कांही नवीन शहरे उदयास आली. परिणामी शहरी व्यवसाय वाढण्यास मोठी चालना मिळाली. भारतातील नागरी समाज हा औद्योगिक समाजात रूपांतरित होत आहे. वाढत्या औद्योगीकरणामुळे शहरी व्यासायात मध्ये झपाट्याने बदल होत आहेत.

शहरी समाजात औधोगिक क्षेत्राप्रमाणेच सेवा क्षेत्राचा विसातर होत चाललेला आहे. शहरामध्ये व्यापार, वाणिज्य, बँका, वितपुरवठा, विमा, वाहतूक, शिक्षण, आरोग्य, मनोरंजन, प्रशासन,पर्यटन इत्यादि सेवांची वाढ व विस्तार होत चाललेला आहे. जागतिकीकरण्याच्या प्रक्रियेमधे संगणक, इंटरनेट, माहिती – तंत्रज्ञान इत्यादि सेवा शहरी व्यवसायामध्ये मोठ्या प्रमाणात वाढत असल्यामुळे शहरी व्यवसायमधे परिवर्तन होत आहे.

शहरी समाजात चैनीच्या वा कृत्रिम गरजा मोठ्या प्रमाणावर निर्माण होत आहेत. जाहिरातीच्या माध्यमातून त्या गरजा लोकांच्या मनावर ठसविल्या जात आहेत .त्यामुळे या गरजाच्या पूर्तीसाठी शहरी लोक भरपूर धडपड करीत आहेत. भारतीय बाजारपेठेत परदेशातील अनेक वस्तू उपलब्ध होत असल्यामुळे लोक मोठ्या प्रमाणावर अशा वस्तू खरेदी करू लागले आहेत साहजिकच मागणी वाढत असल्यामुळे शहरी समाजामधील व्यवसायात परिवर्तन होत आहे.

शहरी समाजातील व्यवसायामध्ये आर्थिक विषमतेत वाढ होत चाललेली आहे. शहरातील उच्चवर्गीय म्हणजे श्रीमंत लोक, उद्योजक, मोठे व्यापारी आणि गरीब व छोटे व्यापारी यांच्यातील विषमतेची दरी वाढत चाललेली आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत तर ही आर्थिक विषमता अधिकच वाढत चालली आहे. काही ठराविक व्यवसाय करणार्या लोकांना लाखो-करोडाचा फायदा होतो तर काही व छोट्या व्यवसायिकांना दोनवेळेचे जेवण मिळेले इतकेही उत्पन्न मिळत नाही. थोडक्यात शहरी व्यवसायात जरी परिवर्तन होत असले तरी आर्थिक विषमतेतील वाढ ही चिंताजनक आहे.

अशाप्रकारे औद्योगिकीकरण, नागरीकरण, वाहतूक व दळणवळण साधनांची वाढ, शैक्षणिक व आरोग्य सुविधांचा विस्तार, जागतिकीकरण, माहिती तंत्रज्ञानातील क्रांती इत्यादी घटकांचा प्रभाव पडून शहरी समाजातील व्यवसायामध्ये फार मोठे परिवर्तन होत आहे.

## **४.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न** (Check Your Progress)

खालील प्रश्नांची उत्तरे द्या.

१. कुटुंबाची कोणतीही एक व्याख्या द्या.

२. नागरी कुटुंबाची पाच वैशिष्टये सांगा.

३. सामाजिक वर्ग म्हणजे काय?

४. जात आणि वर्ग यातील एक फरक सांगा.

५. नागरी व्यवसायांची पाच वैशिष्टये नमूद करा.

## **४.५ सारांश** (Let us sum up)

ह्या चौथ्या अध्ययन घटकात तुम्ही नागर समाजातील सामाजिक संरचना समजून घेण्यासाठी नागरी कुटुंब, नागरी सामाजिक स्तरीकरण व नागरी व्यवसाय हया तीन बाबींचा अभ्यास केलेला आहे. नागरी कुटुंब हे केंद्र कुटुंब असून त्याचा आकार लहान असतो. या कुटुंबावर व्यक्तिवादाचा प्रभाव असून त्याची काही पारंपारिक कार्ये इतर संस्थांकडे हस्तांतरीत झाली आहेत. आज नागरी कुटुंबासमोर अनेक समस्या आहेत. त्यानंतर तुम्ही सामाजिक स्तरीकरणाचा अर्थ, जात व वर्ग यांचा अभ्यास केला आहे. तसेच नागर समाजातील सामाजिक स्तरीकरणाचे प्रकार म्हणून जातिव्यवस्था आणि वर्गव्यवस्था यांच्या स्वरूपाचे विवेचन अभ्यासलेले आहे. शेवटी नागर समाजातील व्यवसायांची काही ठळक वैशिष्टये उदा. बिगरशेती

व्यवसाय, कार्यविभाजन व विशेषीकरण, शिक्षण-प्रशिक्षण, नियमावली मुद्राप्रधान व्यवस्था, संघटन, व्यावसायिक गतिशीलता-अभ्यासली आहेत.

## ४.६ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे:

१. मार्शल जोन्सच्या मते कुटुंब ही लैंगिक संबंधावर आधारलेली एक सामाजिक संस्था असून प्रजोत्पादन व अपत्यांचे संगोपन ही तिची कार्ये आहेत.

२. नागरी कुटुंबाची पाच वैशिष्टये पुढीलप्रमाणे-

अ) नागरी कुटुंब हे केंद्र कुटुंब आहे.

ब) ते लहान आकाराचे आहे.

क) पितृसत्ताक अधिकाराचा ऱ्हास होत आहे.

ड) स्त्रियांचा दर्जा उंचावत आहे.

ई) व्यक्तिवादाचा प्रभाव आहे.

३. मॅकायव्हर आणि पेज यांच्या मते, ''सामाजिक वर्ग म्हणजे एखाद्या समुदायाचा असा कोणताही विभाग की जो त्याच्या सामाजिक दर्जामुळे इतर विभागापेक्षा वेगळा करता येतो.''

४. जात आणि वर्ग यातील एक फरक असा की जन्माने प्राप्त होणारा वर्ग व्यक्तीला स्वकर्तृत्वाने बदलता येतो मात्र जन्माने प्राप्त होणारी जात स्वकर्तृत्वाने बदलता येत नाही.

५. नागरी व्यवसायांची पाच वैशिष्टये पुढीलप्रमाणे-

अ) नागरी व्यवसाय हे बिगरशेती स्वरूपाचे असतात.

ब) नागरी व्यवसायात कार्यविभाजन व विशेषीकरण मोठया प्रमाणावर झालेले असते.

क) नागरी व्यवसायात प्रवेश करण्यासाठी शिक्षण-प्रशिक्षणाची गरज असते.

ड) नागरी व्यवसायात नियमावलीस महत्त्व असते.

इ) बहुतेक नागरी व्यवसायात संघटन आढळते.

## ४.७ स्वाध्याय/गृहपाठ (Exercise/Home assignment)

अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.

१. कुटुंबाची व्याख्या देऊन नागरी कुटुंबाची वैशिष्टये स्पष्ट करा.

२. नागर समाजातील जातिव्यवस्था व वर्गव्यवस्था स्पष्ट करा.

ब)   टीपा लिहा.

१. सामाजिक स्तरीकरण

२. नागर समाजातील वर्गव्यवस्था

३. नागरी व्यवसायांची वैशिष्टये

**चिंतन आणि कार्य**)

नागरी कुटुंबात परिवर्तन घडवून आणणाऱ्या घटकांची नोंद करा.

नागर समाजात जातीची पारंपारिक वैशिष्टये कशी शिथिल होत आहेत याचे निरीक्षण करा.

नागरी व्यवसाय व ग्रामीण व्यवसायातील भेद समजावून घेवून त्या आधारे भेददर्शक तक्ता तयार करा.

## ४.९ अधिक वाचनासाठी पुस्तके (Suggested Readings)


१. Rajendra K. Sharma, Urban Sociology: tlantic Publishers Distributors, New Delhi-1997

२. प्रा. चंद्रकांत खंडागळे, भारतीय समाज-रचना आणि परिवर्तन, प्रकाशिका मायादेवी खंडागळे, सांगली-२००६

३. प्रा. चंद्रकांत खंडागळे, नागर समाजशास्त्र अर्थात नगरांचा अभ्यास, प्रकाशिका मायादेवी खंडागळे, सांगली-२०२१


❑❑❑